म. ग्रं. सं. ठाणे
मूल्य क्र. ८४
सं. नं. ५८
१०२६९

तरी माया तुकिजे॥
कैसी । बाळका माय ? ॥
—श्रीज्ञानेश्वरी, अ० ११ वा.

# हृदयतरंग

[पुस्तक १ ले]

REFBK-0003162
REFBK-0003162

अनंततनय

सन १९२६

सं. ३०५ ८२

८२

३९६२

# हृदयतरंग.

पुस्तक ३ रें.

लेखकः—दत्तात्रेय अनंत आपटे.

[ सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन. ]

आवृत्ति १ ली.

REFBK-0003162

REFBK-0003162

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ३७६२
(प्रथम प्रत)

शके १८४८

१९२६

किंमत १। रुपाया.

प्रकाशक व मुद्रक,
शंकर नरहर जोशी.

अनंततनयांचीं नवीं पुस्तकें.
( छापत आहेत )

| | | |
|---|---|---|
| श्रीमत् तिलकविजय | पूर्वार्ध किंमत | २ रु. |
| श्रीमन्माधव काव्य | किंमत | १। रु. |
| आधुनिक कवींचीं चरित्रें | किंमत | १ रु. |


प्रसिद्धिस्थल.
'चित्रशाळा' प्रेस १०२६ सदाशिव
पेठ, पुणें.

# प्रस्तावना.

श्रीयुत अनंततनय हे महाराष्ट्राला चांगले परिचित आहेत. उदर पोषणाचा आवश्यक उद्योग सोडला तर बाकीचा त्यांचा सर्व उद्योग काव्य-विषयकच असतो हें आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या विपुल कवितासंग्रहावरून स्पष्ट दिसून येईल. यापूर्वी त्यांच्या कवितांचे दोन मोठे खंड प्रसिद्ध झाले होते व त्यांना प्रो० लक्ष्मणशास्त्री लेले व प्रो० श्रीकृष्ण निळकंठ चापेकर या विद्वानांनीं विस्तृत प्रस्तावना लिहून त्यांचा यथायोग्य परामर्ष घेतला होता. आज हा तेवढाच मोठा तिसरा खंड वाचकांच्या हातीं पडत आहे, हें पाहून प्रस्तुत लेखकाप्रमाणेंच महाराष्ट्र वाचकांना आनंद होईल यांत शंका नाहीं. कारण या भागामुळें वाचकांना श्रीयुत अनंततनयांच्या काव्य लाघवाविषयीं जितकें कौतुक वाटेल तितकेंच किंबहुना त्याहूनहि अधिक कौतुक त्यांच्या एकांतभक्तिमूलक चिकाटीबद्दल वाटल्याशिवाय राहणार नाहीं. श्रीयुत अनंततनय यांच्या काव्यकमळांचा जन्म प्रतिकूल परिस्थितीच्या कर्दमांत झालेला आहे, हें त्याविषयीं आपलेपणा वाटण्याचें विशेष कारण आहे. शेंकडों कोस तापून गेलेल्या अफाट साहारा वाळवंटांत, एकादें अखंड झरा वाहणारें शीतळ तालवन असावें त्याप्रमाणें प्रतिकूल परिस्थितीनें तापलेल्या जीवनांतहि प्रस्तुत कवीचें ' कविहृदय ' स्निग्धच राहिलें व त्याला काव्याचे अखंड पाझर फुटत राहिले याचें फार कौतुक वाटतें. स्वतःच्या आवडीचा विषय घेऊन त्यावर क्षणशः कणशः परिश्रम घेतले गेले तरीसुद्धां नांव घेण्यासारखें दृश्य फळ दाखवितां येतें हा सिद्धांत सिद्ध करावयाला श्री. अनंततनय यांचें उदाहरण समर्पक आहे. असो.

प्रस्तुत पुस्तकांत अनेक तऱ्हेच्या कविता संग्रहित झालेल्या आहेत. भावगीतात्मक, वर्णनपर, ऐतिहासिक, प्रासंगिक, खंडकाव्यात्मक, अन्योक्तिपर व्याजस्तुतिपर, विनोदपर, ईशस्तुतिपर वगैरे सर्व प्रकार त्यांत दिसतात. शिवाय अगदीं अलीकडे निघालेला सुनीत पंथहि त्यांनीं पावन करून घेतलेला आहे. प्रस्तुत पुस्तकांतील एक स्वतंत्र भागच सुनीतसंग्रहाला वाहिलेला आहे. पण अनंततनयांच्या परंपरापुनीत पद्धतीनें पाहिलें असतां त्या बाबतींत 'नवे चाळे पण जुनेच डोळे' असा प्रकार झाला आहे. 'बंधविमोचन' 'शिपाइ दादा नका ' ' मुक्त विहंग ' ' मनाशीं ' ' दुःखक्षोभाचे सुस्कारे '

इत्यादि कविता मला विशेष बऱ्या वाटल्या. अर्थात् रुचिभिन्नतेमुळें त्याच सर्वांना आवडतील असें होणार नाहीं, पण हा विशिष्ट कवितांच्या आवडी नावडींचा प्रश्न सोडला तरी एकंदर कवितांच्या वाचनानें वाचकाचा अनुकूलच ग्रह झाल्याशिवाय राहणार नाहीं. प्रस्तुत कवीची मनःप्रवृत्ति पुराणप्रिय आहे, त्याच्या कवितेचा वेष भारदस्त खरा पण जुन्या चालीचा आहे. कल्पनाविलासाचें तिला वावडें आहे, ती बरीच पोक्त झाली असूनहि धीटपणानें निसर्गाच्या उद्यानांत सहल करतांना दिसावयाची नाहीं. नवीन 'चालीं'चा ती फारसा स्वीकार करीत नाहीं. पण या सर्व गोष्टी खऱ्या असल्या तरी त्याच्या कवितेला हृदय आहे व तें प्रेमळ आहे. तिची कल्पनादृष्टि विकास पावलेली नसली तरी तिचें हृदय मात्र खास विकास पावलेलें आहे. तिला विनोद साधत नाहीं व क्वचित् तिनें तसा हटप्रयत्न केला तर तो गांवढळ विनोद होतो याचें कारण तिची मनःप्रवृत्ति गंभीर पण कांहींशी उदासीन आहे हेंच होय. पण त्याचा वचपा तिनें इतर गुणांनीं भरून काढला आहे. तो असा कीं ती जुन्या चालीची असूनहि तिची वाणी शुद्ध व मंजुळ आहे. आधुनिक कविता—तिला शिक्षणाचा सर्व संस्कार झाला असतांहि बऱ्याच वेळां अशुद्ध बोलते असें आढळल्यामुळेंच मुद्दाम वरील गोष्टीचा उल्लेख केला आहे. असो.

शेवटीं एका गोष्टीचा उल्लेख करणें आवश्यक वाटतें. प्रस्तुत खंडांत बऱ्याच व्यक्तिविषयक कविता आल्या आहेत. त्यांचा समावेश या भागांत केला नसता तरी चालण्यासारखें होतें. त्या कविता म्हणजे हृदयतरंग नाहींत असें नाहीं; परंतु मनांत येणाऱ्या सर्वच ऊर्मी जनतेपुढें मांडणें कित्येक वेळां बरोबर नसतें. त्यांत विवेक केलाच पाहिजे.

९-१-२७. न. चिं. केळकर.

---

क्र. नं. ३७९२ ... शाळा (१९४६ ...)

# हृदयनिवेदन.

काय मी पामर । जाणें अर्थभेद ॥
वदवी गोविंद । तेंचि वदे ॥

—श्रीतुकाराम.

हृदयतरंगाच्या पहिल्या पुस्तकाची पहिली आवृत्ति व दुसरें पुस्तक हीं महाराष्ट्राला सादर करून आज अनुक्रमें अकरा व सहा वर्षे झालीं. दोन्ही पुस्तकांचें महाराष्ट्रानें आपल्या ऐपतीप्रमाणें कोडकौतुक केलेलें पाहून लेखकास हें तिसरें पुस्तक–नव्हे–त्रिदल, आज श्रीमहाशिवरात्रीसारख्या पवित्र दिवशीं, शिरोभागीं म्हणजे उत्तरेला असणाऱ्या पुण्यजला नर्मदेच्या योगानें सहजसुंदर नर्मदामौली ॐकारस्वरूपी महाराष्ट्राच्या चरणीं अर्पण करतांना कृतकार्य वाटत आहे. काव्याबद्दल त्यास काय अल्पस्वल्प विवेचन करावयाचें होतें तें त्यानें पहिल्या पुस्तकांतच केलें आहे. शिवाय प्रस्तुत लेखकाच्या काव्याचाहि विद्वद्वर्य प्रो० लक्ष्मण गणेश लेले व श्रीकृष्ण निळकंठ चापेकर यांनीं यथासांग परामर्ष घेतला आहे. तेव्हां आतां या पुस्तकाचा विशेष काय आहे हें सांगणें हेंच आजचें निवेदनकार्य होय.

या पुस्तकांत एकंदर ५३ शब्दचित्रांचा समावेश केला असून त्यांपैकीं १० खंडकाव्यें व ४३ स्फुट कविता आहेत. यांचीं पूर्वीप्रमाणेंच ८ मंडलें केलीं असून त्यांस 'तरंग' हीच संज्ञा दिली आहे. सामाजिक व धार्मिक असे दोन नवीन तरंग या पुस्तकांत प्रविष्ट केले आहेत.

प्रस्तुत पुस्तकांतील दुसरी निर्देश्य गोष्ट म्हटली म्हणजे त्यास सुप्रसिद्ध साहित्याचार्य रा. रा. नरसिंह चिंतामण केळकर, बी. ए. एल्. एल्. बी. संपादक 'केसरी' यांनीं लिहिलेली प्रस्तावना ही होय.

श्रीयुत तात्यासाहेब केळकरांसारख्या राजनीतीच्या तीव्र तपस्येंत निरंतर निमग्न असणाऱ्या गृहस्थांनीं आजच्यासारख्या आणीबाणीच्या प्रसंगीं–त्यांतहि पुन्हां आजारी असतांना–प्रस्तुतसारख्या काव्याच्या पुस्तकाला प्रस्तावनेदाखल, दोन शब्दच का होईनात, पण ते लिहून देणें म्हणजे खरोखर मोठाच अनुग्रह मानिला पाहिजे. त्यांचे दोन शब्दांत आभार मानून मोकळे होण्यापेक्षा त्यांच्या उपकारांत निरंतर बद्ध होऊन राहण्यांतच विशेष स्वारस्य आहे.

असो. प्रस्तुत पुस्तकांतील कवितासंबंधानें लेखकानें आजपर्यंतच्या आपल्या शिरस्त्याप्रमाणें मौन स्वीकारण्यांतच औचित्य होतें पण तात्यासाहेबांनीं प्रस्तावनेंत प्रस्तुत लेखकाचा विनोद 'गांवढळ' आहे असें जें म्हटलें आहे त्याबद्दल थोडासा विवेक केल्याशिवाय गत्यंतर नाहीं! तारीख २६-११-२१ इ. रोजीं बडोदें येथील दहाव्या साहित्यसभेच्या अध्यक्षस्थानावरून श्री. तात्यासाहेबांनीं प्रस्तुत लेखकाच्या विनोदाबद्दल खालील उद्गार काढिले आहेत:—

"आधुनिक कवींत मोगरे, कोल्हटकर, गोविंदाग्रज व अनंततनय यांची विनोदी कविता बरीच उच्च दर्जाची आहे. 'परतंत्र कोण,' 'घरची वाट,' 'स्वर्गाच्या द्वारांत' या अनंततनयांच्या विनोदी काव्यांत उपहास आणि उपरोध हे विनोदगुण प्रमुख आहेत. यांपैकीं 'स्वर्गाच्या द्वारांत' हें काव्य अपूर्ण आहे. तें पूर्ण झाल्यास मराठींत एका उत्तम उपहासात्मक काव्याची भर पडेल. अनंततनय × × × यांच्या लहान मुलांविषयींच्या कवितांत चांगला घरगुती विनोद साधला आहे. अनंततनयांच्या 'लक्के पैथे लक्के आंबे,' व 'हट्टी मुलांची दिवाळी,' या कविता × × × त्या दृष्टीनें फार बहारीच्या उतरल्या आहेत."

वस्तुतः लेखकास उपर्युक्त दोषदिग्दर्शनाविषयीं स्वतःच्या वतीनें एक 'ब्र'हि उच्चारावयाची इच्छा नव्हती; किंबहुना श्री. तात्यासाहेब केळकर हे बृहन्महाराष्ट्रांत वाङ्मयाच्या बाबतींत अधिकारी पुरुष असल्यामुळें त्यांनीं त्याच्या काव्यदोषासंबंधीं आणखी कांहीं जरी म्हटलें असतें, तरी तें त्यानें सादर ऐकिलें असतें. परंतु उपर्युल्लेखित परस्परविरोधी विधानें वाचून त्यांच्याबद्दल—लेखकाबद्दलहि—कदाचित्—कांहीं वाचकांचा निष्कारण होण्याचा संभव असलेला गैरसमज टाळण्याकरितांच वरील मजकूर केवळ प्राप्तकर्तव्य म्हणून लिहिला आहे. तात्यासाहेबांच्या वरील विरोधी विधानांची उपपत्तीच लावायची झाल्यास लेखकास इतकेंच सांगतां येईल कीं, प्रस्तुत पुस्तकांत 'विनोदलहरी' नांवाची एक कविता आहे ती पानें चाळतां चाळतां त्यांनीं ओझरती वाचली असावी व तेवढ्यावरच वरील विधान त्यांच्याकडून कार्यबाहुल्याच्या व्यग्रतेंत सहज होऊन गेलें असावें! वस्तुतः वरील कविता लेखकाच्या विनोदी भावनेंत किंवा वृत्तींत झालेली नसून त्यानें ती लोकमान्यांची एका विवक्षित प्रसंगाची 'सुखद संस्मृति' म्हणून गाइली आहे; शिवाय 'विनोदलहरी' या कवितेंत साधा निरुपद्रवी विनोद नसून तिच्यांत तीव्र उपरोध व उपहास आहे!

" व्यक्तिविषयक कवितांचें प्रसिद्धीकरण करतांना—जरी त्या हृदयतरंगच असल्या तरी—विवेक हा केलाच पाहिजे," अशा आशयाची त्यांनीं लेखकास एक बहुमोल सूचना केली आहे व ती त्यांच्या अधिकाराच्या दृष्टीनें योग्यच आहे. परंतु याहि बाबतींत 'परंतु'चें लोणचें किंवा विरजण घातल्याखेरीज निवेदनाची पूर्तता वाचकांच्या दृष्टीनें तरी होणार नाहीं. तरंगाच्या प्रस्तुत पुस्तकांत वैयक्तिक स्वरूपाचा केवळ आभास उत्पन्न करणाऱ्या कांहीं कविता असल्या तरी त्या तशा नाहींत; केवळ खासगी व्यक्तिमत्त्वाचा त्यांत संबंधहि न येऊं देतां सामाजिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या तत्त्वांना बाध येण्याचीच जेथें भीति वाटली तेथेंच त्यांच्यावरचे बुरखे किंचित् मागें सारिले आहेत इतकेंच! समाजाच्या सर्वसामान्य घटकांपैकीं एक न होतां त्यांच्या शिरोभागीं अधिष्ठित होणाऱ्यांना किंवा व्हावं याची उच्च आकांक्षा धरणारांना खऱ्या अर्थदृष्टीनें खासगी व्यक्तिमत्व विसरलेंच पाहिजे—नव्हे—त्यांना तें उरतच नाहीं! राजा राजदरबारांत सिंहासनावर बसला असतांना जसा तो राजा असतो तसा तो राजमार्गावरून हिंडतांना किंवा राजप्रासादांत विलास भोगतांना राजाच असतो. राजप्रतिनिधित्वाची मानमान्यता उपभोगणारा माजिस्ट्रेट हा कोठेंहि व केव्हांहि माजिस्ट्रेटच असतो हें विसरून कसें चालेल?

असो. जेवतांना मुलें ज्याप्रमाणें पहिल्यानें मोदकाच्या पाऱ्या खाऊन त्यांतील सारण शेवटचा गोड घास घेण्याकरितां बाजूस ठेवतात त्याप्रमाणें आभारप्रदर्शनाचा ठेवलेला शेवटचा गोड घास घेऊन प्रस्तुत निवेदन आटोपतें घेऊं. इचलकरंजी संस्थानचे दानशूर अधिपति श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे यांनीं हृदयतरंगाच्या प्रथम पुस्तकाप्रमाणें हें पुस्तकहि त्यांस समर्पण करण्याची परवानगी दिली याबद्दल लेखक त्यांचा अत्यंत ऋणी आहे. श्रीमंतांनीं या लेखकाच्या बहुतेक कृतींना, कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपानें साहाय्य देऊन त्याच्या शिरावर इतकीं जबरदस्त ऋणें करून ठेविलीं आहेत कीं, त्यांतून त्यास मुक्त होणें अशक्य आहे. पहिल्या दोन पुस्तकांप्रमाणें या पुस्तकाच्या वेळींहि लेखकाचे परम स्नेही प्रो० श्रीकृष्ण निळकंठ चापेकर, एम्. ए. एल् एल् बी. डेक्कन कॉलेज पुणें, व सुप्रसिद्ध धार्मिक लेखक श्री० कृष्णाजी गोविंद किनरे, संस्कृतभाषाकोविद महादेव पांडुरंग ओक व कवि गिरीश यांनीं त्यास जें अपूर्व साहाय्य केलें त्याबद्दल तो त्यांचाहि ऋणी आहे.

चालू परिस्थितीवरून पाहतां तूर्त तरी हृदयतरंगाचें हें तिसरें म्हणजे शेवटचेंच पुस्तक होय असें म्हणावयास हरकत नाहीं. इ, स. १८९६ पासून १९२६ अखेर-पर्यंत झालेल्या बहुतेक स्फुट व खंड कवितांचा संग्रह या तीन पुस्तकांत झाला आहे. आरंभीच्या काळांतील सरासरी ५०।७५ कविता अनुपलब्ध आहेत. उपलब्ध असून स्थलाभावामुळें यांत ग्रथित करितां आल्या नाहींत व अद्याप कांहीं अपूर्ण अशा लहानमोठ्या सरासरी १५।२० कविता उरल्या आहेत. यापुढें अर्धवट लिहून झालेलें ‘ श्रीमन्माधव काव्य ’ व ‘ श्रीतिलकविजय ’ हे दोन काव्यग्रंथ हृदयतरंगाचें चौथें व पांचवें पुस्तक म्हणून महाराष्ट्राचे चरणीं मनोभावें सादर करण्याची इच्छा आहे; ती पूर्ण होणें परमेश्वरी कृपेवर अवलंबून आहे. असो. अशा प्रकारें केवळ श्रीशारदागुणें झालेलें हें काव्यकर्तृत्व त्या प्रणवरूपिणी मंगल जगन्मातेच्या चरणीं प्रणामपूर्वक सादर करून श्रीज्ञानेश्वरांच्या शब्दांनीं प्रस्तुत निवेदनाचा समारोप करतों.

आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें ॥
तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ॥ १ ॥
जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रति वाढो ॥
भूतां परस्परें पडो । मैत्र जीवाचें ॥ २ ॥
दुरिताचें तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्यें पाहो ॥
जो जें वांच्छील तो तें लाहो । प्राणिजात ॥ ३ ॥
वर्ततें सकल मंगलीं । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ॥
अनवरत भूतळीं । भेटो तयां भूतां ॥ ४ ॥

४७०, शनिवार पेठ, पुणे.
श्रीमहाशिवरात्रि शके १८४८.

सर्वांचा कृपाभिलाषि,
अनंततनय.

# अनुक्रमणिका.


| विषय | पृष्ठ | रचनाकाल | प्रसिद्धिसाधन |
|---|---|---|---|
| **तरंग १ ला.** | | | |
| १ राष्ट्रीय प्रार्थना | १ | ३१।१।२० | चित्रमयजगत |
| २ षट्पदी स्तोत्र | ३ | १८।२।२० | ” |
| ३ साधनपंचक | ५ | १।१।२५ | काव्यरत्नावली |
| ४ यशोदाकृष्ण | ६ | १४।१२।२४ | चित्रमयजगत् |
| ५ जिवाशिवांची० | ७ | २७।१२।२४ | ” |
| ६ श्रीमत् तिलकाष्टकम | ८ | २३।८।१९०८ | राष्ट्रमत |
| ” | | ४।३।२३ | शारदा |
| ” | | १०।४।२३ | ” |
| ” | | १७।७।२६ | रत्नाकर |
| ७ प्रतिज्ञापारायण | ११ | १६।९।२० | चित्रमयजगत् |
| ८ गणेश चतुर्थीचे चंद्रास— | १३ | १६।९।२० | ” |
| **तरंग २ रा.** | | | |
| १ बंधविमोचन | १५ | १५।७।२२ | काव्यरत्नावली |
| २ लोक० व त्यांच्या गार्या | २५ | २९।१०।२० | स्वाध्याय |
| **तरंग ३ रा.** | | | |
| १ नीज भारता ! नीज० | २८ | १९।१।२१ | चित्रमयजगत् |
| २ शिपाइ दादा नका ! | ३० | ८।१।२५ | ” |
| ३ मुक्त विहंग | ३१ | | ” लोकसत्ता |
| ४ आटप तव हें गान ! | ३४ | २०।७।२४ | स्वातंत्र्य |
| ५ मनार्शी— | ३५ | १०।१।२२ | काव्यरत्नावली |
| ” | ३५ | १७।४।२२ | ” |
| ” | ३६ | २०।७।२२ | ” |

| | | | |
|---|---|---|---|
| मनाशीं | ३७ | २४।७।२६ | चित्रमयजगत |
| ” | ३९ | | ” |
| ६ बाल अलवं आहे ! | ४१ | १३।७।२२ | शिक्षण |
| ७ गुरुमहिमा ! | ४७ | १८।१२।२५ | चित्रमयजगत् |
| ८ आमचे आधुनिक० | ४४ | १७।३।०७ | लोकमित्र; का. रं. |
| ९ श्रीशारदादूतिका (पूर्वार्ध) | ५३ | १२।१।१३ | केरळकोकिळ |
| ” उत्तरार्ध | ७२ | १०।१०।१३ | ” |
| १० स्वनितसुमनें | | | |
| १ प्रतिध्वनि | ९३ | २१।३।०७ | अप्रसिद्ध |
| २ सॉनेट | ९४ | १९।२।२३ | ज्ञानप्रकाश |
| ३ स्वनीत कीं सुर्नात | ९४ | २४।५।२४ | चित्रमयजगत |
| ४ विधिविलमित | ९५ | १३।२।२३ | लोकमान्य |
| ५ विधिविपर्यास | ९६ | १६।२।२३ | ज्ञानप्रकाश |
| ६ बाबू सुब्रह्मण्य ! | ९६ | १८।३।२३ | चित्रमयजगत् |
| ७ प्रेसि० विलसन् | ९६ | १०।४।२४ | ज्ञानप्रकाश |
| ८ कविवर्य मोरोपंत | ९९ | ७।५।२४ | चित्रमयजगत् |
| ९ लॉर्ड बायरन् | ९९ | ७।५।२४ | अप्रसिद्ध |
| १० नाहीं ऐसें कधीं० | १०० | १६।७।२६ | ” |
| **तरंग ४ था.** | | | |
| १ पुण्याची पर्वती | १०१ | २१।३।२० | सार्वजनिक सभा त्रै० |
| २ जरिपटका | १११ | ३।२।२१ | काव्यरत्नावली |
| ३ वीर विश्राम | ११९ | २५।१२।२० | चित्रमयजगत् |
| ४ जावळीचा पोवाडा | १२२ | २७।४।२४ | काव्यरत्नावली |
| **तरंग ५ वा.** | | | |
| १ मार्जार स्वामी० | १३३ | ७।३।२३ | ” |
| २ तयाला भव स्वर्ग० | १३४ | ” | श्रीरामकृष्णांचा उपदेश |
| ३ नववत्सरास– | १३५ | १२।१।२४ | काव्यरत्नावली |
| ४ विनोदलहरी | १३७ | २८।७।२४ | स्वातंत्र्य |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ खादी ! | १३८ | ७।९।२६ | अप्रसिद्ध |
| **तरंग ६ वा.** | | | |
| १ दुःखक्षोभाचे सुस्कारे | १४१ | ११।७।२० | चित्रमयजगत् |
| २ राजर्षीचें स्वकीय सांत्वन | १४४ | ३०।१२।२४ | काव्यरत्नावली |
| ३ काशीविरह | १४६ | २०।१।२६ | |
| ४ दिवंगता द्वारावतीस— | १४७ | १०।२।२६ | अप्रसिद्ध |
| **तरंग ७ वा.** | | | |
| १ बोधचषक | १४९ | २१।४।०६ | काव्यदोहन |
| **तरंग ८ वा.** | | | |
| १ वरविक्रय ! | १५५ | | अप्रसिद्ध |
| २ अंतर्विद्धकलिका ! | १६० | १५।२।१६ | काव्यरत्नावली |
| ३ स्वर्गाचे द्वारांत— | १७८ | १०।१२।२६ | चित्रमयजगत् |

श्रीमंत
नारायणराव बाबासाहेब घोरपडे, इचलकरंजी.



# अर्पणपत्रिका.


श्लोक—स्रग्धरा.

ज्यांहीं दर्भास्रमुष्टि त्यजुनि धरियली लेखनी—खड्ग हातीं
चातुर्यें विक्रमानें रिपुमद हरिला तीव्र सद्दृष्टिपातीं
बाळाजी विश्वनाथ प्रथित सुयश ते आदिपंतप्रधान
त्यांची विख्यात कन्या सगुणमतिपटू आनु नाम्ना निधान- १
त्यांच्या वंशीं नरेंद्रा तुजसि जनु मिळे ईशलीला अपूर्व
झालीं पन्नास वर्षें शुभदिनिं अजि या लाधलें पुण्यपर्व;
न्यायें त्वां वागवीलें सकल निजजनां केवल स्वप्रजैव,
अर्पीं मी आजि तूतें सुदलकमल हें मानुनी थोर दैव ! २
लाधो कल्याणधामा जय तुज गरिमा आयु—वृद्धि प्रकामा,
सत्कीर्तीचे ललामा सतत तुज रमा प्रेष्ठ साधोनि कामा.
चारी खंडांत नामा तव कृतिसुषमा वाढवो तेविं भामा
मागें मी हेंचि रामा गुरुतममहिमा, गाइं घे या प्रणामा. ३

करवीर, श्रावण कृ० ६
श. १८४८.

अनंततनय.

# द्वादशदलकमलबंध




मु. करवीर

श्रावण कृ. ६ शाके १८५८

अनंततनय.

तव तें जो ओपी, तो पापी, जीव न-जिवडा झोंपी-
नच रे तो गेला, परि मेला, स्वहितातें आंचवला,
कारण निर्बलता, ही नवरी, लावे त्यास भिकारी-
करुनी निमिषांत, निःपात, विश्वासानें घात,
म्हणुनी तव पायां, शक्तिमया, प्रार्थूं यादवराया ! जन्मा० ॥ १ ॥

* * * *

जें जें सुख दास्यीं, अविनाशी, खुलवी, रमवी, त्यासी—
रोधाया आम्हां, जितकामा, शक्त करीं अभिरामा,
प्रखरप्रभ रवि तो, आतप तो, जेवीं शीर्षीं धरितो,
तेवीं दुःखभर, सुदुर्धर, वाहूं देउनि शीर—
घालूं तव चरणीं, विश्वमुनी, कीं हरि तूंच निदानीं,
देउनि बलवीर्य, हरिहृदय, होशिल साच सहाय.
शक्त करीं आम्हां, बलधामा, कीं, तव भजनप्रेमा—
भक्तीच्या सुमनीं तो फुलुनी, लवेल कृतिसुफलांनीं,
शक्त करीं आम्हां, विश्रामा, अभिनवपावननामा,
असतिल जे कोण, बहु दीन, दुर्गतिदुःखविलीन,
त्यांचा अपमान, कीं छलन, कधिंही आम्हि करूं न,
बंधूसम सदया, परी तयां मानूं कीं अविकार्या ! जन्मा० ॥ २ ॥

## [ स्रग्धरा ]

स्वार्थातें देउनीयां मधुरतम तुझें धूर्त नामाभिधान,
त्वेषानें मारती कीं झगडत मरती बा तुला जाणतां न;
बंधूंच्या घातपातें प्रशमित करिती आपुली क्षुत्पिपासा,
क्रोधाग्नीला तुझ्या ते बळि पडुनियां पावती कीं प्रणाशा. १
स्वातंत्र्यासाठिं त्या जें प्रकट शुचि तुझें मूर्त दिव्य स्वरूप,
सोसूं दुःखें प्रमोदें स्वहृदयिं धरुनी धैर्य तैसा हुरूप;
राज्यासाठीं तुझ्या त्या ' हृदयमिळवणी ' शोभतें नाम ज्यातें,
शौर्यानें सज्ज होऊं अगणित विपदीं तोंड बा ! द्यावयातें ! २
सत्यार्थे सत्स्वरूपा अघटितघटना घेउनी शीर हातीं,
धारातीर्थीं सुखानें झगडत मरुनी गाजवूं नामकीर्ती;

शश्वत्सौख्याप्तिसाठीं सकरुणहृदया चांग वा काय जें जें,
तें तें सारें विशेषें प्रथितबलयशा मेळवूं स्वीय तेजें ! ३

*		*		*		*

झाला हा कर्णधारा ! प्रगतिपथ सुरू आज दीर्घ प्रवासा
सर्वारंभीं म्हणोनी प्रणति तुज असो मार्गविघ्नप्रणाशा !
गर्जे क्षोभोनि वात्या उसळति वरती वीचिका क्रोधराशी,
निष्ठा ठेवोनि आम्ही तुजवरि सदया होतसूं मार्गवासी. ४
दुःखांचे घावयातें बळि तुजपुढती सज्ज ही नाविका रे,
झालीसे विघ्नमाला चल चल पुढती विद्ध का भीतिभारें ?
वात्यात्मा वाहताहे मधु मधु वचनें येइं येइं म्हणून,
जिंकाया भीति वेगें, परिस परिस तें कां असा खिन्न दून ? ५
मैंदांची मंदधींची फिरुनि फिरुनि ही कां करावी प्रतीक्षा ?
संदेहें व्यर्थ कालव्ययचि करितसूं ही न सार्था तितीक्षा !
वायां जी काळहानि प्रगतिपथिं घडे एकट्याचीच नाहीं,
नाहीं हा भार एका तुजवरि हरि रे आम्हिही भारवाही. ६
आयुः शश्वन्महाब्धी, परम तरल जो जन्ममृत्युप्रकार,
श्वासोच्छ्वास प्रभो, ते तव मज सदया, वाटती निर्विकार;
किंचिल्लाभें न मानो विजय हृदय हें वागवो नित्य हेंच–
" जेवीं तूं आमुचा कीं, खचित हरि असूं आम्हि तेवीं तुझेच "! ७

---

## षट्पदी स्तोत्र.

[ पृथ्वी. ]

हरी ! अविनया हरीं, दमन चित्त माझें करीं,
तशी विषयतृष्णिका शमविं जीवना ! लौकरीं;
दया वितरिं सारखी सकल भूतमात्रावरी,
भवांबुधिंत या बुडें; कर धरूनियां उद्धरीं.
रमेशपदपद्मिंची मधुमरंदमंदाकिनी,
सुगंधसुखमाधुरी विमल सच्चिदानंदिनी;

सभक्ति परिसेवितां, भवभयापदा दुःखदा—
निवारि पदपद्म जें प्रणति त्या करीं मी सदा. २
अभेद उभयीं जरी; जन तुझा असें मी खरें,
' मदीय ' परि ' तूं ' असें तुज कसें म्हणावें बरें ?
असे खचित वस्तु तें जरि तरंग सामुद्रिक,
नसे प्रभुवरा ! तरी जलधि खास तारंगिक ! ३
परस्परविरोधिनीकृतिपरा नगोद्धारका !
नगारिनवबांधवा दनुजवृंदविध्वंसका !
सुधांशु सुहृदांस तूं बघुनियां त्वदैश्वर्य तें,
कुणा भवतिरस्कृतां बलनिधे न वाटेल ते ? ४
अनेक अवतार तूं धरुनि मत्स्यकच्छादि ते,
सदैव हरि रक्षिलें सकलकामदुघ् भूमितें;
भवत्रिविधताप हा ! भयभरें मती घाबरे,
प्रभो शरण भीत हा अभय देउनी रक्षिं रे ! ५
अनंतगुणमंदिरा ! भवनभांडदामोदरा !
भवाब्धिमथमंदरा ! भजकधीतमोभास्करा !
सुवर्णतनु सुंदराननसुकंज गोविंदजी !
मदीय भय तूं हरीं तुजसि हीच याञ्चा अजी ! ६
अगा प्रणतवत्सला ! सकलहेतु ! नारायणा !
तुझ्या चरणपंकजीं शरण विघ्नविध्वंसना !
स्तवार्थ तव गायिली मधुर शंकरें[1] षट् पदी,
वसो वदनसारसीं सतत ती जशी षट्पदी[2] ७

---

१ श्रीमत् शंकराचार्य यांनीं. २ भ्रमरी ज्याप्रमाणें कमलांत वास करते त्याप्रमाणें ही—स्तोत्र षट्पदी माझ्या वदन—कमलांत अक्षय्य वास करो असा भावार्थ.

# साधनपंचक स्तोत्र.

आर्या. [ गीति. ]

वेदाध्ययन करावें, कर्मं तत्प्रोक्त नित्य साधावीं,
पूजावा परमेष्ठी, सकाम कर्मीं न बुद्धि रातावी. १
दुरितौघ दूरवावा, संसृतिसुख दोषयुक्त लेखावें,
आत्मेच्छा वळवावी, निजसदना सपदि सोडुनी जावें. २
सत्संग आदरावा, ध्यावा भगवान् अनन्य सद्भावें,
दृढ कर्मा टाळावें, शांत्यादिक वित्त नित्य जोडावें. ३
आत्मज्ञीं नत व्हावें, तत्पदकमला सदैव सेवावें,
प्रणवार्था चिंतुनियां श्रुतिशिरवचना सभक्ति परिसावें. ४
वाक्यार्थाचें करुनी, मनन श्रुतितें प्रमाण मानावें,
मिथ्या तर्क त्यजुनी, श्रुतिमतमान्यांसि आदरें घ्यावें. ५
'ब्रह्मास्म्यहं' वदावें, गर्वाहंकार सर्व वर्जावा,
देहा ' मी ' न गणावें, ज्ञात्यासंगें न वाद घालावा. ६
क्षुध् वा व्याधि चिकित्सुनि, भिक्षा कीं भेषजांसि सेवावें,
मधुरान्न न मागावें, दैववशात् जें मिळेल तें घ्यावें. ७
शीतोष्णादि सहावें, निरर्थ वाणी कदा न बोलावी,
औदास्यास वरावें, लोककृपा-अवकृपा विसर्जावी. ८
बैसुनि एकान्ति सुखें, परमात्मीं दृढ समाधि लावावी,
आत्मानुभाव घ्यावा, जगतीं तद्बाधिता समीक्ष्यावी. ९
आत्मबलें प्राक्कर्मा त्यजुनी क्रियमाणही न सेवावें,
प्रारब्धभोग भोगुनि, ब्रह्मीं संलग्न तें स्वतां व्हावें. १०

* * * *

आर्या दहा अशा या, पठन करी जो समोद सद्भावें,
चिंतन करील नेमें, स्थैर्य मनीं सप्रमाण तो पावे. ११
ज्ञानप्रबलसमीरें करुणाकादंबिनी वळंघोनी,
संसृतिदवाग्निदुस्सहतापा टाकील शीघ्र शमवोनी. १२
आचार्यें जें कथिलें साधनपंचक मुमुक्षुजीवांस,
दिधलें अनंततनयें रूप मराठी सयत्न हें त्यास. १३

## यशोदाकृष्ण !

[ चालः—राधाधरमधुमिलिंद...... ]

राहिं असा इथं बसून । कान्हया । काथिं मी तुज निक्षून;
अचपळ किति तूं, निचळ न बससी, पळही कैसा टिकून ! ॥ध्रु०॥
रात्रंदिन सांगून । कान्हया । दमल्यें तुज वळवून,
दुडुदुडु पळसी, बुदुबुदु पडसी, गेले गुडघे फुटून ! १
आतां कपिला दुहून । कान्हया । धारोष्णानें भरून-
गडू ठेविला, प्याया तुजला, दिलास ना लवंडुन ! २
दाव्यानें करकचून । कान्हया । टाकूं तुज बांधून-
उखळीशीं, परि केले तुकडे, तूंच तिला उलथून ! ३
चोर पावलीं लपून । कान्हया । भितिंभितिला धरून,
वाकुडमान्या ! डोळा माझा जाशि कुठें चुकवून ? ४
वळसि न तूं कीं अजून । कान्हया । सांगूं वर जाऊन ?
राहो माझी तिकडचीही, भीति न तुज ये दिसून ! ५
गाल असे फुगवून । कान्हया । डोळे कीं मिचकून-
पाहुं नको मज, गोड कराया, खुदु खुदु गालीं हसून. ६
पाउल पाउल सरून । कान्हया । पुढेंच जाशी अजून-
राधेगृहिं तव, काय डबोलें, सांग ठेविलें पुरून ? ७
मणिमोत्यांनीं खचून । कान्हया । रेशमांत पटवून-
बिंदि आणिली, नवी तुला ही, बघुं दे मज बांधून. ८

[ स्रग्धरा ]

बोलोनी हें, यशोदा हरिस धरि तदा, डांबुनी स्वीय जंघीं,
पाही लावोनि बिंदी कशि किति खुलते त्याचिया उत्तमांगीं;
गेली रंगोनि वृत्ती मतिहि हरपली, दिव्य नेत्रोत्सवांत,
विश्वाच्या अंबिकेचे सुभग नयन त्या ठेवुं आम्हां सुखांत !

## जिवाशिवांची जडली समाधी !

[ चालः—या हो सज्जन जन हो..... ]

व्हाना, मोठे अंमळ व्हाना, नंदयशोदाप्राणा !
हात जोडिल्यें, दया भाकल्यें, द्या इकडे अवधाना । ध्रु०
वांच्छा, असती ज्या स्वजनांच्या, पुरवाया त्या त्यांच्या-
क्षम नच कोणी, ओढा तरि झणिं भृकुटिधनुप्रत्यंचा;
डोळे, उघडुनियां या वेळे, पहा सृष्टि-सोहाळे
शृंगाराश्रय शृंगारांचे; बघून मन का भाळे ?
चंदा, निशादेविचा बंदा, पहा पहा गोविंदा !
चषक सुधेचे तिचे भरित हा फिरे किती शरमिंदा ।
कान्हा, मोठें रूप धराना, करूं नका अनमाना,
बंध तोडुनी छंद घेतला कां हो पूर्ण कराना ?
जोडी, नसतां जगतिं न गोडी, पहा प्रचीती थोडी,
वसंत नसतां कोकिलपंचम काय मनाला ओढी ?
भृंग, किंवा कृष्णकुरंग, दुष्टोद्दाम भुजंग,
कुंजकुरंगीसारंगीविण होति न सौख्यीं दंग !
वेली, सौभाग्याचे दोलीं, बसुनी न करी केली,
विनातरू ती डुले न हाले दिसे न वा रंगेली !
व्हाना, म्हणुनि तुम्हां म्हणत्येंना, मोठे अंमळ व्हाना;
जोड देउनी इहजन्मींचे कोड हरी पुरवाना !
हात, नुरले आज कह्यांत, सरसरती निर्भ्रांत,
आलिंगाया, तुम्हां कान्हया, दिव्य तया रूपांत;
डोळे, विसरुनि अवघे चाळे, जणुं मदघूर्णित झाले,
उजवाया निज वक्षःस्थल तें आतुरले वनमाले !
नासा, न करी श्वासोच्छ्वासा, घाबरल्यें हृषिकेशा !
उत्कंठित त्या दिव्यतनूच्या घ्याया मधुर सुवासा;
कान, शब्द न ऐकति आन, झाले बघ गतभान,
ऐकायातें सुंदरमुखिंचें नाद ब्रह्मज्ञान !
पाय, काय वदूं निरुपाय, पाहुनि मज असहाय-

कुंजवना प्रेरिती चलाया प्रसहें मज यदुराय !
नाथा ! कुठवर गाऊं आतां, एकेकांची गाथा-
सारिंच फितलीं तुला इंद्रियें गणिति न माझी सत्ता !
ऐशी, मृणालमृदुकरपाशीं, बांधुनियां हृदयाशीं,
जिवाशिवांची करुनि मेळणी लुटूं सुखांचा राशी !

* * * *

[ स्रग्धरा. ]

ऐशी श्रीराधिका ती वदत विहरतां आपुले भावनांत,
भक्तार्थी बालकृष्ण प्रकट विनटला रूपधी यौवनांत !
राधा कृष्णीं विराली उरवुनि जगतीं रम्य नामाभिधान
हीं राधामाधवांचीं ललित विलसितें मोहवीती कुणां न ?

---

## श्रीमत्तिलकाष्टकम्

—१—

( वृत्तं–भुजंगप्रयातम्. )

घनश्यामलं शारदाकण्ठरत्नम् । गुणाढ्यं वदान्यं परं लोकमान्यम्
गणेशं जपन्तं प्रशान्तस्वरूपम् । भजे देशभक्तं मुदा बालराजम् १
स्वदेशव्रतं पूर्णभक्त्या चरन्तम् । धृतं येन हस्ते बहिष्कारशस्त्रम्
प्रसन्नं तथा चैकपत्नीव्रतस्थम् । भजे देशभक्तं मुदा बालराजम् २
महापण्डितं निःस्पृहं वीतरागम् । लसद्दीप्तिमन्तं ज्वलत्कर्मसक्तम्
महाराष्ट्रगीर्वाणभाषाप्रवीणम् । भजे देशभक्तं मुदा बालराजम् ३
महाराष्ट्रभूप्राणसंजीवनं तम् । सदाराजनीतिव्रतव्यग्रचित्तम्
तनूबुद्धिजेतारमानन्दकन्दम् । भजे देशभक्तं मुदा बालराजम् ४
" न मेषा वयं सुप्तवीर्यास्तु सिंहाः । स्वकीयार्तबंधूनिदं संप्रवक्तुम्
लिखन्तं श्रुतं 'केसरी' वृत्तपत्रम् । भजे देशभक्तं मुदा बालराजम् ५
स्वकीयं मतं निःस्पृहं निश्चितं यो । नृपस्याग्रतोऽपि ब्रुवन्नो बिभेति
विशुद्धं प्रबुद्धं च सत्यव्रतं तम् । भजे देशभक्तं मुदा बालराजम् ६

सुरापानसक्तान्स्वबन्धून्निरीक्ष्य । स्वचित्ते भृशं यो विषण्णो बभूव
कृतो येन यत्नोऽनिशं तद्धिताय । भजे देशभक्तं मुदा बालराजम् ७
व्रतं स्वीकृतं निर्मलं पालनाय । सहित्वा सदा क्लेशभारं प्रभूतम्
कृतं बंदिवासस्थलं येन पूतं । भजे देशभक्तं मुदा बालराजम् ८
इदं देशभक्तस्य पुण्यं चरित्रम् । स्वदृष्टेः पुरस्तात्सदा यो निधाय
तथा वर्तमानो जनो लोकमान्यो । हितं शाश्वतं देशभूमेः स कुर्यात् ९

---

—२—

[ वृत्त अनुष्टुप् ]

शांताकारा गुणागारा । नयज्ञा धैर्यमंदिरा
भक्तचक्षुचकोरांच्या- । चारुदर्शनचन्द्रिरा ! १
जपाकुसुमसंकाशी- । शिरोभूषणधारिणा
काशकुसुमसंकाशा- । कौमुदीश्वेतवासना ! २
ज्ञानमुद्रा ज्ञानकोशा । ज्ञानदृग्ज्ञानसुंदरा
ज्ञानविज्ञानयोगेन्द्रा । मूर्तिमान् ज्ञान तूं खरा. ३
स्वजनहृत्पद्मभृंगा । शत्रुतूलप्रभंजना
बुद्धिमालिन्यविध्वंसा । स्वार्तबान्धवरंजना ! ४
सर्वगीताभाष्यधेनू । दोग्धा तूं पार्वतीसुत
युवा भारत हा वत्स । रहस्यामृत अद्भुत. ५
वटपत्रीं बालरूपें । प्रलयीं पहुडे हरी ॥
कारागारीं अल्पतल्पीं । तैसा तूं नरकेसरी ! ६
सागरांलागिं ताराया । भूपश्रेष्ठ भगीरथ
भागीरथी जशी आणी । प्रयत्नीं बहु सुप्रथ; ७
तेवीं भारतवर्षीयां । दुःखमुक्त करावया
स्वातंत्र्याची स्वर्गधूनी । आणिशी करुणालया ! ८
तुझा विजय नेमानें । श्रद्धया पाठ जो करी
वागे वर्ते स्वयें तैसा ॥ धन्य तो जगदंतरीं. ९

---

—३—

विशाल मतिमान् धीरा । गंभीरा न्यायनिष्ठुरा.
कर्मयोगेश्वरा वीरा । अविद्यातमभास्करा ! १
गोकुलामाजिं गोविंद । स्थापी गोवर्द्धनोत्सव
तैसा गोवाग्वैभवाचा । गणेशोत्सव तूं नव. २
दैत्यां मर्दोनि गोपाल । रक्षी गोकुलगोधन
तेविं या भारतीं आजीं । केलें तूं धेनुरक्षण. ३
कृष्णें भीमार्जुनाहातीं । जरासंध विदारिला
शिवरामाच्युताहस्तीं । दुर्भिक्षासुर मर्दिला. ४
संस्थापिला जसा दासें । जानकीजीवनोत्सव
तैसा तूं शिव सर्ज्यांचा । वाढाया वीर्यवैभव. ५
एक बाणी रावणारि । एकवाणीहि तूं तसा
' वत्र ' या वर्णसावर्ण्यें । तूं रामासम राजसा! ६
स्वमित्रकार्य साधाया । श्रीरामें ब्रीद सोडिलें
परी सर्वस्व वेंचोनी । प्राणही तूं विसर्जिले ! ७
श्रीकृष्णासम श्रीकृष्ण । राम जैसा रघूत्तम
शिव कैसा शिवाऐसा । तूं कैसा तूझियासम ! ८
तुझा विजय नेमानें । श्रद्धया पाठ जो करी
वागे वर्ते स्वयें तैसा । धन्य तो जगदंतरीं. ९

---

—४—

भारती संगरामाजीं । बोधुनी नीति केवळ,
निष्कंटका मही केली । माधवें मर्दुनी खळ. १
आत्मनीत्युपदेशानें । परी तूं कर्मयोगिया,
दिलें साधुत्व दुष्टांना । चमत्कार कृपालया! २
घेतां न शस्त्र हातांत । संरक्षी हरि पांडवां.
घेऊं देतां न अन्यांही । तारिलें तूं स्वबांधवां. ३
प्राचीन धर्मदेहांत । ओतुनी नव जीवन,
धर्म नारायणीयाख्य । संस्थापी मधुसूदन. ४

गीतारहस्य सांगोनी । नवी झाळा नवी प्रथा,
शोधुनी कर्मयोगातें । दिला तू उजळा तथा. ५
रत्न सत्राजिताचें तें । ख्यात नामें स्यमंतक,
मर्दुनी जांबुवंतातें । मेळवी यदुनायक. ६
आंङ्ग्लाख्य राजसत्तेशीं । वर्षे आठ नि वसि तूं,
सारखें युद्ध मांडोनी । केला दिव्य महा क्रतू ! ७
स्वातंत्र्यरूप तें रत्न । दिलें आणुनि हक्पर्थी,
संप्रती एक तूं ऐसा । जाहलासी महारथी ! ८
तुझा विजय नेमानें । श्रद्धया पाठ जो करी,
वागे वर्ते स्वयें तैसा । धन्य तो जगदंतरीं. ९

---

## प्रतिज्ञापारायण.

### अभंग.

—१—

तुझ्या निःश्वासानें । तुझ्या पदचिन्हें, तुझ्या सांवलीनें ! योगेश्वरा !
येथील आघवें । दृश्य वस्तुजात, झालेंसे पुनीत । भासतसें
अणुअणुमाजीं । दिसते मीनली, तुझी ती सांवळी । मूर्ति मज.
कोठें आणि कसा । ठेवूं तरी पाय, विचारें या धाय । पडे हृदीं !
लागेल कीं काय । तुझीया अंगाला, पद हें मंगला ! भीतीनें या-
उठोनियां कांटा । अंगीं रोमरोमीं, चरं अंतर्यामीं । होत असे.
अणुपरमाणू । येथील हा सारा, भासतो देव्हारा । पूजेयोग्य !

—२—

जें कां शिरोधार्य । कैसें तुडवूं तें, हीन पदाघातें । मातें सांग !
जेथें जेथें माझी । पडतसे दृष्टि, तेथें तेथें मूर्ति । दिसे तुझी.
तमीं आणि तेजीं । स्थावरजंगमीं, तुज पाहतों मी । योगेश्वरा !
काय सांगों परी[1] मजसी जें होतें, झालें उलायातें । हृदय हें.
नुघडती डोळे । नेच्छिती पहाया, विकळ ही काया । सर्वपरी !
सजीव सदेह । तुज किती वेळां, पाहिलें या स्थळां[1] । डोळेभरीं.

---

१ गायकवाडवाड्यांत.

चालतां बोलतां । सल्ला साह्य देतां, व्याख्यानीं गर्जतां । व्यासपीठीं !
आजही दिससी । चित्रांत लिहिला, पाषाणीं कोरिला । जीवहीन !

—३—

कोणा सुख वाटो । रूपीं या पाहतां, माझी चित्तव्यथा । दुणावीसी
चेतनाचैतन्य । मिळोनी ज्योतीशीं, येथें उरलासी । शून्याकार !
पाषाणीं मिनोनी । पाषाण झालासी ! केलेंस आम्हांसी । समरूप !
वनस्पतिदीपीं । निरवी स्वतेज, जातां दिनराज । सूर्य अस्ता.
तेवीं तेजस्वी जे । स्वतेज स्वकीयां, जाती देवोनीयां । परीसिलें !
कर्ममूर्ति कृष्ण । रामदास शिव, सचिव माधव । तूंहि तैसा
कर्मयोगियांचा । साराचि प्रकार, दिसतो साचार । विपरीत !

—४—

श्रीकृष्णदेवाची । कथा परीसीली, प्रत्ययास आली । पूर्ण आजी.
अवतारकार्य । पूर्ण करोनीयां, निघतां जावया । निजधामा.
उत्साह सामर्थ्य । नेसी हिरावोनी, जेवीं चक्रपाणि । अर्जुनाचीं.
व्याप अपूर्व तूं । मांडोनियां जासी, कोण आतां त्यासी । आकळीता !
तुझे अनुयायी । मोजाया असंख्य, परी अनामिक । आघवेची !
सारे सेनापति । सारे भालाईत, कोणी न शासित । शास्ते सारे !
ऐशा स्थितीमाजीं । तुझाचि आसरा, येईं नर–वीरा ! लागवेगें.

—५—

गीतेचें रहस्य । सांगतां आम्हांस, देववाणीमिष । करोनीयां.
दिधलीस जी ही । भाक नरहरि,तिजवरी सारी । भिस्त आतां.
‘ ऊत अनावर । अधर्मासी येतां, धर्मग्लानि होतां । युगीं युगीं–
रक्षाया संतांना । दुर्जनां माराया, धर्म उद्धाराया । जन्म घें मी. ’

# गणेशचतुर्थीचे चंद्रास–

## अभंग.

—१—

" चंद्र परिवृत । दिसेल वलयीं, रम्य हिरण्मयीं । संध्याकाळीं ! "
कविमित्र ऐसें । सांगोनीयां गूज, चित्तीं बहु चोज । उपजवी.
आतुर होवोनी । सतृष्णलोचनीं, पाहतां गगनीं । चपापलों !
भाद्रपद शुद्ध–। चतुर्थीची स्मृति, होतां मनें भीति । वरियेली !
चोरी चहाडीचा । आळ मजवरी, येणें या विचारीं । मोहवीलें !
उदास दृष्टीनें । चंद्रा न्यहाळीत, तिष्ठलों मार्गात । पिशापरी.
नेत्रपल्लवीनें । वदलों तयासी, बहु कासाविशी । करोनीयां.

—२—

" चंद्रराया तुज । शापी गजवक्त्र, फळ आम्ही मात्र । चाखतसूं.
शाप निष्फळ तो । कराया कारणें, काय हीं विंदानें । नियोजीसी !
यथाकालीं मेघ । वर्षती न जल, धेनू त्या दुर्मिळ । झाल्या तेणें !
अभावीं धेनूंचे । कोठील गोष्पद, मात्र शब्दवाद । राहियेला !
जो कां गणनाथ । काय तो सामान्य ? तूंहि असामान्य । चंद्रदेवा !
तुम्हां बलिष्ठांच्या । कलिकौतुकांत, आमुचे कांडात । निघतसें !
दोघांचे कलहीं । लाभ तिसऱ्याचा, सानुभवी वाचा । सांगे ऐसें.

—३—

" तत्त्वाचा व्युत्क्रम । होवोनियां परी, फळ आम्हाकरीं । पडतसें.
मलिन अंतरां । शुद्ध हेतु जरी, फलप्राप्ति परी । ओखटची.
याच न्यायें तुझे । चित्त रहाटतां, मुकलों अमृता । भूलोकींच्या !
शुभकार्य व्हाया । लागे कालगति, अशुभप्रचीति । टांकोटांक !
तुझिया दर्शनीं । सुधारसपान लाभणें, कोठून । मंदभाग्या !
चोरीचहाडीच्या । आरोपाचें फळ, नको काळवेळ । लाधायातें !
म्हणोनियां तुज । आलों काकुळती, द्यावें निशापति । कृपाबळें.

—४—

" मायभूमिसेवा-। चोर विशेषणीं, मजलागीं कोणीं। दूं नये.
राष्ट्रभक्तप्रिय–। मित्रसेवाचोर, म्हणो न साचार । मज कोणी.
थट्टाविनोदीं ही । काव्यचोर ऐसें, वदो न विशेषें । मज कोणी.
संतगुरुजन–। सेवाचोर ऐसें, म्हणो न प्रकर्षें । मज कोणी.
राष्ट्रभक्तगोष्टीं । चहाड मी झालों, बोली ही न बोलो । कोणी कधीं.
शंका ही चुकून । यावी न कोणासी, हीच वा असोसी। चित्तीं एक.
राष्ट्रद्रोहकांचा । दूत मी असावा, स्वप्नींही न यावा । संदेहो हा.

—५—

" चोरीचहाडीचा । आळ येणें जरी, येवो या प्रकारीं । सुखेनैव.
माय–भूभक्तांचें । राष्ट्रधुरीणांचें–साधुसज्जनांचें । मित्रांचें ही–
राष्ट्रसेवी प्रिय–। बंधुभगिनींचें–कवि सुहृदांचें–। चित्त सर्व–
चोरियेलें प्रेमें । अनंततनयें, म्हणोत निर्भयें । मुक्तकंठें !
देशद्रोहकांचीं । सारीं कुलंगडीं, बाहेर तो काढी । चातुर्यानें.
राष्ट्रसेवकांच्या । लागोनियां कानीं, निवेदी जपोनी । शुद्ध भावें.
सत्य नसतां हे । आले जरी आळ, त्यांची मळमळ । वाटे ना कीं.
तुझ्या दर्शनाचें । फळ ऐसें येतां, पाहील जनता । सुखें तुज ! "

# तरंग २ रा

## बंधविमोचन !

कथासूत्रः--इ० स० १७६१ त पानपतच्या लढाईचा सोक्षमोक्ष झाल्यावर जे कांहीं लोक जीव बचावून दक्षिणेंत परत आले त्यांतच नाना फडनविसांची गणना होते. लढाईवर जातांना नानांनीं आपल्या मातुःश्रीस काशीयात्रा करण्याच्या हेतूनें बरोबर नेलें होतें. दुर्दैवानें ही बाई गिलच्यांच्या हातीं पडून धर्मभ्रष्ट झाल्याची अफवा कानीं आल्यावरून नानांनीं दिल्लींतील पेशव्यांचे वकील दामोदरपंत हिंगणें यांस पत्र लिहिलें कीं, --" याकरितां माझ्या शक्तीप्रमाणें जें द्यावयास पडेल तें देऊं करून-निदान माझें सर्वस्व देऊं करून-त्यांची ( मातुःश्रींची ) मुक्तता होय हेंच करावें. मुक्त जाहलियावर जातीविशीं शोध पुरता करावा.•जर यथास्थित प्रकार आहे तर देशास पाठवावी; नाहीं तर प्रयागास ( गंगेंत देहत्याग करण्यासाठींच ) परभारें रवानगी करावी. " तात्पर्य, मातुःश्री शुद्ध असो वा नसो! सर्वस्व भरीस घालून तिची मुक्तता करण्यांतच तिच्या पोटीं जन्म घेतल्याचें सार्थक. याप्रमाणें जरी त्यांचा संकल्प दृढ होता तरी पण ती भ्रष्ट झाली असल्यास तिनें गंगेंत देह टाकावा हेंच विहित होय. तिचें आपल्यास दर्शनही नको असा त्यांचा ( नानांचा ) निर्धार होता ! असो. एवढ्या ह्या अस्सल ऐतिहासिक पुराव्यावर प्रस्तुत काव्याची उभारणी केली आहे. फरक इतकाच कीं, मातापुत्रांचे ऐवजीं पतिपत्नींची योजना करून व उभायतांची प्रत्यक्ष भेट झाल्याचें दर्शित करून उभयतांचे संवादांत पत्रोक्त प्रकार ग्रथित केला आहे. तेव्हां सरासरी शेंदोनशें वर्षांपूर्वींच्या समाजाचें व त्यांच्या धर्मकल्पनांचें आपण एक शब्दचित्र पहात आहोंत इतकी भावना जागृत ठेवून प्रस्तुत काव्य वाचल्यास रसिकांस त्यांत अस्वाभाविक असें कांहीं वाटूं नये असें वाटतें.

चाल-[ दो दिवसाची तनु ही...... ]

" कसला हेतू अथवा किंतू धरुनि मनीं तूं मजमागें,
येशी येथें कां न कळे तें परत गृहातें जा सुभगे !

कां वद छळशी ऐशी मजशी रात्रंदिवशीं सांग तरी;
आल्या मार्गें जाई वेगें परतुनि मागें सुकुमारी !
शब्दानें वा कृतिनें किंवा दिला न केव्हां त्रास तुशी.
उगीच का मग करुनी तगमग लाविशि भगभग ही ऐशी? ”

* * * *

“ मी लग्नाची सद्धर्माची सखी जिवाची प्रिय कांता,
असुनी कांता ! मजला त्यजितां ! योग्य गमे का नयवंता ?
दुःख कोणतें तरी यापरतें अधिक असे तें युवतीतें ?
पदर पसरतें आतां नाथा ! नका लोटुं या दासीतें ”

* * * *

“ धर्माभिमता तूं मम कांता मान्य तत्त्वतां सखि मातें,
धर्म यावनी घेशि म्हणोनी तुटे भामिनी तें नातें !
अद्‍भुत गाथा तुझी कुलकथा सकलविश्रुता पहा असे,
जरि गे स्वामी तुझा असें मी तरि तुज धार्मी घेउं कसें ?
भार्या समजुन तव संगोपन कसें कळेचि न करुं आतां ?
जनता अधिकृत मला बहिष्कृत करील निश्चित तिज कळतां ! ”

* * * *

“ स्वधर्म सोडुनि झालें यवनी तरीहि पत्नी ही अपुली,
द्यावापृथ्वी देवद्विजरवि समक्ष यांच्या परिणियली !
पतिपत्नीचें तरुलतिकेचें नातें साचें हृदयाचें,
तोडायाचें पुण्य जयाचें धन्य भाग्य त्या सुजनाचें !
पति युवतीचा भर्ता भ्राता पतिच रक्षिता सुखदाता,
सत्पथनेता शिक्षणदाता संकटहर्ता उद्धर्ता !
पति हें दैवत पतीच जीवित तत्त्व समुन्नत हें मातें,
कळण्यापूर्वींच अंतरलें मी दुर्दैवें या चरणातें !
दोष न माझा हा पतिराजा ! हे सुखभाजा ! मज गमतें,
अज्ञानत्वें कर्म घडे जें पाप नसे तें विबुधमतें.
स्वयेंचि होउन समजुन उमजुन धनास मोहुन लोभानें,
स्वधर्म सोडुन परकी धर्म न केला सेवन जग जाणे !

खल यवनांनीं उन्मत्तांनीं बाटविलें हो आम्हांला,
पहा विचारें सारासारें, दोष न याचा कोणाला !
एक दृष्टिनें वस्तुपरीक्षण कधींहि वास्तव होत नसे,
कर्त्यासंगें कार्यकारणां नको बघाया काय तसें ?
कर्तृनिरीक्षण केलें आपण, कारणतर्पण म्यां केलें,
कार्यविचारण कीं उद्घाटन करूं उभयतां बुद्धिबलें !
अन्तःशोधन केल्यावांचुन धर्मविचारण कधिं न घडे,
इंद्रियगोचर नच धर्मान्तर सूक्ष्म विचारें पहा गडे !
धर्म न वसतो बहिःप्रदेशीं, परि हृदयाच्या गाभारीं;
पारावारीं जलाभ्यंतरीं वडवा न वसे जलावरीं.

* * * *

धर्मान्तर म्यां केलें, धरलें, अंतर पडलें परि काय ?
जशि मी होतें पूर्वीं अगदीं तशीच आहें पतिराय !
करस्थलीं कर, पदस्थलीं पद, शीर्षस्थानीं शीर्ष असे,
हृदय हृत्स्थलीं, मनःस्थलीं मन, अंतर कोठें लवहि नसे !
विशिष्ट चिन्हें हिंदुत्वाचीं दृश्य पहा हीं पूर्वपरी,
अजुनी दिसती अंगावरतीं बुजलीं नसती खरोखरी !
शिवत्वदर्शक चंद्रकोर जी कपालपटलीं बाळपणीं,
जशी गोंधली तशीच आहे मावळली ती नच अजुनी !
रूपशालिनी मनोमोहिनी मधुरभाषिणी पूर्वपरी,
असें निखालस मुळीं न साहस नसेचि तसनस वचांतरीं !
जसा न कांहीं पालट बाह्यीं तसाचि नाहीं हृदयींही,
प्रेमल कोमल, जलसम निर्मल, नसे निरर्गल वाणी ही !
अमूर्त चित्तीं नसेचि पालट, उलट परी तें पहा कसें,
मागें वळुनी लागे चरणीं स्निग्ध होउनी प्रेमरसें.

* * * *

स्थूल दृष्टिची व्यवहाराची निरीक्षणाची रीति जरा,
दूर सारुनी दया करोनी तत्त्वान्वेषण सूक्ष्म करा.
यदा जन्मलें जगांत आलें तेंव्हांपासुनि आजवरी,
धर्मांतर मीं कितिदां केलें जाणिव याची कुणा परी ?

शैशविं होतें मातृपूजिका, खेलनभजका बालत्वीं,
जनकसेविका कौमार्यीं मी, भर्तृदारिका तरुणत्वीं !
शिशुधर्मातुनि बालत्वीं कीं बाल्यांतुनि कीं कौमार्यीं,
आलें, किति तरि अंतर पडलें देहीं तैसें हृत्कार्यीं !
कौमार्यातें त्यजुनी दायिता ! झालें जेव्हां विवाहिता,
पितृधर्मातें मुकलें; झालें इकडिल धर्मीं मी निरता !
किती विलक्षण हें धर्मांतर ! सर्वचि कांहीं पालटलें,
हृदयमनानें तशि अभिधानें विभिन्न अगदीं मी झालें !

* * * *

नूतन जीवन, नूतन भूषण, वसनाहि तें पण तसें नवें,
नूतन सृष्टी, नूतन दृष्टी, फिरे पूर्व मनु किती जवें ?
जननीस्थानीं सासूबाई, जनकपदीं हो मामंजी,
बहिणी गेल्या, वन्से आल्या, झाले भाऊ भावोजी !
धर्मांतर कीं रूपांतर कीं स्थित्यंतर कीं कांहि म्हणा,
याचें कारण केवळ आपण ! करीं आपुल्या नियंत्रणा.
आपण म्हणजे काय बरें वदुं ? देव्हाऱ्यांतिल देव जसे,
मी तर साक्षात् सदनमंगला ! गणिलें मजला लक्ष्मीसें !
धर्मांतर तें अपण करविलें, पटलें, रुचलें, मानवलें,
न कळे कां हें परी खपावें ? कारण एकचि, म्यां केलें
येउं नये तो प्रसंग आला वदलें वदतें अधिक उणें,
नसे पथ्य परि जरी सत्य तें क्षमा करावी थोरपणें.
धर्मांतर मम नसे जाहलें, आपुलेंच हो परि गमतें,
वृथा न वदतें, सिद्ध करुनि तें मी अपुल्यातें दाखवितें.
प्राण सहावा मना विसावा अपुल्यातें जी पूर्वि असे,
दृष्टीलाही नको आज ती ! धर्मांतर हें काय नसे ?
दाक्षिण्यादिक गुण पूर्वींचे विलया गेले आजि कसे ?
प्रेमस्थानीं वसे तिरस्कृति ! धर्मांतर हें काय नसे ?
हृदय सदय जें पूर्वीं होतें, अदय जाहलें आजि असे,
सांगा नाथा सुविचारानें; धर्मांतर हें काय नसे ?

धर्मांतर तें माझें जैसें तसेंच झालें हें अपुलें,
म्हणून म्हणतें मला त्यजाया कारण कांहीं नच उरलें ! ”

*  *  *  *  *

“ रमणी ! हें तव विचार—अनुभव—युत वाक्पाटव परिसोनी,
मति बावरली, किति गोंधळली, स्तिमित जाहली मोहोनी !
विचार सुंदर परि एकंदर वागाडंबर सखि ! सारें,
अस्त शशीचा, गुरुचा, कविचा, फुलले केवल नभिं तारे !
आस मनाची नवनीताची, परंतु मंथन पाण्याचें,
लोणी नाहिंच, पाणि फुकाचें तेंहि संपलें परि साचें !
वाऱ्यावरती तूस उफाणिलें, परंतु कैंचें धान्य तुशीं ?
तूसहि सारें जाय उडोनी; श्रम सखि ! झाले वृथा तुशी !
ओलीं काष्ठें पेट न घेती, लोट लोटती धूराचे,
बुद्धि अपक्वा तुझी तशी हे उभवी मंडप शब्दांचे !
वर्षाभ्रें जणुं नभीं पसरलीं छाया मिनली घन दाट,
हवा विषारी सुटली भारी, तिथें प्रकाशा नच वाट !
हिमकालींचें दाट धुकें कीं अंध करी जें दृष्टीतें,
ज्ञानरवीच्या उदयावांचुनि सत्वर कैंचें विरणें तें ?
शारद घन हे करिती गर्जन नसे वृष्टि कीं धड ऊन,
तशी अवस्था गमे तुझी, नच कळे ज्ञान कीं अज्ञान !
विनंति करितां वाद मांडिला, वितंडवादीं परि शिरुनी,
शब्दच्छल तूं केला नुसता, शोभे तुजशी तूं म्हणुनी !
धर्म पाळितां कर्म उभे हें, मर्म न ठावें धर्माचें—
तुला, परी तूं वर्म काढिसी शिव ! शिव ! नर्मानर्म वचें !
सदाचार सखि ! सद्धर्माचा संतत सहचर साचार,
चराचरीं बघ तत्त्व एक हें, तदंग दुसरें संस्कार.
संस्काराविण आचार न हो, पुष्पावांचुनि फल न जसें,
जननीविण कीं लालन, संस्कृति आचाराची जनी असे !
व्योमावांचुनि वारिद कैंचे ? मेघाविण ना पर्जन्य,
पर्जन्याविण अन्न कशाचें ? अन्नचि जीवां चैतन्य !

वसन, विभूषण, भाजन नूतन, संस्काराविण घरांतही,
कोणी घेति न धर्मपरायण, हें का ठावें तुज नाहीं ?
आर्यसंस्कृती जी तव चित्तीं बिंबित होती झालेली,
अनार्य यावन संसर्गानें समूळ विल्या ती गेली !
संसर्गाचा—सहवासाचा—संवयीचा कीं परिणाम,
सरला दृष्टी झाली उलटी ! भासे सत्पथ तुज वाम !
जन्मार्जित जो असे मूळचा स्वभाव वदले ना वदले,
तेंही क्षम परि संवयीनें हें स्वोदाहरणें दाखविलें !
धर्मप्रवणा अंतःकरणा अधर्मकारी वदतांना,
काय न गमलें कांहिंच ऐशा सुविचारी या तुझ्या मना ?
अधर्मकारी असतों मी जरि अक्षरही गे नच वदतों,
जवळ कोठलें घेणें मग तें ? न साउली तव पडुं देतों !
दृष्टिपथांतुनि गेल्यापासुनि सुखोपभोगा वर्जियलें,
देहधारणा आवश्यक जें वस्त्रान्ना त्या सेवियलें !
स्वप्नांतरिंही अन्य स्त्रीचें स्मरण फुकाचें मनें वचें.
कधीं न केलें, हवें कासया, नांव घ्यावया देहाचें ?
ब्रह्मचर्य मीं असें पाळिलें,—हा न कुणावर उपकार,
स्तोम न त्याचें करावयाचें कीं न गायचे वडिवार !
समाधान तव करावयास्तव कथिली वास्तव मम स्थिति,
न हें अवास्तव कीं वाक्पाटव कथीं न गौरव वा सुमति !
तुजविषयींची तिरस्कृती कीं प्रेमाहति ही काय खरें ?
धर्मांतर कीं अजुनहि वाटे झालें माझें तुज चतुरे ! ”

* * * *

“ जरी खरें हें, मजवरती वा प्रीति आपुली गणूं खरी,
सेवा माझी कां न घेतसां ? कां न येउं द्या गृहांतरीं ? ”
“ धर्माचीच न, सुष्ट दुष्ट कीं हृदयभावना ज्या असती,
त्या सर्वांची गूढ गूढतमिं अंतर्यामीं सुख—वसति !
प्रीति न वसते बहिः प्रदेशीं, परि हृदयाचे गाभारीं,
राजमंदिरीं न वा कुटीरीं न वा कल्पना—बाजारीं !

प्रीति वदतसे मुकीच भाषा, पेस पाड ना तिज असती,
समागमाची तिज न अपेक्षा; वि-रह-वि-योगीं तिची रति !
कोठें चंदिर कोठें अंबुधि कोठें घनतति शिखी कुठें ?
दर्शनमात्रें केवल उभयां आनंदाची लहरि फुटे !
अमूर्त ईश्वर कुठें निवसतो ? परि भक्तांच्या हाकांना,
कसा काय कीं कुठुनि काय कीं दयार्द्र होउनि दे काना !
गाय गोठणीं सोडी पान्हा हंबरतां तो वत्स घरीं,
भूलिंगातें पाहीं घडतें अभिषिंचन तें एकसरीं !
घरीं न इच्छा सहवासाची, बळेंचि घररिघि व्हायाची,
प्रेमलोप जरि नसे परस्परिं काय अपेक्षा वद त्याची ?
परस्परांना परस्परांवरि दूर राहुनी प्रीति जरी,
करितां येते, समागमाची सांग अपेक्षा काय तरी ?
समयपरत्वें भेटूं बोलूं ज्ञानसुधारसपान करूं,
ऐक एक परि समागमाचा नको तेवढा हट्ट धरूं ! ”

* * * *

“ रुचलें मजला जें जें वदलां, बोध सर्वही मनिं ठसला,
समागमाची करुनि परवडी भीक एवढी मज घाला !
अभिमानाची वृत्ति निमाली ! ईर्ष्या सगळी मावळली,
झुकली राधा ठायीं आली ! म्हणा कृष्णजी ! तिज अपुली !
एक खोपटें रुचिर गोमटें येथें कोठें बांधुनियां,
मला रहाया संमति सखया ! द्यावी सेवा करावया.
लोटिन अंगण, सडाहि घालिन, भांडीं घाशिन, धुइन धुणीं,
वेलफुलें मी करुनी सुखविन, घेइन म्हणवुनि गुणिल गुणी !
डोळे भरुनी पहात निशिदिनिं वेचिन उरले दिवस सुखें,
ठेविन काया पदिं मी सखया! करुणानिलया गात मुखें !
राहुत दुसरीं; दृष्टिसुख तरी घेऊं द्या मज पोटभरीं,
दयाविधूच्या शीतल किरणीं उजळूं द्या ही दुरित-दरी ! ”

* * * *

“ हीन जनांनीं ज्ञान मिळवुनी यत्न करावा वरि जाया,
परि न पहावें चढलेल्यांना पुन्हा खालतीं ओढाया !

व्युत्क्रम याचा करूनि वदतों श्रेष्ठांनींही नीचांना,
हात देउनी घ्यावें वरि, परि नच सोडावें स्वस्थाना !
उद्धर्त्यानें दक्ष असावें, कर देतांना बुडत्याला,
कीं नच बुडता बुडविल बुडतां गळां पडोनी अपुल्याला !
सहवासाचें फल कामुकता तनुस्पर्श हें फल पुढतीं,
तनुस्पर्शनें अतनूची त्या सतनु सुतनु गे ! उत्पत्ति !
उत्पत्तीची काय वाट त्या ? घड न हिंदु कीं नच यवन,
जननिंदेचें प्राप्त मात्र त्या कुजन्म पैतृक सौख्य-धन !
' वादे वादे तत्त्वोत्पत्ती ' बुध हें कथिती शिमग्याचें-
कवित्त झालें इकडे, येथें उद्दीपन कीं विषयाचें !
क्षणावधीच्या सहवासाचा घडला ऐसा परिणाम,
अखंड अक्षय समागमानें होय वृत्ति कीं बेफाम !
कांहीं झालें तरीहि अपुलें मन हें असलें बहु दुबळें,
कुणिहि न द्यावी त्याची ग्वाही; महाज्ञानिही लटपटले !
पुन्हा त्यांतुनी बघ मी अजुनी साधक आहें, सिद्ध नसें,
पवनजवन हा मनोवारु मज फेंकिल ऐशी भीति असे !
घनकांतारीं दरीकंदरीं व्रतपालन तों सामान्य,
' वनितावलयीं व्रतस्थ वसणें ' केव्हांही या प्राधान्य !
जरी खरें; परि यथाशक्ति करिं होइल जें तें साधावें,
उंचावोनी पाय वामनें चंद्रग्रहण न वांच्छावें !
बघुनि बलाबल बुद्धिपुरःसर बुधें अबाधित बांधोन—
धोरण पुढलें, पद टाकावें, स्वतांसि निजकृति बाधो न.
स्वधर्म म्हणुनी प्रीति करीं मी, स्वधर्म म्हणुनी धर्म तसा—
प्रतिपाळीं मी स्वकृत्य म्हणुनी, अन्यासाठीं नच सहसा !
प्रीति स्वार्थी धर्म परार्थी परार्थरक्षण केव्हांही,
स्वार्थपालनाहुनी श्रेष्ठ तें; न दुजें श्रेयस्कर कांहीं !
धर्म सूक्ष्मतम सकल भावनीं धर्माची गे त्वरित गति,
सर्वस्वाचा होमहि पटतो; धर्मत्याग न मतिप्रति !
धर्मज्ञात्या बुधाविबुधांनीं स्वधर्मरक्षण साधाया,
सहेतु घालुनि दिलीं बंधनें हवीं निग्रहें पाळाया.

[illegible]
रुचति न, मंदां काय वदावें ? कैंचा निरुपाधिक गंध ?
दुःखाभावीं कशी अनुभवीं सौख्यमाधुरी उतरावी ?
देहाभावीं जीवधारणा क्षम वद कैशी सखि !  व्हावी ?
बंधन मूलाधार सृष्टिला, सृष्टिक्रम त्यावांचून,
अगतिक निश्चित, बंधाविमोचन अनर्थकारण तें जाण !
पंचभूतिं ज्या विश्वविनिर्मिति कीं स्थिति तैसें संहरण,
करी नियंता तयांसही पण घालुनि बंधन नियंत्रण.
एक भूत जरि विमुक्त झालें बंध च्छेदुनि विश्वाची—
घडी बिघडवी, दृष्टांतानें जाणिव होइल तुज याची.
जशि अतिवृष्टी अनावृष्टि तशि करिते विश्वा वैराण,
सागरतल किति नौका बघती झंझा करितां थैमान !
एकचि दिन जरि रवि न अंबरीं अनर्थ होती किती जनीं,
जाणिव याची सूर्यग्रहणीं खगही देतिल तुज करुनी !
' बंधोच्छेद न करोत भूतें ' इच्छावें हें ज्या मनुजें—
तुडवावीं पदिं तयें बंधनें ! नवल याहुनी काय दुजें ?
हेंचि विबोधुन करी प्रबोधन भारतभूषण, पार्थाचें
अनुस्मरुनि तो उद्घाटन कीं अनुवादन मी करिं त्याचें. ''

*        *        *        *

'जनकादिक जन झाले पावन कर्मचि करुनी जनिं पार्था !
जगद्धितास्तव तुवांहि वास्तव कर्म करावें स्वहितार्था.
आचरितो जें श्रेष्ठ पुरुष कीं, आचरती जन तेंच खरें,
मानी तो जें प्रमाण त्यातें अनुसरती ते मोदभरें
लोकत्रयिं या नुरेचि सखया ! कर्म कराया मज उर्ता,
दुर्लभ कांहीं जरि मज नाहीं कर्म करीं मी तरि पार्था !
कर्माचरणा जरि न करीं मी आळस सारा टाकोनी,
लोकहि सारे पथेंचि माझ्या येतिल कर्मा सोडोनी.
संकरकर्ता लोकनिहंता असुनी जगता मी त्राता,
होइन ऐशापरी अकारण, कारण लौकिक जनघाता.'

*        *        *        *

"तुज मी म्हणुनी विनवीं रमणी! हेंचि निदानीं परोपरीं,
सहवासाची गोष्ट तेवढी पुन्हा न काढीं याउपरीं.
विमोहकलिलीं अधर्मजालीं मज याकालीं गुरुफटुनी,
मद्दृष्टीनें पाप गमे जें नच घडवी तें मजकडुनी!
अगणित तीर्थें असती येथें रुचेल तेथें राहोनी,
तनू सार्थकीं लावुनि अपुली निजोद्धार घे साधोनी.
प्राप्त जाहला धर्म तुला जो प्राग्जन्मार्जित कर्मानें,
त्यांतहि ईश्वर असे अधिष्ठित केवल संज्ञाभेदानें.
ईश्वर ध्यावा, ईश्वर गावा, चुकल्या जीवा निजधाम,
तोचि दाखवी, स्वरूपिं मिळवी, देउनि अक्षय विश्राम!
काय अश्रुचें कारण आतां? इहजन्मींचा संबंध,
तुटला अपुला जावें जिकडे नेइल मन तें स्वच्छंद!
कथिल्या मार्गें अचुक वागतां पडेल कोठें तुज न उणें,
करोनि घेई धनी जगाचा आत्मवश्य तो आत्मगुणें.
मजला तरि वद काय राहिलें येथें आतां विलोभन,
तुझ्याच मागोमाग निघालों सोडुनि मीही हें भवन!"

*   *   *

[ मालिनी ]

परुष सरल शब्दीं बोधुनी कामिनीला,
द्रुतपदिं वळला तो जावया झोंपडीला;
भरभर किति चाले सूर्य अस्तीं नभांत,
पथिंच जणुं गमे कीं गुप्त झाला क्षणांत!

[ स्वागता. ]

वंचिता विधिहता हतकामा
चिंतित स्मरुनि त्या गुणग्रामा
क्रान्त खिन्नवदना उभि राहे,
कान्तसेवितपथाप्रति पाहे!

[ दिंड्या ].

परमकष्टें निजनाथकुटीराला,
सजलनेत्रीं प्रणिपात तिनें केला;

पदां टाकी एकेक विकल काय,
परी घेती ना उचल हाय ! हाय !
पुन्हां चाले परतोनि पुन्हां पाही,
पथीं पतिच्या चामके पुढें कांहीं;
बघे मुरडोनी श्वास दीर्घ सोडी,
परम सायासें पाय पुढें ओढी !

---

## *लोकमान्य व त्यांच्या गायी !

[ शार्दूलविक्रीडित. ]

' हें मी हाय कळे न काय बघतों! कीं दृष्टि थारीं नसे ?
काढोनी चिमटे परंतु बघतां भानावरी मी असें;
ज्या धेनु प्रतिपाळिल्या बहुवसा प्राणाधिका मानुनी,
कां त्या हंबरती अशा कटुरवें डोळे वरी लावुनी ? १
छे ! छे ! हंबरडा न हा परिसवे! कर्णीं जणूं ओततें,
कोणी तेल, जलालें कीं जहर वा ऐसें मनीं वाटतें;
त्यांचीं पाहवती न दीन वदनें केंविलवाणी परी,
चित्ताला चटके अपार बसती सांगूं कुणा हें परी ? २
कां त्यांचे नयनांतुनी घळघळां अश्रू असे वाहती ?
अंगें काय म्हणून हीं थरथरा त्यांचीं अशीं कांपती ?
ओढी कोण तयांस हा फरफरा दावीं गळां बांधुनी ?
घेतां पाय पुढें न, कां मुरडती माना अशा मोडुनी ? ३
या का दान म्हणूं मदर्थ तनयीं सच्छील विप्रां दिल्या ?
खाया दूधदही दिल्या समजुं कीं भाच्यांप्रती आपुल्या ?

---

* सांप्रत वर्णाश्रमधर्माप्रमाणें कोणी वागत नसल्यामुळें या विषयाला बस्तुतः फारसें प्राधान्य नाहीं; परंतु लोकमान्यांसारख्या दिव्य विभूतीच्या कुटुंबीयांचाच त्याच्याशीं संबंध आल्यामुळें त्याला कल्पनातीत महत्त्व आलें. भारतीय जनता आपल्या नेत्यांकडे ' देव ' या दृष्टीनें पाहते. ती त्याच्या चरित्राचे खासगी व लौकिक असे भेद करीत नाहीं. पाश्चात्यांतही हीच पद्धति आहे व म्हणूनच 'Caeaesar's wife should be above suspicion' हा वाक्प्रचार रूढ झाला !

१. स्थिति.

दुर्भिक्षीं जड जाहल्या म्हणुनिया पोसावया संप्रती,
होवोनी निरुपाय काय अथवा पोळामधें धाडती ? ४
नाना तर्कवितर्क आज असले चित्तीं उभे राहुनी,
झाली बुद्धि खुळी, सुचे न लवही, व्यामूढ संमोहुनी;
जों जों मी करितों विचार गमतें कोठोनि हें व्हावया ?
एकालाच मला कुठोनि इतुकें सद्भाग्य लाधावया ? ५
दुष्टां दंडुनि, भूमिभार हरुनी साधूंस संरक्षुनी,
सद्धर्म प्रतिपालनार्थ झटले जे कर्मवीराग्रणी—
ते सारे, इतिहास पूर्व कथितो, बाहू उभारूनियां
होते भाग्यविहीन पुत्रविषयीं, घ्या स्वांतिं शोधूनियां. ६
अग्नीला सुत तो धुरासम दिवा, दीपाप्रती काजळ,
सूर्यापोटिं शनैश्वर प्रथित तो कीं, कर्ण उच्छृंखळ;
श्रीकृष्णाप्रति सांबसा कुलरिपू शंभू[1] शिवालागुनी,
बाजीला रघुनाथराव दिवटा कामांध नीचाग्रणी ! ७
पुत्रांनीं मम ज्या यथाविधिहि तें केलें न दाशाहिक,
त्यांहीं शक्य न गोप्रदान करणें दुर्दान्त ते दांभिक;
गायी या विकिल्याच खास दिसती शंका दुजी कासया ?
गेहश्री नच काढिली, नवल हें अद्यापि ओपावया ! ८
झाले बापु ! न चार मासहि पुरे मातें तनू सोडुनी,
तों तूं हें करुनी, कुलास अपुले संदूषिलें भूजनीं !
वाटे मृत्यु बराच एक परिनें संभावितांचे मनां,
सोसेना अपकीर्तियुक्त जगणें मानीहि त्या दुर्जना ! ९
ताता तात वदावयासहि अहा ! लज्जा गमे ज्याप्रती,
भाचे नी भगिनी धनांध अधमा त्या काय हो होय तीं !
संपत्संग्रह कीं तनू नटविणें सर्वस्व वाटे जया,
कार्याकार्यविचार काय सुचणें कर्तव्यमूढा तया ! १०
‘ ज्यांहीं येइल हीनता, स्वपितरां कार्यें अशीं हातुनी,
केव्हांही घडतील ना, ’ अवधिली संधा तुवां कीर्तनीं[2];

१ संभाजी. २ ‘ कीर्तन ’ मासिकांत.

लेखाची मशिही नसेल पुरती अद्यापि त्या वाळली,
कर्मे हीन किती तुझ्याच कडुनी पाहीं तरी जाहलीं ! ११
व्हावें मात्र गिळावयास तुजला कांहीं न केल्याविना,
शालावृत्ति नको म्हणोनिच दिला फांटा तुवां शिक्षणा;
कैंचा देश नि भक्ति काय तुजसी ? ठाव्या तुला वल्गना,
माझा पुत्र म्हणावयासहि तुला लज्जा गमे या मना ! १२
व्हावें दुःख न हिंदु-बंधु-हृदया, गोघात संवर्जिला–
म्लेंच्छांनीं, परि तूं मदीय तनयें तो आजि आरंभिला !
झाली शांत न एतुलें करुनिही त्वद्वृत्ति ब्रा राक्षसी,
' नाहीं ब्राह्मण मी ' जनांत वदतां हा धिक् न लज्जा तुशी ! १३
आतां हुंबरतां वृथा रडुनि कां सद्भाग्य घ्या मानुनी,
नाहीं ओपियलें तुम्हांस अदयें कीं खाटिकांलागुनी !
गार्यींनों उचला पदें झडकरीं पाहा न माझ्याकडे,
व्हावें ज्ञात कसें तुम्हांप्रति किती दुःखें मनीं मी कढें ! १४
' गोविप्रप्रतिपाल कर्म ' दिधलें होतें पुरा क्षत्रिया,
शूद्रालागिं मिळे कलींत घडतां ही भूमि निःक्षत्रिया;
विप्रीं विप्रपणा जसा न लवही क्षत्रीं नसे क्षात्रता,
आतां केवळ शूद्र एक उरले, अन्यत्र दांभीकता ! १५
जे का क्षत्रिय आपणां म्हणविती गर्जोनियां संप्रती,
नांवाचे नुसते न त्या विदित कीं अस्त्रें, न शस्त्रेंहि तीं;
खड्गाचे स्थलिं ढोल कीं तुणतुणीं कीं घुंगरें बांधुनी,
गांवोगांव पहा कसे भटकती स्त्रीरूपही घेउनी ! १६
' जा ! जा ! पाहुं नका अशा मुरडुनी आतां वरी खालती,
दैवानेंच तुम्हां सदाश्रय असा संप्राप्त हो निश्चितीं,
राहा मोदभरें पडेल न उणें आशास्य भाकीत हें,
पुण्याई पुरली पुरोनि उरली वाटे समाधान हें ! १७

# तरंग ३ रा.

## नीज भारता ! नीज तोंवरी—

[ साक्या. ]

गडद रात्र अंधार अजोनी का मग भारतराया !
आटापीटा करिसि जिवाचा असा उठाया वायां ? १
माथ्यावरचें जराहि ढळलें अजुनि खाटलें नाहीं,
तसें तिकांडें दूर कोठल्या कोठें आहे पाहीं. २
चंडोलाच्या न या लकेऱ्या कोल्ह्यांची ही हूक,
दिवाभितांची हृदयविदारक त्यांत मिसळली घूक ३
रातकिड्यांची कर्णकटू ही किरकिर सरली नाहीं,
टिटवीबाई भिरभिर फिरुनी वांटी वाणवसा ही ! ४
कर्दमचपला मथुराबाई चिखलामाजिं पडून,
ऐक घोरती स्वस्थपणानें ' डाराड्डूर ' करून ! ५
पाकोळ्या या अजुनि भिरविती मारुनियां फलकारे,
बोळाबोळांतुनी वाघुळ घेती चक्कर बा रे ! ६
नीज भारता ! नीज म्हणोनी शांतमनानें बापा !
नको हुरळुं तूं असा परिसुनी स्वातंत्र्याच्या लाफा. ७
बराच अवधि स्वातंत्र्याचा उषःकाल तो व्हाया,
नसे कशाचा कशास अजुनी पत्ता भारतराया ! ८
दिसे तांबडें फुटलें तुज जें नसे तसें तें पाहीं,
दिशा उजळल्या तुला वाटती परी न तैशा त्याही ! ९
जुनीं बंधनें कैक दिसांचीं झालीं सैल झिजून,
नवीन बेड्या[1] करावयाचें योजुनि भूप म्हणून— १०
कलाभिज्ञ तव सुज्ञ बालकां कुतुकें अनुरागानें,
जडजोखिम ही पार कराया सांगे सचिवमुखानें ! ११
स्वार्थमुग्ध हीं तुझींच बाळें भूपगौरवा भुलुनी,
घडीत बसलीं तुझीं बंधनें भट्ट्या शिलगावोनी ! १२

---

१ बेडकी

त्या अग्नीची प्रभा उफळुनी दिशा उजळल्या दाही,
प्रभात गमली ! युग न असे हें त्रेताद्वापर पाहीं ! १३
स्वहितासाठीं पुत्र पित्यावर उठति जिथें हे ऐसे,
देश भारता ! तूंच एकटा गमसी मजसि विशेषें ! १४
अजिंक्य आलें आरमार जैं आंग्लदेश जिंकाया,
सर्व मतांतर झुगारुनी जन झाले एक रणाया. १५
कौरवपांडव परस्परांचे जन्मजात रिपु साच.
अन्यासह परि लढतां झाले मिळुनि एकशें पांच ! १६
परोपरीच्या अशा बोधकर कथा पाठ सकलांच्या,
न कळे कैशा गळीं नुतरल्या परि राष्ट्रधुरीणांच्या १७
योग्य निद्रिता जागें करणें, परी जागृतालागीं,
काय करावें सांग भारता ! जन्माचे हतभागी, ! १८
राष्ट्रसभा करि नागपुराला ध्येय नियत असहाचें,
स्वार्थें जे परि झपाटिले त्यां काय मर्म या ! त्याचें ! १९
तनुसुखसंगीं दंग राहुनी उरल्या वेळामाजीं,
बघति देशहित काय वानुं त्या श्रेष्ठांची मी बाजी ! २०
ज्या सीतिस्तव प्राग् रघुनाथें सागरसेतु रचून,
सपुत्र बांधव रावण वधिला शर्थ जिवाची करुन ! २१
सीताही ती तयें त्यागिली, राष्ट्रा सुखवायास,
कोठें रघु तो कोठें रघु हा रंगलहरता ज्यास ! २२
प्राग् व्रजलाला हरि किसनानें राष्ट्रातें सुख द्याया,
कंसचाणुरा मर्दन केले अवगणुनी निज काया ! २३
या हरिकिसनें परी भारता ! राष्ट्राज्ञा तुडवून,
दिवाणगिरिची झूल चढविली स्वार्थालागिं भुलून ! २४
बाळें दौलत भावि तुझी ती गोळ्या घालोनीयां !
कुत्र्यापरि मारिलीं, फुलें कीं अग्नित होमोनीयां ! २५
रविसहि ज्यांचें नख न दिसावें ऐशा रामा भामा
कामांधांनीं पशुवृत्तीनें भ्रष्टविल्या गुणधामा ! २६
सम्राट्सेवीं समर्पिले सुत संकटसमयीं ज्यांनीं,
कृषीवलां त्या वृद्धां वधिले केवल पशु मानोनी ! २७

पंजाबींच्या या अन्याया पडला बळि जो स्वांगें,
विसरुनि सारें हाय ! किसन तो स्वार्थामागें लागे ! २८
वृद्ध सुरेन्द्रहि तसाचि तिकडे होउनि आज दिवाणा,
दिवाणगिरिच्या झग्याखालती झाकि मनाची दैना ! २९
वाण जोंवरी पडे न तुज त्या ! ऐशा सत्पुत्रांची,
स्वराज्यभानूदय व्हायाची तोंवरि आस कशाची ! ३०
भानुपथा प्रतिरोधितील कीं जे जे दस्यू कोणी,
पूजा त्यांची हवी कराया असह–अर्घ्य देवोनी ! ३१
तपोनिष्ठ सद्विप्र असे ते झाले आतां याया,
नीज तोंवरी नीज नीज रे असाचि भारतराया ! ३२

---

## शिपाइ दादा नका !

[ चाल—क्षणभंगुर संसार...... ]

शिपाइ दादा नका ॥ नका हो० ॥
नेउं नका हो माझ्या दादा बाइच तलि आइका ! ध्रु०
मालुं नका त्या धका, नका हो०
ओढुं नका ना असे फलफला, कालपूनचा भुका !
नका उगालूं बुका, नका हो०
काय असें हें तली कलितसां, पडल गटालीं फुका !
देऊं का दोडका, तुम्हांला देऊं०
चुका देउं कीं, चिलिम भलाया देउं जलासा सुका[1] !
कां पघतां टकमका, असें हो का०
काय पाहिजे तली तुम्हांला देऊं का हा लुका[2] !
काय असें बोलतां, असें हो काय०
चोली केली दादानें ती पोटासाठीं न कश !
भाकल नव्हती घलीं, खली हो, भाकल०
कापुनशानी मळ्यामंधोनी उलिसा अनिला मका !

---

१ तंबाखू २ रुका ( एक नाणें. )

चिलडी नव्हती मला खली हो, चिलडी०
नई आनिली, दिला लुका हा घ्याया हो भातुका !
सोडा सोडा जला, तयाला सोडा०
घेऊं द्या त्या जातां जातां माझा साकलमुका !

## मुक्त विहंग !

[ कथासूत्रः—एका फांसे पारध्यापाशीं एक जातिवंत रामनगरी पोपट होता. कांहीं कारणपरत्वें तें पांखरूं विकलांग झालेलें पाहून त्यानें त्याला सोडून दिलें. त्यावेळीं त्या उभयांत झालेल्या सांकेतिक मूक भाषणाचें शब्द-चित्र प्रस्तुत कवितेंत रेखाटलें आहे. ]

[ चाल—बल ज्याचें त्यास तें. ]

"दिधलें जा सोडुनी ॥ ध्रु० ॥
विश्वासाचें, खुल्या दिलाचें
स्वहिताचें तव, वच हें अभिनव,
घेइं गड्या परिसुनी !
मम तूं बंदी, मज न निखंदीं,
मादक मदिरा, पिउनि पांखरा,
जाइं न तूं बहकुनी !
चार संवगडी, करुनि तांतडी,
जमतिल कुमती, तुझियाभंवतीं,
देतिल कीं चिथवुनी !
गुलगुल वदुनी, फिसाद करुनी,
घाव निशाणीं, तव अभिमानीं
संतत वा घालुनी !

---

* याच प्रकारचा एक जातिवंत पक्षी पेशव्यांचे राजधानींत नुकता (इ.स.१९२४). सोडून दिल्याचें वृत्त सर्वविश्रुतच आहे.

पाडतील फशिं, तोंडघशी तुशिं,
तुजला ईरें, धीरेंधीरें,
बहुवाशिं रे चढवुनी !
देहिं जोंवरी, बल न तोंवरीं,
विहित विचारीं, सारासारीं,
निरुपाधी होउनी-
रत्नाद्रीवरिं, सागरतीरीं,
वृक्षकोटरीं किंवा शिखरीं,
स्वस्थ रहा बैसुनी !
तुला इषारा, दिला पांखुरा,
चटुला रुचिरा, मधुवाक्चतुरा
वाग गड्या समजुनी ! "

## [ दिंड्या ].

" दैत्य निर्दय कीं सदय देव तूतें,
काय मानावें हें न कळों येतें !
मला विकला सोडूनि आजि सांग,
काय माझें हित साधिलेंस चांग ? १
सपदरसना बांधोनि केशपाशीं,
मुक्त केलें मज वरी सांगतोशी !
पुनः हिसके मारून खेचुनीयां,
मला इच्छिसि का कारिं डांबलाया ! २
तोंड असुनी बोलणें बंद केलें,
पाय असुनी चालणें व्यर्थ झालें !
नेत्र असुनी मज अंध करायाची,
भली योजिसि ही युक्ति नवाईची ! ३
गुराऐसें मज नित्य राबवोनी,
कदन्नाची प्रत्यहीं मेजवानी,
द्वीपबंदीशाळेंत चारिलीस,
गोणपाटें ही तनू झांकलीस ! ४

त्वदुपकृतिचा हा दिव्य राशि ऐसा,
स्मरणगत तो होणार कुणा कैसा ?
ऋणें सारीं फिटतील एक पक्षीं;
तव न परि तीं चौऱ्यांशि योनि लक्षीं ! ५
अम्हा पक्ष्यांच्या रीतिरिवाजांची,
तुला कोठुनि जाणीव असायाची,
जनस्पृष्टद्विज विहगसमाजांत,
गणुनि बापा! अस्पृश्य मारितात ! ६
कोण माझ्या मग जवळ सांग येतो ?
कोण कैसा मम समाचार घेतो ?
तयां त्यांतहि तूं निंदिलेंसि फार;
चंचुघातें करितील मला ठार ! ७
शक्ति माझ्या अंगीं न लेश कांहीं,
नसे माझा उपयोग कुणालाही,
त्यांत ऐशा बांधून बंधनांहीं,
मला जाणें येथून रुचत नाहीं ! ८
दिवस वासंतिक जेथ मदायूचे,
लया गेले तेथेंचि मरायाचें,
भाग्य लाधो मज; परी त्या थिबाचें,[1]
नको जगणें त्या स्थळीं अपेशाचें ! " ९

* * *

वदुनि इतुकें त्या सुज्ञ पांखरानीं,
चंचुपुटकें निज पंख कुंचलोनी,
नेत्र मिटले मुरडोनि मान तेव्हां,
अल्प विश्रम निजदेहिं जणों सेवीं ! १०

## [ पूर्व पदार्थ ]

" आज्ञा म्हणजे आज्ञा मम ती,
शब्दहि न तिचा, फिरणें जगतीं

---

[1] वह्मदेशचा शेवटचा दुर्दैवी राजा.

चल जाई येथुनी !
आज्ञेपरि नच घडतां वर्तन,
तुझा मुलाजा धरितां लवहि न,
ठेविन या बंधनीं !''

*　　*　　*

इतुकें वदुनी, स्वकरें ओढुनि,
विहगा त्यांनीं प्रसहें गगनीं
दिधलें तें झोंकुनी !

---

## आटप तव हें गान !

[ चाल—क्षणभंगुर हा संसार० ]

आटप तव हें गान, पांखरा, आटप तव हें गान ॥ ध्रु० ॥
दिसे न कोणा असे तयाची, येथें आज तहान ! पांखरा०
श्रमसी कां मग करुनी तगमग ? कोणि न दे अवधान ! पांखरा०
परिख परिस हें, जें तुज कथितो अनुभववृद्ध ज्ञान ! पांखरा०
अवजड पैंजण पदीं विलसती काय न त्यांचें भान ? पांखरा०
कुटिल कचें तव चंचु बांधिली आहे ध्यानीं आण ! पांखरा०
भिजे तुषारें सुके समीरें ऐसा जन नादान ! पांखरा०
हळ हळु मागें सरत विरागें बसला कोरित कान ! पांखरा०
धर्म कशाचा ? घटन कशाचें ? बुभुक्षितांची खाण ! पांखरा०
नसे अपेक्षा न वा तितीक्षा, नाहीं मान–अमान ! पांखरा०
स्वातंत्र्याचें सामगान ही परिसाया निस्त्राण ! पांखरा०
नको षड्ज तव नको खर्ज वा कर्णविदारक तान ! पांखरा०
गावें कांहीं गमे जरी तुज मधु मधु गाई निदान ! पांखरा०
खडबड धडपड जरि तुज करणें जागिव जा तें रान ! पांखरा०

---

# मनाशीं—

[ अभंग. ]

—१—

परांची पैरवी[1] । वृथा करोनियां, काय मनराया । लाभ तुज ?
ऱ्याकीं वाईट । स्वकीय कर्माचा, कर्ता धनी साचा । सिद्धांत हा !
परपापकर्मी । तुवां रागावोनी, काय सांग जनीं । साधिलेंस ?
निद्राभंग झाला । शांति लया गेली, अंगाची काहली । झाली वरी !
वृथा विचाराचें । काहूर माजलें, धूरें कोंदाटलें । गृह जणूं.
दुजे दिनीं झाला । उठाया उशीर, कार्यांत अंतर नियोजिल्या !

*　　　*　　　*

क्रोध नाम मना । अन्यदोषास्तव, शिक्षा स्वयमेव । सोसणें कीं;
मर्म-भेदकर । वाणी वदायासी, कासया प्रेरिसी । जिव्हेलागीं ?
आवरीं आवरीं । नको सैलें सोडूं, नको दुःखीं पडूं । अकारण,
तुझ्या दोन शब्दां । त्याचे शब्द चार, शुष्क वायबार । होवोनियां-
धुराच्या सुकाळें । कोंदतील आशा[2],आशांचा कोळसा । शेखीं[3] हातीं !
याचसाठीं तुज । बोध हा सुखाचा,करीं अनंताचा-। तनय हा.
जगाचे बाजारीं । असेंचि चालणें, तेथें न मानणें । सुखदुःख.
सोडोनियां सारी । परावी उपाधी, आत्महित शोधीं । दक्षपणें.

---

—२—

मना रे सज्जना । जरी तीर्थजल, दिलें न प्रेमल । पूजारियें,
कासयातें सांग । व्हावें तूं हिंपुटी, अशीच रहाटी । जगाची ही.
क्षिति नाहीं ज्यासी । तीर्थप्रसादाची,पूजारी त्या याची ।'घ्या घ्या'शब्दीं !
जया नसे वाण । कधीं भोजनासी, आमंत्रिति त्यासी । आग्रहानें !
अन्नवस्त्रीं उणें । जया न कदापी, जो तो आपें ओपी । तयासीच.
वस्त्राविणें ज्याचें । कुडकुडे अंग, त्यासी वस्त्र सांग । कोण देतो ?

---

१ वाटाघाट, चर्चा. २ दिशा. ३ शेवटीं.

चल जाई येथुनी !
आज्ञेपरि नच घडतां वर्तन,
तुझा मुलाजा धरितां लवहि न,
ठेविन या बंधनीं !"
* * *
इतुकें वदुनी, स्वकरें ओढुनि,
विहगा त्यांनीं प्रसहें गगनीं
दिधलें तैं झोंकुनी !

---

## आटप तव हें गान !

[ चाल—क्षणभंगुर हा संसार० ]

आटप तव हें गान, पांखरा, आटप तव हें गान ॥ ध्रु० ॥
दिसे न कोणा असे तयाची, येथें आज तहान ! पांखरा०
श्रमसी कां मग करुनी तगमग ? कोणि न दे अवधान ! पांखरा०
परिस परिस हें, जें तुज कथितो अनुभववृद्ध ज्ञान ! पांखरा०
अवजड पैंजण पदीं विलसती काय न त्यांचें भान ? पांखरा०
कुटिल कचें तव चंचु बांधिली आहे ध्यानीं आण ! पांखरा०
भिजे तुषारें सुके समीरें ऐसा जन नादान ! पांखरा०
हळ हळु मागें सरत विरागें बसला कोरित कान ! पांखरा०
धर्म कशाचा ? घटन कशाचें ? बुभुक्षितांची खाण ! पांखरा०
नसे अपेक्षा न वा तितीक्षा, नाहीं मान—अमान ! पांखरा०
स्वातंत्र्याचें सामगान ही परिसाया निस्त्राण ! पांखरा०
नको षड्ज तव नको खर्ज वा कर्णविदारक तान ! पांखरा०
गावें कांहीं गमे जरी तुज मधु मधु गाई निदान ! पांखरा०
खडबड धडपड जरि तुज करणें जागिव जा तें रान ! पांखरा०

---

## मनाशीं—

[ अभंग. ]

—१—

परांची पैरवी[1] । वृथा करोनियां, काय मनराया । लाभ तुज ?
बऱ्या कीं वाईट । स्वकीय कर्माचा, कर्ता धनी साचा । सिद्धांत हा !
परपापकर्मीं । तुवां रागावोनी, काय सांग जनीं । साधिलेंस ?
निद्राभंग झाला । शांति लया गेली, अंगाची काहली । झाली वरी !
वृथा विचाराचें । काहूर माजलें, धूरें कोंदाटलें । गृह जणूं.
दुजे दिनीं झाला । उठाया उशीर, कार्यांत अंतर नियोजिल्या !

*  *  *

क्रोध नाम मना । अन्यदोषास्तव, शिक्षा स्वयमेव । सोसणें कीं;
मर्म-भेदकर । वाणी वदायासी, कासया प्रेरिसी । जिव्हेलागीं ?
आवरीं आवरीं । नको सैलें सोडूं, नको दुःखीं पडूं । अकारण,
तुझ्या दोन शब्दां । त्याचे शब्द चार, शुष्क वायवार । होवोनियां-
धुराच्या सुकाळें । कोंदतील आशा[2], आशांचा कोळसा । शेखीं[3] हातीं !
याचसाठीं तुज । बोध हा सुखाचा, करीं अनंताचा- । तनय हा.
जगाचे बाजारीं । असेंचि चालणें, तेथें न मानणें । सुखदुःख.
सोडोनियां सारी । परावी उपाधी, आत्महित शोधीं । दक्षपणें.

---

—२—

मना रे सज्जना । जरी तीर्थजल, दिलें न प्रेमल । पूजारियें,
कासयातें सांग । व्हावें तूं हिंपुटी, अशीच रहाटी । जगाची ही.
क्षिति नाहीं ज्यासी । तीर्थप्रसादाची, पूजारी त्या याची । 'घ्या घ्या' शब्दीं !
जया नसे वाण । कधीं भोजनासी, आमंत्रिति त्यासी । आग्रहानें !
अन्नवस्त्रीं उणें । जया न कदापी, जो तो आपें ओपी । तयासीच.
वस्त्राविणें ज्याचें । कुडकुडे अंग, त्यासी वस्त्र सांग । कोण देतो ?

---

१ वाटाघाट, चर्चा. २ दिशा. ३ शेवटीं.

झाला अन्नाविणें । पोटाचा कोनाडा, कोण तो बापुडा । जेववीतो !
सुशील साध्वींचे । दारीं जळे बत्ती, वेश्येदारीं हत्ती । झुलतसे !
भरींवर भर । करावी ही रीती, जगाची ही नीति । नवलाई !

* * * *

जेतुलें[1] बा जळ । भरलें जगतीं, सारें तें निश्चितीं । तीर्थ जाण.
गंगा भागीरथी । तापी सरस्वती, भामा भीमरथी । तीर्थजल.
कृष्णा इंद्रायणी । कावेरी नर्मदा, पंचगंगा गोदा । तीर्थजल.
कूप वापी ओढे । नाले नद्या तळीं, सारीं हीं भरलीं । तीर्थोदकें.
प्राशीं त्यांतूनीया । हवें तेंतुलें[2] तें, नाहीं म्हणे तूतें । कोण पाहूं ?
विश्वंभराचें त्या । खरें पादोदक, हेंचि तीर्थ एक । मना माझ्या.
कोणी या आंबट । म्हणो समाधान, तुजसी कारण । काय त्याचें ?
जाणसी कयास[3] । तूंचि अंतरींचा, म्हणे अनंताचा- । तनय हा.

—२—

नको नको मना । नको आतां ओढूं, मोडोनियां काढूं । तुज किती !
किती तरी येऊं । सांग काकुळती, काय ही फजीती । गोड वाटे ?
साऱ्याच बाजूंनीं । उबगलों पुरा, आतां कोंडमारा । सोसे ना हा !
आजन्म हें नाक । धरोनी मुठींत, अर्ध्या वचनांत । वागलों मी.
जन्मा येवोनीयां । काय बा साधिलें, खोदें उपसले । पराव्यांचे !
सदा सर्वकाळ । तुझें म्यां ऐकावें, तूं न परिसावें । माझें कधीं-
कोठील हा न्याय । कोठील ही नीति, पुरे बा संगति । झाली तुझी !

* * * *

दास असोनी तूं । स्वामीसा वागसी, मज वागवीसी । दासापरी !
तुझ्या ओंजळीनें । पाणी पितां पितां, तृष्णा ही अनंता । वाढलीसे !
चुकूनही ज्याच्या । पहावें न तोंडा, त्याच्यापुढें गोंडा । घोळलासी.
नाहीं नाहीं तेथें । केली पायपीटी, हातींची नरोटी । चुकेचिना !

---

१ जितकें. २ तितकें. ३ निश्चय.

नेका त्याचे पाय । असवीं न्हाणोनी, डोईच्या वस्रींनीं । घासिलेसी;
अग्रेपण आलें । नाक हें घासोनी, तोंड वेंगाडोनी । झालें वक्र !

* * * *

मायभूमीसाठीं । होतासी पायिक[1], अल्प आराणूक[2] । होती माझी.
मायभूमीपायीं । वाहतां मस्तक, जन्माचें सार्थक । होतें कांहीं.
मायभूमीसाठीं । सांडितास प्राण, तरीही निर्वाण । साधोनियां-
थोडें फार माझें । अंतरींचें गूज, पुरोनीया चोज । होतें लोकीं.
घड न देवाची । घड न देशाची, सेवा हातें साची । घडू दिली !
स्वार्थ परमार्थ । एकाचीही तुज, प्राप्ति न निर्व्याज । झाली बापा !
पुढतीं या तरी । प्रेरीन मी जैसें, रहाटावें तैसें । तुवां लोकीं.
पंक्ति-बारगीर । होवोनि बसावें, सम्राट् पद द्यावें । माझें मज.

---

—४—

बापा मनराया । कासया हा राग, उद्वेग विराग । कशापायीं ?
नसे या कारण । आज विकारांचें, पर्व आनंदाचें । मानीं गड्या !
पुरें रागावणें । पुरें जाजावणें, कढणें कुढणें । पुरें झालें.
नको भरकटूं । पुरें धांवपळ, क्षणैक निचळ । होई तरी.
येई येई थारीं । होई सावधान, थोडें अवधान । देई मज.
बोधें कोरड्या या । तुझी बुझवण, होणें न म्हणून । तुजसाठीं—
सांगोनियां थोडें । पूर्वानुसंधान, जागृत स्मरण । करीतसें.

* * *

केली बागशाही । उत्साहाचें मोल, देवोनी अमोल । कौतुकानें.
नखांच्या नांगरें । भूमि नांगरीली, आणि भिजविली । नेत्रोदकें !
पुष्पतरुलता । मेळवोनी यत्नें, संरक्षिलीं रत्नें । जीवाऐशीं !
तरुलतिकांचें । गुणजातिधर्म, पहावें न वर्म । माळीयानें !
माळीयालागोनी । एकच विचार, गंधाचा साचार । दुजा नाहीं.
जन जनार्दन । यांतोनी कोणाही, येती पुष्पें पाहीं । उपयोगा.

---

१ शिपाई. २ आवड; शांति.

देवा,इतरां वा । पुष्पें जीं नकोशीं, माझीं तीं मजसी । लखलाभ!
ऐशीया विचारें । बाग लावितांना, मीं न विचक्षणा । मशीं केली.

* * *

तरुलता जंव । सान अभिनव, होता त्यांचा भाव । माझे ठायीं,
सांजसकाळेशीं । वाटेसी माझिया, डोळे लावोनीयां । उत्कंठेनें.
येण्याची माझिया । भेटीची वा तैसी, दावीती असोसी । सर्वकाळ.
जातां मी बागेंत । बांकवोनी मान, होतीं देत मान । मजलागीं.
मागील जन्मींच्या । भावि आयुष्याच्या, तैशा सांप्रतींच्या । गुज गोष्टी,
अंतरींचीं काव्यें । दावीती गाऊन, आलाप घेऊन । प्रेमानंदें.
कधीं कानगोष्टी । कधीं प्रेमालाप, कधीं मनस्ताप । निवेदिती.
ऐसे योग नाना । साधिले अन्यान्य, काय न स्मरण । होई तुज ?

* * *

झालीं जों तीं मोठीं । गेला बालभाव, खोटा अहंभाव । प्रकटला.
गरज संपतां । सरे माझें काज,केवीं पूर्व चोज । राहणें तें?
सुचतां विचार । विकार दाटले, सहज निमाले । शुद्ध भाव.
शब्दचहाटळी । येई जों का ऊता, जाय शालीनता । विलया तैं.
विनयाचा[1] जन्म । विद्येचिया कुशीं, मृत्युही तयासी । तीच देई.

* * *

एक वदे मज । प्रतारणा ऐशी, कां हो तुम्ही मशीं । करीतसां ?
माझीया प्रसूना । म्हणाया धत्तूर, कोण तूं चतुर । शब्दवेत्ता ?
गुलाब वदाया । तयालागीं साचें, गाठोडें का 'बा'चें । वेंचतसें ?
सुमें योपितांना,रुचलीं माझीं,ना ? तुज पहावेना । गमे मज.
सदा मत्सरानें । जळतोसी मनीं, दावितोसी जनीं । शांत भाव !
काय म्हणोनीया । शंभूसीच मात्र, फुलें हीं पवित्र । वहावीं रे ?

---

१ 'विद्या ददाति विनयम्' असें सुभाषित आहे. 'दा' या धातूचा "देणें" हा जसा अर्थ आहे तसा "कापणें" हाही त्याचा अर्थ आहे.

याच सुमदामें । कांता भूषवीन , ना तरी कामीण । भलतीही !
नराचि निर्माते । देवदानवांचे, पूज्य मज साचे । उभयही.

*　　*　　*

एक वदे जुने । तुझे हे रिवाज, रुचती न मज । कदा आतां.
जुने वासनांत । ठेवीं ते बांधोन, कोणीही नूतन । स्पर्शीना त्या.
ऐशीं हीं बोलणीं । कोणी तोंडावरी, कोणी पाठीवरी । बोलताती !
कोणी वाऱ्यासही । उभे न रहाती, तोंडें फिरवीती । पाहतांच.
भेट घेतां माझी । येईल लघुता, हेंही भें[1] तत्त्वतां । वाटे कोणा !
ऱ्यांच वाढवीलीं । तरुलता ऐशीं, वर्तती माझ्याशीं । आजकाल.
ऐशा स्थितीमाजीं । बाग-त्यागावीण, नुरे समाधान । दुजें मज !

*　　*　　*

मज एकासाठीं । बाग जाणें लया, केविं मनराया । सहावें मीं ?
चुकोनीहि कधीं । वेडा हा विचार, नाणिला साचार । अंतरीं मीं.
ग्रामाचा विलय । एकासाठीं जेथें, मोकलावें तेथें । एकालागीं.
भारतीयांलागीं । हीच भारताची, असे साक्षेपाची । शिकवण.
पशुपक्षी यांचीं । बाळें होतां मोठीं, पूर्वींची रहाटी । पुसे तेथें.
आम्हां कविजनां । सृष्टि हें दैवत, हेंचि तें निश्चित । सांगतसे.
मना रे सज्जना । रागाचें कारण, योग्य का अजून गमे तूज ?

---

—५—

आतां कां रे ऐसा । मना! पेंडुळसी, आणि पांगूळसी । उठाउठीं ?
डिंवचोनी मज । आणिली जागृती, आणि तूं सुषुप्ति । सेवितोसी ।
आतां तुज ऐसें । कोण करूं देई, काय चाड नाहीं । माझी तुज ?
ऊठ ऊठ वेगें । कपिबुद्धिमंता, वायुवेगवन्ता । मना माझें.
ऐक एक तुज । पूर्वेतिहासींची, कथा नवलाची । निवेदितों.
कुत्रे शिक्रापुरी । प्रसिद्ध या प्रांतीं; त्यांची अनुभूति । मित्रें एका—
दिली आणोनीयां । सभास्थानीं मज, स्मरण सहज । झालें त्याचें !

*　　*　　*

---

[1] भय.

शिक्रापुरी श्वान । कार्यसाधू मोठे, अस्सल भामटे । जातिवंत !
नदीतीरावरी । घालोनीयां पाळा, मार्गस्थ फराळा । बैसलेती—
न्यहाळोनी आधीं । दृश्य हें दुरून, होती चार जण । एक्या ठायीं.
भांडोनी अन्योन्यीं । लोळण घेवोनी, पडती येवोनी । पांथांमाजीं.
गुर्गुरत सारे । पाथेय[1] भक्षिती, पांथ निरखीती । टकमका !
याची तंतोतंत । मजसी प्रचीती, मित्रराज देती । आणोनीयां.

* * *

निश्चित करोनी । पुढील विचार, सभा ती सादर । बोलावीली.
शंकित होवोनी । विचारूं मी जातां, चालक तत्त्वतां । काय वदे ?
झालें पूर्वीं जें जें । विसरोनी जावें, लक्ष परी द्यावें । कार्यभार्गी.
नीतिरीतीला या । काय नांव द्यावें, पडे हें स्वभावें । गूढ मज.
दोषयुक्त व्यंग । जीव जन्मजात, तत्त्व हें निश्चित । सर्वमान्य.
दोष परी जेथें । नसे स्वाभाविक, तत्त्व हें मायिक । तेथें जाण.
करोनियां आधीं । बळें लत्ताघाता, क्षमा मा[1] भाकितां । काय वेंचे ?

* * *

वैयक्तिक मज । जरी दूषियेलें, तरी एक वेळे । साहीन मी.
परी मायभूस । किंवा जन्मदात्या, माझे मातापित्या । आणि धर्मा—
आराध्य दैवता । पूज्य गुरुजना, स्वराष्ट्रधुरीणा । किंवा मित्रा—
सारांशें, मीं माझे । जयां लेखियेलें, तयांना दूषिलें । जरी कोणीं—
एक निमीषही । मी न तें साहीन, फळ चाखवीन । त्याच क्षणीं !

* * *

देहें जरी झालों । दीन बलहीन, तोंडाचा सोडीन । पट्टा तीव्र.
करोनी भेदक । शब्दभडिमार, अंतर साचार । निववीन.
कृष्णसर्पापरी । दंश मी धरोनी, डंखीन साधोनी ! प्राप्त काल.
सदा मी प्राण्यांत । पाहीन तयासी, ऐसा दीर्घद्वेषी । होईन मी.

* * *

---

१ वाटेचें फराळाचें सामान. १ मग.

महारोग्यापरी । धरीं मी हे दूरी, हस्तीदंती[1] परी । चुकों नेदीं.
मोजोनी पैजारा । मैंदां या माराया, क्षम तो तुकया । झाला एक !
येर गबाळांना । हेंचि बा साधन, वंदावें दुरून । सर्प विंचू !
सागे आणि लागे । सिद्ध नी साधक, वहावें मस्तक । त्यांचे पायीं.
कानाचे ते चाफे । धरोनी हातांत, घ्याव्या श्रीमुखांत । मारोनीयां.
चुकलों चुकलों । वदावें विशेषीं, नाकदुरयासी । काढोनीयां !
मधुमुखान्वित । मूर्त विषकुंभ, शुंभ कीं निशुंभ । रक्षोराज.
शंभू ऐसा कोणी । असेल तत्त्वतां । जरी पचवीता । दावा त्यातें ।
घालीं दंडवत । सद्गुरुभावाचा, म्हणे अनंताचा- । तनय हा.

---

## बाळ अलवं आहे !

[ दिंड्या. ]

मित्र-भेटीची धरुनि मनीं आस,
सहज गेलों मी त्याचिया गृहास;
शोध करितां " घरिं कोणि नसायाचें–
कुठें फिरतीवर असे जावयाचें ". १
असे दाराआडून उत्तरास,
मला मिळतां लागलों निघायास;
मित्रकन्या मधुभाष सुशीला ते,
जिन्या–तोंडीं येऊनि पुसे मातें. २
" कोन आहे ? भाऊच पाहिजे का ?
उद्यां गेले जमनींत असति एका;
काल येतिल घेवोनि खाउ भाऊ,
तुम्हां देइन दुखवाल जालि न बाऊ ! " ३
बालभाषित मधुमधुर आयकोन,
तिशीं कांहिं न बोलतां जाय कोण ?

---

१ हाताला हात लावून दांत काढणें.

अधिक बोलावें गोड तिनें कांहीं,
म्हणुनि पुशिलें " बाहुली तुझिच का ही ?" ४
" होय माझिच ही पहा कशी नामी,
उगिच लोकांची घेउं कशाला मी ?"
" बरी आहे ना सांग सोनुताई,
कसें आहे गे बाळ तिचें बाई ? " ५
" बाल सोनीचें ? बाल सोनिचें तें,
बाल किनई हो असें आलवें तें;
तें न माझ्यासालिखें उभें लाही,
असें निजतें तें उठत बसत नाहीं ! ६
सोनु अक्किटली फाल माल देते,
इथें चिमटा पोटास अशी घेते;
खलें सांगूं का ? गोदि छान मोठी,
बनी वाइट; ती इंन्दि फाल्र खोटी !" ७
" किती चुरुचुरु तूं सुशे ! बोल्तेसी,
थांब आतां येशील आइपाशीं—
काय चिमटे मीं तुला घेतले का ?"
वदुनि ओढी तिज वरी सोनुअक्का ! ८

---

## गुरुमहिमा* ! !

[ ध्वनित ]

[ चाल—अर्धतनू वारुळीं बुडाली. ]

केशवकरणी अघटित लीला अभिनव गुरु हा असा,
जयाचा सकलजनांवरि ठसा ! ध्रु०
अद्भुत महिमा अपार गरिमा अठराही भागले,
श्रुतींचें पाळेंही खंडिलें !

---

* इ. स. १९२५ त फर्गुसन कॉलेजचा अधिकारिवर्ग व विद्यार्थिगण यांत संमेलनाचे वेळीं कांहीं तेढ उत्पन्न झाली होती;त्या प्रसंगाला अनुलक्षून ही कविता लिहिली आहे.

श्रीवसुंधरेचें भूर्जपत्र सोज्ज्वळ,
नव नील मशी तें झालें सागरजळ,
लेखणी तशी तें वनस्पतींचें कुळ,
स्वयें गणपती लेखक झाला व्यास सांगता तसा,
भारती गुरुच्या लीलारसा !
युगीं युगीं जे असे जाहले गुरुजी वाचस्पती,
गाउं या त्यांच्या रम्या स्मृती !
शुंडामर्क प्रल्हादाचे कृतयुगगुरु फांकडे,
हरीशीं ज्यांचें वहु वांकडें !
आचार्य वळीचा भृगु जो नयसागर,
वृषपर्व्याचाही गुरु तो कुटिलांतर,
एकाक्ष करी ज्या वामन, दर्भांकुर-
खोंचुनि नयनीं, त्रेतागुरु हे असे लाविता कसा,
सुरेचा दिला बुधां वारसा !
वाण न पडली अशा गुरूंची तशिही द्वापरयुगीं,
अहंता हीच जयांची सुगी !
जगद्गुरु श्रीकृष्णा शैशवीं लाधे गुरु चोखट,
कपटपटु तांत्रिक मामळभट !
कौमार्यीं लाधली श्रीरामा त्राटिका,
यौवनीं तशी ते शूर्पणखा मोहिका,
कीं अहीमहींची साध्वी नवमल्लिका,
एकाहूनहि एक धुरंधर आचार्याणी अशा,
मळवुनी गेल्या रविकुलयशा !
चंद्रराव झुंझार घाटगा बाजी पन्नगकृती,
गुरू हे विषतरु शिवबाप्रती !
एलिफासु गुरु शास्त्रिबुवांचा जस्टिस बाळा जसा,
जयांवरि गुरुचा या वरदसा !
जो झटे कराया शिष्यां उजु सर्वदा,
ज्यापुढें फिकी ती शुक्रयशःसंपदा,
का नीटकरहि तो व्हावा नच हो वदा ?

केशव के शव पडतां कौरव रडती किति ढसढसा,
हसतसे पांडवगण परि कसा ?
सार्थक व्हावें निज जन्माचें इच्छी ज्यांचें मन,
तया ही गुरुगीता साधन;
राहुनि तत्पर परिसा सादर होतिल धन्य श्रुती,
सुकृतवान् सुंदरकृति सन्मती !
ही पंचपदी जो पठन करी सर्वदा,
गुरुभीति तया नच करील बाधा कदा,
मिळतील घबाडें विद्यालयिंचीं सदा,
अनन्य भावें सोत्कट सादर केशवपदसारसा,
सेवितां जीव होय थंडसा !

---

## आमचे आधुनिक कवि पुर्वकालीन कविपदावरून ढळले आहेत काय ?

[ इ. स. १९०७ च्या मार्च महिन्यांत जळगांव येथें भरलेल्या महाराष्ट्र कविसंमेलनाचे वेळीं वाचलेला पद्य—निबंध.]

**ओंव्या.**

भो कविता—देवी—प्रियजन । तुम्हांपुढतीं होवोनि लीन । मी बोलतों तें करा श्रवण । देवोनि अवधान साक्षेपें ॥ १ ॥ मुकुंदापासांव मयूरापर्यंत । कवि झाले नामांकित । काय वर्णूं तयांची मात । सर्व-विश्रुत असती ते ॥ २ ॥ मुकुंदें वेदांतसागर । मंथोनी जें काढिलें सार । प्रेमानंदें अद्यापवर । सानथोर सेविती ॥ ३ ॥ गीता नामें सरिता भली । ज्ञानेशें परि सु-तरा केली । ज्ञानेश्वरी सांगड निर्मिली । मानिती माउली तीतें ॥ ४ ॥ भागवत-स्कंध अकरावा । बिकट वाटला अज्ञ जीवां । एकनाथें परी बरवा । केला मेवा तयाचा ॥ ५ ॥ नामदेवें प्रेमें गायिली । श्रीविठ्ठलाची बिरुदावली । शतकोटी संख्या जाहली । असेल पाहिली बहुतांनीं ॥ ६ ॥ कधीं कोणा नाकळला । तो श्रुत्यर्थ तुका बोलिला । सदेह स्वर्गा केला । ही काय लीला

सामान्य ? ॥ ७ ॥ अष्टोत्तर शत रामायणें । निर्मिलीं कीं मयूरानें । तैशीं भारतादि कवनें । नाना गुणीं मंडित ॥८॥ समर्थांनीं बोध केला । 'दासबोध' म्हणती त्याला । शिवाजी-करीं प्रेमें दिधला । झेंडा उभविला कीर्तीचा ॥ ९ ॥ ती नव्हती साधी कविता । मनोरंजनार्थ लिहिली तत्वतां । तिच्यांत कांहीं मार्मिकता । आणि अपूर्वता होती कीं ॥ १० ॥ तो नुसता बोध जाण- । नव्हता;परी बोधांजन । नेत्रीं घालितां प्रेमें करून । जन-लोचन उघडले ॥११॥

* * * *

ब्राह्मणशूद्रादि आर्य-वसती । थोडी फार जी आर्यावर्तीं । दिसते कांहीं संप्रती । समर्थांप्रति तच्छ्रेय ॥ १२ ॥ समर्थकालीं आर्यावर्त । झाला होता यवनांकित । अर्धचंद्राची सर्वत्र मात । पसरली होती ॥ १३ ॥ तत्का-लीन देशस्थिति । समर्थें कथिली शिवाजीप्रती । त्यांच्याच शब्दीं निगुती । सांगतों ती परिसावी ॥ १४ ॥ " तीर्थक्षेत्रें मोडिलीं । ब्राह्मणस्थानें भ्रष्ट झालीं । सकल पृथ्वी आंदोळली । धर्म गेला ॥ १ ॥ " ऐशा वेळीं दास-बोधाची । उत्पत्ति झाली जाणा साची । किती करावी स्तुति त्याची । उणीव शब्दांची पडतसे ॥१५॥ असो. तत्कालीन कवि सर्व । ऐसे होते नर-पुंगव । त्यांच्यायोगें सौख्य-पर्व । लाधलें अपूर्व जनांसी ॥ १६ ॥ संप्रती ऐसे कवीश परी । कां न होती निर्धारीं । हा प्रश्न थोराथोरीं । अभ्यंतरीं सोडवावा । ॥१७॥याविषयीं मजप्रती । जें सुचलें तें यथामति । सांगतों आतां निश्चितीं । स्वस्थ चित्तीं परिसावें ॥ १७ ॥ समर्थें व्याख्या कवित्वाची । केली अत्यंत बहारीची । तीच येथें उतरोनि साची । घेतों मी साक्षेपें ॥ १९ ॥ " जेणें घडे भगवद्भक्ति । जेणें घडे विरक्ति । ऐशिया कवित्वाची युक्ति । आधीं वाढवावी ॥ १ ॥ शीघ्राचें कवित्व केलें । जें पाहिलें तें वर्णिलें । भक्ती-वांचून जें झालें । या नांव धीटपाठ ॥ २ ॥ कवित्व नसावें धीटपाठ । कवित्व नसावें खटपट । कवित्व नसावें उद्धट । पाषांडमत ॥३॥ "

* * * *

एवं पूर्व कवि भगवद्भक्त । होते अत्यंत निष्णात । म्हणोनि ते विख्यात । जगतीं ज्ञाहले ॥ २० ॥ पूर्वीं जे जाहले कवीश्वर । बोटांइतुके साचार । संप्रति परी घरोघर । कवीश्वर दिसती कीं ॥ २१ ॥ ज्यानें त्यानें कविता करावी ।

अक्षरांसीं अक्षरें जुळवावीं। कवि-वर ही पदवी घ्यावी। कीर्ति गावी आपुलीच ॥ २२ ॥ कोणी निवडुंगातें वर्णिती। कोणी परिटातें प्रशंसिती। कोणी मूषका वाखाणिती। कोणी गाती घुबडातें ॥ २३ ॥ ग्रामीं येतां कलेक्टर। कविता करावी तयावर। नसते सद्गुण साचार। त्याचे अंगीं जोडावे ॥ २४ ॥ ट ट ट ट हिंगणबेट। साहेब आमुचे ईश्वर थेट। त्यांची बुद्धि अति अचाट। ऐसें कवित्व संप्रती ॥ २५ ॥ मार्गीं पाहतां उंटाबिंट। कवित्वाचे फुटती पाट। नवरसांचे लोटती लोट। जणूं भाट बोलती ॥२६॥ ऐशियातें का काव्य म्हणावें। सांगा तरी जीवेंभावें। काय त्यातें नांव द्यावें। न कळे मातें सर्वथा ॥ २७ ॥ ऐशियातें कवि म्हणणें। वाटे मना लाजिरवाणें। 'कवि' शब्दाची थट्टा करणें। होईल येणें वाटते ॥ २८ ॥ एवं पूर्वस्थानाहुनी। का न व्हावें भ्रष्ट त्यांनीं। कैसा व्हावा मान जनीं। सांगा तरी तयांचा ? ॥ २९ ॥ तात्पर्य त्यांची परमेशीं। नसे भक्ति असावी तशी। हेंचि वाटतें मन्मनाशीं। कारण त्यांच्या अवनतीचें ॥ ॥ ३० ॥ जे आपणातें संप्रती। कवि ऐसें संबोधविती। ते असतील विद्यापति। मी न म्हणें 'नाहीं' कीं ॥ ३१ ॥ ते असतील भाषाकोविद। साहित्यशास्त्र विशारद। बी. ए. एम्. ए. ऐसें पद। असेल त्यांचे नांवातें ॥३२॥ ते असतील गानाभिज्ञ। वा गीर्वाणभाषाप्राज्ञ। किंवा असतील अलंकारसुज्ञ। परी येथें 'काय त्याचें?॥३३॥

* * * *

पूर्वीं जे झाले थोर थोर। रामदासादि कवीश्वर। ते नव्हते पदवीधर। व्यवहारचतुर होते परी ॥ ३४ ॥ तुकोबासी बी. ए. पदवी। होती काय सांगा बरवी। परि त्यासी म्हणती कवि। गाती थोरवी तयाची। ॥ ३५ ॥ फंदी कोणत्या शाळेंत। पढला सांगा निश्चित। परी त्यानें केवढी कीर्त। केली पहा पंडित हो ॥ ३६ ॥ वेणूबाई रूपावली। कोणापाशीं सांग पढली। जनाबाई कोठें शिकली। साहित्यशास्त्र सांगा कीं ॥ ३७ ॥ परी ते होते ईश्वराचे। अस्सल भक्त जाणा साचे। म्हणोनि त्यांच्या कवित्वाचें। नांव निघतें अद्यापि ॥ ३८ तात्पर्य जे ईशभक्ति। एकविधा नित्य करिती। सर्व शास्त्रें अपाप येती। त्यांच्या पायांनिकट कीं ॥ ३९ ॥ पदच्युतीचें दुसरें कारण। जें भासतें मनालागून। तें सांगतों जी विचक्षण!। विचार करुनी पहा कीं ॥ ४० ॥ सांप्रत आपुली नसे सत्ता। सर्वत्र नांदे पराधीनता।

सकलां छळी एक चिंता । पोट कैसें भरावें ? ॥ ४१ ॥ दीड वीत खळगी-साठीं । नाना उपाधी लागल्या पाठीं । स्थिति झाली उफराटी । कैसी राहटी अपूर्व ॥४२॥ हांजी हांजी करावी लागे । धांवणें पडे साहेबामागें । निद्रित व्हावें असोनि जागे । कर्म वाउगें करणें पडे ॥ ४३ ॥ धनी वदतां बैल गाभणा । होय ! खाविंद ! नववा माहिना । उद्यां पसवेल खचित जाणा । तुकवोनि माना म्हणावें ॥ ४४ ॥ असत्य वदावें उठाउठीं । ना तरी त्वेषें बैसे काठी । राजद्रोह लागे पाठीं । स्थिति मोठी विकट ही ॥ ४५ ॥ निखालस धरोनी निःस्पृहपण । कोणी करील सत्य भाषण । नृपाचा रोष घडे जाण । एवं रावण–राज्य हें ॥ ४६ ॥ ऐशी स्थिति भूपतीची । तीच परी समाजाची । दूषण देणें व्यर्थ साची । यथा राजा तथा प्रजा ॥ ४७ ॥

*   *   *   *

तात्पर्य, आश्रय नसे कोठे ! । कैसे व्हावें कवित्व गोमटें ! । तैसें होणें अशक्य वाटे । मातें या काळीं ॥४८॥ स्वराज्याचा अभाव । कर्तृत्वाचा अंतर्भाव । हेंचि याचें कारण सर्व । विचारांतीं दिसतसे ! ॥ ४९ ॥ स्वराज्य जातां अस्ताप्रती । लक्ष्मी गेली त्यामागुतीं । शौर्य दाक्षिण्य आणि धृति । यांची गति तीच कीं ॥ ५० ॥ खड्ग कैसा धरावा करीं । बंदूक कैसी डागावी तरी । बाणांचा उपयोग समरीं । कैसा करावा नाकळे ॥ ५१ ॥ आधीं समरभू कैशी असते । हेंचि ठावें नाहीं परतें । शस्त्रास्त्रांचे उपयोग ते । दूरीं ठेले ॥ ५२ ॥ भाला न पेलवे आम्हां । बर्च्या न येती लावितां कामा । फुकट न मुकलों स्वकीय धामा । आतां हमामा घालितों ! ॥ ५३ ॥ मुखें बोलावें चुरुचुरु । लेखणी चालवावी कुरुकुरु । कागदी घोडे तुरुतुरु । धांवती आमुचे ॥ ५४ ॥ परी तेही परस्वाधीन । नृप-करीं त्यांची अनीन[1] । धरितां त्यांनीं आंखडोन । आम्ही तळीं येतसों ॥ ५५ ॥ कांहीं न करितां विचार । बकवा आम्ही करितों थोर । पोलीस पाहतां समोर । बसे वाचा आमुची ॥ ५६ ॥ अर्भकें भिती बागुलाशीं । तैसेंच आम्ही भितों त्यांशीं । वृश्चिक टाकी नांगी जैशी । पट्टिकेतें पाहतां ॥ ५७ ॥ आम्ही म्हणतों तोंड आमुचें । परी तेंही करीं त्यांचे । उघडती व मिटती सांचे । सांपळा जैसा ॥ ५८ ॥ बंदुकीचे ध्वनी होतां । अंतर धडधडे तत्त्वतां । संगिनीतें पाहतां । दिपती नेत्र

---

[1] लगाम

आमुचे ॥ ५९ ॥ रसना तैसी कोरडी पडे । स्तंभित होती पद रोकडें । न पहावें इकडे तिकडे । कर्णी दडे बैसती ॥ ६० ॥ एवं परी शेदांड-शीपाई । जाहलों आम्हीं करावें कायी । एवढी हानि कशापायीं । झाली हें जाणती जन ॥ ६१ ॥ बंदुक खड्ग बर्ची भाला । संप्रति जाणतों या नांवांला । परी वाटे पुढील पिढीला । नावें यांचीं न कळतील ॥ ६२ ॥ चाकू कात्री विळी कोयता । हींच आमुचीं शस्त्रें आतां । कालांतरें त्यांसीं तत्त्वतां । मुकूं आम्ही वाटतें ॥ ६३ ॥ कारण हीं हीं देणें घेणें । त्यांचेच करीं आम्हां पुरविणें । अस्मद्गृहीं आम्ही पाहुणे । कैसें झालों पहा कीं ॥६४॥

* * * *

तात्पर्य, त्यांनीं जें द्यावें । तेंचि आम्हीं खावें प्यावें । प्रसन्नमनें तैसें गावें । स्तोत्रपाठ तयांचें ॥६५ ॥ याचें कारण माझ्यामतें । आम्ही विसरलों आम्हांतें । फांटा देतां पूर्वक्रमातें । ऐसेंच होतें निश्चयें ! ॥ ६६ ॥ ब्रह्मचर्य नाहीं ठावा । गृहस्थाश्रमाची तशी पर्वा । कोणी न करी परी जीवां । रति-पिसें लागलें ॥ ६७ ॥ अनुदिनीं प्रजा उपजे खुरट । झाला शक्तीचा नायनाट । प्रसंग ओढवला विकट । भोजनभट्ट झालों कीं ॥६८॥ सर्वेचि बनलों कामदास[1] । विसरोनि गेलों कामदास[2] । स्वहस्तेंचि जेथें केला नाश । कां मदास वहावें? ॥ ६९ ॥ आम्हांपेक्षां पशुजाती । बरी वाटे खरी निश्चितीं । ऋतुकालींच ते रमती । आम्हां नाहीं काळवेळ ॥ ७० ॥ सिंहासारिखा बलिष्ठ प्राणी । त्याचा तोचि त्रिभुवनीं । त्याची समता न करी कोणी । सर्वांस मान्य गोष्ट ही ॥ ७१ ॥ द्विरद वृक आणि शूकर । यांना वधोनी निरंतर । तो चालवी निजाहार । अन्य साचार मक्षीना ॥ ७२ ॥ ऐसा जरी बलि केसरी । संवत्सरानेंच खरोखरी । एकवेळ तो रति करी । आश्चर्य थोर नसे कां ? ॥ ॥ ७३ ॥ क्षुद्र प्राणी पारावत । शिलाकणांतें जरी भक्षित । प्रति-दिनीं परी होवोनि मत्त । रति-क्रीडा करितसे ॥ ७४ ॥ या दृष्टांताचें इंगित । रसिक जाणती निर्भ्रांत । पारावतन्यायें समस्त । आम्ही वर्तत असों कीं ॥७५॥ ऐशा केवळ स्थितीमुळें । आमुचें मन झालें दुबळें । कैसें निर्माण व्हावे नकळे । कवि पूर्वीसारिखे ॥७६॥ उदात्त विचार कवित्वातें । लागती सर्व जाणती निगुतें । परी केउती दुबळ्या मनातें । सुचावे ते सांगा कीं? ७७ तैशा उत्तम कवित्वास । विशाल कल्पना लागती खास । 'परी त्या दुबळ्या

---

१ मदनाचे दास. २ ईश्वरास.

मनास । कैशा तरी सुचाव्या ? ॥ ७८ ॥ उत्तम कवि निपजायातें । निःस्पृह नर लागती निगुते । परी अभाव पडला त्यांतें । परकीय सत्तावळें ॥ ७९ ॥

* * * *

तात्पर्य, जोंवरी परकीय सत्ता । दुर्मिळ तोंवरी उत्तम कविता । तैसाचि दुर्लभ तिचा जनिता । सांप्रतकाळीं भासतें ॥ ८० ॥ सर्वेचि आतां विषयोद्दिष्ट । सांगतों मी तिसरी गोष्ट । परिसोनि ती घ्यावी स्पष्ट । मग तुष्टातुष्ट व्हावें कीं ॥ ८१ ॥ वस्तुतः प्राकृतभाषान्वित । थोडकेचि महाकाव्यग्रंथ । भाषांतररूप परी निश्चित । थोडेबहुत असती जे ॥ ८२ ॥ रघुवंश आणि कुमारसंभव । नैषध किरात भट्टीकाव्य । ऐशीं काव्यें सुंदराभिनव । प्राकृतीं केवळ नसती कीं ॥ ८३ ॥ नाहीं म्हणाया शिवाजीसम । एकदोन काव्येंचि अनुपम । प्राकृतभाषीं मनोरम । स्वगुणीं परम शोभती ॥ ८४ ॥ परि तीं केवळ अपवाद । संस्कृताचाचि अनुवाद । कल्पनामय ऐसा सुसंबद्ध । काव्य-ग्रंथ नसे कीं ॥ ८५ ॥ ज्या ग्रंथीं सरिता पर्वत । सूर्यचंद्रांचे उदयास्त । नृपसभा युद्धें आणि द्यूत । यांचें वर्णन असेल ॥ ८६ ॥ आराम आणि निसर्ग वन । पड्ऋतूंचें तैसें वर्णन । मनुष्यस्वभाव भिन्न भिन्न । करोनी यत्न वर्णिले ॥ ८७ ॥ प्रत्येक सर्गीं एकचि वृत्त । असेल रचिलेलें निश्चित । ' महाकाव्य ' हें नाम सार्थ । तोचि ग्रंथ पावतो ॥८८॥ आधुनिक कविता-भांडागारीं । वरील लक्षणीं मंडित परी । ऐसा ग्रंथ साचारी । एकचि मातें वाटतो ॥ ८९ ॥ 'यशवंतराव महाकाव्य' । तया ग्रंथा हें नांव । सोज्ज्वल कविता अभिनव । पहावी वाचोनी आदरें ॥ ९० ॥ ' खरे ' कुळीं जन्म ज्यांचें । वासुदेवशास्त्री नाम साचें । जनकत्व या सद्ग्रंथाचें । त्यांचेकडे असें कीं ॥ ९१ ॥ आधुनिक कवि–मंडलांत । तया मानितों ललामभूत । न मानावा याचा विषाद । जें रास्त तें बोलिलों ॥ ९२ ॥

* * * *

असो.आतां अलीकडे । ऐसें कवित्व नुपजे रोकडें । कारण याचें वाडेंकोडें । पाहूं विचारें आपण ॥ ९३ ॥ महाकाव्यीं वर्णावयास । योग्य ऐसा सर्वथा खास । नाढळे कोणी उत्तम पुरुष । हेंचि विशेष कारण॥९४॥ दोन तीनशें वर्षांखालीं । शिवाजीसारखा महाबलि । नर–वीर झाला न या काळीं ।

सत्यासत्य पहा कीं ॥ ९५ ॥ विशालबुद्धि नायक गुणी । तैशा नायिका लावण्यखाणी । पतिव्रता वा वीरशालिनी । झाल्या न कोणी संप्रती ॥९६॥ विप्रप्रभूंचे अमदानींत । एकादाचि केवळ निश्चित । जाहला नर बहु विख्यात । माधवपंतांसारिखा ॥ ९७ ॥ योषितांमाजीं रमा साध्वी । मल्हारीस्नुषा अहिल्या देवी । दाभाड्यांची उमा तेवीं । किंवा लक्ष्मी झांशीची ॥ ९८ ॥ ऐसें हे सर्वांगसुंदर । राष्ट्रीं चमकले नारीनर । यावच्चंद्रदिवाकर । कीर्ति त्यांची प्रसिद्ध । ९९ ॥ परी यांचेवरी कोणीं । महाकाव्यें केलीं न अजुनी । खेदाची ही गोष्ट मनीं । वाटे मातें ॥ १०० ॥ आङ्ग्ल देशीं ही मंडळी । जरी जन्मती आङ्ग्ल कुळीं । त्यांच्या अनेक ब्रीदावळी । गायिल्या असत्या ॥ १ ॥ अनेक चरित्रें झालीं असतीं । महाकाव्या नसती मिती । विविध नाटकां तैशी भरती । आली असती अपूर्व ॥ २ ॥ बालबोध नामें मासिक । प्रतिमासीं लिही चरित्र एक । परांचेंचि बहुधा न भ्रामक । बोलणें माझें ॥ ३ ॥ जणूं कांहीं अस्मद्देशीं । पुरुष न झाले तेजोराशि । कालाची गति अद्भुत ऐशी । वाहे कैशी पहा हो ! ॥ ४ ॥ चरित्र असो कोणाचेंही । वाचायातें हरकत नाहीं । वाचकें परी गुणग्राही । होवोनि तें वाचावें ॥ ५ ॥ द्वितीय पक्षीं करितां विचार । मना वाटे आश्चर्य थोर । कीं आह्मीं स्वबालांसमोर । कां तीं चरित्रें ठेवावीं ? ॥ ६ ॥ कारण म्यां आङ्ग्ल मासिकें । जीं पाहिलीं परम कौतुकें । त्यांमाजीं परंतु निकें । अस्मच्चरित्रें नसतीं कीं ॥ ७ ॥ त्यांनीं आपुल्या पुत्रांस । माहिती आमुची द्यावयास । जे लिहिले इतिहास । एकतर्फी असती ते ॥ ८ ॥ जेथें जेथें प्रसंग आले । स्वकीयातें वाखाणिलें । प्रसंग विशेषीं आह्मां निंदिलें । सार्थ केलें लेखांतें ! ॥ ९ ॥ शिवाजीसारख्या पुरुषोत्तमा । चातुर्यसद्गुणशौर्यधामा । कपटी लुटारू ऐशा वामा । दिल्या उपमा तयांनीं ॥११०॥येविषीं करितां विचार । अंतर्यामीं खरोखर । 'चोरासि दिसती सगळे चोर । ह्मण ही साचार वाटते॥११॥एवं ऐशा धूर्तांवरतीं । लेखणी कशाला चाळवोनि धरली । बालकहस्तीं द्यावीं तीं । पुस्तकें मातें ना कळे ॥ १२ ॥

* * * *

परी आमुच्या नयनांप्रती । दोष तयांचे गुण भासती । अनुकरण करावें त्यांचे निश्चितीं । ऐसें मनीं वाटतें ॥ १३ ॥ आह्मां वाटे

नृप इंग्रज । अवतरला जणूं धर्मराज । ऐसा हा भ्रामक समज चित्तीं त्रोजे उपजवी ॥ १४ ॥ ते डोईंतें न मुंडिती । आह्मां आवडे तींचे रीती । ऐसी ही अनुकरण–प्रीति । अपूर्व परी ॥ १५ ॥ सुवर्ण आणि मौक्तिकें तीं । दुर्मिळ झालीं आह्मांप्रती । कच–भूषणीं म्हणोनि निगुतीं । माथा संप्रति शोभवूं ॥ १६ ॥ बंड्या धोतरें अंगरख्यास । ‘खो’ दिला पागोट्यास । आह्मां आवडे तुमान खमिस । नेक्टायफांस गळ्यातें ॥ १७ ॥ सर्वेंचि आह्मीं स्वहस्तकीं । प्रेमानंदें निजमस्तकीं । टोपी घालोनि घेतली निकी । आश्चर्य कीं हें नसे का ? ॥ १८ ॥ अग्निहोत्रातें विसरोनी । गेलो परी क्षणोक्षणीं । समिध शेकतों धरोनि वदनीं । जठरवन्हि प्रज्वाळितों ॥ १९ ॥ एवंच वस्त्रप्रावर्णीं । सर्वेचि तैसें अशनपानीं । कमाल केली अनु-करणीं । प्रतिइंग्रज झालों कीं ॥ १२० ॥ ऐसा विदेशी पोषाक । आम्ही घालितों अलोलिक । ते हांसती निंदाव्यंजक । आम्हां कौतुक वाटे परी ॥ २१ ॥ दोन शतकें इंग्रजांसी । येऊनि झालीं अस्मद्देशीं । परी त्यांनीं अनुकरणासी । नाहीं केलें आमुच्या ॥ २२ ॥ देशकाला शोभे ऐसा । जरी आमुचा पोषाक खासा । परी त्यांनीं त्याचा सहसा । स्वीकार न केला पहा कीं ! ॥ २३ ॥ बंडी पगडी घालतांना । धोतरें तैशीं नेसतांना । कधीं कोणीं इंग्रजांना । पाहिलें काय सांगा कीं ! ॥ २४ ॥ ऐशा स्थितींत आम्हीं परी । कां करावें सांगा तरी । अनुकरण तयांचें साचारी । वाटे परोपरी आश्चर्य ! ॥ २५ ॥ अनुकरणातें करावयास । प्रतिकूल मी नसें खास । चित्तीं परी विचारास । करोनी तें करावें ॥ २६ ॥ अनुकरण करावें सद्गुणांचें । न करावें परी दुर्गुणांचें । जें जें यथार्थ दिसेल साचें । तें तें नेमें घ्यावें कीं ॥२७॥ कालव्ययीं नियमीतता । मिठें भाषण चतुरस्रता । दीर्घोद्योग आणि धूर्तता । सद्गुण तत्त्वतां आंग्लांचे ॥२८॥ सद्गुण हे अनुकरणीय । ऐसा माझा अभिप्राय । जेणें घडे सर्वथा अपाय । तें अनुकरण वर्जावें ॥ २९ ॥

*  *  *  *

असो. हा विषय प्रतिपादितां । विषयांतर झालें तत्त्वतां । समारोप करोनि आतां । विषय पूर्ण करूं कीं ! ॥ १३० ॥ तात्पर्य महा-काव्याजोगीं । स्थिति नाहीं देशालागीं । भाकड कथा काव्योपयोगीं । सर्वथा नसती कीं ॥ ३१ ॥ समजामाजीं फाटाफूट । शब्दांचा

वृथा काथ्याकूट । कर्तृत्वाचा नायनाट । अवघीकडे ॥ ३२ ॥ कोणांमध्यें कर्तृत्व नसे । खुळ्या सुधारणेचें पिसें । लागलेलें सर्वत्र दिसे । काय यातें म्हणावें ? ॥ ३३ ॥ ज्या काय झाल्या चारदोन । नरनारी कर्तृत्ववान । त्यांच्याविषयीं उदासीन । मन आमुचें ॥ ३४ ॥ उरली न कांहीं ईश्वरभक्ति । तैशी नाहीं देशप्रीति । परकी–रीती आवडती । जडे आसक्ति तयांवरी ॥ ३५ ॥ परकीयांच्या सत्ताबळें । शक्ति क्षीण झाल्यामुळें । अंतःकरण जाहलें दुबळें । कैसीं काव्यें व्हावीत ? ॥३६॥ काय आणि कैसें करूं । हाचि मंत्र अष्टोप्रहरू । घरीं दारीं निरंतरू । जपत असों ॥ ३७ ॥ आश्रय कोठें आम्हां नुरला । कैसा प्रसंग ओढवला । उदर लागलें पाठीला । चित्तीं कांहीं सुचेना ॥ ३८ ॥ एवं ऐशा कारणांनीं । आम्ही अस्मत्पदाहुनी । भ्रष्ट जाहलो सर्वथा जनीं । ऐसें मनीं वाटतें ॥३९॥ याचि कारणें मातें वाटे । पडत्या काळीं अशक्य मोठें । होणें कवित्व उत्तम गोमटें । शंका नसे कांहीं-हीं ॥ १४० ॥ स्वराज्य तैसें झाल्याविणें । उत्तम कवि निष्पन्न होणें । पूर्व-स्थानीं किंवा चढणें । शक्य न वाटे सर्वस्वीं ॥ ४१ ॥ असो. जे जे माझे चित्तीं । विचार आले कांहीं निश्चितीं । तें ते मी तुम्हांपुढतीं । ठेविले निगुतीं प्रेमानें ॥ ४२ ॥ प्रस्तुत विषय प्रतिपादिता । उणें अधिक बोलिलों तत्त्वतां । परी त्याची क्षमा आतां । सुज्ञें मातें करावी ॥ ४३ ॥ मानवी कृति दोषास्पद । माझी न त्या अपवाद । कारण मी विशारद । नसें सर्वज्ञ तसा कीं ॥ १४४ ॥

# श्रीशारदादूतिका. ( पूर्वार्ध. )

प्रस्तावनाः—माझे सत्काव्यमकरंदलोलुप व स्वतः सुंदर काव्यरचना करणारे मित्र रा.रा. दत्तात्रेय अनंत आपटे ऊर्फ'अनंततनय'यांनीं केलेल्या या काव्यास जोडण्याकरितां लहानशी प्रस्तावना लिहिण्याविषयीं मला विनंती केल्यावरून, त्यांच्या विनंतीस मान देऊन प्रस्तुत काव्यासंबंधानें प्रस्तावनेदाखल दोन शब्द लिहित आहें. वास्तविक पाहतां माझे मित्र ' अनंततनय ' यांनीं मजपेक्षां अधिक अधिकाराच्या दुसऱ्या एकाद्या गृहस्थाकडून ही प्रस्तावना लिहविली असती तर बरें झालें असतें. कारण प्रस्तुत काव्यांत श्रीशारदेस अनुलक्षून जो संवाद झालेला आहे त्यामध्यें ज्या आधुनिक कवींचा प्रेमपूर्वक उल्लेख त्यांनीं केला आहे, त्यांत त्यांनीं माझ्या संमोहलहरी काव्याबद्दल

" गोविंदाची विमोहलहरी शांति भ्रांताला जी
देत्ये; संशयमणिमालेसम आवड तिजवरि माझी ॥ "

असे उद्गार काढून माझें तोंड ' मोठया खुबीनें ' बंद केलें आहे, यामुळें हें प्रस्तावना लिहिण्याचें काम दुसऱ्या एकाद्या मित्रावर त्यांनीं सोंपविलें असतें तर अधिक चांगलें झालें असतें, हें खरें. तथापि माझ्या मित्रांची उत्कट इच्छा मीच प्रस्तावना लिहावी अशाबद्दलची पाहून त्यांच्या आग्रहास्तव ही प्रस्तावना लिहिण्याची कामगिरी मीं कबूल केली.

' अनंततनय ' यांचीं काव्यें लोकांपुढें आजपर्यंत बरींच आलेलीं आहेत. तीं स्वतंत्ररूपानें व ' केसरी करमणूक व मुमुक्षु' ' इत्यादि वर्तमानपत्रद्वारां व ' लोकमित्र, काव्यरत्नावली व केरळकोकिळ ' इत्यादि मासिकांच्याद्वारां आलेलीं आहेत.

प्रस्तुतच्या काव्यांत कवीनीं सररहा साकी वृत्त घातलें असून १५४ साक्या केल्या आहेत. काव्याचा विषय असा आहे कीं, त्यांत कवींनीं श्रीशारदेस आपलें हृद्गत कळविलें आहे. आरंभींच्या साक्यांत प्राचीन महाराष्ट्रकवींचें स्तवन केलें आहे. प्रथम आद्यकवि परमामृतकर्ते मुकुंदराज यांचा उल्लेख करून पुढें श्रीज्ञानेश्वर, मुक्तेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास, कबीर, रंगनाथ, गिरिधरनागरभक्त मिराबाई, वामनपंडित, मोरोपंत, रघुनाथ-

पंडित, अनंतफंदी, मध्वमुनीश्वर व महिपति इत्यादिकांच्या चरित्रांचें व काव्यांचें स्वरूप एकेका साकींत चटकदार व बहारीनें वर्णिलें आहे. पुढें आधुनिक कवि विठ्ठल, रे. टिळक, गोविंदाग्रज, केशवसुत, बालकवि, दत्त राधारमण, गोविंद, माधव व माधवानुज, चिंतामणी वैद्य, आनंदीरमण, श्रीकृष्ण, सरस्वतीकंठाभरण, खत्री ( सातघर ) इत्यादिकांचा सप्रेम उल्लेख आहे. त्याचप्रमाणें रा. रा. सदाशिवराव भावे, जोशी, चालुक्य व कमलाकांत वगैरे रसिक मित्रांचाही मोठ्या आदरानें उल्लेख केला आहे.

असो. येणेंप्रमाणें या लाहानशा खंडकाव्याचें स्वरूप आहे. माझ्या मित्रांनीं शारदेस उद्देशून जीं हीं पद्यें केलीं आहेत, तीं मला तर फार आवडलीं व त्याचप्रमाणें पुष्कळ रसिकांस तीं खास आवडतील, असें मला वाटतें. माझ्या मित्रांस अद्यापि , 'कविमौक्तिक ' ' कविकुंजर ' ' कविशार्दूल ' 'कविव्याघ्र ' असा एकादा ' प्राचण्ड्यं वहति नखायुधस्य मार्गः ! ' या संस्कृत ओळीचें स्मरण देणारा किताब एकाद्या लक्ष्मीधरानें, विद्याधरानें, किंवा छत्रधरानें पारितोषिखादाखल दिला नाहीं, किंवा ' मी एक प्रचंड कवि होणार आहें, व लवकरच गरुडाप्रमाणें अस्मानांत भराऱ्या मारून सर्व विश्वास आश्चर्यानें चकित करून सोडणार आहें, ' अशा आशयानें आत्मश्लाघेचा प्रकार करून व निर्यमककाव्यरचनेचें वकीलपत्र घेऊन अकांडतांडव करण्याची हांव आमच्या कविमित्रांनीं धरिली नाहीं. मागें एका प्रसंगीं यद्यपि ' अनंततनय' यांनीं प्राचीन कवींच्या किंवा कवितांच्या तरफदारीचे भरांत बिचाऱ्या आधुनिक कवींची व त्यांच्या काव्यांची मानखंडना ज्यांत केली आहे असा एक लेख लिहिला होता. तो आमचे मित्र बालकवि रा. ठोंबरे यांनीं ' आधुनिक कवितेचें स्वरूप व योग्यता ' प्रतिपादणारा लेख लिहिला होता त्यास उत्तर म्हणून लिहिला असून गेल्या वर्षाच्या आरंभीं ' केसरी ' पत्रांत प्रसिद्ध झाला होता. जो स्वतः आधुनिक कविवर्गापैकीं एक व बऱ्याच उच्च दर्जाचा कवि त्याचे हातूनच तो लेख खरोखर लिहिला गेला कीं काय, याचा मला तो लेख वाचतांना थोडासा संशय आला व मी थोडा बुचकळ्यांतच पडलों; परंतु एकादा पक्ष स्वीकारून त्याचें समर्थन करण्याची हातोटी व सदर लेखांत दिसून येणारें आमच्या मित्राचें लेखनचातुर्य पाहून मला बहुत कौतुक वाटलें. ही गोष्ट येथें सांगण्याचा मुख्य हेतु एवढाच कीं, ' अनंततनय ' यांची पद्यरचना जशी सुंदर असते त्याचप्रमाणें गद्य-

रचनाही ते सुरेख करितात. आमचे तरुण मित्र रा. ठोंबरे ऊर्फ बालकवि व प्रस्तुत कवि यांचे दरम्यान झालेला हा मनोरंजक पत्रव्यवहार केसरीपत्रांत (ता. २३।१।१२, २७।२।१२, १९।३।१२ व २६।३।१२) आला आहे तो वाचकांनीं अवश्य वाचून पाहण्यासारखा आहे.

प्रस्तुत निर्यमक कवितेच्या संबंधानें वाद बराच माजून राहिला आहे. त्यासंबंधानें अनंततनय यांनीं रा. रा. बालकवि ठोंबरे यांस ' दुसरी बाजू म्हणून जें उत्तर दिलें आहे, तें येथें देण्यासारखें आहे. रा. रा. अनंततनय आपल्या पत्रांत म्हणतातः—

" यमक, चाल, प्रास हीं जर बंधनें वाटतात तर छंदःशास्त्र तरी कशाला पाहिजे ? वृत्तें तरी कशाला पाहिजेत ? नुसतें गद्यच लिहिणें काय वाईट ! कवितेला अमुक एक चाल न घेऊं देत, तमुक कां घेईनात, पण अखेरीला ती तमुक घेतलेली तरी चालचना ! दिंडीची चाल नको, साकीची चाल लावा; साकीची चाल नको, ' चंद्रकांत राजाची कन्या ' ही चाल लावा; ' चंद्रकांत राजाची कन्या ' नको, दुसरी वाटेल ती लावा; पण त्या तरी सर्व चालीच होणार ना ? ' तेथें होती भली मोठी थोरली धसाडी विहीर, जीमधें गोड पाणी, ' किंवा, ' जातां जातां मार्गीं गवसे चाकू मजला पीतळेच्या मुठीचा, ' अशी मंदाक्रांता वृत्तांत रचना करावयास कोणी कबूल आहेत काय ? 'चंद्रकांत राजाची कन्या सुगुणरूपखाणी ' ही ओळ 'चंद्रकांत नामक राजाची कन्या सुगुणरूपखाणी ' अशी म्हटली असतां फार गोड लागेल नाहीं बरें ? प्रातःकाळीं थंडगारसा वारा झुळ झुळ येतो ' ही साकीची ओळ ' प्रातःकाळीं बर्फासारखा थंडगारसा वारा किती तरी झुळ झुळ वाहतो, ' अशी जर आलाप घेत म्हटली तर हर्षातिरेकानें मुरकुंड्या वळेपर्यंत ती गोड लागून ब्रह्मदेवानें मला दोनच लहान लहान कान दिले, चांगले सुपाएवढाले मोठमोठे व लांब लांब कान सर्व अंगभर दिले असते,तर त्या थेरड्या कुंभाराचे हात झिजले असते काय ? असेंच म्हणावयाची पाळी येईल होय ना ? तात्पर्य काव्यरचना म्हणजे गद्यरचना नव्हे. गद्यांत काव्य असूं शकेल. परंतु काव्यांत गद्याचा संभव शक्य नाहीं. काव्याला छंदःशास्त्राची जरूरी आहे. छंदःशास्त्राची जर जरूरी आहे, तर मग बिचाऱ्या यमकप्रासांनींच कोणतें घोडें मारिलें आहे व असे कोणते मोठाले केळीनारळींचे बाग कांपले आहेत,कीं

आधुनिक कविवर्गानें त्यांच्या नांवें सारखी तिलांजुळी घेऊन बसावें, हेंच कळत नाहीं. '' प्रस्तुत कवींचा हा युक्तिवाद बराच मार्मिक दिसतो.

निर्यमक कवितेसंबंधानें नुकताच इंदुप्रकाशांत ( ता. ३१।१२।१२ व ३।१।१३ ) जो लेख प्रसिद्ध झाला आहे त्या लेखाच्या शेवटीं माझे मित्र रा. रा. नरसिंह चिंतामण केळकर यांच्या विविधज्ञानविस्तारांतील ( नोवेंबर १९०९ ) ' मराठी कविता व यमक ' या लेखास उद्देशून त्या ठिकाणीं रा. केळकर यांनीं जें म्हटलें आहे, त्याचाच अनुवाद करून मीही म्हणतों कीं, अगदीं निर्यमक अशीही कविता करावयाची नाहीं, व दुसरे पक्षीं यमकाचे जाळ्यांत गुरफटून जाऊन काव्याची कृत्रिमपणामुळें नासाडीही करावयाची नाहीं. तर दोहोंमधून मार्ग काढून यमकादिकांच्या दोषांची बाधा न होऊं देतां त्यांचा फायदा तेवढा करून घ्यावयाचा हाच मार्ग श्रेयस्कर दिसतो व हेंच मत कोणाही विचारी मनुष्यास पसंत पडणारें आहे. कल्पना सरस असावी. ती सालंकार व छंदोबद्ध असून छंदाच्या प्रत्येक चरणाच्या शेवटीं सुंदर यमक साधलेलें असावें. एवंगुणविशिष्ट यमकरूप मुकुटानें महाराष्ट्रकवितादेवी जशी शोभेल, तशी तिच्या डोक्यावरील मुकुट फेंकून दिला, तर ती शोभिवंत दिसणार नाहीं. असें मला वाटतें. असो.

' अनंततनय ' यांचा ' शुचिप्रतिभाझरा ' ज्यांस पाहणें असेल त्यानें, त्यांनीं श्रीमद्भगवद्गीतेच्या १२ व्या अध्यायाचें पृथ्वीवृत्तांत जें अत्यंत सुंदर भाषांतर केलें आहे व जें केरळकोकिळ मासिकांत ( जोड अंक नोव्हेंबर व डिसेंबर १९१२ चा पहा. ) छापून प्रसिद्ध झालें आहे, तें काव्यप्रिय वाचकांनीं अवश्य वाचावें. प्रस्तुत काव्याची भाषा सरळ व गोड असून ' निरंकुशाःकवयः ' असा उद्गार कोठेंच काढावा लागत नाहीं. वृत्त ' साकी ' सुंदर आहे. पुष्कळ ठिकाणीं कै० कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनीं केलेल्या मेघदूताच्या भाषांतराची आठवण होते. आमचे रसिक मित्र पंडित रा. ब. विष्णु मोरेश्वर महाजनी यांनीं म्हटल्याप्रमाणें मनोवृत्तीचें ईश्वराशीं किंवा सृष्टिदेवीशीं तादात्म्य झाल्याशिवाय रसाचा आविर्भाव होत नाहीं. त्याचप्रमाणें, विषय दिसावयाला कितीही क्षुल्लक दिसला, तरी मनोवृत्तीच्या झळाळीनें त्यासही झळाळी येते. या गोष्टीचें प्रमेय ज्यास पहाणें असेल त्यानें आंग्लकवि वर्डस्वर्थ याच्या मनाचें व सृष्टीचें तादात्म्य किती झालें होतें, तें त्या कवीच्या व त्याच्या काव्याच्या संबंधानें अत्यंत रसिक व सहृदय

आंग्ल टीकाकार मि. स्टॉपफोर्ड ब्रूक यांचा 'Theology in English Poets' या नांवाच्या ग्रंथांत सुंदर दाखविलें आहे. सदर ग्रंथांतून एकच उतारा येथें देतों.

I traced in a previous lecture the growth of the conception of Nature as alive, and said that this conception which had only been in germ in others reached its full growth in Wordsworth's poetry. In what way ? The outward universe lay before the poet's eye & ear. He felt it speak to him through his senses to his soul, and feeling this, he asked, what is it ? Who is it that speaks ? Is it only the matter of the universe which by self is dead ? No, he answered. Matter is animated by a soul and it is this soul which thrills to meet me.

" An active principle subsists
In all things, in all natures, in the stars
Of azure heaven, and unenduring clouds,
In flower, tree, in every pebly stone,
That paves the brooks, the stationery rocks,
The moving waters, the invisible air.

*　　*　　*

From link to link
It circulates, the soul of the worlds. "

Now that, which acts, lives, and the universe lives as much by its soul as we do by ours.

To this active principle, Wordsworth gave personality; that which all shared in was in fact one. It was one life, one will, one character, one persen. And this personality he called Nature.

(Lecture V. Every man's Library Edition P. 76-77)

( अर्थ—सृष्टीच्या सजीवत्वाच्या कल्पनेची वाढ कसकशी होत गेली, हें मी आपल्या पूर्वींच्या एका व्याख्यानांत सांगून असें म्हटलें होतें कीं, " इतर दुसऱ्या कवींत ही कल्पना केवळ बीजरूपानें असून तिचा परिपाक वर्डस्वर्थ कवीच्या कवितेंत झालेला आहे." तो कसा ? बाह्य विश्व कवीच्या कर्णेंद्रियास व नेत्रेंद्रियास गोचर होतें. आपल्या इंद्रियांच्या द्वारां आपल्या

आत्म्याशीं तें बोलत आहे असें त्यांस भासतें. आणि हा अनुभव घेत असतांच आपण आपल्यालाच प्रश्न करितों: हें काय आहे ? माझ्याशीं हें जें कोणी बोलत आहे, हें कोण ? बाह्य सृष्टीचा जो जडांश तो तर निर्जीव. तो काय बोलणार ? या प्रश्नाला तो स्वतःच असें उत्तर देतो: छे: असें नव्हे. हा जडांश चैतन्ययुक्त असून त्यांतील चैतन्यच मला भेटण्याकरितां स्फुरण पावतें आहे.

" पदार्थमात्रांत, सर्व प्रकृतींत, नीलनभाच्या तारामंडळांत, वितळून जाणाऱ्या मेघांत, वृक्षांत, पुष्पांत, अगदीं लहान ओहोळाच्या तळाशीं असणाऱ्या प्रत्येक खड्यांत, निश्चल खडकांत, चंचल जलांत, अदृश्य हवेंत एक चित्तत्व भरून राहिलेलें आहे. हा सर्व विश्वात्मा सांखळीच्या दुव्याप्रमाणें त्यांतील प्रत्येक अणूस दुसऱ्यांशीं जोडणारा आहे. "

ज्याच्यांत क्रियाशक्ति आहे तें सजीव आहे; आणि आपल्या जीवाच्या योगानें जसे आपण जगतों त्याचप्रमाणें हें विश्वही आपल्या आत्म्याच्या योगानें जीवमान आहे. हें जें कांहीं सचेतनत्व त्यालाच **वर्डस्वर्थ** कवीनें व्यक्तित्व दिलें. वस्तुतः सर्वांत भासमान होणारें तें एकच तत्त्व असलें पाहिजे. हें तत्त्व[1] म्हणजेच एक जीवन, एकच इच्छा, एकच स्फूर्ति व व्यक्ति अशी त्याची कल्पना होती. आणि ही जी काय समष्टिरूप व्यक्ति तीच **वर्डस्वर्थ** कवीची **सृष्टि**–देवता होय. )

असो. रा॰ रा॰ अच्युत बळवंत साठे एम्. ए. बी. एल्. यांनीं दयाळनाथांची कविता या विषयावर जो सुंदर निबंध अकोल्यास भरलेल्या साहित्यसंमेलनापुढें वाचिला व जो **विविधज्ञानविस्ताराचे** नोव्हेंबर १९१२ चे अंकांत प्रसिद्ध झालेला आहे, त्यांतील एकच लहान उतारा येथें देतों. रा॰ रा॰ साठे म्हणतातः—

' कवि हे शब्दसृष्टीचे ईश्वर होत असे श्रीसमर्थ म्हणतात. ज्याप्रमाणें सृष्टीची प्रतिसंवत्सराला उलटापालट होत असते, त्याचप्रमाणें रसब्रह्माची

---

१ प्रस्तुत ठिकाणीं हिंदुस्थानी कवि सुंदरदास यांच्याः—
" जडकी सक्ति कहा की स्वामी देखहु सृष्टि निहारी ।
हलन चलन चुंबक तै दिसे सूइ न चलत बिचारी ।।
या कडव्याचें स्मरण होतें.

प्रकृतीशीं मिळणी झाली असतां पुनः पुनः नवता धारण करणारें रमणीय रूप काव्याला प्राप्त होतें.'

'जो कारागीर ज्या कालाचा असेल तशी त्याची कृति उतरेल,' असें म्हणून निबंधकारांनीं देवनाथ, मिराबाई, आनंदतनय व दयाळनाथ या चौघांही देवभक्तांचे अभेदित्व चार प्रकारांनीं वर्णिलेलें आहे. त्या चार कवींचीं पद्यें त्यांनीं दिलीं आहेत, तीं विस्तारभयास्तव येथें देतां येत नाहींत, याबद्दल वाईट वाटतें. एकच मूर्ति चार कुशल कारागिरांचे हातून घडतांना सौंदर्य-भिन्नता कशी उत्पन्न होते हें यावरून दिसतें. काव्याचे भोक्त्यांनीं हा निबंध अवश्य वाचावा, अशी शिफारस केल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं. असो.

प्रस्तुत काव्य वाचीत असतां "प्रतिभेच्या अंतरालसृष्टींत विहार करून इहलोकींचीं दुःखें विसरणें" या गोष्टीचा अनुभव माझ्या मित्रांस आल्याचा भास होतो व हीच खूण श्रीशारदादेवीशीं कवीच्या मनाचें तादात्म्य झालें आहे, असें दाखविण्यास पुरेशी आहे.

प्रस्तुत काव्यांत खालील प्रसंग सुंदर असून वाचनीय आहेत.

साक्या २८ ते ३२ (सहज व सरळ विनोद.)
साक्या ३३ ते ३५ (कवीचे ठिकाणीं निसर्गनिरीक्षण कितीं अवश्य आहे यासंबंधानें श्रीशारदेची तक्रार.)
साक्या ४९ ते ५४ (आधुनिक कविप्रशंसा.)
साक्या ७२ ते ८६ (शरद्वर्णन.)

सरतेशेवटीं माझे दुसरे एक परमरसिक व प्रतिभासंपन्न आधुनिक महाराष्ट्रकवींच्या नूतन संप्रदायापैकीं तरुण कविमित्र रा. रा. गोविंदाग्रज (रा. ग. गडकरी) यांच्या हल्लींच्या शब्दांचा अनुवाद करून प्रस्तुत काव्यांतील गुणविशेषांचें थोडक्यांत वर्णन करितों व ही प्रस्तावना पुरी करितों. 'श्रीशारदादूतिका' हें काव्य खरोखरीच सुंदर आहे. कल्पना नवी आहे. रचना चांगली आहे. प्रासयमकांचा 'खटाटोप' सुद्धां अनायासें साधला आहे. ठराविक उपमांचा व कविसंप्रदायांचा उपद्रव मुळींच नाहीं. काव्यमकरंदलोलुपवाचकभ्रमरांचें लक्ष प्रस्तुत काव्यपुष्पाचा सुगंध व मधु यांचेकडे अवश्य आकर्षिलें जाईल, अशी मी आशा करितों.

पुणें
१२-१-१९१३.

कविवृंदाचा नम्र सेवक.
**गोविंद वासुदेव कानिटकर.**

## साक्या.

[ श्रीशारदाऽवाहन–संशयरत्नमाला–श्रीशारदाऽगमन–श्रीशारदेची तक्रार–आश्वासन–आवाहनहेतु–मार्गवर्णन–शरद्वर्णन–मुंबापुरीचें वर्णन–श्रीकृष्णमंदिराचें वर्णन–संदेशकथन व उपायनसमर्पण–उपायनचिकित्सा–आशास्य. ]

हृदयनिवासिनि ! अये शारदे ! झोंप काय ही आतां-
आली तुजला, दृष्टी उघडीं, ठेवीं चरणीं माथा. १
रसिकरंजने ! कुमतिभंजने ! सुधास्यंदने[1] ! देवी !
अंबुजवदने ! वामलोचने ! वीणा निजकरिं सेवीं. २
नवसितवसने ! हंसवाहने ! केविं तरी ही झोंप ?
लोप दयेचा झाला समजूं कीं हा मिथ्या कोप ? ३
किती आळवूं किती स्तवूं गे ! साद न ये का कानीं ?
सोंग घेतलें कीं बधिराचें समजूं सांग निदानीं ? ४

* * * *

आद्यकवीशें मुकुंदरायें परमामृत जें केलें-
तृप्त न होई काय पितां तें तव हें चित्त भुकेलें ? ५
ज्ञानेशाच्या मुक्तेशाच्या ओंव्या सुंदर बाई !
ऐकत ऐकत गमे लागली निद्रा काय तुला ही ? ६
बालकवि श्रीनामा[2] बसला रडत बाभळीखालीं
त्याची बुझवण[3] करावया का गुंतसि तूं या कालीं ? ७
कीं नाथांनीं जीवशिवांचें सुंदर केलें लग्न,
बघतां बघतां तूंहि गमे तैं होसी ब्रह्मनिमग्न ? ८
कीं तुकयाच्या अभंगलोभें फिरसी त्याचेमागें-
हाटोहाटीं गूळखोबरें विकण्याला अनुरागें ? ९

---

१ अमृताची वृष्टि करणारे देवी. २ श्रीनामदेव. ( लहानपणीं त्यांच्या आईनें त्यांना एकदां बाभळीची अंतरसाल आणावयास सांगितलें होतें. बाभळीची साल काढीत असतां खोडावाटे गळलेलें लाल पाणी पाहून त्यांना फार वाईट वाटलें व तीच कुऱ्हाड त्यांनीं आपल्या पायावर मारून घेतली. पुढें मग श्रीविठ्ठलानें त्यांच्या आर्त धाव्याला धावून त्यांना बरें केलें. या कथाभागाला उद्देशून वरील ओळ आहे. ) ३ समजूत.

कीं दासांचा दासबोध तूं जासी ऐकायाला ?
कीं कबिराचे दोहे ऐकत वसनें नव विणण्याला ? १०
श्रीरंगाच्या वासिष्ठानें केलें तुजला दंग-
निजरंगीं कीं सांग शारदे ! काय समजुं मी सांग ? ११
श्रीरामाच्या श्रीकृष्णाच्या लीला श्रीधर गाई,
तच्छ्रवणीं का तुझी एवढी वृत्ति रंगुनी जाई ? १२
कैसी झुलवी मिरा गाउनी मोदें राधासंगें-
गिरिधरनागर; तिथें रमसि का ? सज्जनचित्तविहंगे ! १३
वामन घाली यमकनूपुरें त्यांच्या रुणझुणनादीं-
ऐकुं न येई काय तुला ही हाकचि माझी साधी ? १४
तुला नेसवी मयूर कविवर जरीभर्जरी शेला-
तोऱ्याखालीं त्या न ऐकसी किंवा या हाकेला ? १५
कीं मयुराचा केका–रव तव बसवी कर्णीं टाळी ?
कीं अण्णांची रसवंती तुज गुंतवि मायाजाळीं ? १६
कवि रघुनाथप्रथित चतुर त्या दमयंतीच्या हंसें-
नेलें मोहुनि तुला कुठें कीं ? कविवरमानसहंसे ! १७
कीं फंदीचा तुला लागला फटकन् फटका कोठें ?
कीं तात्या तुज करी उभी गे क्षणभर नाचायातें ? १८
मध्वमुनीचा अक्रुर रडवी मुग्ध गोपिकाबाळां;
वृंदावनिं का म्हणुनि जासि तूं त्यांना शांतविण्याला ? १९
भार्यात्रासें अमृत उभारी कुटिका सोडुनि गेह-
गंगातीरीं पहावया त्या जाशी धरुनी स्नेह ? २०
संतचरित्रें परमपवित्रें वीण्यावरतीं गाया-
महिपतिसदनीं जासी किंवा जनिचें दळण दळाया ? २१

*   *   *

तोंचि उठे पडसाद[1] माझिया चिदवकाशिं या एक;
जेविं उमटला तेविं सांगतों नलगे तर्क अनेक. २२
'कां रे ! इतुका ताररवानें करिसी माझा धावा ?
उठल्याबसल्या मला बाहसी घेउं न देसि विसांवा ! २३

---

१ प्रतिध्वनि.

अल्पकृतिप्रिय शाब्दिक केवळ सांप्रतकविजन सारा
भाव न पोटीं उठाउठी परि पिटितो दंभ-नगारा ! २४
अगाधकवितोदधी कुठें ते शांतिब्रह्म गभीर-
ज्ञानेशादिक; कुठे तुम्ही रे ? गावजलारव फार ! २५
मयूरवामनकविशार्दूलां वदतां निंद्या वाणी;
योग्यचि; कारण मृतसिंहाला बालक धोंडे हाणी ! २६
माझ्या जननिनें दळतां दळतां जीं हो गाणीं केलीं,
सरि न तयांची जरि साहित्यीं करितां अद्भुत केली ! २७
जो तो उठतो मला ओढतो घरची बटिक जणूं मी,
लाविति मजला रडावयाला, कुठुनि जलाविण ऊर्मी ? २८
सोम्या गेला रड मज म्हणती होईं दुःखीं चूर ;
गोम्या आला हास गद्गदां येवो प्रेमा पूर ! २९
कम्या चढला उच्चपदावरि गाईं गाणीं गोड;
धम्या आला ढेंकुण वधुनी पुरवीं त्याचे कोड ! ३०
कोंड्याधोंडीप्रणयरसाचा रम्य वाहवीं पाट;
केविं इथें ये कृष्णरुक्मिणीशृंगाराचा थाट ? ३१
मांजर बघतां गा मज म्हणती घेईं उलकीं ताण;
जल्पुनि करिती सदा सर्वदां माझी ओढाताण ! ३२
केविं रडावें केविं हसावें जरि न चित्तीं कांहीं ?
मोलें रडतां माया नाहीं अश्रुलेशही नाहीं ? ३३
जाळावांचुनि कढ न कधीं ये रडणें मायेवीण;
एरंडाचें गुऱ्हाळ म्हणजे, केवळ सारा शीण ! ३४
ईशभक्तिचा सत्प्रेमाचा लेश न काव्यामाजीं;
कैसें यावें मीं, वद कैसी वृत्ति रमावी माझी ? ३५
बाल्यापासुनि जुन्या कवींनीं ईशभक्तिचा छंद-
मला लाविला, कसे रुचावे आतांचे हे फ़ंद ? ३६
सांप्रतकविजन[1] शीघ्रकोपि हा कुत्सितबुद्धि तसाच-
अरसिक निंदक सुगुणद्रोहक महामत्सरी साच ! ३७

१ हें विधान वाचून पुष्कळांस वाईट वाटेल, पण खरी वस्तुस्थिति अशीच आहे व सूक्ष्म विचाराअंतीं प्रत्येकास ती तशीच प्रतीत होईल !

मयूरवामनदत्तभूषणें जीं मी लेत्यें देहीं-
बघतां उठतो शूल तच्छिरीं, होते तनुची लाही ! ३८
कोणी म्हणती " कितीं भूषणें जीव न दडपे काय ?
कवितादेवी अर्धी मेली केली दुष्टें हाय " ! ३९
बालिशता ही किती खरोखर काय भूषणें होती-
नैसर्गिक मधुरूपा मारक बुद्धि न का ही कोती ? ४०
जात्या रुचिकर दूध लागतें मी न म्हणें कीं, नाहीं;
दुग्धशर्करा मधुरतरा परि कडू न लागे पाहीं. ४१
आर्यस्त्रीजन बहु भूषाप्रिय ठावें जगताला हें;
मीच तया अपवाद असावें कां हें तन्मन लाहे ? ४२
सुवर्णवेष्टित पाषाणहि तो लेवूं ललना आम्ही;
काय न तरि मग रम्य भूषणें मणिमय नामी नामी ? ४३
भूषणभूषित तनू मदीया विद्रूपाही त्यांना-
भासे तरि कां अलंकारिती प्रेमें निज भार्यांना ? ४४
शब्दालंकृतिवरी तयांचा कटाक्ष दिसतो फार;
केविं रुचे मग पत्नी—चरणीं तोडरनूपुर—भार ? ४५
स्वीयतनूवरि जात्या सुंदरकेशालंकृति त्यांना-
मूळसर्पि कां न रुचे ? रुचते करितां छिन्ना भिन्ना ! ४६
सुमनांचे वा वसनांचे वा धातूंचेही तैसे-
अलंकार मी एक मानित्यें भू खलसाधू जैसे ! ४७

*   *   *   *

भांगेमध्यें तुलसीतरुवर जेविं निपजती चार;
सांप्रतकविगणिं तेविं विलसती प्रिय ते मजला फार. ४८
विठ्ठल किंवा कवि नारायण यासम एकादाच;
कधिं काळीं तरि पूर्वयुगींचें स्मरण मला दे साच ! ४९
गोविंदाग्रज केशवसुत ही तात्त्विककविमणि जोडी,
अर्थगभीरा वाणी त्यांची देई रसिका गोडी ! ५०
बालकवीचे बोल बोबडे अर्थहीन कीं सार्थ,
निष्कारण ते मला मोहिती, वदत्यें बोल यथार्थ ! ५१

प्रेमनिमज्जन मला घडे जें बहुदिनिं त्याचें श्रेय--
दत्तकवीला समुचित देणें प्रेम जयाचें ध्येय ! ५२
राधारमणप्रणीत कविता ओजस शुद्ध रसाळ-
बघतां राहे उभा मजपुढें ' वामन ' माझा बाळ ! ५३
गोविंदाची विमोहलहरी शांति श्रांताला जी-
देत्ये संशयमणिमालेसम, आवड तिजवरि माझी ! ५४
पुरे जाहली कर्मकथा ही जन्माचें हें माझें-
गाणें झालें, स्मरण पूर्वींचें करितें दुःखा ताजें ! ५५
शांत तुझ्यासम सहज लाधला श्रोता मज हा आज;
म्हणुनी इतुकें मी हें वदल्यें ना तरि नव्हतें काज ! ५६
व्यक्तिमतांच्या स्वातंत्र्याचा संप्रति मनु हा चाले ;
कोणि कुणाचा देव न भक्तहि कविनय विलया गेले ! ५७

* * * *

काय हेतु वद मनीं धरोनी आठव मम हा केला ?
आल्यें धांवत सपदि[1] परिसतां प्रेमळ तव हाकेला '. ५८
आश्वासनपर वाग्देवीचे शब्द ऐकतां कानीं-
धालों, भ्यालों होतों बहु मी परिसुनि पहिली वाणी. ५९
वदलों तेव्हां " अये शारदे ! भक्तकामदे ! माते !
मत्कविमित्रें श्रीकृष्णानें लिहिलें पत्रीं मातें; ६०
" काव्यकरंडक दीपावलिच्या भरून पक्वान्नांहीं-
मला पाठवीं " कसें करूं परि धैर्य न होई पाहीं- ६१
काव्यदेवते ! आज म्हणोनी केला तव मीं धावा,
काकुळतीला येउनि कीं मम हेतू पूर्ण करावा ! ६२
करुनि दया तूं स्वयें जाउनी मुंबानगरीमाजीं,
श्रीकृष्णातें मत्कृति अर्पीं झडकरिं जों ती ताजी. ६३
सर्वसाक्षिणी सर्वज्ञा तूं तद्गृह तुजला ठावें;
तरिहि सांगतों चार खुणा मी कैसें जावें यावें. ६४
अस्तदिशेनें योजनभर तूं जातां चालुनि माते !
देव मोरयापुण्याश्रमपद[2] दिसेल मार्गीं तूतें. ६५

---

१ लौकर. २ चिंचवड.

निकटवर्तिनी श्रीतुकयाची देहू पुण्यपुरी ती-
जातां जातां पाहीं; क्षेत्रें वंदावीं ही रीती. ६६
शाहुनृपाच्या सेनापतिची ' तळ नगरी ' ही पाहीं,
मार्गींच विलसे, नसे तिथें परि नयनमनोहर कांहीं ! ६७
केलें आंग्ला पराभूत गे ! मराठियांनीं जेथें,
वटनगरीची पवित्र रणभू मोद मनाला देत्ये ! ६८
सव्यकराला पुढें कारलें येथिल सुंदर लेणीं-
दिसतिल तुजला काय वर्णुं तीं ? चातुर्याची खाणी ! ६९
मनुजकृतीची सीमा केवल सार्थक तें दृष्टीचें !
आश्चर्याचें निधान भासे साराचि कौशल्याचें ! ७०
किंचित पुढतीं लोणावळ तें विशाल विलसे जेथें-
बाप्परथांचें कलाभुवन, मन चकिताचि बघतां होतें ! ७१
वासंतिकसुखनिवासनगरी सांप्रत वदती यातें,
लक्ष्मीधरनरनारी येथें वसति निदावी मातें ! ७२
सह्याद्रीच्या वनदेवीच्या अंतःपुरचें किंवा-
द्वारचि अंबे ! मजसि गमे हें सुखकर दर्शन जीवा ! ७३
खंडाळ्याचा घाट मनोरम सुषमा[१] ही सृष्टीची,
वनदेवीचें अंतःपुर हें सीमा सुविलासांची ! ७४

* * * *

काशावसना पंकजवदना हंसनिनादा गे जी-
शरद्रूपिणी सुंदर युवती येथें विहरे आजी ! ७५
परिणतशालीतनू मोहिनी पीतकेतकीकांती,
सुवर्णवेली गौरांगी ती बघतां पडते भ्रांती ! ७६
चंद्रें रजनी, काशसुमें भू, सरित्तोय तें हंसें,
सप्तच्छदतरु सुमें, कैरवें सर, मतिमलविध्वंसें ! ७७
शंख रजत वा दुग्धोपम हीं धवल तेंवि ही भूमी,
मधुरमालतीसुमनाच्छादित दिसे मनोहर नामी. ७८

---

१ शोभा.

शब्दित शफरी कांची तटकटिं मरालमाला कंठीं-
ऐशी सरिता नवयुवतीपरि पतिगृहमार्गा कंठी ! ७९
तोयशून्य हे तूलोपमघन देवि ! हालतां वातें-
नभोभूपशिरिं जणूं चामरें गमेल ढळती तूतें ! ८०
ज्योत्स्नावस्त्रा हिमकरवक्त्रा ताराभूषा वामा-
घनमुक्ता ती नवयुवती जणुं भासे रजनी रामा ! ८१
पथिकवियोगें तद्युवतीचें जेविं मावळे हास्य;
चंद्रास्तें वघ मिटे तेविं गे ! अभिनव मृदु कुमुदास्य ! ८२
नीलनभातें निरखुनि नूतननीलेंदीवर–कांती,
हंसनिनादा परिसुनि रमणी–कटिकांचीची भ्रांती– ८३
बंधुकमृदुदल बघतां स्मरुनी निजकांताधर पांथ,
दिसतिल मार्गीं वण वण फिरतां तुजला विव्हलचित्त ! ८४

*    *    *    *

शरच्छोभा अपूर्व शोभा निरखित निरखित जातां,
कल्याणातें जाशिल माते ! लवही श्रम नच होतां. ८५
परिहाराया मार्गश्रम तूं द्वयदिन राहीं येथें.
श्रीमन्माधव–अनुजकविगृहीं सेवीं सुखशांतीतें. ७६
मेघनादवध काव्य मनोहर नूतन लिहिलें त्यानें,
सरल सुलभ तें किति ओजस्वी कोण न त्याला वाने ? ८७
तेंवि ‘ सति श्रीठाकूराणी ’ नामक सुंदर काव्य-
रसिक माधवें प्रेमें लिहिलें अपूर्ण तरि तें श्राव्य ! ८८
काव्ययुगुल हें बघसी जों तूं ‘ अद्भुत[१] किमियागार ’,
येउनि पुढतीं रिझविल तुजला सुरस असे तो फार ! ८९
नयनमनोहर परम सुवासिक सुमनें जाईचीं[२] तीं-
समर्पील तो तुला गौरवें प्रमुदित होउनि चित्तीं ! ९०

---

१ ही एक कै०कवि माधवानुज यांचे वडील बंधु श्री० माधवराव मोडक यांची कविता आहे. ती मनोरंजनांत छापून निघाली आहे. २ माधवानुजांची जाईचीं फुलें ही कविता.

उभय बंधुंना परि त्या संप्रति तनूस्वास्थ्य ना कांहीं !
पूर्वीसम तव सेवा न घडे म्हणुनी खिन्न सदाही ! ९१
कृपादृष्टिनें पहा त्यांकडे देईं आरोग्यातें;
करून घेईं स्वकीय सेवा हीच याचना माते ! ९२
कोण क्षम गे ! सेवाया तुज तुझ्या अनुज्ञेवीण ?
तेज शशीला रवि न जरी दे कसा प्रकाशे दीन ? ९३
अस्तु. इथें जों राहशील तूं तुझ्या दर्शनासाठीं,
प्रेमल सहृदय कवीजनांची होइल भारी दाटी. ९४
चिंतामणि[1] कवि येइल घेउनि ' संन्याशाचीं गीतें '.
आनंदीपति[2] ' कल्पद्रुमसुम ' तुजला अर्पायातें. ९५
तृप्त करोनी या सत्कविंना चार योजनें अंबे !
जातां तुजला दिसेल मुंबानगरी सौख्यकदंबे ! ९६

* * * *

आश्चर्यानें स्तिमित होउनी बघतां येथिल थाट
' कोठें आल्यें ' गमेल तुजला ' चुकल्यें मी का वाट ' ? ९७
विपरितवस्त्राभरणीं मंडित पाहुनि येथिल लोक
भांबावुनि तूं जाउनि चित्तीं करशिल तर्क अनेक. ९८
'आंग्ल वदूं तरि श्यामलतनु हा शिखा न शीर्षीं कांहीं,
यवन वदावें तरि दाढीचा ठावठिकाणा नाहीं ! ९९
आंग्लपद्धती शिरोभूषणें आंगीं पारसी कोट,
धोतर खालीं यवनोपानह पदीं काय हा थाट ! १००
किंवा पगडी शिरीं विराजे तुमान सुंदर खालीं,
उपवस्त्राचा फांस गळ्याला गंध केशरी भालीं ! १
किंवा कोठें भस्म कपाळीं वरी मोंगली टोपी,
अंगीं बंडी शीतनिवारक मूर्तिमंत बहुरूपी ! २

१ कल्याणचे प्रसिद्ध कवि कै० या. दि. वैद्य यांचे हे चिरंजीव. हेही चांगली कविता करितात. २ हर्षे उपनांवाचे एक सॉर्टर;(आतां पोस्टमास्तर.) हे कवि 'आनंदीरमण' या नांवानें प्रसिद्ध आहेत.

गंध दुबोटी अडवें भाळीं नाभ्यवलंबी दाढी,
आंग्लतऱ्हेचे केश; शिखा नच, शब्द मराठी काढी ! ३
भाषेवरुनी याति गणूं तरि शुद्ध वाक्य ना एक,
एका वाक्यीं आंग्लमराठी मिश्रित शब्द अनेक ! ४
अभिधानीं जरि याति ओळखूं शक्य नसें तरि तेंही,
कर्णीं येती विचित्र नांवें कदा परिसिलीं नाहीं ! ५
जॉन गजानन, फ्रँयाक महम्मद, शामसू पेस्तन बेल !
डोसाभाई काशिनाथ कीं काब्रा नाटिंगेल ! ६
धर्मानें तरि कशी ओळखूं ? सर्व तऱ्हेचे येथें-
गोळा झाले बहुत लोक हें गमतें नवल मनातें ! ७
बुद्धा स्तविती कृष्णा भजती येशू प्रेमें गाती,
झोरास्टरही कोणि वानिती महमद नमिती माथीं ! ८
विठ्ठल निंदिति परि तुकयाचे गाती गोड अभंग;
डोळे लावुनि ईश ध्याती कांहिं न लागे थांग ! ९
तेविं योषिता आंग्ल यावनी पारसीक वा आर्य-
न पटे ओळख सौकर्यानें, अवघड बहु तें कार्य ! १०
पारसीक या महिला म्हणुं तरि खीस दाविति केश !
आंग्ल म्हणावें पदर शिरीं तरि विचित्र ऐसा वेश ! ११
म्हणूं यावनी तरिही शंका आविंध दिसती कान;
चाक नथेचें तसें न नाकीं सुंदर खासें ध्यान ! १२
आर्ययोषिता–स्थिति विपरीता समजूं काय कळेना !
द्विजललना कीं अन्य कुणी या निश्चय मज करवेना ! १३
गृहिणी किंवा वारकामिनी नुकळे हेंही गूढ,
जागृतींत मी सुषुप्तींत[1] कीं, स्वप्नीं अथवा मूढ ! १४
सरळ मनोहर भांग दिसेना मजला एकीचाही;
तिरपे सगळे ! काय हौस ही ! कैशी जनता साही ? १५
कोणीं कोणीं केश बांधिले कैसे उफराटोनी ?
सौभाग्याचें भूषण कुंकुम तेंहि न ल्याल्या कोणी ! १६

---

१ झोपेत.

कोणीं बारिक टिकलीइतुकें कुंकु लाविलें भाळीं-
दिसे दिसेना, शिष्टसंमता रीति गणति या काळीं ! १७
उंची वसनीं विटे चित्त जणुं यिटीं चिटें हीं आतां-
पटलीं जरि तो दंडाखालीं पदर येइना घेतां ' ! १८
नानापरिचे विचार ऐसे येतिल चित्तीं माते !
सांप्रत मुंबापुरी पाहतां, स्थल परि नच दे त्यांतें. १९
जग उफराटें नाथें कथिलें अम्हां न त्याचा बोल;
साधुवचांना साक्षर पाळूं करूं न त्यांतें फोल ! २०
या नियमानें अवनति याचा उन्नति ऐसा अर्थ;
प्रणयाचाही कोप अर्थ हा स्वहानि म्हणजे स्वार्थ ! २१
आचार्यांच्या अद्वैताचें रहस्य आतां आम्हां-
कळे चांगलें ! तसें वागतों त्यजुनी पूर्व हमामा ! २२
बुद्ध कृष्ण वा राम महम्मद येशू जिन हा भेद–
लव न पाळितों; तूर्ण एक गे ! होऊं पूर्ण उमेद ! २३
थोर नीच वा सुजन कुजन कीं रुग्णारुग्णहि[1] सारे–
मानव तेथुनि एक असें तव वाहो चित्तीं वारें ! २४
व्यक्तिमतांच्या स्वातंत्र्याची नौबत गाजे वाजे,
वागावें निजमनोनुरोधें; आम्ही अमुचे राजे ! २५
अस्तु. सर्व हें असें खरें जरि एक राहिली गोष्ट–
सांगायाची; तूंच म्हणोनी हळूच कथितों स्पष्ट ! २६
बाह्यात्कारीं परी सर्व हें उगीच दावायातें,
पोकळ उन्नति रम्यवृक्ष हा, भिरुड आंतुनी त्यातें ! २७
म्हणुनि सांगतों न हो स्तिमित तूं मुंबानगरीमाजीं–
अससी देवी ! भारतवर्षीं, नान्यत्स्थानीं आजी ! २८

* * * *

सन्मुख थोडें असेंच जाशी सन्निध कृष्णगृहाचे,
खुणा सांगतों कीं तूं जाशिल अचुक मंदिरीं त्याचे. २९

---

१ आजारी व बिन आजारी.

शब्दित शफरी कांची तटकटिं मरालमाला कंठीं-
ऐशी सरिता नवयुवतीपरि पतिगृहमार्गा कंठी ! ७९
तोयशून्य हे तूलोपमघन देवि ! हालतां वातें-
नभोभूपशिरिं जणूं चामरें गमेल ढळतीं तूतें ! ८०
ज्योत्स्नावस्त्रा हिमकरवक्त्रा ताराभूषा वामा-
घनमुक्ता ती नवयुवती जणुं भासे रजनी रामा ! ८१
पाथिकवियोगें तद्युवतीचें जेविं मावळे हास्य;
चंद्रास्तें वघ मिटे तेविं गे ! अभिनव मृदु कुमुदास्य ! ८२
नीलनभातें निरखुनि नूतननीलेंदीवर—कांती,
हंसनिनादा परिसुनि रमणी—कटिकांचीची भ्रांती— ८३
बंधुकमृदुदल बघतां स्मरुनी निजकांताधर पांथ,
दिसतिल मार्गीं वण वण फिरतां तुजला विव्हलचित्त ! ८४

* * * *

शरद्यशोभा अपूर्व शोभा निरखित निरखित जातां,
कल्याणातें जाशिल माते ! लवही श्रम नच होतां. ८५
परिहाराया मार्गश्रम तूं द्वयदिन राहीं येथें.
श्रीमन्माधव—अनुजकविगृहीं सेवीं सुखशांतीतें. ७६
मेघनादवध काव्य मनोहर नूतन लिहिलें त्यानें,
सरल सुलभ तें किति ओजस्वी कोण न त्याला वाने ? ८७
तेंवि ‘ सति श्रीठाकूराणी ’ नामक सुंदर काव्य-
रसिक माधवें प्रेमें लिहिलें अपूर्ण तरि तें श्राव्य ! ८८
काव्ययुगुल हें बघसी जों तूं ‘ अद्भुत[1] किमियागार ’,
येउनि पुढतीं रिझविल तुजला सुरस असे तो फार ! ८९
नयनमनोहर परम सुवासिक सुमनें जाईचीं[2] तीं-
समर्पील तो तुला गौरवें प्रमुदित होउनि चित्तीं ! ९०

---

१ ही एक कै०कवि माधवानुज यांचे वडील बंधु श्री० माधवराव मोडक यांची कविता आहे. ती मनोरंजनांत छापून निघाली आहे. २ माधवानुजांची जाईचीं फुलें ही कविता.

उभय बंधुना परि त्या संप्रति तनूस्वास्थ्य ना कांहीं !
पूर्वीसम तव सेवा न घडे म्हणुनी खिन्न सदाही ! ९१
कृपादृष्टिनें पहा त्यांकडे देई आरोग्यातें;
करून घेई स्वकीय सेवा हीच याचना माते ! ९२
कोण क्षम गे ! सेवाया तुज तुझ्या अनुज्ञेवीण ?
तेज शशीला रवि न जरी दे कसा प्रकाशे दीन ? ९३
अस्तु. इथें जों राहशील तूं तुझ्या दर्शनासाठीं,
प्रेमल सहृदय कवीजनांची होइल भारी दाटी. ९४
चिंतामणि[1] कवि येइल घेउनि ' संन्याशाचीं गीतें '.
आनंदीपति[2] ' कल्पद्रुमसुम ' तुजला अर्पायातें. ९५
तृप्त करोनी या सत्कविंना चार योजनें अंबे !
जातां तुजला दिसेल मुंबानगरी सौख्यकदंबे ! ९६

*　　　*　　　*　　　*

आश्चर्यानें स्तिमित होउनी बघतां येथिल थाट
' कोठें आल्यें ' गमेल तुजला ' चुकल्यें मी का वाट ' ? ९७
विपरितवस्त्राभरणीं मंडित पाहुनि येथिल लोक
भांबावुनि तूं जाउनि चित्तीं करशिल तर्क अनेक. ९८
'आंग्ल वदूं तरि श्यामलतनु हा शिखा न शीर्षीं कांहीं,
यवन वदावें तरि दाढीचा ठावठिकाणा नाहीं ! ९९
आंग्लपद्धती शिरोभूषणें अंगीं पारसी कोट,
धोतर खालीं यवनोपानह पदीं काय हा थाट ! १००
किंवा पगडी शिरीं विराजे तुमान सुंदर खालीं,
उपवस्त्राचा फांस गळ्याला गंध केशरी भालीं ! १
किंवा कोठें भस्म कपाळीं वरी मोंगली टोपी,
अंगीं बंडी शीतनिवारक मूर्तिमंत बहुरूपी ! २

---

१ कल्याणचे प्रासिद्ध कवि कै० बा. दि. वैद्य यांचे हे चिरंजीव. हेही चांगली कविता करितात. २ हर्षे उपनांवाचे एक सॉर्टर;(आतां पोस्टमास्तर.) हे कवि 'आनंदीरमण' या नांवानें प्रासिद्ध आहेत.

गंध दुबोटी अडवें भाळीं नाभ्यवलंबी दाढी,
आंग्लतऱ्हेचे केश; शिखा नच, शब्द मराठी काढी ! ३
भाषेवरुनी याति गणूं तरि शुद्ध वाक्य ना एक,
एका वाक्यीं आंग्लमराठी मिश्रित शब्द अनेक ! ४
अभिधानीं जरि याति ओळखूं शक्य नसें तरि तेंही,
कर्णीं येती विचित्र नांवें कदा परिसिलीं नाहीं ! ५
जॉन गजानन, फ्रँयाक महम्मद, शमसू पेस्तन बेल !
डोसाभाई काशिनाथ कीं काब्रा नाटिंगेल ! ६
धर्मानें तरि कशी ओळखूं ? सर्व तऱ्हेचे येथें-
गोळा झाले बहुत लोक हें गमतें नवल मनातें ! ७
बुद्धा स्तविती कृष्णा भजती येशू प्रेमें गाती,
झोरास्टरही कोणि वानिती महमद नमिती माथीं ! ८
विठ्ठल निंदिति परि तुकयाचे गाती गोड अभंग;
डोळे लावुनि ईश ध्याती कांहिं न लागे थांग ! ९
तेविं योषिता आंग्ल यावनी पारसीक वा आर्य-
न पटे ओळख सौकर्यानें, अवघड बहु तें कार्य ! १०
पारसीक या महिला म्हणुं तरि खवीस दाविति केश !
आंग्ल म्हणावें पदर शिरीं तरि विचित्र ऐसा वेश ! ११
म्हणूं यावनी तरिही शंका अविंध दिसती कान;
चाक नथेचें तसें न नाकीं सुंदर खासें ध्यान ! १२
आर्ययोषिता–स्थिति विपरीता समजूं काय कळेना !
द्विजललना कीं अन्य कुणी या निश्चय मज करवेना ! १३
गृहिणी किंवा वारकामिनी नुकले हेंही गूढ,
जागृतींत मी सुपुतींत[1] कीं, स्वप्नीं अथवा मूढ ! १४
सरळ मनोहर भांग दिसेना मजला एकीचाही;
तिरपे सगळे ! काय हौस ही ! कैशी 'जनता साही ? १५
कोणीं कोणीं केश बांधिले कैसे उफराटोनी ?
सौभाग्याचें भूषण कुंकुम तेंहि न ल्याल्या कोणी ! १६

---

१ झोपेंत.

कोणीं बारिक टिकलीइतुकें कुंकु लाविलें भाळीं-
दिसे दिसेना, शिष्टसंमता रीति गणति या काळीं ! १७
उंची वसनीं विटे चित्त जणु थिटीं चिटें हीं आतां-
पटलीं जरि तो दंडाखालीं पदर येइना घेतां ' ! १८
नानापरिचे विचार ऐसे येतिल चित्तीं माते !
सांप्रत मुंबापुरी पाहतां, स्थल परि नच दे त्यांतें. १९
जग उफराटें नाथें कथिलें अम्हां न त्याचा बोल;
साधुवचांना साक्षर पाळूं करूं न त्यांतें फोल ! २०
या नियमानें अवनति याचा उन्नति ऐसा अर्थ;
प्रणयाचाही कोप अर्थ हा स्वहानि म्हणजे स्वार्थ ! २१
आचार्यांच्या अद्वैताचें रहस्य आतां आम्हां-
कळे चांगलें ! तसें वागतों त्यजुनी पूर्व हमामा ! २२
बुद्ध कृष्ण वा राम महम्मद येशू जिन हा भेद–
लव न पाळितों; तूर्ण एक गे ! होऊं पूर्ण उमेद ! २३
थोर नीच वा सुजन कुजन कीं रुग्णारुग्णहि[1] सारे–
मानव तेथुनि एक असें तव वाहो चित्तीं वारें ! २४
व्यक्तिमतांच्या स्वातंत्र्याची नौबत गाजे वाजे,
वागावें निजमनोनुरोधें; आम्ही अमुचे राजे ! २५
अस्तु. सर्व हें असें खरें जरि एक राहिली गोष्ट–
सांगायाची; तूंच म्हणोनी हळूच कथितों स्पष्ट ! २६
बाह्यात्कारीं परी सर्व हें उगीच दावायातें,
पोकळ उन्नति रम्यवृक्ष हा, भिरुड आंतुनी त्यातें ! २७
म्हणुनि सांगतों न हो स्तिमित तूं मुंबानगरीमाजीं–
असती देवी ! भारतवर्षीं, नान्यत्स्थानीं आजी ! २८

* * * *

सन्मुख थोडें असेंच जाशी सन्निध कृष्णगृहाचे,
खुणा सांगतों कीं तूं जाशिल अचुक मंदिरीं त्याचे. २९

---

१ आजारी व बिन आजारी.

द्वारीं त्याच्या उभी असे गे ! एक सर्वदां वेडी[1],
उष्णशीत तिज कांहीं नाहीं; तीच भुतांना छेडी ! ३०

वेडी तिजला कसें म्हणावें? वेडें तीच जगाला,
देवि ! करोनी उरे पुरोनी सर्वभक्षका काला ! ३१

गतवर्षींच्या फाल्गुनमासीं जना बोधिलें त्यानें,
केविं करावी आत्मशोधिनी होळी साक्षेपानें ! ३२

तीव्रप्रज्ञाखनित्रयोगें वैराग्याचा खाडा—
खणुनि पुरावा एरंडद्रुम दंभाचा बहु जाडा ! ३३

दुष्कृतिच्या मग शुभा जमवुनी रचुनी त्याचे भोंतीं,
परनिंदेचीं तृणें पसरुनी होळी झांकावी ती ! ३४

मनोवृत्तिची विवेकवासित धूपशलाका हातीं-
धरुनि चेतवा निजांतरींच्या ज्ञानदीपकावरतीं ! ३५

आत्मप्रत्ययरूपज्योती लावुनि होळीलागीं,
अनुतापाचा ज्वलन पेटवा विशाल हृद्भागीं ! ३६

चित्तशुद्धिच्या प्रखर प्रबला ज्वाला गगनीं गेल्या,
धूम्रानें त्या धुंद दशदिशा दिसतिल तुजला झाल्या ! ३७

त्याच्या द्वारीं देवि ! लोंबती सुवर्णपंजर दोन;
त्यांत विलसतें कीरयुग्म[2] तें किति तरि चतुर सुजाण ! ३८

काव्यशास्त्रकवि कविची प्रतिभा यांवरि नित्य अगाध—
कोटीक्रमपर सुंदर त्यांमधिं चाले वादविवाद ! ३९

गगनदीप बहु नयनमनोहर परंप्रकाशी त्यानें-
स्वागतार्थ तव पहा लाविला प्रेमें आनंदानें ! ४०

---

१ श्री. श्रीकृष्ण निळकंठ चापेकर यांची ही कविता करमणुकींत प्रसिद्ध झाली आहे. २ श्रीयुत चापेकर हे चांगले रसिक व सहृदय टीकाकार आहेत. प्राचीन व अर्वाचीन कवितेवर त्यांच्याकडे नेहमीं वादविवाद चाललेला असतो; त्यांस उद्देशून वरील ओळ आहे.

द्वारस्थित तुज बघतां त्याची सुगुणसुंदरी[1] कन्या,
आदरपूर्वक परमकौतुकें ओवाळिल ती धन्या ! ४१
परमोत्साहें त्वदागमोत्सव करुनी जनि ! कवि कृष्ण-
नानायत्नीं सुखविल रिझवुनि तुजला करिल वितृष्ण ! ४२
भाविक सात्त्विक रसिक विमोहक कवि तो तुजला आर्यें !
कोमल कवितासुमनीं पूजिल सोडुनि दुसरीं कार्यें. ४३
देई त्यातें ममोपायनें[2] सांगुनि साग्रनिरोप,
बहुत लागले दिन धाडाया न करो म्हणुनी कोप ! ४४

* * * *

कृष्णकवी किति रसज्ञ मार्मिक ठावें तुजला देवी !
केविं रुचे मम नवकृति ही त्या शंका मन्मन सेवी. ४५
" लव न लवण वा तिखट फार कीं, लागे पक्वान्नांत,
रुचिकर नाहीं स्वाद न कांहीं तुल्यांगित्व न त्यांत; ४६
" नसे कल्पना नसे ओजही वर्णमधुरता नाहीं,
तशि न सरसता चिद्वेधकता " म्हणेल ऐसें कांहीं ! ४७
तेविं सरस्वतिकंठाभरण[3] प्रियकर त्याचा मित्र,
रसवेत्ता बहु चतुर विलक्षण सद्गुणशालि पवित्र ! ४८
बघतां नीरस कृति मम असली चढवुनि निजनासातें,
चेष्टा माझ्या करील भारी अक्षम वर्णायातें ! ४९
भावे[4] जोशी[5] फ्रेंचगीष्पती—"खत्री[6]" कमलाकांत[7],
चालुक्य[8] चतुर चार्वाकचि तो न कळे मतिचा अंत ! ५०

---

१ ही एक मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळीनें प्रसिद्ध केलेली श्रीयुत चापेकर यांची सर्वांगसुंदर कादंबरी आहे. २ माझी भेट. ३ हे एक चांगले कवि आहेत. त्यांचें साग्र नांव गणपत बापूजी शिंदे. ४ केसरींतील व केरळ-कोकीळमधील प्रसिद्ध लेखक कै० ' सदाशिव. ' ५ हे एक्झिक्युटिव्ह इंजिनियर असून चांगले होतकरू कवि होते. ६ श्री. श्रीपाद नारायण सातघर एम्. ए. एल्. एल्बी. हे रसिक गृहस्थ मुंबईस वकिल आहेत. ते कधीं कधीं कविता करतात. त्यांची कविता भक्तिरसप्रधान असते. ७।८ रा. जाधव व रा. साळोखे हे उभयतां चांगले रसिक व प्रेमळ गृहस्थ सत्काव्याचे भोक्ते आहेत.

नानापरिच्या व्याजोक्तींनीं बोलबोलुनी सारे-
करितिल माझा विडंब, बहु हें अंग अतांचि थरारे ! ५१

असो कांहिंही, पाक एकदां झाला जो तो झाला,
टाको घेवो स्वीयरुचीपरि अथवा करुं दे त्याला ! ५२

त्याच्या इच्छेस्तव हें केलें दिसलें मज जें गोड,
तया आवडो अथवा काढो यांत कांहिं तो खोड ! ५३

अंतीं जनि ! तुज एक याचना करिं गे ! ती परिपूर्ण;
आशीर्वादें तया मिळो तव पट्टुता न्यायीं तूर्ण ! १५४

---

## उत्तरार्ध.

**दोन शब्दः—** श्रीशारदादूतिका—काव्याचा पूर्वार्ध प्रसिद्ध झाल्यानंतर आज सरासरी एक वर्षानें हा उत्तरार्ध प्रसिद्ध होत आहे. प्लेग महाराजांनीं जर यंदा पुण्यपट्टणावर आपली वक्रदृष्टि फिरविली नसती, तर हा भाग यापूर्वींच बाहेर आला असता. या काव्याची प्रस्तावना पूर्वार्धालाच जोडिली असल्यामुळें उत्तरार्धाला प्रस्तावनेची वस्तुतः जरुरीच नव्हती; परंतु पूर्वार्ध प्रसिद्ध झाल्यानंतर त्याचें कांहीं सहृदय व रसिक टीकाकारांनीं जें सुस्वागत केलें, व माझी जी संभावना केली, त्याबद्दल त्यांचे आभार मानण्याकरितां हे दोन शब्द लिहावे लागत आहेत.

कांहीं टीकाकारांनीं ' आम्ही दूतिकेवर टीका करणार आहोंत हें लेखकास कळल्यावर व आमची टीका पाहिल्यावरच उत्तरशारदादूतिका लिहावयाची कल्पना निघाली' असें प्रस्तुत अर्धाबद्दलचें आपलें मत ठोकून दिलें आहे. परंतु तें साफ चुकीचें आहे. टीका येण्यापूर्वींच अथवा टीका होणार आहे हें कळण्यापूर्वींच उत्तरार्ध अर्धाचेवर तयार झाला होता, व तो टीकाकारांना माझ्या गैरसावधपणामुळें पहावयास मिळाला होता, इतकेंच नाहीं, तर त्याचा त्यांनीं आपल्या स्वभावानुरूप आपल्या टीकेंत ( तसें करणें अन्याय

असतांही ) कसा तादृश उपयोग करून घेतला हें चतुर वाचकांचे ध्यानांत आल्याशिवाय खास रहाणार नाहीं. या अर्थांत काय आहे व तो कां लिहिला वगैरे गोष्टींचा निर्णय काव्य वाचल्यावर आयताच होणार आहे; तेव्हां त्याबद्दल येथें द्विरुक्ति करण्याचें कारण नाहीं.

या काव्याची प्रस्तावना, नवीन पद्धतीप्रमाणें मीं आपल्या सुप्रसिद्ध विद्वान् व रसिक मित्राकडून लिहून घेतली होती. तसें करण्यांत वस्तुतः कांहींच हेतु नव्हता. परंतु आमच्या मनकवडे टीकाकारांना ' नावडतीचें मीठसुद्धां अळणी ' या न्यायानें तें खपलें नाहीं, व त्यांतही त्यांना माझा स्वार्थच दिसून आला. केवळ स्वार्थाकरितांच मित्र जोडावयाचे असतात हें मला आजच कळलें ! केवळ मित्रत्वाच्या नात्यावर आपल्या मित्राला हेतुपुरःसर आपली सदसद्विवेकबुद्धि बाजूस ठेवण्यास सांगून आपला स्वार्थ साधणारा मनुष्य मित्रत्वाच्या नात्याचा दुरुपयोग करणारा अधमाधम प्राणी होय, अशीच माझी समजूत आहे. कदाचित् माझ्या टीकाकारांची याच्याविरुद्ध समजूत असेल; नाहीं तरी कोणी म्हणावें ? असो. पूर्वार्धाला प्रस्तावना जोडण्याची विनंती, मीं रावसाहेब कानिटकरांना केली, त्या वेळीं ' केवळ प्रस्तावना लिहिण्यानें त्यांच्यावर इतका गहजब गुदरेल' याची मला यत्किंचित् जरी अटकळ झाली असती, तरी मीं त्यांना तस करूं दिलें नसतें. पण माझ्या दुर्दैवानें तसें झालें नाहीं, व त्यामुळें रा. सा. कानिटकरांसारख्या ज्ञानानुभववयोवृद्ध सौजन्यशील सज्जनांस त्या टीकासंग्रामांत निर्घृण व छद्मी टीकाकारांचे विषमय वाग्बाण विनाकारण सहन करावे लागले ! तेव्हां या वेळीं तरी असा मजकरितां दुसऱ्यास त्रास होऊं नये, म्हणून हे दोन शब्द माझे मींच लिहिले आहेत.

प्रस्तुत काव्यार्धांत जर कांहीं अल्प—स्वल्प काव्यांश असेल, तर त्याचें श्रेय मजला नसून तें त्या टीकाकारांसच आहे; शिवाय ' प्रस्तुतचा काळ म्हणजे कोणी काव्यें फारशीं वाचीत नाहींत असा असतांही ' माझ्या पूर्वशारदेची जी थोडी फार प्रसिद्धि झाली त्याचेंही श्रेय सर्वस्वीं त्या टीकाकारांसच आहे; कारण त्यावर जर तशा टीका झाल्या नसत्या, तर या श्रीशारदादूतिका काव्याचें नांवही पुष्कळांना माहीत झालें नसतें, हें निर्विवाद आहे; व म्हणून मी त्या सर्वांचा अत्यंत आभारी आहें. त्याचप्रमाणें हा उत्तरार्ध पूर्ण करण्याचे कामीं मला माझ्या रसिक व सहृदय मित्रमंडळींनीं वेळोवेळीं

जें अपूर्व साहाय्य केलें व प्रोत्साहन दिलें त्याबद्दल मी त्या सर्वांचे व काव्य उत्तम रीतीनें छापवून दिल्याबद्दल भट आणि मंडळींचे आभार मानून हे दोन शब्द पुरे करितों.

११२, बुधवार पेठ, पुणें.
ता.१-३-१९१४
अनंततनय.

साक्या.

१ वर्षावर्णन. २ वर्षारजनी. ३ मित्रदर्शन. ४ न्यायनिपुणतालाभ. ५ आनंद. ६ श्रीशारदागमन. ७ सृष्टिगायन. ८ दौत्यसार्थक. ९ श्रीशारदेशीं संभाषण. ( क ) दौत्य कां सांगितलें व कां स्वीकारलें. ( च ) सगळींच मुलें मला सारखीं प्रिय. ( ट ) क्षीणा नरा निष्करुणा भवन्ति. ( त ) मीं निवडानिवड केली नाहीं. ( प ) काव्यलक्षण. ( ग ) काव्योद्यान ( ज ) आशीर्वाद. ( ड ) श्रीशारदा अंतर्धान पावते.

नवजलसंभृत मंदमंदगति अंबुदपंक्ति नभांत,
स्वच्छंदानें स्निग्धमधुरवें होती हिंडत गात. १
मेघदर्शनें तृषार्तचातकमुख प्रफुल्लित होई,
सोत्कट केकारवें शिखीच्या गगन भरोनी जाई. २
इंद्रचापसम मोर पिसारा फरफरवी अनुरागें,
मत्तमयूरी प्रेमें फिरती त्याच्या मागें मागें. ३
सागरसंगमसमुत्सुका ही स्वैरगामिनी सरिता,
सूं सूं गर्जत उसळत वेगें धांवे विभया आतां. ४
हरित तृणांकुर सुंदर शालू गमे नेसली सृष्टी,
कोण न पावे तुष्टी बघतां अंतरिं कितिही कष्टी ? ५
सर सर वर्षुनि जलधर करिती जलधारांची वृष्टी,
स्वर्गंगा जणुं गमे उतरली पूत कराया सृष्टी. ६
विरहविकलपतिपर्युत्सुक ही देवी प्रकृति अधीर,
पुरुष जाहला बुद्ध म्हणुनि का ढाळी लोचननीर ? ७
नभःसरीं का नीलांभोधर दंतियूथ जलकेली,—
करितां शुंडीं जल भरुनी हा फेकी भरभर खालीं ? ८

ग्रीष्मतप्त गिरिवरा वघुनिया गमे नभःश्री रमणी,
मेघनिनादें स्फुंदस्फुंदुनि गाळी अंसवें वरुनी. ९
स्वर्गद्वारें भेदुनि येतां मर्त्याक्रंदन कानीं,
सुधाकुंभ कीं वरुनि ओतिले द्रवुनी सुरललनांनीं. १०
यत्प्रत्यंचा चपला हरिधनु ओढुनिया आकर्ण,
जगन्नियंता महा धनुर्धर मांडी शरसंधान. ११
कीं गांजी जो दुर्भिक्षासुर जनांस मानवलोकीं,
तया वधाया काय चालवी मार्गणवृष्टी ही कीं ? १२
जिकडे तिकडे किती पसारा माजे हा चिखलाचा,
दीनस्वांतीं जसा माजतो सदसत्संकल्पांचा. १३
न्यायनिर्दया नयपति हृदया त्यजितो करुणा जैसा,
सहस्ररश्मी सविता गगना सोडुनि गेला तैसा. १४
प्रकाश जातां तिमिर पसरला विहग जाहले मूक,
अविचारी नृपसन्मुख जैसे सात्त्विक सज्जन लोक. १५
गगन कृष्ण तें, भुवन कृष्ण तें, दिशा सर्वही कृष्ण,
सरलवक्र हें द्वैत निमालें सर्व दिसे तें कृष्ण. १६
आशा जळतां दीनस्वांता नैराश्याचें जैसें,
अंजन लागे रविदीपाचें गगना का हें तैसें ? १७
सूर्यनिमज्जन घडतां कीं या दिगङ्गनांनीं अपुलीं,
मुखें वळविलीं म्हणूनि इतुकी नभीं कृष्णता भरली ? १८
तमोविमोहित अंध निशापति शांतनवश्रीशुक्र–
द्रोणश्रीगुरुपुढतिं तिमिर तो दुःशासन कीं वक्र, १९
गगनश्रीद्रौपदीसतीचीं प्रभारूप तीं वस्त्रें,
दूर झुगारी ओढुनिया ते गुरुभृगु झांकिति वक्त्रें. २०
अज्ञानानें निशाचरें कां ज्ञानकला श्रीसीता,
आत्मशोककर विषयकाननीं सहसा चोरुनि नेतां– २१
जीवात्मा श्रीराम भटकला शोकारण्यामाजीं,
सीता शोधित, म्हणूनि माजे ऐशी असिता आजी ? २२
विश्वबालका रात्र माय ही काळ्या बाळंत्यांत,
गुंडाळोनी काय घेतसे वत्सप्रेमभरांत ? २३

मधेंच कोठें उन्मत्तापरि घू घू करितो घूक,
जसा बडबडे भूप—प्रियजन असतां सारे मूक. २४
' ड्रॉ ड्रॉ ' करिती पंकलिप्त ते दर्दुर बहु कासारीं,
कोलाहल तो करिजे जेवीं कुत्सित टीकाकारीं. २५
' काय करावें ' एकध्वनि हा जैसा दीनागारीं,
रातकिड्याचा किर्र शब्द हा चाले धृत्यपहारी. २६
चराचरात्मक अनंत विश्वें झालीं निद्रामग्न,
आशा जैशा निर्धनिकांच्या होति निराशालीन. २७
अशा दिनीं या नियत नियोगा नित्यापरि निरवोनी,
निजें न जों मी, विष्णुकवी[1] ये मुंबानगरीहूनी. २८
प्रमुदित झालों, खेद विसरलों, हरिखा पारावार—
नुरे, तेधवां प्रेमसागरा भरती येइ अपार. २९
सहृदय सज्जन त्यांत प्रियसख वरिही सत्कवि मान्य,
अनपेक्षित निजसदनीं येतां कोण न मानी धन्य ? ३०
सेवार्थ्यातें नियोगलंभन एकाएकीं व्हावें,
न कळत वाढुनि वृत्ति अकल्पित तें धन करिं कीं यावें ! ३१
विपन्न विद्यार्थ्यास मिळावी शिष्यवृत्ति ही किंवा,
परीक्षेंत कीं संभव नसतां यशोलाभ हो व्हावा ! ३२
भूशास्त्रज्ञा गवसावा पथ अवचित पाताळाचा,
नभोज्ञास कीं लागावा नव शोधाचि नक्षत्राचा ! ३३
कीं मोक्षाचें गूढ सुटावें अवचित मोक्षेच्छूतें
किंवा जावें काव्य नियोजित अविघ्न पूर्णत्वातें. ३४
किती वर्णिलें किती गायिलें तरि त्या आनंदाची,
कशी कल्पना इतर जनांना यथार्थ व्हावी साची ! ३५
हासहासलों खेळखेळलों वाचवाचलें काव्य,
प्रेमानंदीं निमग्न झालों दुजा न तें अनुभाव्य. ३६
ज्याचें हर्षण त्याला ठावें इतरां केविं कळावें ?
जलांत मासा निजतो कैसा, कळण्या मासा व्हावें. ३७

---

१ प्रसिद्ध कवि कै. रा. सा. वि. बा. कुळकर्णी, कल्लोळकर.

‘ न्यायनिपुणता श्रीकृष्णाला प्राप्त जाहली ’ ऐसें,
वृत्त कथियलें विष्णूनें मज ओघा ओघासरिसें. ३८
‘ धन्य शारदे ! धन्य विष्णु तूं, धन्य तसा श्रीकृष्ण,
अनंततनया ! तूंहि धन्य कीं अवघें कांहीं धन्य ! ’ ३९
कोंकणदेशीं राजापुरच्या जशी गोमुखीं गंगा,
निघे अकल्पित रम्य शुभांगा पुण्या पापविभंगा; ४०
तशी तेधवां हृदयांतरिंची मुखीं निघाली माझ्या,
उपरिवर्णिता श्रीवाग्गंगा मोहक रम्य सतेजा. ४१
हेलावुनि वा हृदयपयोनिधि ऊर्मिजवें वरि आलीं,—
शब्दमौक्तिकें धन्य घन्य त्या आनंदाच्या कालीं ! ४२
‘आनंदाच्या दिव्यमेरुच्या सुवर्णसानूवरतीं,
जों मी वेंधें परमसुखाची लागे मजसि सुषुप्ती. ४३
आनंदी आनंद गडे हो ! ’ बालकवीचें काव्य,
चोहिंकडे मज ऐकूं आलें प्रतिपळ गमलें नव्य. ४४
अपूर्व केवल अननुभूत या शांतिसुखाच्या दोलीं,
शिवसहवासीं चित्तकला जों पूर्ण रंगुनी गेली, ४५
‘मज उठवोनी स्वयें मात्र तूं निसूर बा ! निजलासी,
ऊठ ऊठ रे ऊठ सत्वरीं कैसा झोंपीं जासी ? ४६
सृष्टि सुंदरी बघ बाहेरीं किती गायनीं दंग,
कसा सुरांचा लय लागे हा उडे कसा बघ रंग; ४७
हाच आजचा विशेष बघ कीं गानवादना सर्व,
युवती जमती अमोघ केवल आनंदाचें पर्व ! ४८
दुंदुभि वाजवि घनमाला ही मारुतलहरी सनई,
तशी ध्वनींची नव मंजूषा हरिखें रजनीबाई. ४९
स्थावरजंगमसुस्वरवीणावादन निद्रा देवी,
करी लावुनी रातकिड्याचा सूर सारखा तेवीं. ५०
अलिपंक्तीची सतार नलिनी रम्य सरःसुखधामीं,
सागरिका जलतरंग तैशी ऐक वाजवी नामी— ५१

स्वरसंगामिं या अपुलेही स्वर झणिं मिळवूं वत्सा हे !
नादब्रह्मीं रत होऊं ये चल ऊठ समुत्साहें. ' ५२.

मंजुल सिंजितसम मृदुवाणी श्रवणीं मम ही आली,
सवेंचि रुणझुण नूपुररवही ऐकूं ये त्या कालीं. ५३

गानलुब्ध मृगशावक जैसा गानध्वनि तो कानीं,—
येतां उठतो खडबडुनी निज कर्ण उभारी दोन्ही, ५४

नागसूर वा श्रवणीं येतां नागराज तो तूर्ण,
फणा उभारुनि डोले जैसा होउनि मोदनिमग्न, ५५

मातृपदाची शब्दाची कीं चाहुल येतां कानीं,
सोत्सुक नयनीं बघे भोंवती बालक जेंवि उठोनी, ५६

प्रेमल मंजुल सुधातुल्य ती हृदयशारदावाणी,
कर्णीं पडतां विस्मित झालों तैसा हृदय भरोनी. ५७

प्रेमानंदें तनू पुलकिता कंठ सगद्गद झाला,
लोचनगंगा स्रवूं लागली प्रेमपूर कीं आला ! ५८

मान मनाची अपाप लवुनी ध्यानमग्न तें झालें,
भावें अर्चुनि वाग्देवीला वंदन शतदां केलें. ५९

'क्षमस्व जननी प्रणवरूपिणी जाड्यवारिणी अंबे !
हंसवाहने प्रसन्नवदने अनुपम सौख्यकदंबे ! ६०

ब्रह्मबालिके ! मधुरगायिके ! रसिकरंजिके अंबे !
पाहि पाहि मां ' दुरितदारिके ! अनुहतशब्दारंभे ! ६१

अनाहूत तूं प्रकट होउनी प्रसन्न दर्शन माते !
देउनि केलें धन्य खरोखर या तव पददासातें ! ' ६२

आशीर्वचना उच्चारोनी वदे शारदा माता,
'वत्सा ! आल्यें प्रेमें पुरवुनि हेतु तुझा जो होता. ६३

तव कविमित्र श्रीकृष्णाच्या जाउनि आल्यें धामीं,
ओगरिलें मीं काव्योपायन तव स्वयें त्या नामीं. ६४

प्रेमळ भाविक भला असे तो विनीत वर्तनिं भारी,
बहु धाल्यें मी बघुनि तयाची सत्कृति रीती सारी. ६५

नवल न परि बा ! यांत असे कीं, तोही मत्प्रियपुत्र,
तुझ्याचसम नित मदुपासनिं रत, तुम्ही म्हणोनी मित्र. ६६
स्थानें तीं मीं सर्व पाहिलीं निरूपिलीं तूं जीं जीं,
अभीष्टही तव बहु दिवसांचें केलें सुफलित आजी. ६७
नयपटुतेचें उपपद वत्सा ! तुझ्या लावलें कृष्णा,
दौत्याचें मम सार्थक झालें शमली तवही तृष्णा.' ६८
'छे ! छे ! जननी म्यां अधमानें काय कर्म हें केलें !
दौत्यकर्म तें अहा ! तुला गे ! करण्यातें लावीलें ! ६९
चुकलों ! चुकलों ! व्यामोहें मीं व्यर्थ दिला तुज शीण,
पश्चात्तापें तनू मदीया पेटे आतां पूर्ण. ७०
हाय ! हाय ! म्यां मातृदैवता क्षुल्लक ऐशा कर्मीं,
केविं योजिलें अविचारानें शल्य सले हें मर्मीं.' ७१
'हा ! हा ! वेड्या वृथा निंदिसी स्वतांस कां तूं ऐसा ?
दोष न घडला, चुकलि न सेवा तुझ्याकडोनी सहसा. ७२
'भक्तकामनाकल्पद्रुम' हें ब्रीद मिरवितों आम्ही,
तत्पालन जरि घडे न, महती काय राहिली नामीं ? ७३
देव भक्तिचे मात्र भुकेले दुजें न त्यांना लागे,
ती त्यां मिळतां दासदास्यही करिती ते अनुरागें. ७४
अंत्यजरूपें दामाजीची रसद पोंचवी कोण,
नरसीजीची हुंडी तेवीं येई कोण भरून ? ७५
तसें जनीचें दळण दळोनी वेणी ही उकलोनी,
प्रेमें टाळू भरोनि तिजला न्हावुं घातिलें कोणीं ? ७६
या कृत्यांशीं तुलितां तव बा ! कार्य नसोनी मोठें,
कां तरि त्याचें तुज वद वत्सा ? इतुकें वाइट वाटे ? ७७
पुनः असें बघ भावदर्शिका शब्दरूपिणी मी ती,
मजवांचोनी वाक्कर्माची कधिं का होई पूर्ती ? ७८
हंसमुखानें दमयंतीला पोंचवुनी संदेश,
तिचें मनोगत मींच निवेदुनि तोषविला निषधेश. ७९
तशी रुक्मिणीप्रणयपत्रिका सुदेवरूपें कृष्णा,
पोंचवुनी ती राजसबाला केली मींच वितृष्णा. ८०

हंसविहंगम सुदेवकुलगुरु सुंदर या अभिधानीं,
गूढ तत्त्व जें काय असे तें जाणति आत्मज्ञानी. ८१
आकाशांतुनि केव्हां केव्हां भीतिसूचका वाणी,
वदूनि कळवी कोण हरीच्या आज्ञा मजवांचोनी ? ८२
हृदयांतरिंचीं निगूढ चित्रें मुखीं उमटती जीं तीं,
चतुराईनें मजविण शब्दीं चित्रित कैशीं होती ? ८३
मानसशास्त्रीं बौद्धिक झाली खरी प्रगति रे! ज्यांची,
तेच जाणती सूक्ष्म व्याप्ती माझ्या वात्सल्याची ! ' ८४
'मज मूढाला काय कळे हें अगाध तत्त्वज्ञान,
शल्य सत्य हें एकचि अंतरिं ' दिधला तुज म्यां शीण. ' ८५
भक्तसंकटीं उडी घालिती स्वयें देवता, म्यां हें,–
वेदपुराणीं जागोजागीं जननि ! ऐकिलें आहे. ८६
परि निजसेवा कथिली देवा स्वयेंच तद्भक्तांनीं,
कालत्रयिं हें आजवरी मीं नायकिलें गे ! कानीं. ८७
बहुजनसंमत अभिप्राय हा अवगणुनी अधमानें,
दौत्य कराया कथिलें तुज मीं माते ! अविचारानें. ८८
कविसंकेता विनयपथा मी उल्लंघुनि अनयानें,
तुजसि वर्तलों पतित अधम मी निष्कृति मज काशानें ? ' ८९
'अहह ! ऐकत्यें काय आज मी नसतें वेड कुठोनी,
हृदयीं शिरलें तुझ्या न कळतें गेल्यें वेडावोनी. ९०
स्वमतें वदसि न संदेहात्मक वच हें तूं मज ठावें,
कोणी तरि तव हृदय ढवळिलें प्रशांत ऐसें भावे. ९१
विमल हृदाशय डहूळला तव ज्यांहीं त्यां मी जाणें,
विमूढ मत्सरयुत जे त्यांना विधिही बुझवूं नेणे. ९२
दे मज सुत वा दे मज धन वा दे मज विद्या किंवा,
धांव पाव वा ! चरण दाव कीं उद्धरिं देवा जीवा. ९३
नवीं नवीं किति अशीं सांकडीं प्रत्यहिं जनता घाली,
देवावरतीं वारायातें स्वात्मतापदावाली. ९४
या वर्गीं का नच येई जो तुवां घातला भार,
मजवरतीं कां खेद तयाचा वाटे त्यांना फार ? ९५

वेडे चाळे कितीक यांचे तुजला सांगूं सांग,
अल्पश्रवणें यावी त्यांची कशी कल्पना सांग ? ९६
मांडी मजवरि सर्वप्रियकवि केशवसुत फिर्याद,
तिची परी वद आजवरी रे ! कोणिं घेतली दाद ? ९७
आद्यकवि श्रीवाल्मीकासम महाकवी ज्या मातें,
प्रेमानंदें विशुद्धभावें वदती माते ! माते ! ९८
*सरस्वतीला त्या या सांप्रत सांप्रतचे तव बंधू,
प्रत्यक्ष प्रियपत्नी गणिती अगाध कवितासिंधू ! ९९
कवीश्वरांना ऐशा यावी चीड तुझ्या धाष्टर्याची,
नवल न तिळभर यांत गमे मज योग्यचि कृति ही त्यांची ! १००
असे असे जरि तरि तीं माझीं प्रियकर मजला बाळें,
हासें खेळें मी त्यांसंगें प्रेमें बहु लडिवाळें. १
मातृहृदय जें मातृहृदय तें अनुपम जगतीं साचें,
मातेवांचुनि दुजा न त्यावें मर्म मोल कळण्याचें. २
वदोत माता वदोत दुहिता वदोत भगिनीकांता,
मुलेंच तीं कीं कशी तयांची झोंबे वाणी स्वांता ? ३
करोत निंदा स्तुति वा कोणी कोणी गालीदान,
पुष्पवृष्टि ती जणूं चालली मनिं मी मानीं मान. ४
लहुकुश करिती श्रीरामावरि नेणुनि शरसधान,
पुष्पापरि परि पतन पावले जनकस्दीं ते बाण. ५
श्रीरामानें तशी निजसुतीं बाणवृष्टि जी केली,
होतां नच ती बाधक त्यांना भूषणभूता झाली. ६
या न्यायें मी वदल्यें कांहीं जरी टाकुनी, त्यांनीं-
विषाद त्याचा नच मानावा, मद्वच घेउनि ध्यानीं. ७
पनस सकंटक वरुनि दिसे परि त्याचें अंतर्याम,
असे मधुररससंभृत तें कीं खातां दे आराम. ८
अथवा श्रीफल दिसे जसें कीं दुःखद कठिण वरोनी,
सुधातुल्यमधुविमलजलें तें असतें आंत भरोनी. ९

कडुनिंबाचीं पानें कडु जरि होती परि परिणामीं,—
हितकर, तैसी परुषा वाणी ममही जाण निदानीं.' १०

*　　　*　　　*

'असो जननि ! हें, 'सर्व बालकें प्रिय मज' ऐसें कांहीं,
वदलिस जें तूं यथार्थता मज पटे न त्याची पाहीं. ११
तव कविबाळें सगळीं प्रिय तुज कसें मानुं मी माते !
भ्रमवी वाणी तव ही स्मरतां पहिल्या संवादातें. १२
त्या संवादीं चार कवींचीं गौरवपूर्वक नांवें,
घेतलींस तूं डोलत डोलत वद तें केविं रुचावें ? १३
तदितर रुचती मुळीं न तुज, हें कां नच मानावें गे !
संशयतरु हा मनीं मूळ घे काढीं तरि तो वेगें ! १४
सर्वश्रुत कविसिंह तुझा तो तसेंचि दुसरे कोणी,
कोपा चढले फणिसम येती मजवरि फूत्कारोनी. १५
तो कविभूषण, तो कविकुंजर, तो कविमौक्तिक किंवा,
विसरलीस तूं कशी अशां या काव्यन्हृदराजीवां ? १६
बाण, बेहरे, विद्याधर कवि, मधुकर, मार्गण, भृंग,
राजहंसकवि, चक्रवाक जे काव्यानंदीं दंग, १७
बाळकृष्ण कवि, उमारमण कवि, भाषाचित्रमयूर,
दडकर, हडकर, चित्रे, पित्रे, काव्यरणीं जे शूर, १८
काव्योद्यानीं गुंगे 'बी' कवि, रंगे मंजूबाळ,
काव्यें गाउनि रसिकांचा जे नित्य पुरविती आळ, १९
काव्यजान्हवीपुलिंदलांच्छन वसंत, वामन, कुंटे,
नागेशादिक कवि ज्यांपुढतीं बुद्धि तुझीही कुंठे ! २०
तेविं मोगरे, कीर्तिकरद्वय, वृद्ध सच्चिदानंद,
साधुदास, ते दासगणू जे साक्षाद्रसिकानंद, २१
सत्कविशेखर शशिशेखर ते लोंढे कवि भांडारे ?
विसरलीस हीं कशीं अशीं निज कवितामणिभांडारें, २२
ज्ञानवृद्ध कवि महाजनी ते रसिकवर्य आगाशे,
रसभरिता यत्कविता बघतां कुतुकभरें 'आ' वासे, २३

कविटेकाडे, सहस्रबुद्धे, गुर्जर, सीताकांत,
विसरलीस हे ! कसे न हो मन विस्मित दुःखाक्रांत ? २४
तशी धुरंधर कवयित्री ती सुमंतकांता गंगा,
काव्यीं जीच्या साक्षात् वाहे रसेश्वरी श्रीगंगा ! २५
कविऋषिवृंदीं अरुन्धतीसम चमके ती श्रीलक्ष्मी,
रसिकांचींही नयनें दिपवी जीची कवितालक्ष्मी. २६
रसिक गोपिकातनया, गिरिजा, उमा, शारदा, सिंधू,
विसरलीस तूं ! तुला तयांनीं सांग नये का निंदूं ? २७
कविविद्याधरसदनविभूषा सरस्वती ती साध्वी,
रसपटु रसना कधीं न विसरे यन्नव कविता माध्वी. २८
असो. अशीं ही कविकवयित्री कशीं न तुजला माते !
आठवलीं त्या भाषणसमयीं सांग सांग तें मातें.' २९
'कसल्या शंका ? काय कल्पना, ? अघटित सारें कांहीं,
व्यवहारीं कधिं गणितश्रेढी उपयोगाची नाहीं. ३०
तुझ्याच ठायीं प्रत्यंतर घे दूर नको रे जाया,
अपत्यवृंदीं ' वनमाले ' वरि कां लव इतुकी माया ? ३१
म्हणुनि म्हणूं का इतर अपत्यें अप्रिय तुजला सारीं ?
छे ! छ ! क्षम नच कृति ही बघतां सारासारविचारीं. ३२
करपादादिक अंगें हीं जरि एका तनुचीं सारीं,
डावें उजवें नैसर्गिक हा भेद तयांमाझारीं. ३३
सव्यांगा का म्हणोनि कोणी रक्षी अधिक जपोनी,
अपसव्यांगा हीन गणोनी उबगुनि उन्मेखोनी ? ३४
एकचि मौलिक एकोद्यानीं नानाविध तरु लावी,
त्यांतुनि कांहींवरीच परि तो बहुत कृपा कां दावी ? ३५
तदितर तरु का अप्रिय म्हणुनी साक्षेपें तो पोषी,
स्कंधीं शीर्षीं जल वाहोनी दुःखें अगणित सोशी ? ३६
अनंत गगनीं लसती तेज अनंत बघ हे तारे,
भक्ति विशेषा कांहिचवरि तो ईश दाखवी कां रे ? ३७

---

१ म.ळी.

कडुनिंबाचीं पानें कडु जरि होती तरि परिणामीं,—
हितकर, तैसी परुषा वाणी ममही जाण निदानीं. ’ १०

* * *

‘ असो जननि ! हें, ‘ सर्व बालकें प्रिय मज ’ ऐसें कांहीं,
वदालिस जें तूं यथार्थता मज पटे न त्याची पाहीं. ११
तव कविबाळें सगळीं प्रिय तुज कसें मानुं मी माते !
भ्रमवी वाणी तव ही स्मरतां पहिल्या संवादातें. १२
त्या संवादीं चार कवींचीं गौरवपूर्वक नांवें,
घेतलींस तूं डोलत डोलत वद तें केंविं रुचावें ? १३
तदितर रुचती मुळीं न तुज, हें कां नच मानावें गे !
संशयतरु हा मनीं मूळ घे काढीं तरि तो वेगें ! १४
सर्वश्रुत कविसिंह तुझा तो तसेंचि दुसरे कोणी,
कोपा चढले फणिसम येती मजवरि फूत्कारोनी. १५
तो कविभूषण, तो कविकुंजर, तो कविमौक्तिक किंवा,
विसरलीस तूं कशी अशां या काव्यन्हृदराजीवां ? १६
बाण, बेहरे, विद्याधर कवि, मधुकर, मार्गण, भृंग,
राजहंसकवि, चक्रवाक जे काव्यानंदीं दंग, १७
बाळकृष्ण कवि, उमारमण कवि, भाषाचित्रमयूर,
दडकर, हडकर, चित्रे, पित्रे, काव्यरणीं जे शूर, १८
काव्योद्यानीं गुंगे ‘ बी ’ कवि, रंगे मंजुबाळ,
काव्यें गाउनि रसिकांचा जे नित्य पुरविती आळ, १९
काव्यजान्हवीपुलिंदलांच्छन वसंत, वामन, कुंटे,
नागेशादिक कवि ज्यांपुढतीं बुद्धि तुझीही कुंठे ! २०
तेविं मोगरे, कीर्तिकरद्वय, वृद्ध सच्चिदानंद,
साधुदास, ते दासगणू जे साक्षाद्रसिकानंद, २१
सत्कविशेखर शशिशेखर ते लोंढे कवि भांडारे ?
विसरलीस हीं कशीं अशीं निज कवितामणिभांडारें, २२
ज्ञानवृद्ध कवि महाजनी ते रसिकवर्य आगाशे,
रसभरिता यत्कविता बघतां कुतुकभरें ‘ आ ’ वासे, २३

कविटेकाडे, सहस्रबुद्धे, गुर्जर, सीताकांत,
विसरलीस हे ! कसे न हो मन विस्मित दुःखाक्रांत ? २४
तशी धुरंधर कवयित्री ती सुमंतकांता गंगा,
काव्यीं जीच्या साक्षात् वाहे रसेश्वरी श्रीगंगा ! २५
कविऋषिवृंदीं अरुन्धतीसम चमके ती श्रीलक्ष्मी,
रसिकांचींही नयनें दिपवी जीची कवितालक्ष्मी. २६
रसिक गोपिकातनया, गिरिजा, उमा, शारदा, सिंधू,
विसरलीस तूं ! तुला तयांनीं सांग नये का निंदूं ? २७
कविविद्याधरसदनविभूषा सरस्वती ती साध्वी,
रसपटु रसना कधीं न विसरे यन्नव कविता माध्वी. २८
असो. अशीं हीं कविकवयित्री कशीं न तुजला माते !
आठवलीं त्या भाषणसमयीं सांग सांग तें मातें.' २९
'कसल्या शंका ? काय कल्पना, ? अघटित सारें कांहीं,
व्यवहारीं कधिं गणितश्रेढी उपयोगाची नाहीं. ३०
तुझ्याच ठायीं प्रत्यंतर घे दूर नको रे जाया,
अपत्यवृंदीं ' वनमाले ' वरि कां लव इतुकी माया ? ३१
म्हणुनि म्हणूं का इतर अपत्यें अप्रिय तुजला सारीं ?
छे ! छ ! क्षम नच कृति ही बघतां सारासारविचारीं. ३२
करपादादिक अंगें हीं जरि एका तनुचीं सारीं,
डावें उजवें नैसर्गिक हा भेद तयांमाझारीं. ३३
सव्यांगा का म्हणोनि कोणी रक्षी अधिक जपोनी,
अपसव्यांगा हीन गणोनी उबगुनि उन्मेखोनी ? ३४
एकचि मौलिक एकोद्यानीं नानाविध तरु लावी,
त्यांतुनि कांहींवरीच परि तो बहुत कृपा कां दावी ? ३५
तदितर तरु का अप्रिय म्हणुनी साक्षेपें तो पोषी,
स्कंधीं शीर्षीं जल वाहोनी दुःखें अगणित सोशी ? ३६
अनंत गगनीं लसती तेज अनंत बघ हे तारे,
भक्ति विशेषा कांहिंचवरि तो ईश दाखवी कां रे ? ३७

१ म.ळी.

शुक्राइतुके तेजस्वी हे नसती सारे गोल,
काय असावें कारण याचें शोध अंतरीं खोल. ३८
इतक्यावरुनी कसें म्हणावें कीं तो श्रीजगदात्मा,
कविवांचोनी इतरांवरतीं अल्पहि न करी प्रेमा ? ३९
वृक्षवल्लिका सुतदुहितांसम असती नगराजाच्या,
तरी तयां तो कसा वागवी भेदानें प्रेमाच्या ! ४०
कांहींना निजशिरीं, कांहिंना धरितो अपुल्या हातीं,
स्कंधीं खेळवि कुणास लुडवी कवणा चरणाघातीं. ४१
यावरुनी का नगशीर्षीं जो तरुगण कांहीं राहे,
तोच तया प्रिय; कवण सज्ज बा ! होइल मानाया हें ? ४२
समान सारीं जरी भूषणें असती प्रिय युवतींना,
एका कालीं एका ठायीं तरि त्या कधिं लेती ना. ४३
कोर राखडी शिरीं विराजे, कंठीं तन्मणि साजे,
कर्णीं बुगड्या, करीं गोठ ते, नूपुर चरणीं वाजे. ४४
नथ नाकीं ती, कटीं मेखला, करीं मुद्रिका साजे,
कपालपटलीं बिंदिबिजवरा, कंठीं साज विराजे. ४५
तन्मणिनूपुर बिंदिबिजवरा यांहुनि कोरचि मात्र,
होइ काय बा ! सर्व भूषणीं रमणीप्रेमा पात्र ? ४६
सायंकालीं अंगावरच्या जैशा साऱ्या भूषा,
उतरुनि करिती एका जागीं भरिती निजमंजूषा; ४७
त्याचपरी मी मम बाळांशीं सदा सर्वदा वागें,
कठोर दिसल्यें जरी प्रसंगीं हृदय सांद्र अनुरागें. ४८
सर्वांगीं तीं खेळति माझ्या कांहीं चढती शीर्षीं,
कांहीं स्कंधीं कांहिं बिलगती घट्ट घट्ट हृदयाशीं. ४९
लोळकंवती कांही हातां कांही कटिं वेंघोनी,
चढती प्रेमें हृदयावरतीं केश करीं कवळोनी. ५०
कांहींसंगें मीच खेळल्यें हातीं त्यांस धरोनी,
‘ गाड्या गाड्या भिंगोऱ्या ’ हें प्रेमें हसविं वदोनी. ५१

* * *

खेळ असे हे खेळाया जीं अक्षम दुबळीं कोणी,
किरकिर पिरपिर करीत बसती मागें तीं कुरठोनी ! ५२
स्वयें खेळवे न पाहवेही शक्ति न लेश जयांना,
शस्त्र तयां करिं गालिदान हें करिती नित्य तनाना. ५३
शक्ति न देहीं, ओज न शब्दीं वाळा ! तेच चिडोनी,
हेवा मत्सर परस्परांचा करिती नित्य कुढोनी. ५४
मजविषयीं तरि कुठें तयांच्या चित्तीं आदर वागे,
बंधुप्रेमा लेश न ठावा सदैव जळती रागें. ५५
धरिती मजला किती धारकीं भळभळतें बोलोनी,
दूषविती मज परोपरींनीं दावूं काय वदोनी ! ५६
पक्षपात मी करित्यें म्हणती सांगूं काय कपाळ !
अविचारानें वर्तन करुनी छळिती सांजसकाळ. ५७
नवल न वाटे मजला याचें जातीचे जे क्षीण,
कपटानिपुण निष्करुण तसे ते चित्ताचेही दीन. ५८
असो; कांहिं जरि झालें केलें तरि तीं माझीं बाळें,
कैशीं व्हाविंत अप्रिय वद जरि करिती वेडे चाळे ? ५९
याहुनीहि जरि अवाच्यतरा केल्या खोडया त्यांहीं,
तरि तीं व्हाविंत अप्रिय कैशीं जर मी जननी, पाहीं. ६०
मधुर शर्करा पुढें करोनी जेवीं जननी पाजी,
कडू औषधें गदातें बाला तेविं रीति ही माझी. ६१
अपराधास्तव रागें भरुनी पुन्हां जवळ घेणारी,
प्रेमळ माता सकलांची मी पाहीं सूक्ष्म विचारीं. ६२

* * *

पुन्हा सांगत्यें मातृहृदय जें मातृहृदय तें, त्याची,
मातेवांचुनि इतरा कोणा न हो कल्पना साची. ६३
दुजें असें कीं संवादाच्या ओघानें जीं आलीं,
तींच घेतलीं कविनामें मीं निवड न कांहीं केली. ६४
एकविधा जैं सुमनें घेउनि माळी गुंफी हार,
करीं येत जें तेंचि सहज घे कुसुम न अधिक विचार. ६५

कथाकीर्तनीं प्रसाद नामी करीं मिळे जो काय,
न भक्षितां तो बाळां देती रूढ जगीं हा न्याय. ६६,
जवळ कोणि जो असेल समयीं वस्तु तया ती देतों,
निवड न करितों निजबालास्तव गृहीं न अथवा नेतों. ६७
पुनः पुनः मी म्हणुनि सांगतें यांत न दोषी कोणी,
समयासमयाचा हा गुण बा! यथार्थ माझी वाणी.' ६८
'तरीहि जननी सुटे न मजला अद्यापी हें कोडें,
शंका माझी निवारुनी मज बोधीं वाडेंकोडें. ६९
जुन्या कवींना प्रशंसिसी कां ओढुनि त्यांची झील,
परुषभाषणीं निंदिसि कां वद आधुनिकांचें शील? ७०
जेव्हां तेव्हां ज्ञानोबाच्या काव्ययशाचें गे! तूं,
गोडगोडसे गासि गोडवे कळे न यांतिल हेतू. ७१
कधिं एकनाथाचे[1] कधीं तुकयाचे[2] कधीं मुकयाचे[3] किंवा,
कवितावेणुध्वान काढुनी भुलविसि भोळ्या जीवा! ७२
मोरोबाचा कधिं दासाचा करुनि ' मोरया ' तेवीं,
काव्यशंख तूं फुंकिसि परि तो कर्णा त्रासवि देवी! ७३
कधिं तात्यांची खंजिरि घेउनि कधीं तुणतुणें किंवा,
थाप डफावरि जोरें देशी चकविसि भोळ्या जीवा! ७४
असे आणखी किती राहिले ज्यांचीं नांवें माते!
घेतां, विसरासि आधुनिकीं तूं हक्षात करायातें. ७५
ज्ञानेशाहुनि थोर थोर गे! संप्रति किति कविरत्नें,
आधुनिकीं तुज दिसतीलहि जरि पाहशील त्यां यत्नें. ७६
कव्यग्रेसर नारायण तो काय वाटला ऊन,
ज्ञानोबाहुनि तुला जननि गे! रसज्ञ गमसी तूं न! ७७
खिस्तायन नव काव्य मनोहर संप्रति लिहिलें त्यानें,
लटकी ज्ञानेश्वरी त्यापुढें फुगसि वृथा अभिमानें! ७८
वदे न मी हें स्वयें परी गे! अशी गर्जना झाली,
कळे न अजुनी जननि! कशी ती तुझ्या न कर्णीं आली!' ७९

---

१ श्रीएकनाथ. २ श्रीतुकाराम. ३ मुक्तेश्वर. ( हे लहानपणीं मुके होते परंतु पुढें त्यांस श्रीएकनाथांच्या कृपेनें वाचा आली. )

तोंचि शारदा उभय करांनीं कर्ण झांकुनी दोन्ही,
कांपत कांपत डोळे झांकी ' अगई ' उच्चारोनी ! ८०
'हाय ! हाय ! मी काय ऐकल्यें, काय परिसिल्यें मी हें,
अनंततनया ! तुझीच का रे ! निरंकुशा वाणी हे ? ८१
तप्ततैल्शी कर्णीं शिरतां विषमय तव ही वाणी,
हृदयबंध हे तुटुनि तनूचें झालें पाणी पाणी ! ८२
काय वदूं मी न कळे आतां हृदय जाहलें शीर्ण,
नृत्य जाहलें अंधापुढतीं बधिरापुढतीं गान. ८३
जीव न राहे म्हणोनि केवळ तव शंकेचें आतां,
समाधान मी करित्यें कष्टें कारण मी तव माता. ८४
श्रीज्ञानेश्वर नाथादिक या पूर्व कवींशीं साम्य,
आधुनिकांचें खुळ्या ! कल्पिशी आज न परि तें क्षम्य. ८५
एरंडद्रुम कधिं इक्षूची काय सरसता पावे ?
ओहोळानें सिंधूचें वद केवीं साम्य करावें ? ८६
प्रावृजन्या जरी कौदरी कितीहि मोठी झाली,
येइल समता कदलीची का जिजला तरि कधिं कालीं ? ८७
न गणीं तुलना गौण कधीं मी दृष्टि परी बा ! त्यास,—
रसज्ञ लागे, नसे तरी ती पात्रचि उपहासास. ८८
द्राक्ष रुचिर तें, आम्र मधुर तो, रंभाफलही गोड,
परि एकाची काय मधुरता दुजास देई जोड ? ८९
या न्यायानें नारायणकृति मी न मानित्यें हीन,
परि ती तुळणें ज्ञानेश्वरिशीं बापा ! क्षम्य कधीं न ! ९०
नितांत यद्वाक् सुखें रंगली संतत गात अनंत,
ते नाथादिक कविच न केवळ होते संत महंत. ९१
प्राचीनार्वाचीनकविगणीं हाच भेद जो स्थूल,
भक्तिबलें ते रामीं रतले तुम्हांस पडली भूल ! ९२
दुर्जय मन ते स्वांकित करुनी पहा जाहले स्वामी,
मायामोहित तुम्ही होउनी झालां मनोऽनुगामी ! ९३
कविता म्हणजे वागवडंबर असें नसावें ब्रीद,
वृत्तीमध्यें काव्य कवींचें नित्य असावें सिद्ध. ९४

काव्य न तें कीं ज्यांत दिसे बा ! केवळ शाब्दिक पूर,
अनुभूतीचा स्फुलिंग ज्यांत न परि दंभाचा धूर, ९५
कीं वणिकाचें दुकान चित्रीं भरलें मालांनीं हें,
परंतु लोचनसुखापरौतें काय त्यांत रे ! लाहे ? ९६
रंगित कागद कांपुनि त्यांचें सुंदर उपवन केलें,
फुलें फलें परि येति न हातां श्रम न वृथा का गेले ? ९७
काव्य न केवळ साधी वाणी परि तें चिद्ब्रह्माचें,
आद्य तसें बा ! अंतिम साधन मोल न होई त्याचें. ९८
कविजीवात्म्या तेविं परांच्या जें न रंगवी रामीं,
काव्य कशाचें ? वाणी कैंची ? लघनच्छंदोगामी. ९९
स्वजीव निद्रित ज्यांचे त्यांनीं जागृत केविं करावें,
अन्यातें वद, अंधासंगें अंधें कूपिं पडावें ! २००
मदिरापानें मत्त मद्यपी बैसुनि मदिरागारीं,
जरी निषेधी मद्यपान तें घेई कोण विचारीं ? १
विषयकर्दमीं स्वयें लोळतां आत्मानात्मविचार,
अन्या शिकवी लाभ कोणता होई ? वद रे ! सार. २
कवि कविता कविशील म्हणोनी काव्यत्रिपुटी आहे,
दिसे न जरि ती काव्यामाजीं काव्य साच तें नोहे. ३
प्रत्येकानें आत्मचरित्रा यास्तव नित निरखावें,
निजवाणीचें बिंब वर्तनीं दिसे न कीं शोधावें. ४
जुन्यांतही या कसा उतरले केवळ पांच दहा कीं,
देवत्वा ते पात्र म्हणोनी असती झाले लोकीं. ५
ऐशा, यास्तव, सत्कविरत्नां काव्यनिधानां ठेवा,—
दृष्टीपुढतीं, मिळवा यत्नें काव्ययशाचा ठेवा. ६
छद्मी वचनें मुधा ओकुनी कदा न निंदा त्यांस,
पतंग घे जर झडप दिव्यावर पावे कोण विनाश ? ७
तुला न तत्कृति मात्सर्यानें त्यांत न शेवट गोड,
कितीहि दर्दुर फुगला तरि का करी वृषाची जोड ? ८
विश्वासानें, दृढभावानें, अभ्यासें, उत्साहें,
त्यांसम व्हाया यत्न करा परि अशी त्यजा कुत्सा हे. ९

केवल शब्द न गुंफा म्हणुनी आत्मवंचना त्यांत,
वद स्ववंचक पररक्षापर कधिं तरि का होतात ? १०
शाब्दिक त्यांच्या अनुकरणातें करितां इतुका मान,
होतां परि बा ! स्वयें तेच मग काय सुखाला वाण ! ११
केवळ सुंदर शब्द जुळी जो तो नच कवि बा ! होतो,
इंद्रजाल जो करूनि दावी ईश वदे का हो तो ? १२
असे काय कवि जनसाधारण ? अनल्प कव्यधिकार,
सद्बुद्धीचा वैरागर तो साक्षान्मोक्षागार ! १३
कवि हा आश्रय निजधर्माचा सचिवाचि जगदीशाचा,
वैराग्याचा सागर तैसा निःस्पृहतेचा सांचा ! १४
कवि नीतीचा मंदरगिरि हा सन्मार्गाचा गाभा,
कल्पकतेचा कल्पवृक्ष हा साक्षात्तेजःशोभा ! १५
कवि शब्दाचा रत्नाकर हा भाषाशास्त्र जिवंत,
सकल रसांचा कवि प्रणेता राष्ट्राधार नितांत ! १६
सुनिश्चयाचें सिंहासन कवि सौजन्याची मूर्ती,
वसुंधरेचा अलंकार हा ध्यानाची संपूर्ती ! १७
पुनः पुनः मी म्हणूनि कथित्यें गणा न परि तत्खेद,
तनुवाङ्मनसा एक सदा व्हा करुनी भेद अभेद. १८
कुलशीलाच्या निजधर्माच्या अनुरोधानें वागा,
सामान्यांना दोष म्हणाया अल्प न द्यावी जागा. १९
विगुण जरी निजधर्मचि बरवा चांग न परि अन्याचा,
मरणें श्रेयस्कर स्वधर्मीं भयद धर्म दुसऱ्याचा. २०
मत्सर पोटीं, प्रेमा ओठीं, तिजे दर्शनीं कांहीं,
जगदुपदेष्ट्या कविवर्यांना भूषण हें न कदाही. २१
अंतर निर्मळ, रसाळ वाणी, प्रेमळवृत्ति विशेष,
अशा लक्षणीं युक्त कवीला साह्य सदा परमेश. २२
विश्वकुटुंबी वृत्ति असावी परी न मायावी ते,
धरा ध्यानिं हें तत्त्व निरंतर ‘ माया माया वीते. ’ २३
प्रेम ! प्रेम ! प्रेम ! असा हा करा न केवल टाहो,
वृत्तीमध्यें परी तयाचें आस्तिक्याचि दावा हो ! २४

'आचरितो जें श्रेष्ठ पुरुष कीं आचरती जन तेंच,
मानी तो जें प्रमाण त्यातें अनुसरती ते साच.' २५
ऐकुनि तुमची मधुरा वाणी तेवीं त्वत्संदेश,
सोत्सुक नयनें मनें तुम्हांला जनता निरखि विशेष. २६
यत्किंचित जरि तुम्हांत दिसला दोष तरी हो त्यांस,
व्हाल सर्वदा तुम्ही तयांच्या पात्राचि उपहासास.' २७

*  *  *  *

'कसें असावें काव्य मनोहर सांग एवढें मातें,
कीं ज्यामाजीं वृत्ति रंगुनी तन्मय होसी माते!' २८
' रे मतिमंदा ! काय मांडिलें कळे न तूं हें आजी,
अनाहूत मी आल्यें, करिसी विडंबना का माझी ? २९
मी अथवा जे मद्रूपी मम भक्तराज निःसीम,
काव्यलक्षणें स्वयें न बांधूं अमुचें नच तें काम. ३०
अनन्य सुव्रत मद्भक्तांच्या अनुपम काव्याधारें,
साहित्याचे रूढ नियम हे तुम्हीं निर्मिले सारे. ३१
देहोत्पत्तिपूर्वि न झाले अलंकार बा ! जेवीं,
भाषेपूर्वीं भाषाशास्त्रें नसति निर्मिलीं तेवीं. ३२
स्वतःस्फूर्तिचे सुव्रत कवि जे अपूर्व तेजोराशी,
भाषाशास्त्रें स्वयें तयांच्या येती चरणापाशीं ! ३३
स्वतःसिद्ध तो कवीश जें जें वदेल त्याला त्याला,
काव्याचें ये स्वरूप त्याच्या तुला न काव्ययशाला. ३४
क्रौंचवधोद्यत बघतां व्याधा वाल्मीकाननिं आले,
शब्द चार जे सहजोद्गारें आदिकाव्य तें झालें. ३५
वेडा तुकया समयीं समयीं वदला शब्द अभंग,
सर्वेचि झाले काव्यरूप ते ज्यांची कीर्ति अभंग. ३६
आचार्यांचा कोप हराया फंदींनीं जी केली,
फटके उडवित संध्या ती कीं काव्य होउनी ठेली. ३७
' केशवकरणी अघटित लीला ' हें तें संध्या—पद्य,
लावण्यवती म्हणुनि लावणी मोक्षद मार्मिक हृद्य. ३८

जात्यावरच्या जनिच्या ओंव्या काव्यरूप बा ! झाल्या,—
सहज, न त्यांतें परिश्रमें बा ! काव्यरूप कुणिं केल्या. ३९
अधीत करुनी साहित्यादिक शास्त्रें आधीं, केलीं,
या कविरत्नीं निज काव्यें मग कोण वदे या वेळीं ! ४०
वदत्यें यास्तव काव्यलक्षणें मला न कांहीं ठावीं,
ज्याचीं त्यानें यथारुचीपरि व्याख्या ग्रथन करावी. ४१
इतुक्यानें तव जरी न होई समाधान चित्ताचें,
दासें केलें लक्षण मजला प्रिय जें काव्य तयाचें. ४२
समर्थशाब्दिंच तुला सांगत्यें परी पटे तें केवीं,
कलियुगकोविद काव्योद्धारक कवींस मय मन सेवी. ४३

* * * *

अशा लक्षणीं युक्त अशा त्या सुंदर काव्यारामीं,
रमें न केवळ मीच परी बा ! तोही विश्वस्वामी. ४४
बहुविध नव नव विषयरूपि रे ! पुष्पद्रुम ज्यामाजीं,
विचारसुंदर पुष्पें फुललीं सदैव जेथें ताजीं. ४५
शब्दमंडपीं अलंकृतीच्या मोहक वेली चढल्या,
अर्थमरंदें चेतोहारी कैशा बघ रसरसल्या. ४६
भक्तिरसाची अखंड वाहे पुष्करणी रे ! ज्यांत,
सद्भावाचीं सुंदर कमलें अगणित फुललीं आंत. ४७
कविरायांचे मनोभ्रमर हे त्यांच्यांतूनि निघोनी,
आत्मानंदें उपवनिं फिरती गुंजारविं गुंगोनी. ४८

---

१ जेणें घडे भगवद्भक्ती ।। जेणें घडे विरक्ती,
ऐशिया कवित्वाची युक्ती ।। आधीं वाढवावी ।। १

* * *

मृदुमंजुल कोमल ।। भव्य अद्भुत विशाल ।।
गौल्य माधुर्य रसाळ ।। भक्तिरसें ।। २

* * *

कामिक रसिक शृंगारिक ।। वीर हास्य प्रास्ताविक ।।
कौतुक विनोद अनेक ।। या नांव धीटपाठ ।। ३

भव्यकल्पनावातावरणीं उत्साहें ते उडुनी,
कृतज्ञतेनें समुद घालिती रुंजी प्रभुच्या चरणीं. ४९
ओजोरविवरि दृष्टि ठेवुनी करूनि मंजुल गान,
प्रसादरूपी चंडोल द्विज भूषवि जें उद्यान. ५०
कल्पतरूवरि सुनिश्चयाच्या प्रीतिसारिका गाते,
मोदें मधुरालाप घेउनी चित्ता मोहित करिते. ५१
प्रतिभापुष्करणिचें पाणी नवरसरंजित केलें,
प्रशस्तपद्यप्रवाहयोगें स्वैर कसें फिरवीलें. ५२
आनंदाचा मंद सुगंधित मारुत जेथें वाहे,
नंदनवनही मला खरोखर तुच्छ त्यापुढें आहे. ५३
अक्षर—मात्रा—वृत्तविनिर्मित पदपथ सुंदर ज्यांत,
ठायीं ठायीं किती शोभती ! प्रसन्न होतें चित्त. ५४
वैदग्ध्याचे किति पाजळले स्वयंप्रकाशी दीप,
दोषगर्त ते होती जेणें दृष्टीआड अपाप. ५५
अंत्रे, चाली, अस्थाईंचीं सुखासनें हीं नामी,
जागोजागीं पहा ठेविलीं अभिनव या आरामीं. ५६
मुनि वाल्मीकी ज्ञानेशादिक सत्कवि कोकिळपक्षी,
जेथें गाती उपवन ऐसें सोत्सुख सुरगण लक्षी, ५७
दिव्यरुचिरशा काव्यकुंजिं मी करित्यें नित्य विहार,
प्रशांत निर्भर एकांतिक मज तेथें सौख्य अपार. ५८
सत्कविकोकिलकूजननिर्मित नादब्रह्मामाजीं,
विलीन होत्यें अशी अशी मी वृत्ति रंगुनी माझी. ५९

* * * *

गभीर अर्थी, ललित पदांनीं, शोभन नवशब्दांहीं,—
युक्त मनोहर तुमच्या करवीं होवो काव्य सदाही. ६०
प्रसादसंभृत सुप्रतिभोज्ज्वल ललितध्वनियुत ऐशीं,
रुचिरपदान्वित, सहजालंकृत विशदार्थप्रद तैशीं. ६१
आर्योन्नतिकर चेतोमलहर रसिक निर्वृतीकारी,
अर्थचतुष्टयसाधक मुक्तिद काव्यें दुर्मिळ भारी. ६२

संप्रति यास्तव मम मानीं हा साऽशीर्वच आदेश,
काव्यें ऐशीं करा निरंतर तेणें मज संतोष. ' ६३

*		*		*		*

शब्द न जों हे श्रवणीं रिघले, विरल विरल ती होतां
हृदयाकाशीं अस्तंगत हो प्रणवरूपिणी माता. ६४
तेज विरे जों नयनांपुढचें दृष्टि स्तिमित झाली,
अंधजनापरि चांचपडें मी भ्रमे बुद्धि त्या काळीं. ६५
तों सहसा कविविष्णु पुढिल मज वृत्त कथाया लागे,
संभाषणभरिं कशी न कळली रात्र संपली वेगें. २६६

---

# स्वनितसुमनें.

## प्रतिध्वनि !

[ शार्दूलविक्रीडित. ]

तंबोरा तबला सतार सनई या वाद्यशब्दीं तदा—
केला जागृत जो प्रतिध्वनि निशीं लो जें तया गायना—
देई उत्तर गोड तें कितितरी ! तैसा बहू दूर ही—
जाई धांवत देत उत्तर जवें रानीं वनीं डोंगरीं !
रात्रौ शितल शुभ्र सोज्ज्वल शरज्जोत्स्नेंत जेव्हां असा
प्रीतीचा उठतो प्रतिध्वनि अहा ! सुश्राव्य चेतोहर—
तंबोरा तबला सतार असल्या वाद्यध्वनीहूनही
वाटे तो रमणीय सर्व रसिकां मातेंचि ना केवल !
ऐशी ही घडते चमत्कृति परी प्राणी यदा यौवनीं—
चित्तीं उज्ज्वल एकनिष्ठ विमल प्रेमा धरोनी खरा—
कामें विव्हल अंतरीं बहुपरी वा मूढ होवोनियां—
दीर्घ श्वास बहु स्वकीय दयितेप्रीत्यर्थ सोडीतसे;
तेव्हां प्रेमविमूढ तीच तरुणी त्याची सखी सुंदरी,
प्राणेशास्तव आपुल्या वरिवरी श्वासाप्रती सोडिते !

## सॉनेट.

[ मंदाक्रांता. ]

माझीं वाळें विगुण विमती वा जरी रूपहीन,
तैसें माझें सदन जरि ही सर्वथा चंद्रमौळी,
मद्देशींची सकल जनता भाबडी भीरु भोळी,
किंवा तैसा जरिहि असला धर्म माझा पुराण,
माझी भाषा म्हणति जरी ती व्यंग कीं अर्थहीन,
माझीं काव्यें अधम गणुनी अट्टहासें निराळीं—
काढो; निंदो किविहि कुणि वा कीं करो तो कुचाळी,
माझें सारें प्रियतम मला एक माझें म्हणून !
[1]आहे आतां सकल जरि हें साच सर्व प्रकारें,
येतां कोणी अतिथि म्हणुनी स्वीय गेहीं परावे—
गुंडाळोनी सुरुचि गुण वा धर्म कीं स्वीय सारे—
लागे त्यांना सुखित करणें गार्हपत्यस्वभावें !
सॉनेटा तूं असुभग जरी चित्रकाव्यापरी रे !
सन्मानीं मी तरि तुज गड्या एक आतिथ्यभावें !
आहे आतां सकल जरि हें साच सर्व प्रकारें,

---

## स्वनित कीं सुनीत ?

[ पृथ्वी. ]

विभिन्न कुलयातिनें तव रिवाजही वेगळे,
तुझा जनक नी जनी कवण हें न ठावें मशीं;

---

१ पाठभेद:—
केव्हांही मी परजनगुणीं अंध नाहीं स्वभावें;
पूजास्थानीं गुणचि चढती पाहतां सद्विचारें,
वर्णत्यादि प्रकट न तया आड येतात भावें !
सॉनेटा तूं जरिहि परकी ज्ञानवान् सद्गुणी रे !
सन्मानीं मी तुजसि म्हणुनी एक त्या रम्य—भावें.

उपेक्षुनिहि हें परी तुजविशीं रती मानसीं—
धरूं; रसिक तूं असा सकलही तुझें आगळें !
जसें सतत आळवूं सुतसुतां ममत्वामुळें,
तसेंच तुज वागवूं; मन विशेष आकर्षिसी;
चतुर्दश सुनीत कीं स्वानित रम्य नांवें अशीं,
समोद तुज देउनी पुरविले तुझे वा लळे !
परी न अभिधानिं या रुचि समान कोणांप्रती,
सुनीत रुचते कुणां स्वानितही कुणां लोभवी;
मनोगत तुझें परी कुणिं न शोधुनी पाहती,
रहस्यहि न यांतलें तुजासि कोणि वा ऐकवी !
सुनीत अभिधा तुझी प्रिय जया सुराज्यीं रती,
स्वराज्य रुचते जयां स्वानित नाम त्या तोषवी !

## विधिविलसित !

[ मंद्राक्रांता. ]

नाना यत्नीं वळवुनि मनें संधि जो साधिलास,
जासी जों न त्यजुनि मजसी तोहि गेला लयाला;
वेताळाची परत फिरली स्वारि पूर्व स्थळाला,
झाले सारे धनिच नुरतां एकही कोणि दास !
होती जेथें म्हणशिल दिशा पूर्व ती राजकार्यीं,
होता जेथें तुजसि सुतराम् देवसा मान लोकीं,
तेथें आतां स्मृतिहि न तुझी होय कोणां विलोकीं
साधे ना जी घडि बिघडली कोणत्याही उपायीं !
साचें ऐसें परि हिमभुवीं वाहती उष्ण वारे,
तुंगोत्तुंगाचल गिळुनियां तेथ गर्जे समुद्र,
पाहों तैसें फुटति मुसळा अंकुरांचे धुमारे,
लुंगासुंगा अबल नर ही होतसे मूर्त रुद्र !
' नाहीं ! नाहीं ! ' जन जरि वदे शिघ्ररत्नें उदारें,
दावीयेलें वट[१]तरुतळीं रूप तूझें सुभद्र !

---

१ गया येथील अक्षय्यवटाखालीं.

## विधिविपर्यास !

सर्वांना जे पुरुनि उरले आपुल्या विक्रमानें-
शर्मण्यांचे कटु रुदन त्या आयकें आज कानीं;
ग्रीकांची त्या रग जिरविली शौर्यधी केमिलानीं,
वार्ता हीही श्रवणपुटकीं ओतिली वारियानें.
केला जागा गडद निजला रीस तो लेनिनानें,
स्वातंत्र्याचे ध्वज उभविले व्यालराड्कुलांनीं.
साऱ्या पृथ्वीवरिल असल्या गोष्टि या आयकोनी,
होतों चित्तीं व्यथित अथवा हृष्ट मी नित्य जाणें.
आहे ऐसें परि न रडणें दीन त्या स्वार्भकांचें,
पत्नीची वा करुण वचनें नर्ममर्मोपहास;
पोटासाठीं कटु विवळणें पंगु भिक्षेकऱ्यांचें,
देशाची ज्या तळमळ खरी ऐशियाचा उमास;
किंवा तूझ्या चरणयुगिंच्या ध्वान हे शृंखलांचे,
हा ! हा ! माते मजसि नच गे येति ऐकावयास !

---

## बाबू[1] सुब्रह्मण्य अय्यर !

यत्स्पर्शें मीं अशुचि गणुनी शुद्ध व्हाया स्नपावें;
त्यांच्या स्पर्शें जनुसुफलता वाटते प्राप्त झाली !
याहीपेक्षां अरुणसुषमा रंजिता कृष्ण गालीं,
ईर्ष्याचाडें नवयुवति कीं लाल होती स्वभावें !
बाबालोकीं[2] मृदुल चरणीं दोंदिं या बालभावें,
मारोनीयां मज उडवितां चेंडुसें भोंवतालीं;
आनंदानें वदत उठुनी का कशी काय झाली ?
हस्तीं या तच्चरण चुरितों कीं न त्यांनीं रडावें !

---

१ साहेबलोक घरीं येणाऱ्या जाणाऱ्या कारकुनांस या नांवानें संबोधितात.

२ साहेबलोकांच्या मुलांस संभाळण्याकरितां ठेविलेल्या आया ( दाया ) त्या मुलांना ' बाबा लोक ' या नांवानें संबोधित असतात.

## विधिविपर्यास !

सर्वांना जे पुरुनि उरले आपुल्या विक्रमानें-
शर्मण्यांचे कटु रुदन त्या आयकें आज कानीं;
ग्रीकांची त्या रग जिरविली शौर्यधी केमिलानीं,
वार्ता हीही श्रवणपुटकीं ओतिली वारियानें.
केला जागा गडद निजला रीस तो लेनिनानें,
स्वातंत्र्याचे ध्वज उभविले व्यालराड्गुलांनीं.
साऱ्या पृथ्वीवरिल असल्या गोष्टि या आयकोनी,
होतों चित्तीं व्यथित अथवा हृष्ट मी नित्य जाणें.
आहे ऐसें परि न रडणें दीन त्या स्वार्भकांचें,
पत्नीची वा करुण वचनें नर्ममर्मोपहास;
पोटासाठीं कटु विवळणें पंगु भिक्षेकऱ्यांचें,
देशाची ज्या तळमळ खरी ऐशियाचा उमास;
किंवा तूझ्या चरणयुगिंच्या ध्यान हे शृंखलांचे,
हा ! हा ! माते मजसि नच गे येति ऐकावयास !

---

## बाबू सुब्रह्मण्य अय्यर !

यत्स्पर्शें मीं अशुचि गणुनी शुद्ध व्हाया स्नपावें;
त्यांच्या स्पर्शें जनुसुफलता वाटतें प्राप्त झाली !
याहीपेक्षां अरुणसुषमा रंजिता कृष्ण गालीं,
ईर्ष्याचाडें नवयुवति कीं लाल होती स्वभावें !
बाबालोकीं[२] मृदुल चरणीं दोंदिं या बालभावें,
मारोनीयां मज उडवितां चेंडुसें भोंवतालीं;
आनंदानें वदत उठुनी का कशी काय झाली ?
हस्तीं या तच्चरण चुरितों कीं न त्यांनीं रडावें !

---

१ साहेबलोक घरीं येणाऱ्या जाणाऱ्या कारकुनांस या नांवानें संबोधितात.

२ साहेबलोकांच्या मुलांस संभाळण्याकरितां ठेविलेल्या आया ( दाया ) त्या मुलांना ‘ बाबा लोक ’ या नांवानें संबोधित असतात.

ज्यावांचोनी मज न मिळतें अन्नही खावयातें,
वस्त्रांची वा दसडिहि पुरी लाज रक्षावयास,—
हा ! हा ! त्यांचा सहज चुकुनी जाहल्या स्पर्श मातें-
धिक्कारीं मी परुष वचनीं गालिदानीं तयांस !
अस्पृश्यांचें मुळिंच नलगे नांव त्या घ्यावयातें
स्पर्शें त्यांच्या पितरचि जणों जाति कीं रौरवास !

# प्रेसिडेंट विल्सन्, लेनिन व महात्मा गांधी !

—१—

सर्वांठायीं स्थिरमति तुझी दृष्टिही एकरूप,
अध्यक्षाचा म्हणुनि तुजला लाधला मान थोर;
पाहोनीयां वळि नृपतिची राज्यतृष्णा अघोर,
इच्छापुत्रा ! मनिं चरकुनी लुप्त झाला हुरूप !
द्रव्यव्याजें वळवुनि फराशीस नी आंग्लभूप,
स्वेच्छेची तूं रवि करुनियां आत्मविश्वास दोर;
मंथोनीयां रणनयमहासिंधु तेव्हां अपार,
वाग्रत्नें त्वां वितरुनि जगा कीर्ति केली अमूप !
वाग्दानानें चुकुन तरिही कोणि का तृप्ति पावे ?
सामेंदामें अदय कपटी हिंस्र का होति दीन ?
धूर्तीं लोकां तव चकविलें योजुनी दुष्ट कावे,
तूतें स्थानच्युत करविलें तेविं बा ! कीर्तिहीन !
पीयूषानें मृत अमरता पाविजे तो स्वभावें,
येथें आजीं तुज तव सुधा हा ! करी मृत्युलीन !

—२—

अल्पांशेंही कृति न करितां जो मुखें मात्र बोले,
त्याचें कैसें फल करिं पडे प्रत्यहीं ये दिसून;

‘ आधीं केलें उपरि कथिलें, ’ दिव्य हें आचरून,
लेनीना त्वां पटवुनि दिलें, आघव्यां थक्क केलें !
सत्ताश्रेष्ठीं तुज तव नया सारखें निंदियेलें,
त्वद्राष्ट्राही वरि वगळिलें राष्ट्रसंघामधून;
सृष्टीची त्वां घडि विघडिली वैपरीत्यें करून,
त्वल्लोकां जे,सुर-वर खरे, दैत्य संबोधवीलें !
नानायत्नीं अमृत तरु जो लाविला अङ्गणांत,
त्याला येणें बहर कुटुनी उग्र वृंदावनांचा ?
गाडें सारें उलट फिरलें देवता वा ! जगांत,
आली तूतें; अमित चढला मानही त्वज्जनांचा !
कस्तूरीच्या मधु परिमलें गुंगतें वस्तुजात,
घेतो ध्यानीं कवण परि तन्मृत्यु होतो पित्याचा !

—३—

देवें दैवें तुज करवुनी मुक्त बंधामधून,
बारोनीयां गदभय दिली शक्ति ही कर्मवीरा !
हेतू हा कीं, तव करिं तुझी तत्त्वमाला उदारा
व्हावी वेगें मधु फलवती देशदैन्या हरून !
पुण्याईचें फल तव असे भाविकालीं दिसून,
येणें आहे जरि कळतसे चित्तवृत्ती अधीरा !
दैवें केला हरण अमुचा आजचा काल सारा,
गेला काल स्मृतिसुखमिषें भासतो मोदपूर्ण !
नाकीं ज्याचे सुत धरियलें रुग्ण तो मृत्यु-दारीं,
जीवूं कांहीं दिन अधिक ही आस ऐशी तयातें !
स्वातंत्र्याचा विजय दिन तो तूंचि सर्वाधिकारी,
दावायातें क्षम म्हणुनियां लक्षितों आम्हि तूतें !
आशा भारी चिवट तिजला घोर सांद्रांधकारीं,
बालार्काचे किरण दिसती रंजले मोदवीते !

---

# कविवर्य मोरोपंत.

नाना वस्त्राभरणिं नटली वाग्वधू दिव्य ज्याची,
ज्याची वाणी सतत रमली रामसंकीर्तनांत;
आर्याचार्या बघुनि तुजला या लसद्वैभवांत,
वांके आपें शिर सुटुनियां गांठ गुर्वी मनाची !
रूपें तुझ्या इह अवतरे काव्य तो मूर्त साची,—
वाचावी जों तव सुकविता वाटतें मानसांत;
मोहोनी मी वरळ न वदे साक्ष यालागिं साक्षात्,
' आत्मा वै ' ही श्रुतिच वदते पुत्र मूर्ती पित्याची !
निंदी कोणी तरिही तुजला 'कीं न बा तूं कवीच,'
काव्याचा त्वद् हृदयिं न वसे अल्प ज्ञानप्रकाश;
लुंग्यासुंग्याकविपरिसही वाटसी त्यांस नीच,
कैंची होणें स्मृति तव तुझ्या पुण्यकालीं तयांस !
या*मार्जी बा नवल न परी आमुची रीति हीच,
' स्वापत्यांतें ढकलुनि दुरी अंकिं घ्यावें परांस ' !

---

# लॉर्ड बायरन्.

झालीं वर्षें शत कविवरा ! होउनी आज तूतें,
त्वद्भक्तांहीं स्मृतिदिन तुझा पाळिला आदरानें,
कोणीं काव्यें अभिनव तुझीं गाइलीं कौतुकानें,
कोणीं मूर्तीवरि तव सुमें वाहिलीं साश्रु पूतें !

---

१ श्रीशुक्राचार्य. [ येथें मूळचा पाठ ' शारदा ' असा होता.]

* चैत्र शु० १५ शके १८४६ ( ता. १९–४–२४ ) च्या ज्ञान-प्रकाशाचे वाङ्मय–पुरवणींत, त्या दिवशीं कविवर्य मोरोपंत यांची पुण्यतिथि असतां त्यांच्याबद्दल एक अवाक्षरही न येतां लॉर्ड बायरन्‌वरमात्र एक लांबलचक लेख आला ! हें दृश्य पाहून कोणाही महाराष्ट्रभाषाभिमान्याच्या मनांत हे विचार येणें स्वाभाविक नाहीं काय ?

तीर्थक्षेत्रापरि तव गृहा वीरसें आणि तूतें,
वाखाणोनी अनुपम रणावेशही गौरवानें;
व्याख्यांनीं हें विशद करुनी मुक्तकंठारवानें,
उद्वर्तीलें तुज बहु असे बायरंना कीर्तिमूर्ते !
होतां ऐसें त्रिभुवन तुझ्या तोटकें सत्रशाला,
भेदोनीयां गगनहि वरी जाय जो नाद त्याचा—
योषित्कर्णीं; मनिं दचकल्या थोर संताप झाला
आवेगानें परत वळल्या भंग झाला मनाचा !
उच्छेदोनी गृहसुख तुवां भ्रष्टिले ज्या स्त्रियांला,
हा ! हा ! कैशा विरस करिती आज त्या उत्सवाचा !

---

## नाहीं ऐसें कधिं तरि वदे०

राधे ! आतां तुजसि कथितों निक्षुनी एकदांच,
सोडीं चाळे सकल झणिं हे; यापुढें क्षम्य ना तें;
जो तो निंदी कुजबुजुनियां गोकुळीं सर्व मातें,
दावायातें वदनहि जनां वाटतें लाज साच !
कोणासंगें लवहि नसतां वैर माझें उगाच—
चेष्टा माझ्या करतिल कशा काय ना भीति त्यांतें ?
कृष्णानें त्या पुनरपि कधीं येथ यावें न कांते !
जावें न त्वां चुकुनिहि तसें; थोर होईल जाच !
राधे ! राधे ! तव मन कुठें ? बोलतों मी कुणाला ?
कोठें दृष्टी ? नसति तव का कान गे आज ठायीं ?
कालिंदीचे तटवनभुवीं—बोलसी काय आला,
श्रीकृष्णाचा मधुर मुरलीशब्द आनंददायी ?
नाहीं ऐसें कधिं तरि वदे काय मी जावयाला ?
मंदे राधे ! तुज मज गमे शब्द ठावा न थाई !

[library stamp]

तरंग ४ था.

# पुण्याची पर्वती.

पर्वतीच्या पहिल्या पायरीवर.इ.स.१९१७ मध्यें,एका उदारधि,भाविक पण सहृदय रसिक राजपुरुषानें, प्रस्तुत लेखकास पुण्याचे पर्वतीवर एक कविता लिहावयास सांगितली होती.प्रस्तुत कविता हें त्या आज्ञापालनाचें दृश्यस्वरूप होय. आज्ञापक भक्तिमय अंतःकरणाचे असल्या कारणानें त्यांना कशा प्रकारची कविता पाहिजे याची लेखकास चांगली जाणीव होती. त्यांच्या वृत्तीशीं समरस होऊन कविता लिहावी या हेतूनें पर्वतीला सारख्या खेट्या घातल्या, तरी वृत्ति उल्हसित होईना व कांहीं केल्या जम बसेना! अखेर एके दिवशीं 'वयपरत्वें बुद्धीला जाड्य येतें. तुमचें काव्यकौशल्य गारठल्यासारखें दिसतें.' असे शब्द ऐकून घेण्यापर्यंत पाळी आल्यावर आत्मवंचना न होऊं देतां आज्ञापालनाचें कार्य तडीस नेण्याचा संकल्प केला व त्याप्रमाणें गेल्या शिवरात्रीस कविता लिहिली. आज्ञापकांनीं व त्याप्रमाणें इतर पुष्कळ सहृदय कविमित्रांनीं प्रस्तुत काविता पसंत पडल्याचें दर्शविल्यावरून ती आज महाराष्ट्रास या स्वरूपांत सादर करीत आहे.

प्रस्तुत कविता ऐतिहासिक स्वरूपाची असतांही वाचकांस प्रसंगविशेषीं विपर्यास झालेला आढळेल; परंतु कै० हरिभाऊ आपटे यांच्या "काव्याचें सर्व रहस्य सत्यांत नाहीं, तर सत्याभासांत आहे. इतिहासाचें रहस्य सत्यांत आहे, इतिहास लिहिणारानें अणूभरही सत्यापासून चळतां कामा नये. कवीस प्रत्यक्ष सत्याची अपेक्षा नाहीं, सत्याभासाची अपेक्षा आहे." (विदग्ध वाङ्मय पृ० ५६ पहा) या शब्दाकडे दृष्टि ठेवून कविता वाचल्यास इतिहासाचा विपर्यास केला आहे असें म्हणण्याची पाळी येऊं नये असें वाटतें.

शेवटीं ज्या हृदयस्थ जनार्दनानें, परम मंगल परमात्म्यानें अशा प्रकारचें हें शब्दचित्र काढविलें, त्याला अनन्यभावें शतशः प्रणाम करून व पर्वतीवरील श्रीदेवदेवेश्वराचे चरणीं तें समर्पून हें हृदयनिवेदन आटोपतों.

[ चाल—पोवाड्याची. ]

१

स्मशानवासी विश्वविलासी विभवविनाशी उमापती,
सपार्वती ज्या वसे पर्वतीं तया पर्वती जन म्हणती. ध्रु०
धनी शिकंदर, विलासतत्पर, राज्यधुरंधर नानांनीं,
पुण्याग्रामा रूपा आणुनि केली अपुली नृपधानी;
शौर्यशालिनी समरखेलिनी महाराष्ट्रभूहृदयमणी,
पुण्यपुरी ही भली वसविली 'दख्खनची' म्हणती 'राणी;'
भयार्तसंजीवनी मानिनी मर्द मराठ्यांची जननी,
सुहासिनी सद्भाग्यशालिनी लावण्याची नव खाणी;
मग तिचे दक्षिणेकडे,
सह्यगिरि—कडे,
बघुनि रोंकडे,
बांधवोनि देउळवाडा,
नाहिं सान नाहीं गाढा,
स्थापिला देव नागडा,
न कळे कोणीं कुण्या मुहूर्तीं दिली तयातें ही सुमती !

२

काळि गंडकी शिळा चक्राके जींत पाहतां रूप दिसे,
श्रीविष्णूची मूर्ति घडविली बघतां जीवा जडे पिसें;
दक्षिणभागीं महेश्वराचें बांधुनि देवालय सान,
ज्येष्ठसुमारीं व्रजवनवासी तिथें स्थापिले श्रीरमण;
देव पूजिल्या दैव न चुकतें पानिपताच्या[1] रणांगणीं,
भाउ हरपला, पुत्र निमाला, अघटित दैवाची करणी !
नउ लाख बांगडी फुटलि,
शोणितीं न्हाली,
भूमि त्या कालिं,

---

१. श्रीविष्णूची स्थापना इ. स. १७५८ त झाली व पुढें अवघ्या तीन वर्षांनीं म्हणजे इ. स. १७६१ त पानिपतचें भयंकर युद्ध झालें !

ढवळ्याचे शेजारास,
बांधिता पोंवळा त्यास,
वाण न गुण लागे खास,
स्मशानवासी कसा होय हा वृंदावासी रमापती ?

३

जवामर्दिचें शिक्षण द्याया महाराष्ट्रिंच्या बाळांना,
सचिव रमाधव तेजःसंभव विचार अभिनव करि नाना,
निर्दय पशुपति विलासि यदुपति हे न लाधले देव इथें;
सुरसेनानी, कार्तिक मानी तोचि रक्षिता समयातें,
पौरुष्याची षडाननाची मूर्ति करवुनी नवलाची,
मंदिर बांधुनि करि जों अर्चा परमोत्साहें यथारुची;
क्षयरोग माधवा जडे,
मनीं चरफडे,
नावरे रडें,
जावोनि थेउरामाजीं,
नेमुनी गणेशा फर्जी,
गुजरिली गुहावर अर्जी,
व्यर्थ होय तें! मुके जिवा तो! जाय त्यासवें रमा सती !

४

पुण्यदंपती रमा—रमापति—शापें पुढतीं एक दिनीं,
स्कंदमंदिरावरी कोसळे लोळ विजेचा कडाडुनी;[1]
मूर्ति भंगली मंदिर पडलें सदन[2] जळालें निमिषांत,
भोंज्या भिंती अजून देती साक्ष पाहत्या डोळ्यांत !
अश्रु ढाळितां रडूं ओसरे; हुंदके स्फुंदन सरत नसे,
ढग कोसळता, पाउस जातां गगन उसासे देत बसे !

---

१ कार्तिकेयाचे मंदिरावर इ. स. १७९१ त वीज पडून:तें जाया झालें.

२ श्रीविष्णूचे दक्षिण व पश्चिम बाजूस एक चतुष्कोणी वाडा होता. हा वाडाहि वीज पडूनच इ. स. १८१६ त जळाला !

आणुनी मूर्ति गोजिरी,
सुखद साजिरी,
स्थापिली जरी,
जें जाय विभव एकदां,
भंगिली मुक्त–संपदा,
सांधितां काय ये कदा ?
भरल्या गोकुळिं अकाबाइचा फेरा आला ! कालगती !

५

छत्रपतींच्या वजिरातीवर जिथें चमकले मानधन;
एकापेक्षां एक विचक्षण वीरमणी कीं नयनिपुण;
दैव आमुचें ! रुचे माधवा त्या गादीचे योजाया,
धनि जे झटले, सदैव अपुलें देह–कातडें राखाया;
सवाइ बाजी, भोजन–गाजी भिक्षुकभटजी–पोशिंदे,
साळुसखूंचे चिमीठमीचे बावनखाणिंचे साजिंदे !
युद्ध जुंपतां खडकीला,
बघत बैसला,
त्या समयाला,
उमापतीचे पायाशीं,
लावुनि दुर्बिण डोळ्यांशीं,
स्वजनप्रेतांच्या राशी,
भला प्रजापति दिला उमापति ! अभिधा पशुपति सार्थचि ती !

६

सभोंवताली दृष्टि फेंकिली जरी विचक्षण घडीभरी,
गतकाळींचें विनष्टवैभव अश्रु लोचनीं उभे करी !
जल पुरवाया नगरवासियां तळें निर्मिलें पायतळीं,
मंगलदायक सिद्धिविनायक बसे जलाशयिं सुनिर्मळीं;
क्रीडानौकेमधें बसोनी सवाइ माधव महादजी—
नानासह नृपनीति खेळले तळ्यांत या सहजासहजीं;
आजला तळें आटलें,
रान माजलें,

गवत उगवलें,
पाण्याचा टिपुसहि नुरला,
डोळ्यांला लावायाला,
प्रगतीचा गाडा आला,
त्या पाण्यासह पाणि पुण्याचें गेलें बोले वृद्ध–तती !

७

स्मर–रण–रंगीं समसुखभोगी राजयोगि कीं तो बाजी,
समरामाजीं केवळ गाजी सदा शिपाई ज्या राजी;
अनन्य सुंदर अशी तयाची सखी जिवाची विलासिनी,
मनोमोहिनी मधुरभाषिणी मदमस्तानी विनोदिनी;
तत्सुखसंगीं दंग जोंवरी रंग न भंगो धरुनि मनीं,
उपवन अनुपम, नंदनवनसम, निर्मी नामें ' मस्तानी '
त्यापुढें बाग दूसरा,
अजब नव तऱ्हा,
नाम ज्या ' हिरा, '
बांधिला पंत नानांनीं,
धोरणी राजकारणी,
गाजे कीर्ती अशी जनीं,
बापसे बेटा असा सवाई उणा न एकहि पाव रती !

८

मंगलकार्यीं विप्रभाजनें सतत पूर्वि ज्या स्थलिं व्हावीं,
सुमंत येता परराष्ट्रींचे तयांस जाफत कीं द्यावी;
विबुधांकरवीं वसंतोत्सवीं सायंकालीं पुढें पुढें,
स्वबंधुसाठीं ज्ञानसुधेचे माधव[२] घाली जिथें सडे;

---

१ जसा मस्तानी बाग बाजीरावांनीं आपल्या खेळीकरितां बांधिला तसाच त्यांच्या मुलानें म्हणजे श्री. नानासाहेबांनीं ' हिराबाग ' आपल्या खेळीकरितां बांधिला अशी आख्यायिका आहे; व तिलाच उद्देशून प्रस्तुत ओळ योजिली आहे. २ कै. न्या. मू. माधव गोविंद रानडे.

मंत्र्यांसंगं किंवा व्हावीं जिथें खलवतें एकांतीं,
सखीसंगतीं तिथें पारवे आज मसलती परि करिती !
सोमाचे स्थलिं त्या किती,
पाट वाहती,
सदा संप्रती,
चेंडुफळी किंवा कोणी,
लुसलुशीत मउ हातांनीं,
खेळती धांवधांवोनी,
चहा बिस्किटें, कांदाचिवडे जलसे यांचे किति झडती !

९

इचलकरंजी संस्थानींचे व्यंकटराव् घोरपडे,
दानशूरता—यशोदुंदुभी ज्यांचा आजहि कानिं पडे !
बाजीभगिनी सुगुणशालिनी अनसूया ती जणुं दुसरी,
व्यंकटरावा वरी विवाहीं; हरिविण लक्ष्मी कुणा वरी ?
समीपवर्ती विलसे त्यांचा बागबगीचा मनोहर,
श्रांत मना विश्रांति लाधतें प्रेमें बघतां घडीभर !
उमापतीची दृष्टि परी,
पुरी विषारी,
पडे जयावरि,
तयास लघुता कशीवशी—
येणें; ठरली रीति अशी,
अनसूया[†] मग सुटे कशी ?
देउनि अनुमति, तोतयास ती, पडे फशीं नयमती सती !

---

[†] इ. स. १७६६ त सदाशिवराव भाऊंच्या तोतयाची चौकशी झाली तेव्हां श्री. अनुबाई पुण्यांतच होत्या. तो तोतया नसून भाऊसाहेबच असावा असें अनुबाईचें मत होतें व त्यांची भ्रांति दूर करण्यासाठीं श्रीमंतांनीं त्या तोतयास अनुबाईचे वाड्यांतही कांहीं दिवस ठेविलें होतें. परंतु त्यांची भ्रांति शेवटपर्यंत दूर झाली नाहीं, ती नाहींच ! श्री. अनुबाईच्या हातून हें जें अविचाराचें राजकारण झालें तेणेंकरून त्यांचें फार नुकसान व दुर्लौकिक

१०

समोर भिंती उघड्या दिसती स्थलासि म्हणती त्या रमणा,
वाटित होते धन द्विजांना श्रावणांत जेथें नाना;
धर्म मांडितां कर्म राहिलें उभें केविं सालीं एका,
पर्जन्याची वृष्टि जाहली सुरू अचानक धुमधडका;
वेदोभास्कर पळूं लागले, चिंब जाहले कुडकुडले,
पडले, झडले, पदिं अडखळले, जलीं बुडाले गडबडले !
'—धर्म काय हा शक्राला—
नाहीं रुचला ?—'
वदुनि समयाला,
नृपवस्त्रें त्यजुनी सारीं,
नानांची बसली स्वारी,
मांडुनी ठाण निर्धारीं,
पाउस गेला, भानु[1] चमकला, नवलपराई चमत्कृती !

११

सिंहगडाचें अभिमानाचें, विमल यशाचें शिखर महा,
दिसे येथुनी, झुलता गगनीं, नीट न्यहाळुनि जरा पहा;
अस्तगिरीला जयें लाविला उदयभानु तो यवनांचा !
शिवरायाचा, सखा जिवाचा, शेलाराचा त्या भाचा !
सिंह मावळी, तो वनमाळी, करवंदीच्या जाळींत,
दिसे पहुडला तीक्ष्ण दृष्टिनें पापी हृदया जाळीत !
पाय पांढरे उमार्धते[2]—

---

झाला. त्यावेळीं त्यांचें सर्व संस्थानच खालसा व्हावयाचें; परंतु नाना फडनवीस यांनीं केवळ त्यांच्या वृद्धापकाळाकडे लक्ष देऊन तसें केलें नाहीं, इतकेंच.

१ सूर्य, पक्षीं नाना फडनीस. २ इ. स. १८१७ त खडकीची लढाई निश्चित झाल्यावर पर्वतीवरील सर्व जामदारखाना देवदेवेश्वरांच्या मूर्तीसह सिंहगडावर नेऊन ठेविला. अर्थात् सिंहगडाला पर्वतीवरील देवांचे पाय लागतांच सिंहगडाचें टापूंतील मावळी प्रजा वस्त्रान्नास महाग झाली अशी कल्पना केली.

लागतां इथें
तुझे वाटतें,
त्याच धुरंधर सिंहाचे,
महाग झाले हे बच्चे,
वस्त्रान्नालाही साचे,
सतिचे द्वारीं बत्ती, झुलती असती–द्वारीं परि हत्ती !

१२

वानवडीच्या चतुःशृंगिंच्या अफाट उघड्या मैदानीं,
डेरे देउनियां दल्बादल् जिथें दिसावे वीरमणी,
शिंदे होळकर समरधुरंधर खांबचि केवळ दौलतिचे;
भाले पेलित सदा बसावे शिपाइ निधड्या छातींचे;
तिथें आजला स्वैर हिंडती तिसऱ्या प्रतिचे सरदार
चष्मे घालुनि वरचष्म्यानें नव्या दम्याचे बहाद्दर;
जाहले छातिचें खोकं,
कटीला पोक,
तरीही झोंक,
वायुधूत केश सारिती,
किडकिडित कांठि फिरविती,
तोंडांनिं शीळ घालिती,
खांब आजचे हे दौलतिचे ! देवा ! डोळे डबडबती !

१३

डोळे उघडुनि दिसे पाहतां असा भोंवतां अंधार,
तरीहि म्हणती प्रकाश गाढा ! खूप शर्तिचे बिलंदर !
अतिवृष्टीनें अनावृष्टिनें देश जाहला वैराण,
अर्ध्यापोटीं प्रजा वावरे सर्वपरींनीं हैराण !
डोळे ताणुनि धूर्त धोरणी धीटपणाच्या गुर्मीनें,
म्हणती रडता भरती असतां महानुभावी कपटानें !
खरें तयांचें हें म्हणणें,

नाहीं वदणें,
लाजिरवाणें,
तोंड दाबुनी वरी बुके—
देती मारुनि चरम् धके,
बालिष्टनीती अशी विके,
शेळी जातां जिवानिशीं कीं म्हणती खात्रू वातट ती !

१४

पाठीमागें मावळतीला[†] ध्यान देउनी पहा जरा,
विठ्ठलवाडी जुनी पुराणी हिंगण्याची ती नवी तऱ्हा !
अनाथ अबला विधवा बाला, यानां घालुनि नवे घडे,
मैत्रेयी कीं गार्गी यांचें पुनरुज्जीवन आज घडे;
पहा मुठेचें धरण कसें तें अल्लडपोरीपरी पळे,
घाली विळखा या दरडीला; परी मेखला तिला मिळे
भारतसेवकसमितीचें,
सुविलासाचें,
गृह मौजेचें,
भारतसेवा कशी किती,
घडते त्यांना ठाउक ती,
वाक्‌कुशलांची ही वसती
पोरें सोरें म्हणति; जाउं द्या; बोलुनि चालुनि अल्पमती !

१५

शेजारीं तें कला शिकवितें विद्यामंदिर[१] पलीकडे,
तशींच तिकडे गंगमुखीला[२] अणीक दिसती दोनें[३] पुढें;
उंची शिक्षण इथें लाधतें आजकालच्या बाळांना,

---

[†] पश्चिमेला.

१ फर्ग्यूसन कॉलेज. २ उत्तरेला. ३ शेतकी व सायन्स हीं कॉलेजें.

कंठरवानें म्हणती सारे; मला न पटतें§ कांहिं म्हणा !
सुधारलेले बडे भिकारी हमाल पैदा करणारीं,
यंत्रमंदिरें, गिरण्या, गोद्या यांना म्हणतों खरोखरी !
परावलंबी अजागळे,
भळे नेभळे,
लुळे आंधळे,
काड्यामोड्यांचीं औतें,
माण्यांचे जणुं दिसति पिते,
वायू उडवी अशीं भुतें,
निम्या गोंवऱ्या गेल्या त्यांच्या आजचि मसणीं जणुं पुढलीं !

१६

ईशान्येला राजमंदिरापरी दिसे जो अजब महाल,
दर्ग्यावाणी दिसे वरोनी शिल्पाची ही बहार विशाल !
पोटभरूंचा हमालखाना–तुरुंग–वाडा तसा नवा,
कोणी म्हणती तया संप्रतीं, काय आंतली वर्णु हवा !
आरंभाला कीं अकराला हमालहजरी होत असे,
दिवेलागणीं तेथुनि सुटती, चरकीं पिळिले ऊस असे !
बोलाया नाहीं उजरी,
जावया चोरी,
अशी शिरजोरी,
टाकांचीं उमदीं घोडीं,
मारिती तुरुतुरू दौडी,

§ पुष्कळांना माझें हें म्हणणें ऐकून सखेदाश्चर्य वाटेल. पण त्याला उपाय नाहीं. जसें माझें ' प्रामाणिक ' मत आहे, तसें मीं लिहिलें आहे. प्रख्यात वनस्पतिशास्त्रज्ञ भारतभूषण जगदीशचंद्र बोस, भूगर्भशास्त्रज्ञ बालमूर्ति आनंद मोहन व साहित्यसम्राट् रवींद्रनाथ ठाकूर या वंगदेशीय अतुलप्रज्ञ, कल्पक, व शोधक त्रिमूर्ती मनश्चक्षूपुढें आणिल्या म्हणजे खरें उंची शिक्षण कोणाला मिळत आहे, याची पुरेपूर अटकळ होऊन माझ्या म्हणण्यांत अल्पस्वल्प तरी तथ्यांश आहे असेंच पूर्ण विचारांतां सर्वांच्या प्रत्ययास येईल.

बानुं मी काय ती प्रौढी ?
आंखे[1] चोळितां आंखें[2] मोडितां बसे हाहि त्या स्थलिं विमती !

१७

अस्तगिरीवर चढुनि दिवाकर पश्चिमसागरजलीं तळीं—
जों न उडी घे, पुण्यनुरीवर टाकी निजकर तमोवळी,
क्रमाक्रमांनीं पदापासुनी अमल विषाचा पुरा बसे,
सजीवतेची उगिच धुगधुगी तोंडावरती मात्र दिसे;
तोंडावरती प्रेतकळा ती आली आतां हळू हळू,
पर्वतिलाही विषार चढला, तिला लागलें तिमिर गिळूं !
नैराश्याच्या विषें महा,
केलें स्वाहा,
दुनियेस पहा,
तिमिरापोटीं प्रभा जशी,
नैराश्याचे म्हणति कुशीं,
आशा जन्मे दिव्य तशी,
भाविकाल तो कसा तुझा तुज ठाउक देवा उमापती !

---

# जरीपटका.

१

अभिमानाचें, जरिपटक्याचें, निशाण बुरजावरि नाचे,
कोण पूत कीं, असेल ऐसा लवे न बघतां शिर ज्याचें ? ध्रु०
जशी खाण ती तशीच माती जग अनुभूती सांगतसे,
आनंदीचे—विषवल्लीचे—पोटीं आले राव तसे;
मिठास मोठी, साखर ओठीं, भरलें पोटीं जहर परी,
नजर विषारी, भारी गहिरी, मारी लहरीवर लहरी;
हिंदुस्थानी वाघ पटाइत पाटिलबोवा मर्दगडी,
खेळविला ज्या नृपनयनिपुणें हातीं बोटीं कडिविकडीं;

---

१ डोळे. २ अकडे.

अटुकाट करुनि सिद्धता,
गोट सर्वथा,
बांधुनी स्वतां,
चढविला भयंकर हल्ला,
घालुनी अचानक घाला,
शिंद्यांचा धुव्वा केला,
गोट लुटोनी, बूड पाहिलें, खोल किती गंगाजाळिचें,
भलें लाधलें, फळ शिंद्यांना या हातीं त्या हातींचें !

६

शिरला अंगें रणरंगीं त्या शूर सवाई यशवंत,
कतल्बाज दांडगा लांडगा जसा शिरावा मेंढ्यांत !
कणसापरि कीं कत्तल केली, हडें पसरलीं मैदानीं,
'हडेपसर' हें नांव पावलें गांव वसे जें त्या स्थानीं,
गारद केला शिंदा सगळा; कळतां ऐशी रणवार्ता,
श्रीमंतांनीं, पुण्यामधोनी पाय घेतला मग पळता,
उदयभानुसम रणगडी,
करुनियां कडी,
गडीं अवघडीं,
मारुनियां तानाजीनें,
कमविलें नांव शौर्यानें,
'समरसिंह' सन्मानानें,
सिंहगडीं त्या दडी देउनी नांव मळवुनी 'सिंहाचें,'
हरिचर्मांतरिं, कसें वसतसें हृदय दाविलें कोल्ह्याचें !

७

तळ देवोनी हडपसराहुनि यशवंतानीं कडिविकडीं,
लिहुनि लखोटा थैलि धाडिली श्रीमंतांना सिंहगडीं,
" धनी गादिचे आपण, आम्ही चाकर पायाचे असतां,
भिउनी आम्हां, करित हमामा सैरावैरा कां पळतां ? "
धनीपणानें, येउनि मानें, हिशोब घेणें दौलतिचा,
दर्शन द्यावें, धन्य करावें, हीच एक कीं मनिं इच्छा !

मागणें न दुसरें कांहीं,
आण मी वाहीं,
या लवलाहीं,
भंडार उचलुनी देतों,
दिल्‌सफाइ अवघी करितों,
मग सुखें इंदुरीं जातों,
यांत न अंतर पडेल, थकलें जरी उगवणें सूर्याचें,
ऐका विनती करी लेंकरूं सती अहिल्या देवीचें !

८

अंतःकरणा न ज्या भावना इमान म्हणजे काय असे,
विश्वासाचे खुल्या दिलाचे बोल पटावे तया कसे !
जन्मापासुनि कपटावांचुनि दुजें न कांहीं ज्या ठावें,
भित्यापाठिं त्या योग्यचि भीति ब्रह्मसमंधें बैसावें;
दहशत चित्तीं घेउनि पुरती त्या बेहिमती रायानें,
तळीं उतरुनी वसइ गाठिली तडक महाडच्या मार्गानें;
जें पूर्वीं वसई ठाणें,
चिमणाजीनें,
बहु शौर्यानें,
घेतलें शत्रु मारून,
अंगाचें करुनी रान,
घेउनी सतीचें वाण,
त्याच स्थानीं मोल देउनी स्वातंत्र्याच्या नरडीचें,
विकत घेतलें, नामर्दानें रक्षण अपुले देहाचें !

९

" राव न येतां, देउनि गोता गेले पुढतीं " हें वृत्त,
कळतां खवळे वाघ डाहण्या शूर सवाई यशवंत,
नवलपराई, करुनि चढाई, बहुत मांडुनी पुंडाई,
चंदीसाठीं, नाकेबंदी करुनी घेई भरपायी;
तोफा लावुनि, वेढा घालुनि श्रीमंतांच्या वाड्यास,
पैक्यासाठीं, काटाकाटी करुनि घातला हैदोस !

सोडिलें पुंड पेंढार,
लुटाया स्वैर,
शहर बाजार,
टोळधाड जैशी यावी,
वळवाची वृष्टी व्हावी,
वायधूळ किंवा यावी,
आले भरभर, गेले झरझर झरवुनि अश्रू जनतेचे,
औट घडीचें राज्य करोनी अस्मानी सुलतानीचें !

१०

दंगल असली, सुरू जाहली, कोणि न वाली कोणाला,
ख्यालि खुशाली, दूर राहिली, बाप पुसेना लेकाला;
जो तो अपुला जीव घेउनी मिळल्या मार्गें पळत सुटे,
'सब्से प्यारा जीव' तत्त्व हें अशाच समयीं खरें पटे;
बाण वर्षती, गोळ्या सुटती चमचम चमकति तरवारी,
रडण्यावांचुनि दुजें न कांहीं ऐकूं येई घरिंदारीं !
तों सूं सूं सुटला बाण,
कसा कोठून,
करित थैमान,
बुरजाचे वरुनी गेला,
झेंडयाला लागुनि पडला,
ध्वज तेणें खालीं आला,
वस्त्र फाटलें, उडत चाललें, बाजुस पडलें रस्त्याचे,
पेंढाऱ्यांना, पोटभरूंना, मोल काय तें परि त्याचें !

११

'वाडयावरचें, जरिपटक्याचें निशाण पडलें मोडून,'
पुरंधऱ्यांच्या कानीं कोणीं वृत्त घातलें जाऊन;
लगबग वेगें, येउनि अंगें, निशाण नेउनि दादांनीं,
अपुल्या वाडयावरी चढविलें, प्रेमें मस्तकिं त्या धरुनी;
'श्रीमंतांची स्वारी आली पुरंधऱ्यांच्या कोटांत,'
कंडी पिकली, हुल्लड झाली एकचि साऱ्या शहरांत,

सूडाची इच्छा—व्याली,
पुन्हां सळसळली,
डिवचितां उठली,
यशवंतें सोडुनि वाडा,
कोटास घातला वेढा,
मांडिला नवा भंडवडा,
'म्हणे दाखवा, कुठें पेशवा कारण अवघ्या कलहाचें,
समूळ काढूं मूळ उपटुनी निशाण उतरा वाड्याचें !'

१२

होउनि पुढतीं, दादा म्हणती, भलीच केली ही मात,
काय पेशवा, तुझ्या येसबा ! सांग उपजला गोठ्यांत ?
ही बेइज्जत, अशी धन्याची, घालुनि हुज्जत आजवरी,
कोणि न केली; मलुबावाची कुळी उजवली ! बहाद्दरी !
पायीं तोडा, खालीं घोडा, कानिं चौकडा सरदारी,
कृपाबळाचें फळ कोणाचें, लक्ष पोंचवीं मूळघरीं,
कळ धरीं अमळ थोडीशी,
स्मर वांकळ उशी,
घोंगडी तैशी
काळ्याचे ढवळे झाले,
परि असें न कानीं आलें,
डोळ्यां न तसेंही दिसलें,
वाडा सारा, पाड मोड कीं करीं मनाला जसें रुचे,
प्रेत पाडल्यावांचुनि माझें निशाण हातिं न यायाचें !

१३

निधडें माझें, हृदय तुजपुढें, बघ हें उघडें म्यां केलें,
निशाण व्हावें, तरी यामधें खुशाल खुपशी ते भाले;
हात तोडले, पाय मोडले, शीर उडविलें, नाचोनी—
कबंध माझें, धरील ऐसा मार्ग तरीही रोधोनी !
'निज देशाची ध्वजा रक्षितां दादा आला कामास,'
ठेवितील कीं बखरकार ते असाचि माझा इतिहास !

गातील तवहि बडिवार,
भाट शाईर,
लिहुनि अखबार,
कीं, सुभेदार यशवंतें,
जरिपटका काढुनि हातें,
तुडविला सवें पदघातें,
नांव रक्षिलें, असें कुळाचें, व्रत पाळुनि मल्हारायाचें,
करीं त्वरा तर होइं न कातर, घेइं नांव चल देवाचें !

१४

वैर तुझें श्रीमंतांसंगें असे, निशाणासवें नसे,
करिसि अनादर का मग त्याचा ? होईल न का छीथु हंसें?
तुझें न माझें न पेशव्यांचें, एकाचें हें मुळीं नसे,
जो जो कोणी खरा मराठा त्याचें त्याचें परी असे;
मराठियांच्या पाच्छाहीचा देशाचा ध्वज असे तुझ्या,
विडंबितां त्या स्वतां होउनी काय गमावी तुला मजा ?
तूं खरा मराठा अससी,
ना तरी तुजसी,
याच समयासी
गिरफदार सत्वर करुनी,
टाकितों हात छाटोनी,
परि देतों जा सोडोनी,
बांक खालती करीं कुर्निसात पूजन करुनी आणिं त्याचें,
वाजत गाजत बांध नेउनी बुरजावरती वाड्याचे !

१५

मनीं विरमला, झरझर झरला, शब्द ऐकुनी दादांचे,
तळीं उतरुनी, दौलतवरुनी पायिं लागुनी तो त्यांचें,
वदे आणुनी, डोळ्यां पाणी " चुकून घडल्या दोषांचे;
वाइट वाटे, क्षमा करावी, असे लेंकरूं मी तुमचें;
वडील आपण, वडिलांवाणी, अंगें येउनि मजसंगें,
सल्ला मसलत, करुनी खलबत काढा मोडुनि कुल दंगे;

श्रीमंत अमृतरावातें,
आणुनी येथें,
धनी गादीतें,
करुं चला भरवुं दरबार,
उमराव अमिर सरदार,
व्हा तुम्हीच कुलमुखत्यार,
बाजत नेऊं निशाण चढवूं फडकत ठेवूं वाड्याचे,
बुरजावरती, करूं आरती, निववूं डोळे सकलांचे.

---

# वीर विश्वास.

[ चाल—वीर अभिमन्यु... ... ... ]

वीर विश्वास, बालवीर पडला, दुराणी रणीं जयी झाला ! ध्रु०
भाउनीं उठुनी, प्रथम काय केलें, रणाचें शिंग फुंकवीलें,
शिंग होतांच, वीर सिद्ध झाले, रणाया रणनवरे सजले;
घेउनी भाले, भाले सरसरले, धुरंधर योद्धे बिनिवरले,
वीर एकांडे, खंडे धरलेले, छातिचे निधडे रणदुल्हे;
भले झुंजार; निकम, दुधे, काळे, झांबरे, झिंगे, जगदाळे,
बासडीवाले, धनगर किति जमले, मुखानें येळकोट चाले;
मर्द जनकोजी, पाटीलहि आले, विठल शिव विंचुरवाले,
दमाजीबावा, बावा गुरगुरले, गारदी गोल धरुनि चाले;
बावनी पागा, बारगीर जमला, हुजूरांत कडाकाच उडला !
अजब थंडीचा, महिना मकराचा, त्यांतही मुलुख उत्तरेचा;
हस्तिनापुरचा, यमुनातीराचा, भयंकर कुरुरणतीर्थाचा;
थंडि म्हणत्ये मी, कमटा मनुजाचा, वळवुनी द्रोण तसा त्याचा,
करी थरकांप, कांप शरीराचा, बोबडा विलास वाणीचा;

प्रेमझगडा कीं, झगडा मौजेचा, सुखाच्या गुलगुल गोष्टींचा,
वाटतें जणुं कीं, प्रेमळ ओठांचा, रदावलिसह चाले साचा;
सबल दलभार, मर्द मराठ्यांचा, गर्जता सागर शौर्याचा,
एक जीवाचा, अढळ निश्चयाचा, अचल तो पर्वत धैर्याचा;
निशाणाभंवतीं, भंवतिं जमा झाला, हरहर महादेव केला ! २

निघाली सेना, सेना निमिषांत, मुखानें जयगीतें गात,
पवनवेगांत, वेगांत दिमाखांत, थरथरा धरा कांपवीत;
तांबडें फुटुनी, फुटुनी पूर्वेला, उदयाचलीं भानु चढला,
परी एकाकीं, एकाकिं सौख्यझोला, तयाचा, दुर्दैवें तुटला;
होइ वादळ, वादळ पूर्वेला, द्विखंडित दिसे सूर्य झाला,
धुकें पसरोनी, अंधकार पडला, तयें रवि हीनतेज केला;
धुळीचे त्यांत, त्यांत दाट मिनले, उठोनी पर्वत मोठाले,
दिशा कोंदोनी, प्रांत धुंद झाले, दिसेना हाताहीवरलें !
यवनसेनेचा, लोंढाही आला, प्रयागीं संगम जणुं घडला ! ३

बघुनि रिपु सज्ज, सज्ज संगराला, भाउचा कोप उता गेला,
डागल्या तोफा, तोफा जेजाला, कडाबिनि सुतर—हस्त—नाला;
लागलीं वाजूं, वाद्यें एकसरीं, कर्णे पडघम रणभेरी,
नौबती ढक्के, डंके सरदारी, शिंग दे मधेंच ललकारी;
हिंसती घोडे, चीत्कारिति हत्ती, बैलही डरकाळ्या देती,
ससाणे घारी, त्यांत गीध मिळती, घालिती घिरट्या किति वरती;
चढुनि वीरश्री, बाहू फुरफुरले, तटातट बंद सर्व तुटले,
गर्जले योद्धे, त्वेषोद्धत झाले, निनादें अंबर दुमदुमलें;
चढविला हल्ला ! गनिम थक्क केला ! धडाका एक तदा उडला ! ४

भाउविश्वास, वीर चापपाणी, उभयही अंबारिंत बसुनी,
किरण साधोनी, अचूक संधांनीं, झांकिला शत्रु पूर्ण बाणीं;
अजब कौशल्य, " घेती शर कैसा, जोडिती चापीं कधिं तैसा,
दिसेना कोणा, कळे मात्र खासा, विंधुनी रिपु पडतां सहसा; "
इशारा देती, शूर सैनिकांस, चला रे धिरें सावकाश,
भले शाबास, फत्ते आम्हांस, चारिली धूळ गनीमांस;

शोभले भाऊ, भाउ मूर्त काळ, विश्वासराव पार्थबाळ.
उडविती चेंडू, दाविति आभाळ, चिरुनियां शत्रुकंठनाळ;
पुरेना धरणी, धरणी-प्रेतांला, दुराणी मनीं भिउनि गेला ! ५.
हिंदुयवनांचें, तटयुग भंगोनी, भयंकर सरिता त्यांमधुनी—
उष्ण रक्ताची, फूं फूं होवोनी, वाहिली दुथडी तें भरुनी;
हडामांसाचा, मुगा त्यांत मिळुनी, मातला चिखलचि मैदानीं;
शिरें वीरांचीं, पटपट तीं पडुनी, तरंगत जातां तींतोनी—
शोभलीं जणुं कीं, रक्तपंकजांचे, कोंवळे कळे गुलाबांचे,
हस्तपादादी, भाग इंद्रियांचे, नवोनव खंड मृणालांचे;
सुजा उद्दौला, नजिब दुष्ट फार, जींत हे मकर नक्र घोर,
दमाजीबावा, फितुरी मल्हार, भोंवरे घरचे अनिवार;
अशी रणसरिता, तरवे कोणाला, जरी श्रीकृष्ण न साह्याला ? ६.
देउनी रंजूक, रंजुक तोफांला; गारदी दावि अग्निलीला,
करी सरबत्ती, शत्रु लोळवीला, तरी तो पेटे हट्टाला;
उभय पक्षांत, कोणिहि कोणाला, हार त्या जाइ न समयाला,
भानु इतक्यांत, येउनि माथ्याला, जरासा अस्तदिशीं झुकला;
भाउविश्वास, करिति विचाराला, “ जाइ जों सूर्य न अस्ताला,
होउं कांहींही, अजि या घटिकेला, पाहिजे सोक्षमोक्ष केला;
मरूं मारूं कीं, निश्चय हा झाला, रिकामे जाउं न शिबिराला,
खंदकीं कुजुनी, कुजुनि मरायाला, मराठा जन्मा नच आला ”
करुनि मनसोबा, बाळ तळीं आला, भाउंही अनुसरले त्याला ! ७.
आणुनी घोडे, चंचल बजरंग, शिकंदर लंगर सारंग,
जाहले स्वार, मारुनियां टांग, स्मरोनी मनीं रमारंग;
मारुनी टांच, घोडे उडवीले, धुमाळी जिथें ऐन चाले,
पाहुनी खासे, खासे आलेले, सैन्यही ईर्ष्येला चढले;
पाडिला बंद, बंद तोफखाना, शत्रुचा मारुनि कैकांना,
पुत्र वजिराचा, पडला लढतांना, जाहला हर्ष मराठ्यांना;
परी नशिबानें, ऐशा समयाला, सुखाचा विरस पूर्ण केला,
सुधेचा घोट, जों न ओंठिं नेला, पाडिला झडपुनि धरणीला;
भला जंबूरी, गोळा जों सुटला, चाटुनी विश्वासा गेला ! ८

" बाळ विश्वास, रणीं हाय ! पडला, " वृत्त हें कळतां भाऊला,
फोडिला टाहो, योद्धा गडबडला, लाविलें बोट अदृष्टाला;
त्यजुनि अवसान, धूळ शिरीं भरली, झराझर झरले असु गालीं,
म्हणे " भगवंता, तुज न दया आली, दगा हा दिला ऐन वेळीं;
कसें हें कृष्ण, कृष्ण वदन नेऊं, कसें हें नानांला दावूं !
केविं लक्ष्मीला, लक्ष्मीला पाहूं, दाष्टिला दृष्टि कशी देऊं ?
' बाळ विश्वास, का न अजुनि आला ? ' प्रश्नि या काय उत्तराला–
देउं मी सांग, सांग पार्वतीला, दुर्विधी कळसाला गेला;
कुठें तो देव, देव गुप्त झाला, सितारा हिंदूंचा पडला ! ९
बाजुंनीं साऱ्या, साऱ्या आभाळ, फ़ाटलें देउं कुठें ठिगळ,
करिल मज कोण, कोण आजिं जवळ, कोपला जरी जगत्पाळ;
कठिण समयाला, कोणि न कोणाचें, अनुभवी वदती जन वाचे,
कशाचा धर्म, आणि दैव कैचें, बळ जरी नसे मनगटाचें;
स्वतां जे कोणी, करिति विक्रमास देवही देति हात त्यांस,
रडत मी बसुनी, काय मिळायास, किड्यापरि मरणें नशिबास;
व्हायचें झालें, आतां काशाची, वाट रे मना पहायाची ?
करुनि चल शर्थ, शर्थ लढाईची, पाडु त्या आहुति खाशाची !
घालिती हात, भाउ अनीनीला, बसे तों टाप अंबराला ! १०

---

# जावळीचा पोंवाडा.

खुलासाः—जावळीच्या या महत्त्वाच्या राजकारणानें श्रीशिवाजी महाराजांच्या कारकीर्दीची तीन वर्षें व्यापिलीं आहेत. तें इ० सन १६५२ त सुरू होऊन १६५५ त शेवटास गेलें. महाराजांच्या उपक्रमास अडथळा करणारे असे जे कोणी डोईजड मराठे सरदार होते, त्यांचा बंदोबस्त करणें त्यांस भाग पडलें. या सर्वांत जावळीचे मोरे हे विशेष मातबर होते. इ० सन १६५२ पूर्वी मोरे व महाराज यांजमध्यें बराच घरोबा होता. परस्परांचे

जासूद व कारकून परस्परांकडे जात येत असत. परंतु इ० सन १६५२ त बिजापूरकरांनीं बंडखोर ठरविलेल्या शिवाजी महाराजांचा बंदोबस्त करण्यासाठीं 'बाजी श्यामजी' नामक एका सरदारास पाठविलें. बाजीनें मोऱ्यांच्या मदतीनें शिवाजी महाराजास पकडण्याची तयारी केली होती परंतु त्यांस यश आलें नाहीं. मोरे यांच्या मदतीनें तो महाराजांचे हातून निसटला ! यामुळें महाराजांचे मनांत मोऱ्यांविषयीं वांकडें आलें. जावळीचें राज्य महाराजांनीं कावीज केलेल्या प्रदेशांस लागून होतें. ह्या मराठे सरदारास अनुकूल करून घ्यावें अशी महाराजांची फार इच्छा होती; परंतु सामोपचारानें तो विजापुरकरांस सोडीना. त्यांजबरोबर उघड लढाई करण्याचें सामर्थ्य महाराजांत या वेळीं नव्हतें. मोरे यांस तसेंच शिरजोर राहूं दिलें असतां महाराजांनीं हातीं घेतलेलें कार्य तडीस जाणें शक्य नव्हतें; तेव्हां कांहींतरी युक्ति योजून त्यांस आपल्या कह्यांत आणण्याचा विचार त्यांनीं ठरविला. या ठरल्या विचाराचा उच्चार करून त्यांनीं तो आचारांत कसा आणिला हें प्रस्तुत पोंवाड्यांत वर्णिलें आहे.

( चाल:— पोंवाड्याची. )

१

स्वतंत्रतेच्या वेदीवरती करूं स्वयंवर थाटांत,
परदास्याच्या लाजा होमूं सात पावली तोऱ्यांत ॥ ध्रु० ॥
धन्यधन्य रणनीतिधुरंधर नशिबशिकंदर शिवसरजा,
नांव ऐकतां अलमगिराच्या पडती गमजा सर्व वजा
विजापूरच्या फुगीर फौजा विसरुनि मौजा दाहि दिशा,
दरिखोऱ्यांनीं दडती पडती करित चालती उठाबशा;
गोवळकोंडा छातिंत धोंडा हाणित तोंडा घेइ उणें,
गाळित बोंडें घोळित गोंडे करुनि इतल्ला; ' सबुर ' म्हणे,
शिवराज राजाधिराज,
गरिबनवाज,
शूरशिरताज,
श्रीभवानिमानसहंस,
साक्षात शंभुचा अंश,
भोसले धन्यकुलवंश,

केले रक्षण गायी ब्राह्मण, पदीं शरण त्या सौख्यांत--
सदा ठेविलें, खळां दंडिलें कधिं न पाहतां कुलजात !

२

पुंड शिवाजी बंड भंड करि दंड कराया तया पहा,
बाजि श्यामजी धाडि तातडी विजापुरीचा बादशहा;
हिंदुस्थानी हिंदू मालक बंड ठरविलें परि त्यासी,
परके आले मालक झाले पहा मिजाशी तरी कशी !
धनी उपाशी चोर तुपाशीं जेवित बैसे पहा कसा !
धन्या धत्तुरा मलिदा चोरा ! देवाघरचा न्याय असा !
सरदार बाजि बेगेशीं,
पारघाटाशीं,
ठरवि मोऱ्यांशीं,
वाघूटाचें हें पोर,
तयास दावूं विजापुर,
घालुनि पट्टा, घरोघर--
चला हिंडवूं धिंड काढवूं रस्तोरस्तीं शहरांत,
पोरें सोरें बिब्बी बाया बघतिल बसुनी झरुक्यांत !

३

वृत्त ऐकतां बोले शिवबा तिळ तिळ तुटतें मन माझें,
न कळे ज्या मी माझें म्हणतों शरीर तरि कां तें माझें ?
अमुचें अमुचें म्हणुं ज्या साचे उगीच कांटे कवटाळूं,
लोण्यासाठीं मुडद्याचीही चाटित बसातिल ते टाळूं !
धातुंत कांसें, खेचर जैसें पशूंत, तैसें मनुजांत,
अक्करमासे बांडगूळसे भिन्नचि भासे ही जात !
तांतडी करुनि बदमाश
पाजि बाजीस,
मिळवुं मातीस,
मोऱ्यांचाही तो मोर,
पहात बैसे लांडोर,
दावुं तयाही निळें घर,

त्याच पावलीं चढवुनि हल्ला बाजि रेटिला घाटांत,
परि मोऱ्यांनीं पाक्षि पळविला तुरी देउनी हातांत !

४

सावज धरिलें परी निसटलें; फिसाद केला मोऱ्यांनीं,
नवल कशाचें कसाबासची गाय अखेरिस धारजिणी !
ना जातीचा ना गोताचा विजापूरचा बादशहा,
मोऱ्यालागुनि माझ्याहूनी काय गमावा आप्त महा ?
वेड म्हणूं कीं, तेढ गणूं कीं, कीं हें मानूं अज्ञान,
मानूं किंवा हा घरबुडवा नागवणा कीं अभिमान !
मोऱ्यांची घडतां हानि,
डोळियां पाणी,
याच येवोनी,
पिळवटेल माझें चित्त,
माझेंच उसळुनी रक्त,
हरपेल जेविं शमवित्त,
इमामदांडग्या दुष्ट भांडग्या तया नोडग्या—हृदयांत,
मायेचा का पाझर फुटुनी अभयाचा हो धरि हात ?

५

खोट्यासंगें खरें वागणें हा न जगाचा व्यवहार,
कपट्यासंगें कपटनीतिचा डाव टाकणें यशस्कर;
तरवारीची मूठ मुठिंत या दर्भाची ना मूठ असे,
अक्षस्मरणी करीं न धरिली, अक्ष नीतिचा नाचतसे !
बळी निर्बळी एका काळीं समानबळ कीं दोन बळी,
एका ठायीं क्षम न राहणें, एका जाणें प्राप्त बळी !
नातरी एकमेकांस,
अंग अंगास,
चिटुनि समयास,
आगीची ठिणगी उडुन
आंतले आंत धुमसून,
भेदुनियां ज्वाळा गगन,

एकाचि सारा डोंब होउनी खाक सकलही कुलजात,
रक्षा भाळीं लावूं म्हणतां तीहि न येणें हातांत !

६

चंद्रशिवांतुनि एके कोणी गेल्यावांचुनि, एकानें,
आस न करणें शांतिसुखाची लिहुनि ठेविलें ब्रम्ह्यानें;
साम करोनी दाम वेंचुनी साम न घडणें मोऱ्यांशीं,
दंडावांचुनि उपाय दुसरा सुचे न मज या समयासी !
परी न शक्ती अंगीं इतुकी यास्तव युक्ती योजोनी,
लग्ननिमित्तें रिघोनि परतें, बघूं जावळी भेदोनी;
रघुनाथ बल्लाळातें,
संभाजीतें,
त्याच समयातें,
बाहुनियां कामावरती,
धाडिली बोधुनी नीती,
या फत्ते मारुनि वदती,
दिला लखोटा—मऊ चपेटा—मढवुनि गोटा सोन्यांत,
नव्हे जंबिया रत्नखचित कीं झळक सुवर्णी कोशांत !

७

काय गहजरी गहिरी जहरी रायें दिधली झणझणित,
पत्रिं अक्षरें सरलाकारें ? नव्हे निखारे जळजळित !
शहा मुस्तफद तुम्ही म्हणवितां राजे आम्ही खरे असूं,
श्रीशंभूनें दिलें अह्मांला राज्य सर्व हें तसु न् तसू !
तरि यापुढतीं तुह्मी आपणां राजे म्हणवुनि घेउं नये,
बरी न गुर्मी, आणिल वर्मी, मारिल मर्मी बडिल वयें;
मुंगी होउनि साखर खावी, करा नौकरी हामरहा,
होउनि हत्ती करितां मस्ती गिरेल पंक्ती स्वस्थ रहा !
यावरी करुनि बदफैल
सुटोनी सैल,
फंद मांडाल,

एकाचि सारा डौंब होउनी खाक सकलही कुलजात,
रक्षा भाळीं लावूं म्हणतां तीहि न येणें हातांत !

६

चंद्रशिवांतुनि एके कोणी गेल्यावांचुनि, एकानें,
आस न करणें शांतिसुखाची लिहुनि ठेविलें ब्रम्ह्यानें;
साम करोनी दाम वेंचुनी साम न घडणें मोऱ्यांशीं,
दंडावांचुनि उपाय दुसरा सुचे न मज या समयासी !
परी न शक्ती अंगीं इतुकी यास्तव युक्ती योजोनी,
लग्ननिमित्तें रिघोनि परतें, बधूं जावळी भेदोनी;
रघुनाथ बल्लाळातें,
संभाजीतें,
त्याच समयातें,
बाहुनियां कामावरती,
धाडिली बोधुनी नीती,
या फत्ते मारुनि वदती,
दिला लखोटा—मऊ चपेटा—मढवुनि गोटा सोन्यांत,
नव्हे जंबिया रत्नखचित कीं झळक सुवर्णी कोशांत !

७

काय गहजरी गहिरी जहरी रायें दिधली झणझणित,
पत्रिं अक्षरें सरलाकारें ? नव्हे निखारे जळजळित !
शहा मुस्तफद तुम्ही म्हणवितां राजे आम्ही खरे असूं,
श्रीशंभूनें दिलें अह्मांला राज्य सर्व हें तसु न् तसू !
तरि यापुढतीं तुह्मी आपणां राजे म्हणवुनि घेउं नये,
बरी न गुर्मी, आणिल वर्मी, मारिल मर्मी बडिल वयें;
मुंगी होउनि साखर खावी, करा नौकरी हामरहा,
होउनि हत्ती करितां मस्ती गिरेल पंक्ती स्वस्थ रहा !
यावरी करुनि बदफैल
सुटोनी सैल,
फंद मांडाल,

जावळी सगट मारून,
कैदेंत ठेवुं डांबून,
राहणें याद राखून,
म्हणूं न हिंदू चेंदूमेंदू झोकूं चेंडू गगनांत,
दिली इशारत गणा न दहशत ठेवा पक्कें ध्यानांत !

८

आम्ही तुम्ही एक जातिनें वैर टाळणें सुज्ञपणें,
शहा न तुमच्या गणगोताचा काय वदावें म्यां सानें ?
जुना पुराणा स्नेह वाढवूं करोनि बेटीव्यवहार,
दिल्यास मुलगी होइल सलगी, घेउं न आम्ही माघार !
सुमंत अमुचे राघव शास्त्री संभाजी हे सरदार,
करा बोलणें असेल करणें समजुनि त्या कुलमुखत्यार;
करुनियां जिवाचा धडा,
करा उलगडा,
साखरपुडा,
होउं द्या पाहुनी मूर्त,
द्या सुपारि तूर्तातूर्त,
तुम्हि सारे जाणा धूर्त,
जाब उत्तरीं सुपूर्त करणें होइल गुजरण हुजुरांत,
नीट हुशारी धरुनि अंतरीं करा मनसुबा खोलांत !

९

पत्रें मोरे मनीं खोंचले दिसूं न दिधलें परि कांहीं,
मानमरातब केला आतब म्हणुनि सोयरे ' ईयाही ';
जाब देउनी दूत धाडिला गुप्तपणानें शिवबास,
शहा मुस्तफद घरीं म्हटलिया कोण आणितें ध्यानास ?
राजे तुम्ही असा कालचे दिलें तुम्हांला राज्य कुणीं ?
दाइमदारी दरपिढि आम्ही राज्य करितसूं गोष्ट जुनी !
अमुचा राजा ममलेसर,
त्याचे चाकर,
असूं खरोखर,

जोंवरि पाखर शिरिं त्याची,
भीती आम्हां कवणाची,
क्षिती न गरुडा चिलटाची,
' येतां जावळि जातां गोवाळें ' माणुस येथुनि जीवंत,
जाणें सुटुनी गोष्ट कशाला ख्याल करा हा चित्तांत !

१०

उद्यां कशाला आजचि यावें असला कांहीं पुरुषार्थ,
लंब्या चवड्या कशास बाता करा जिवाची या शर्थ;
बेजाबातें खतें घालुनी कशास लिहिलें अर्बूद,
समर्थ आम्ही असो पुरोपुर दारू गोळा महझूद !
उपाय करितां अपाय होइल यश नच येइल सांभाळा,
अपेश माथां; घालुं पाहतां काय गवसणी आभाळा !
मुलूख वरकड असे तुम्हांस,
जरी खमखास;
जरी कावास

खाइत शिरता सिंहाचे,
हाल कोंवळ्या देहाचें,
करुनि घेतसा हे साचे,
पायापुरतें केवळ पाहुनि जीव न घाला धोक्यांत,
तेंच तेंच तें काय लिहावें नका पडूं या फंदांत !

११

इकडे ऐसें लिखित लिहोनी तिकडे कावा दुसराच,
वकिलासंगें असे मांडिला निमित्त करुनी लग्नाचं;
अंदण द्यावें काय जावया कितीक बस्ता लागेल,
शोभा देइल उभय कुलांना तें तें सारें करिजेल;
याद्या लिहुनी करा टिप्पणें कांहिं न ठेवा वगळून,
पाहिलें वहिलें कार्य आमुचें कुठें नसावें हो न्यून,
पेरिली अशी साखर,
उरीं परी जहर,
कशी ही कदर,

हेतु यांत होता [ ऐसा ] खास,
कीं वकिलासरदारांस
घालुनी गळां सरफास,
संधि साधुनी कैद करोनी ठेवावें त्या ओलींत,
परि ते नव्हते साधे सीधे ठका महाठक निष्णात !

१२

संभाजीनें युक्तियुक्तिनें रिघोनि रिपुचे पोटांत,
"गोड बोलुनी ठाव घेतला दगड फेकुनी पाण्यांत,
मोऱ्यांचे ते घुगऱ्या खाउनि वरी वारसें जेवोनी,
बसले होते ख्यालिखुशालिंत सात ढेकरा देवोनी,
त्या प्रांताची तशि मोऱ्यांची सर्वेचि त्यांच्या लोकांची,
सर्व माहिती करुनि घेतली काय शिताफी ही त्यांची ?
कैफबाज मोरे तुस्त,
भाषणीं मस्त,
लोक बेशिस्त,
पाहुनी स्थिती ही अशी,
मनसुबा करुनि मानसीं,
योजिला बेत राक्षसी,
'लग्ननिमित्तें घाट घालुनी करीत असतां एकान्त,
संधि साधुनी करामतीनें करूं सुपारी देहान्त !'

१३

दूताहातीं शिवरायातें लिहुनि कळवुनी हें गुपित,
सवें विनविलें सैन्य घेउनी जवळ रहाया साह्यार्थ !
संकटिं पडला चक्रवाक तो विवळत वणवण वनिं फिरतां
उडी घालितो जैसा वाट न शरणागतिची रवि बघतां,
शिवरायांचा प्रताप अद्भुत दासा पडतां जडभारी,
शस्त्र उपसुनी सज्ज होउनी तेथ उभी त्यांची स्वारी !
वीस शंभरा हशम नवे,
फाकड्यासवें,
धाडिले जवें,

जावळी अवघट वाट,
जाळिया कळकिच्या दाट,
दरियाचा निसणी घाट,
उतरुनि वेगें; महाबळेश्वर दैवत मोऱ्यांचें शांत,
भावें वंदुनि दडी घेतली तडक जावळीखोऱ्यांत !

१४

चिलखत अंगें अंगिं चढवुनी सिद्ध होउनी शस्त्रास्त्रीं,
शिवरायांचा महा धोरणी राघव शास्त्री कीं शस्त्री—
करावयाला मसलत आला मोरे यांचे सदरेला,
संकेतापरि संभाजीसह कृष्ण अष्टमी रात्रीला;
मोरेबंधू मानसिंधु कीं कृष्णाजी नी बाजि असे,
जनां भासती चंद्रसूर्यसे म्हणुनी म्हणती त्यांस तसे !
रायांपुढतीं शास्त्रिबुवा,
डोंगरी चुव्वा,
( कीं ) कपटीकव्वा.
नम्रपणानें येऊन,
आशीर्वादें गौरवुन,
ठाण बैसलें मांडून,
तों रायांच्या डौरावरती संभाजीनें निमिषांत,
ठाण घेतलें न कळ योजुनि काय आपुल्या चित्तांत !

१५

शास्त्रिबुवांनीं बुद्धिबळांनीं जोरावरती मोऱ्यांचें,
पुढें सारिलें शहाजोगिनें हळूच प्यादें लग्नाचें !
" खडकावरच्या कुळवंताला लेक आमुची देऊन,
काय सांगता घ्यावा आम्हीं पदर हीन हो लावून ? "
बोलुनि ऐसें चंद्रराव जों अहंपणाच्या हत्तीचे—
पायीं घाली प्यादें अमुच्या शास्त्रिबुवांच्या हिकमतिचें;
अपमानाची तों ठिणगी,—
मान्यता जिनगी,
दारुची कणगी,

पडोनि तीवर ती कवळी,
आपुलकीचा नाग बळी,
फूं फूं करीत घे उसळी,
भेट होइ जों ' अगिन इखाची ' काय सांगिजे ती मात,
भडका झाला पट्टा चढला सळसळ सपकन हातांत !

१६

घाव निशाणी वेगें बसुनी सूर्याबाचे डोक्यांत,
चिरी कोथळा जाय अडकला परी नाभिंच्या भोऱ्यांत,
जसा द्वापरीं जरासंध तो उभा चिरोनी दो खापा,
भीमें केल्या करी शास्त्रिही घालुनि अवचट हा छापा,
संभाजीची गुप्ती तिकडे तों चंद्राचे पाठींत,
भसकन शिरुनी पुढें निघाली पोट फोडुनी झटक्यांत !
प्रेतें मोऱ्यांचीं ऐशीं,
जों न धरणीशीं,
गळति त्यासरशीं,
एकचि अकांत होऊन,
मिळेल जें तें घेऊन,
लोक निघाले धांवून,
तों शास्त्र्यांनीं पाय काढिला पळता तेथुनि वेगांत,
स्वतंत्रतेला घेउनि संगें शिवरायांच्या गोटांत !

१७

सुरराबांनीं तोंच जावळीवरतीं हल्ला चढवून,
एकचि भीषण गिल्ला केला हाणा मारा गर्जून,
मोऱ्यांचेही लोक धांवले हनुमंत्यांला करुनि पुढें,
नेत्याभावीं वीरांचेही प्रयत्न पडती परी फुडें !
एक धुमाळी झाली तेव्हां कोण ओळखी कोणाला,
झुंजु लागतां बाप म्हणेना बेटा अपुल्या लेकाला,
मोऱ्यांचे सदरेवरतीं,
असा या रीति,
पाट वाहती,

झाली एकाचि घे मार,
हार खाउनी माघार,
घेइ न कोणी साचार,
वार लागुनी हनुमंते परि शेवटच्या या चकमकिंत,
पडले खालीं, तशी ध्वजाही मोडुनि तोडुनि धूळींत !

१८

जातां वार्ता राणिवशामधिं सुरू जाहली रडारड,
धूळ भरोनी तोंडामाजीं फोडिति डोकीं तडातड !
चिमणीवाणी तोंडें करुनी बाळें सारीं भराभरा,
कुशींत शिरुनी मातांच्या तीं टकमक बघती परस्परां,
' का गे ललशी आई ऐशी ! बाबा बोले काय तुला ?
उन्हांत बांधूं घल चल त्याचें घलीं न घेऊं या त्याला !'
एक त्यांतली वेल्हाळा,
राजसबाळा,
बिलगुनी गळां,
बोलत असतां मातेला,
शिवसरजा त्या समयाला,
अवचित ठायीं त्या आला,
बालभाषितें पाझर फुटला कळवळुनी तैं हृदयांत,
गळा दाटला, गहिंवर आला, धरिला शेला तोंडांत !

१९

राघवपंता वदे दयाघन वैर आमुचें मोऱ्यांशीं—
होतें उगवुनि अम्हीं घेतलें; नसे तयांच्या बायांशीं;
अमुच्या त्यांच्या लेकीबाळी नसति वांटल्या जाणावें,
इनमामानें तयां वागवा म्हणतिल तें तैं त्या द्यावें
मेल्यावरतीं वैर कशाचें ? द्या प्रेतांना संस्कार—
राजालागीं शोभे ऐसा नको सांगणें मी फार !
पुराण जागा पहा कशी,
जावळि खाशी,
जिंतुनी अशी,

शिवरायानें सर केली,
स्वराज्यमेढा रोंवियली,
तीच कथा ही गोड भली,
अनंततनयें रचुनि पवाडा गुंफन केली कवनांत,
मर्दा, भारत तरुण, ऐकवी शुभदिनिं मधुरालापांत !

---

# तरंग ५ वा.

## मार्जारस्वामी साधुराम

[ आर्या—गीति. ]

रानदांडगा कोणी परस्थ बोका कषाय वर्णाचा,
शिरतां प्रभातिं दिसला मत्सदनीं ' साधुराम ' नांवाचा. १
माजघरीं अंधारीं बैसे तो आसनस्थ होवोनी.
डोळे दोन्ही मिटुनी नासाग्रीं सूक्ष्म दृष्टि लावोनी. २
झरझर इकडुनि तिकडे तिकडुनि इकडे उगाच पळतांना,
मृदुमांसकवलमूषक दिसला त्या स्वामि ' साधुरामां ' ना. ३
गुरु गुरु करुनी स्वामी वदले होतां समाधिचा भंग,
थोपटुनी त्या मूषा ' होसि असा कैंवि सांग निस्संग ? ' ४
' उभयहि आतां आपण जाऊं या न्यायमंदिरामाजीं,
दावा दाखल करणें प्राप्त घडे मज तुझ्यावरी आजी ! ५
नाहीं होय म्हणोनी गयावया बहु करोनि अथवा कीं,
चालायचें न कांहीं, दावा झालाचि पाहिजे बाकी ! ६
कारण पाहीं आतां नुरलें कांहींच कामकाज मला,
श्रांता विरंगुळ्याला धंदा संमान्य एक हा असला ! ' ७
मूषक वदे ' महाशय ! ज्यूरीजज्जांशिवाय इनसाफ,
देणें स्वयेंचि म्हणजे तोंडाची व्यर्थ दवडिणें वाफ ! ' ८

मार्जार स्वामी तैं वदती त्या मूषकासि हासून,
' हां हां नको गडबडूं चित्तीं ऐसा हताश होऊन ! ९
चिंता न करीं वेड्या माझी दृष्टी सदैव अवदानीं,
होतों वकील तव मी मति माझी पटु अनेक अवधानीं. १०
धीर न टाकीं सखया ! चल मी तव सर्व काळजी वाहें,
रिपुवचही पारसावें हितद जरी योग्य सर्व जीवां हें ! ११
होतों अमीन चल मी किंवा मी न्यायशास्त्रिही होतों,
निःस्पृहतेची ग्वाही भगवा वेषचि मदीय हा देतो ! १२
ज्यूरिच जरी हवी तुज कार्य तिचेंही करीन मी सारें,
सत्ता एकमुखी कीं फार बरी दशमुखीहुनी बा रे ! १३
चल तूं मात्र कचेरिंत तुजसाठीं पुढिल सर्व मी करितों,
दावा चालवितों मी, शिक्षा मी फाशिची तुला देतों ! ' १४

---

## —तयाला भव स्वर्ग झाला !

[ चालः—गुरु दत्त दिगंबर... ]

जो नर हरिभजनीं रतला । तयाला भव स्वर्ग झाला ध्रु०
खातों, पितों, मुदें विहरतों, पूर्ण सुखीं मी झुलतों;
संसृति विषमय गमो परां, मी स्वर्गसुखाला लुटतों.
विदेहभूपति तेजोमूर्ति न्यून काय त्या होतें ?
आदिशक्ति ती कन्या, जांवइ पूर्णब्रह्मचि हो तें.
जितेंद्रिया त्या वाण न कसली सकल पृथ्विचे पाठीं,
तरीहि लक्षी जसा हरी तो तशिच दुधाची वाटी !
जशी प्रपंचीं तशि परमार्थीं समान ज्याची दृष्टि,
भला भला नर तोचि, तया नच व्हावें लागे कष्टी.

---

## नववत्सरास—

[ वृत्त—पृथ्वी ]

समर्थ हरि माधवें विगतवत्सरा वर्णिलें,
म्हणोनि सुहृदुत्तमें मजसि आजि आज्ञापिलें—
नवाब्दफल गावया, तव पुढ्यांत रत्नावली !
‘ वियद्गणितवित् ’ परी पदवि म्यां न संपादली ! १

तुझ्या जनकहेतुची मजकडोनि संपूर्ति ती,
कळे न घडणें कशी विमति मी न वाचस्पति;
न तर्क पढलों न वा श्रुति पिशाच्चिका साधली,
न वा करुनि घेतला वश निगूढ पातञ्जलि! २

कुठोनि करुं मोजणी मज तदादि ना सांपडे,
तदन्तहि न वा दिसे कठिण हें गडे सांकडें !
कथी हरि धनंजयाप्रति रणांत कीं ‘ काल मी
न भीति धरितां मनीं निरत हो स्वकार्योद्यमीं ! ’ ३

असा बघ असे स्वयें विकट काल हा ईश्वर,
कसा मजसि आकळे मतिविहीन मी पामर,
कुठें प्रबल काल तो अबल दीन मी गे कुठें ?
कुठें गिरि हिमाद्रि तो प्रतिअणू तसा मी कुठें ! ४

‘ प्रयत्न करुनी पहा ’ म्हणसि का ? मला पावलें
कसा कुठुनि आणि तो परि तुवां न हें बोधिलें !
‘ विभूति मृगशीर्ष ही मम ’ असे वदे श्रीपति,
करूं गणन तेथुनी तरि न रूढ तें संप्रति. ५

नवाब्ददिन सृष्टिचा घडतसे वसंतागमीं,
कृषीवल विलेखिती सजलनीलमेघागमीं;
स्वभावज वणिक् तसे गणिति कार्तिकापासुनी,
जयितृ नृप आरुढे दिवसिं ज्या स्वसिंहासनीं ! ६

मिळे जठरपूर्तिला उचित तेंचि ज्या शिक्षण,
मनोविकसनार्थ गे घडतसे न विद्यार्जन.

नव प्रतिपदा तया मधुर बालकांची गडे !
मनोज्ञ मधुमाधवीं क्वचित फाल्गुनीं वा घडे ! ७
असंख्य जन जे परी असती सर्वसाधारण,
नवाब्दि विगताब्दि कीं गमतसे तयां भेद न;
समान सगळे तया नच कुठेंहि ऊनाधिक
न काल उपवासि ते न मिळणें उद्यां मोदक ! ८
विशण्णमन काल जे न विभवाचलीं वेंघले,
तसे दडपिले जयां दडपिलेच ते राहिले;
अनेकविध गांजले दिसति ते जसेचे तसे,
व्यथा विगतवर्षिंच्या नच नवाब्द वारीतसे ! ९
समुद्रिं जलवीचिका कुठुनि पावती उद्गम,
कुठें विलय पावती नच कळे पडे संभ्रम;
तशींच घटिका पळें दिवस मास कालार्णवीं,
कशीं उगवती कशीं निखळती मना गुंगवी ! १०
म्हणोनि घटिवीचिका जंव न सिंधुकालोदरीं—
विलीन अनुभाव्य कीं नयनगम्य मध्यंतरीं,
तदर्थ सुखदुःख वा भयविषाद संपादणें,
गमें विहित मात्र तें परि न भाकितें भाकणें. ११
समुत्कट मनें सदा नविन वत्सरा गायिलें,
समोद अभिवादिलें शुभसुखार्थ आशंसिलें.
न दुःख टळलें न वा सुख विशेष कीं लाधलें,
चुकूनहि तसें कधीं नियत जें न तें भंगलें ! १२
असत्यमय भावना धरुनि वाउग्या मी मनीं,
असत्य अभिनंदनें करुं कशास संमोहुनी ?
वृथा मधुर लाघवी वदुनि भाकितें भाषणें,
स्वयें फसुनि का बरें वद खरें परां वंचणें ? १३

---

# विनोदलहरी.

[ वसंततिलका ]

‘ आले न आज सहसा जरि बापटिस्टा
त्याची गमे न मजला बहुशी प्रतिष्ठा!
आम्ही इथें उभयतां असल्यावरी ते
चिंता कळे न अपुली मति का वरीते ? १
आतां असा उगिच काळ न घालवावा
आरंभ कीं हळुहळू गमतें करावा; ’
गोविंदराव वदुनी वच हें उदात्त
जों लागती धडपडूं नयमंदिरांत— २
मुद्रा गभीर करुनी तंइ लोकमान्य
त्यांना ‘ प्रमाण ’ वदले, ‘ नच हें अमान्य !
शंका अकारण फुका मनिं जी उदेली
ती पाहिजे प्रथमतां तुम्हिं दूर केली ! ३
उद्वाहयोग्य तरुणी चवदा वयाची
तेजस्विनी असिलता जणु मन्मथाची !
आहे वयें विशिमधें असला कुमार
होईल योग्य गमतें तिजला भ्रतार ! ४
दैवें परंतु जरि त्या नव बालिकेला
ऐसा पती न समजा उपलब्ध झाला—
बाळें वयें असति जीं दहादहांचीं
केलीं उभीं तिजपुढें जरि दोन सार्चीं-- ५
चालेल काय ?—करुनी सुविचार याचा
संदेह या निववि़जे म्हणिं बाळकाचा ’
ही वाग् विनोदनपरा उपरोधि कीं ते—
येतां मनीं अजुनही मज हांसवीते ! ६

## खादी

**खुलासाः**—एके दिवशीं सहज फिरत असतां एका दुकानावर ‘ खादीची पाटी·’ लाविलेली पाहिली. ती वाचतांना ‘ खादीचे ’ ऐवजीं ‘र वादी’ असा शब्द वाचला व ‘ खादी ’ कीं ‘ र वादी ’ असें विचारपरिभ्रमण सुरू झालें; त्याचा जो निष्कर्ष निघाला तीच ही प्रस्तुत कविता होय.

[ पृथ्वी ]

र वादि नव रूप हें पदपदार्थ खादी यदा
पथीं सहज वाचिलें मज न बोध झाला तदा
क्षणैक मति गुंगली; परि सर्वेचि मोदा वरी
प्रतीत घडला न जो मज तदर्थ चित्तांतरीं १

पवित्र शुचि रम्य ती सित सबाह्य–अभ्यंतर
सगौर तनु कर्पुरासम खाळ चेतोहर
तिचीच परिधानि जो विमल अंशुकें सुंदर
स्वतांविषयिं वाढवी जनसुलोचनीं आदर २

र वादि घृत शर्करा सपरिमाण एकत्रिता
करोनि मित सेवितां सुलभ सेवित्या पुष्टता
मिळे नयनरम्यसें प्रथम त्या तनुस्वास्थ्य तें
तदीय नत वृत्तिही सबल शांतता लाधतें ३

र वादि मधुरान्न दे तनुस पुष्टताशोभन
तसें वसन भूषवी करुनि देहसंगोपन
द्विलाभ घडती असे तिजमुळें जनां आगळे
परंतु नुतरे गळीं; नच सुमार्गिं दृष्टी वळे ४

परी प्रतिपदार्थ तो द्विविध भाव दावी जनीं
तिलाचि अपवादिता मग मिळे बरें कोठुनी
सजिव कुलजात हें निपजवी जसें अन्न तें
लयाप्रतिहि तेविं तें सकल वस्तुंना लावितें ! ५

जलांत बगळा जसा धुवट सोंवळा निर्मळ
स्वनेत्र मिटुनी जणों तप करी दिसे सोज्ज्वळ;
स्थिती न अशि ही खरी अनुभवा जनीं येतसे
तसे धवल जे वरी असति आंतुनी काकसे ! ६

वरोनि दिसतें जसें नच तसें असे आंतुनी
जनीं नियम हा असा क्वचित बाध त्यालागुनी.
गुणत्रितय एक हे उचित वाटतें साधन
स्वभावगुण वस्तुचे विदित व्हावया; अन्य न. ७
न दोष परि हा तिला, उपजतांचि ती सात्त्विक
कलंक तिज लाविती कपटबुद्धि जे दांभिक
करांमधुनि त्यांचिया तिजसि सोडवीणें जरी
सुदर्शन धरी करीं शरण जा तया सत्वरीं ! ८

* * *

## [ भुजंगप्रयात. ]

ख वादीच खादी असे ती स्वभावें
महाराष्ट्रिंचा हा खरा अर्थ भावें
‘ दिसे खादिचें हें शरीर स्वभावें ’
असे बोल ते याच अर्थीं म्हणावे. ९
“ सदन्नें खादीच सेवा पवित्र
कमावा शरीरास आधीं सुयंत्र
सुखें ऐहिकें मेळवा आत्मतंत्रें
तुम्हां साध्य निःशंक तेणें परत्रें १०
जरी भोग ना शक्य तो त्याग नाहीं
जरी शक्ति ना कर्म होणें न कांहीं.
तनूचे अभावीं न जीवासि थार,
करावा मनीं सूक्ष्म याचा विचार ११
ख वा तो अणू कीं अणू तो खाही,
असे शब्द दोन्हीहि एकार्थवाही
अणूनेंच हो विश्व हें संप्रतिष्ठ
कणादीय हें तत्त्व ऐसें विशिष्ट १२
अणूनें जसें विश्व जन्मास आलें
अणूला अणू लागुनी थोर झालें
शिगेला अणू जो चढे येइ खालीं
तशी सृष्टि अंतीं अणू-लीन होई १३

युगेंचीं युगें कैक कोट्यानुकोटी,
अशी सृष्टिची चालली ही रहाटी
भ्रमे चक्रशी ती; अवष्टंभ नाहीं
मुळारंभहेतू र वा तो पुन्हांही १४

मधूचा जसा मक्षिका बिंदुबिंदू
करोनी भरी पुष्पपीयूषसिंधू
जसा विद्रुमाचा कृमी वा विशेषें
महाद्वीपचे द्वीप निर्मी प्रकर्षें १५

अणू तोचि सांख्याख्य योग प्रसिद्ध
म्हणोनी अणू हा स्वतः सर्वसिद्ध !
उपेक्षा न खादी खादी चुकून
मनोवांच्छितें पूर्ण होतील तूर्ण" १६

जनांलागुनी दिव्य संदेश अंगें
असा स्वप्रभावेंचि ही खादि सांगे
नको लेश शंका कुशंका फुकाची
अपेक्षा रवीलागिं का दर्पणाची ? १७

असो वस्त्र जाडें मऊ कीं कसेंही
पुरें तोटकें कीं तसें फाटकेंही
क्षिती ना तयाची कधीं बाळगावी
परी खानपानीं उणीवी नसावी १८

असे खा सदा कीं तनू पुष्ट व्हावी
बहू शक्ति अंगामधें संचलावी
परी स्वातंरी तत्त्व हें वागवावें
सुदीनावनीं नित्य देहें झिजावें. १९

पहा भारतादी सुकाव्येतिहास
कुठेंही बघा हेंचि ये प्रत्ययास.
जगावें सुखें दैन्य देशीं नसावें
असा हेतु त्यांनीं उदासी न व्हावें २०

असत्स्वार्थ सोडा स्वसत्त्वास जागा;
खलत्वासि केव्हांहि द्यावी न जागा.
असें जाहल्या देव आहेचि जागा.
स्मरा मात्र त्या कृष्ण देवा शुभांगा. २१

---

# तरंग ६ वा.

## दुःखक्षोभाचे सुस्कारे !

[ अभंग ]

—१—

कैसा दिन उगवला । चंडरश्मी थंड झाला !
काय केलें नारायणा ! कैसें वंचीयेलें दीनां ?
किती केली विनवणी । काय नाहीं आली कानीं ?
तुझें ब्रीद दयासिंधू । दीननाथ दीनबंधू !
नाहीं तुला दया आली । व्यर्थ झाल्या ब्रीदावली !
चित्ता नाहीं आला द्रव । सार्थ नांव करुणार्णव !
किती केलीं पारायणें । व्रतें पुण्यें अनुष्ठानें
अन्नसंतर्पण केलें । बीज पाषाणीं पेरिलें !
शिरीं धारा अखंडिता । धरियेल्या विश्वनाथा !
घागर उपडी पाणी वरी । पडे पर्जन्य डोंगरीं !
ऐसा चमत्कार झाला । ब्रह्मलेख फळा आला !

—२—

ब्रह्मलेख किती वेळां । पार तुवां फिरविला—
याची तुला आठवण । व्हावी द्यावा का करुन ?
श्रियाळाचे सत्त्वासाठीं । चिलीयाला जगजेठी !
केलें तूंची बा सजीव ! मार्कंडेया चिरंजीव !
बत्तिस कोटी दीन जन । ‘ बाळा वांचवा ’ म्हणून
किती आले काकुळतीला । परी काय त्याचे तुला ?

काय सारे अभाविक । दुष्ट पापी कीं दांभिक ?
दोष सर्वां देण्यापरी । कां न तुला दूषूं हरी !
कोट्यवधी मुके जीव । आक्रंदतां नाहीं कींव
' सर्वहर मृत्यु माझी— । विभूती ' ही गतिमाजीं
वाणी उच्चारोनी अशी । बोल संचिता लाविशी !
बाळ तूंची लांबविला । घालोनियां गुप्त घाला !

३

एक झाला हलकालोळ । चित्त धांवे रानोमाळ
सारी भिस्त ज्याचेवरी । कोठें प्राण बालहरी ?
हातपाय पांगूळले । तोंड तेंही मुकें झालें !
कोण्यातोंडें रडूं आतां । सांगूं कोणा चित्तव्यथा ?
सर्वांठायीं अंधकार । भरे बायांचा बाजार !
खगेश्वर घरीं गेले । आतां घुबडां फावलें !
शक्ति नुरली अल्प देखा । डोळे करिती लुकलुका
शिवमाधवबालत्रयी । गेली भंगा करूं कायी !
सदाचार खड्गधारा । बोथटली एकसरा
नीतिसिंधू शुष्क झाला । धारा नैःस्पृह्याचा गेला !
चित्त कैसें व्हावें शांत । देव नाहीं देव्हाऱ्यांत !
धैर्यनग कोसळला । कर्मयोग लुप्त झाला !

४

इच्छा होती जगायाची । कलिकाळ बळवंताची
मुक्तावस्था मायभूची । प्रेमदिठीं पहायाची
नाहीं तुवां घडूं दिलें । न कळे का ऐसें केलें ?
इच्छामृत्यु गांगयाचें । भाग्य न का होतें त्याचें ?
कर्मशेजीं पहूडला । बाळ कर्मयोगी भला
धन्वंतरी देशमूख । सुश्रुत 'राव' अलौकिक;
होते जरी उशागती । काय चुके कर्मगती ?
नरसिंह सव्यसाची । दोरी ओढोनी चापाची

सज्ज होता उभा तेथें । गंगाजल पाजायातें
च्युत होवोनी अच्युत । सुयोधनसा निश्चित
स्वर्णपात्र गंगोदकें । आला घेवोनी कौतुकें
परी काय योग आला । तृष्णाशम नाहीं झाला !

—५—

स्वराज्याचें गंगोदक । पिणें ज्याचा हेतु एक
त्याची प्राप्ती झाल्यावीणें । तृषा कैंची शांत होणें ?
गजगंडमुक्ताशन- । सिंह झाला जरी दीन
तरी काय खाणें तृण । तोंड कोमिलें करून ?
त्रत्रें जन्मोनी या काळीं । मुक्तिगंगा गोठवीली
वृत्रवध करावया । आस्थिवज्र बाळा द्याया
नेलें काय स्वर्भूस्थला । परि बारसें जेवला !
किंवा गीताविस्मरण । झालें तुज बा म्हणून
अनुगीता ऐकावया । नेसी त्यातें येथोनिया
कर्मयोगी गुरूहून । बाळ बहु विचक्षण
पाहीं धूर्त येथें ठेला । अणूरेणूंत मीनला !

—६—

अणू अणू रेणू रेणू । भरोनी तो उरे जणूं
पानोपानीं फुलोंफूलीं । भृंगापरी रुंजी घाली
चंडोलाच्या गानव्याजें । कर्मपाठ देई चोजें
" शुभहेतु ' काशीवास ' । धरोनियां सावकाश
रेंगाळत चालतसां । काशीवास मिळे कसा ?
काशी आहे तुम्हांपाशीं । दिसे डोळेझांकीं कशी ?
स्वातंत्र्याची मंदाकिनी । सर्वसुखसंवर्धिनी
पहा पैल तीरावर । स्वराज्याचा विश्वेश्वर
विश्वेश्वरदर्शनाचा । हेतु चित्तीं जरी साचा
चला पुढें पुढें वेगें । संकटांना टाका मागें
संकटांच्या कोडी कोडी । येती येवोत बापुडी

झालों मृत तरी जिते । होवूं लाधतां अमृतें
काशी काशी बोला बोला । नको येणें[1] वै-कुंठाला[2]

—७—

बंधुप्रेतें असंख्यातें । जमवोनी रचा हातें
भव्य दिव्य सेतु करा । कशी तरी गंगा तरा
जालीयनवाले किती । झाले तरी नको भीती
जरी तम दिसे पुढें । तरी तेज पलीकडे
होवो झाला छल जरी । दृष्टि ठेवा ध्येयावरी
समराचें तोंड दिसे । आतां कोठें लागलेंसें
आतां पाय घेतां मागें । घाबरोनी लागवेगें
सुख सर्व आटोपलें । होतें जाणा तेंही गेलें
आणीबाणीची ती हीच । वेळ आहे जणा साच ''
अनंताच्या तनयमुखें । बालवाणी परिसा सुखें
जयनाद करा बोला । बाळ पुन्हां अवतरला !

---

## राजर्षीचें स्वकीय सांत्वन !*

[ मंदाक्रांता. ]

जन्मा घ्यावें शिकवि ' ज ' असें आणि जावें मरून–
सांगे सर्वां ' ग ' मग पुढतीं; येतसें हें दिसून–
धात्वर्थें कीं जगति म्हणजे जन्म घ्यावा नि जावें
मृत्यू-धाकें मग वद मना कां उदासीन व्हावें ? १
इच्छा कांहीं धरुनि मनिं तो आपुल्या विश्वकर्मा,
घाली जीवा भुवनतलिं या श्रेष्ठ मानुष्यजन्मा;
नेई त्यातें परत मग तो पूर्ण होतांच हेतू
चित्ता ! घ्यावें कलुनिहि तुला काय औदास्य हें तूं ? २

---

१ जाणें. २ जेथें गति कुंठित होतें तें वैकुंठ.

* श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे हे आपले दत्तक चिरंजीव रावसाहेब व्यंकटराव कालवश झाले त्यावेळीं स्वतःच आपलें सांत्वन करून घेत आहेत अशी कल्पना करून प्रस्तुत कविता लिहिली आहे.

श्रीकृष्णें जें कुरुरणभुवीं बोधिलें पार्थराया
केलें बा तूं पठन वद तें काय ऐसें रडाया ?
माझें माझें तुजसि वदतां लाज वाटे स्वभावें
केव्हांही यापुढतिं म्हणुनी तूं उदासी नसावें ! ३
जन्मापूर्वीं सकल असती जीव आकारहीन,
तन्नाशान्तीं फिरुनि सगळे होति अव्यक्तलीन;
मध्यें मात्र; प्रकट उदकीं जेंवि वीची अपार,
जाणोनी हें उचित न तुला वाहणें शोकभार ! ४
केलें प्रेमें निरलसपणें शक्य सारे उपावू,
व्हावा ना कीं वश ग्वर गदा प्रेष्ठ[१] मद् व्यंकुरावू;
देवें दैवें मज न दिधलें मानसा सद्यशास
औदास्यातें उगिच वरुनी तूं न व्हावें हताश. ५
व्हावी तूतें अनुपम खरी वस्तु लोकीं अशी ती,
काळाची ही झडप पडते उत्तमीं त्याच रीती;
चंच्वाघातें मधु मधु अशा पक्षि टोंची फळांस,
ठावें हेंही तुजसि असुनी काय व्हावें उदास ? ६
भृंग प्राशी विकसनवशा कुड्मलींच्या रसाला ?
सांगे बाबा ! दलितदलसुमा कोण सेवी रसाला ?
स्पर्शी मुंगी कधिं न सहसा मृत्तिकेच्या कणास,
ज्ञाता चित्ता ! असुनहि तुवां काय व्हावें उदास ? ७
सर्वेशाचा अजुनहि मिळे मान साक्षात् जयांतें,
रामाकृष्णा विधिवश तयां लागलें व्हावयातें !
आहे ज्याला जनन म्हणुनी ठेविला नाश त्यास,
ठावें हें बा ! असुनहि तुला काय व्हावें उदास ? ८
ज्या मार्गातें अचुक वरिलें माझिया आधिल्यांनीं,
केलें त्यांचें अनुसरण त्या लाडक्या अर्भकानीं;
जाणें आहे नियत समयीं त्याच मार्गें तुला ही,
व्हावें कां तूं व्यथित मग रे ! ध्यानिं हें येत नाहीं ! ९

१ अत्यंत प्रियकर.

पुत्राऐसा वदति नयधी मान द्यावा प्रजेतें–
भूपालांहीं; उचित गमतें माझियाही मतें तें !
कर्तव्या या नियत करितां वेळ कोठूनि व्हाया–
दुःखक्षोभें विलपत असा स्वांतिं चित्ता झराया ? १०

---

## काशीविरह

चाल—[ शारदे दास कामदे...... ]

उमलली, जों न मृदु कळी, मधुर हासली, प्रभो[1] वितरोनी,
पाडिलें मारुतें तोंचि तिला झडपोनी;
काशिके ! कृष्णकन्यके, स्वजनमोहिके, केविं हें घडलें ?
राहुनें नवोदित इंदुकलेला गिळिलें !
लडिवाळ, बाळ वेल्हाळ, घेतला आळ, खेळ मांडाया,
मांडिला यथारुचि हौस तुझी पुरवाया;
घरकुल, जणूं गोकुल, बोळकीं चूल, मांड मांडोनी,
*होतां न पूर्ण* तो जासि परी सोडोनी !
बोलकी, तुझ्यासारिखी, तूंचि परि मुकी आजि होवोनी
बसलीस कशास्तव सांग अशी तूं रुसुनी ?
गारुडी, भरी पोतडी, करुनि तांतडी, खेळ होतांच,
कृति रची विरंची तशीचि सांगती साच !
जरि खरें, म्हणूं हें बरें, सुगुणसुंदरे ! तुला प्रेषोनी–
साधि गे विधी तो आणि काय नेवोनी ?
स्मरुनियां, तुझ्या कृतिनया, सुगुणसंचया रडावें आम्हीं,
हेतुनें याचि का नेइ तुला निजधामीं ?
मम कृती, असो काशिहि ती, तुला प्रिय अती म्हणुनि वेल्हाळे !
तव अर्पि चिदंशा अष्टपदी ही बाळे !

---

१ प्रकाश पक्षीं ' प्रभा ' नामक कन्या.

# दिवंगता द्वारावतीस—

## [ अभंग ]

इच्छा अंतरंगीं । उदेली स्वभावें, फळ परी पावे । विपरीत !
विधिघटनेचा । खेळ अखंडित, अनादि सिद्धांत । वाद नाहीं
मायाविमोहित । आम्ही गाढ वेडे, सदैव देहुडे । वागों परी
स्मशानवैराग्य । धरूं घडीभर; परी निरंतर । डोळेझांक !
उबगोनी जीवा । वांच्छी जो मरण. आयुष्यवर्धन । होई त्याचें !!
आयुर्दायीं वाढ । इच्छी मनांतून, मृत्यु आलिंगन । देई तया !'
महा सिद्धांता या । व्हाया अपवाद, नसे मी प्रबुद्ध । सिद्ध योगी
अपूर्व हें पुण्य । ज्याचें ऐसें झालें, तयानें जिंतिलें । म्हणों सारे
वंदावे ते पाय । भावें लाटांगणीं, मानोनी शिराणी । पायवणी !

* * *

बाई मनोरमे । सत्कविशंसिते, गोष्पिकेच्या सुते । द्वारावती !
तव पतियोगें । तुझा परिचय, घडे निरामय । आनंदाचा !
परिचय—बीज । वेगें अंकुरलें, दृढमूल झालें । स्नेहजलें
छायातरूपरी । वाढीस लागलें, आणि बहरलें । प्रेमसुमीं
गुणधर्मकर्मीं । समानता जेथें, स्नेह वाढ तेथें । घेई लोकीं
जगाचें बाजारीं । ऐसा व्यवहार, येई निरंतर । दिसोनियां
कलाकुमारी[2] तूं । कलानिधि[3] पति, कलाहीनमति । असोनि मी
तुम्हीं उभयांनीं । आप्तापरी मज, मानोनी निर्व्याज । वागवीलें
जेव्हां जेव्हां याचें । घडे गे स्मरण, प्रेमें ये भरून । अंतर्याम
डोळे भरोनीयां । गंगा ही दुथडी, प्रेमाचे आवडी । वाहों लागे.

* * *

एकेका गुणाचें । होतांच स्मरण, मन व्यामोहून । पाकुळतें[4]
विपत्तीमाझारीं असतां माहेर, पोशिलें साचार । पुत्राऐसें
कन्यासुधामुखें । मज गौरवानें, ' अदोबा ' म्हणावें कौतुकानें
विद्येचें भूषण । विनय बोलीजे, तुझेठायीं चोजें । पाहियेलें

१ वांकडे. २ बी. ए. ३ एम्. एस्सी. ४ द्रवतें.

विद्याहीन माझे । कन्यांसंगें तूज, पाहतां मी रूज । करितांना
निर्बुजल्याऐसें । व्हावें मी मनांत, परी तूं वृत्तींत । निश्चळ कीं
प्रेमगीतें तुझीं । पाहोनीयां वाटे, खरें काव्य थाटे । तुझे ठायीं
पतिच दैवत । मानोनी अंतरीं, मानाची बोहरी । केली तुवां

* * *

मित्रसहवास । सुखासी कारण, उद्वेगभाजन । झाला तुज
उदार पतीच्या । निर्व्याज प्रेमाचें, दांटप मौजेचें । मित्रें एका—
केलेलें पाहतां । तुजसी निर्वाण, झाला वायांवीण । शीण बाई !
क्षण मस्करीची । होवोनी कुस्करी झोंवली जिव्हारीं । ठावें मज !
कोणी कांहीं म्हणो । मज काय त्याचें, तुज तें मृत्युचें । पाचारण !
जातां सासुऱ्यासी । दिली मज भाक, अल्प आराणूक । केली माझी
' येईन मी पुढें । जातां मुंबापुरीं; भोजनाची उरी । राहों द्यावी !'
पुढील जन्मींचा । विसार हवाला, होईल वाटला । कोणा तदा ?
परी दैवयोग । असा जो आंखीला, कोण पुसायाला । क्षम बाई ?

* * *

वेड्या कविमनें । बागवीला हेत, अज्ञ हृदयांत । द्वारावती !
' श्रांत कलेवरा । जातां मी सोडून, मज आठवून । शुद्ध भावें—
दोन ढाळोनियां । निर्मळ आसवें, सहज स्वभावें । मनोरमे !
'चिंदशी अत्म्यास । दोन काव्यपुष्पें, निर्धूत निष्पापें । वाहशील.'
मनांतला हेत । मनींच जिराला, परी उलटला । गंगौघ तो
गंगाजलें जैसें । गंगेसी तर्पावें, तैसें मी स्वभावें । पूजीं तूज
तुझ्या सद्गुणाच्या । पांच पाकळ्या या, माझ्या गुंफोनियां । शब्दगुणीं
शुद्ध नेत्रोदकें । आर्द्र करोनियां, वाहतों चिन्मया । आत्म्या तुझे
विशुद्ध भावाचा । सोज्ज्वळ सुगंध, सेवोनी स्वच्छंद । पावो तृप्ति !

———

१ दिपवृक्षासारखें. २ नाश. ४ व्यर्थ.

# तरंग ७ वा.

## *बोधचषक.

आर्या ( गीति )

प्रणति असो प्रभुला जो सदय मनें सर्व काळजी वाहे
अंतीं रक्षिल तोची धरिं चित्तीं सर्वकाळ जीवा हे. १
शमवीं तृष्णा चेतो-भृंगा ! श्रीहरिपदाब्जमधुपानें
टाकुनि कमल-मरंदा प्राशावें उदक काय मधुपानें ? २
जा जीवा हरि-मंदिरिं पाहीं श्रीकृष्ण तेविं नयनांहीं
तदितर काय पहावें ! दान विफल तें जरी विनय नाहीं. ३
स्पर्शि न पर-वनितेला प्रखर अती अन्यदारकीलाभा
रघुशारिं रावण पडला धरितां स्वमनांत जानकी-लाभा. ४
प्रेम करीं स्वस्त्रीवरि परि न धरीं मनिं तिचाहि विश्वास
व्यसु झाला पत्नीकरिं विदुरथनृप विदित गोष्ट विश्वास. ५
स्त्री-प्रेमा लुब्ध न हो कैकेयी वचन बद्ध भूपाळ
सुतविरहें मृत झाला; हृत्कमलीं गा ! सुवाक्य हें पाळ. ६
' मद्य करी शक्त नरा ' प्राशिं न तें धरुनि या प्र-भासाला[1]
मधुपानमत्तयादव झाले व्यसु रणिं तृणें प्रभासाला ! ७
ईर्षा मूळ कलीचें करितां ती तव उरेल बा पत न
परिक्षित धरितां ती द्विज-वर-शापेंहि पावला पतन! ८
येतां विघ्नशतेंही सोडीना धर्म त्यांत परम हित
नीचगृहीं दास्य करी तारामति-कांत धर्मपर महित ! ९
सत्संगीं निरत रहा दुर्जन-सहवास फार भीषण तो
रघु-वर-सत्संगानें लंकापति जाहला बिभीषण तो ! १०
तुष्ट करीं जननीला; दैवत तें कथिति थोर; सत्यहि तें
जननीशापें झाले सर्पमखीं मरणकष्ट[2] अत्यहितें ११
पितराज्ञा पाळ सदा; देतां यौवन पुरु स्वजनकाशी
झाला सम्राड्भूपति, पितराज्ञी गणिति सूज्ञ जन काशी. १२

---

* प्रस्तुत चषक क्षेमेंद्राच्या चारुचर्येतील अमृतानें भरला आहे.

१ विशेष कल्पनेला. २ सर्पांना मरणकष्ट फार झाले.

होती तापद अंतीं अनुचित तीं सत्य जाण पां दानें
दान सपूर्ण कराया बलिनृप ताळिं जाय विप्र-पादानें ! १३
देतां दान फलाशा न धरावी ऐक नीट दे कर्ण
इंद्रा कुंडल देतां याचुनि हीनत्व पदरिं घे कर्ण ! १४
अवमानीं द्विज न नरा तच्छापें अहि-मुखांत सांपडला
जनमेजयतात, फणी नहुष वनीं होउनी तसा पडला. १५

* * *

दंभें हेतु न साधीं, झाला जरि साध्य अंतिं असुख रची
द्विजरूपें लब्धास्त्रें, होउनि रणिं विफल, कर्ण असु खरची. १६
दीनजनावनतत्पर राहीं, दावीं दया नला राया !
अर्पी शिबी स्वमांसहि श्येनविहंगा कपोत ताराया १७
न करीं द्वेष कुणाशीं ठेवीं मृदु सुमसमान सु-मनातें
देवासुर- भीषण-रण झालें तापद न काय सुमनांतें[1] ? १८
नच हो कृतघ्न त्यातें उपकृति केली जयेंहि तुजवरतीं
धर्मोपकार भुलतां[2] सिंधुनृपप्राण मृत्युतें वरती १९
वाक्शर हाणिं न कोणा, तुडविति हृत्पद्म ते[3] मतंगजसे
दुःशब्द-तप्त-पांडव-दीपीं कुरु पडति ते पतंग जसे ! २०
अपमानत्रुटितमना सांधाया शक्य जो नमो त्याला
हतभाग्यें फुटलेल्या येइ कधीं जोडितां न मोत्याला. २१
स्वामि-प्रिय साधाया इतरां छळण्यांत बुद्धि राहू न
पैशुनतत्परचंद्रा प्रतिवर्षीं पीडि काय राहू न ? २२
याञ्चाप्रसंग टाळीं कीर्ति तुझी वा ! करील वामन ते
घेतां दान बळीचें प्रभु झाले तैं न काय वामन ते २३
दूषिं न वा त्यागिं न वा गर्वें तूं स्वात्मबांधवांलागीं
दक्षक्रतु विफल घडे वदतां निंद्या सुता-धवाला गीं. २४
परनिंदा न करावी; नच का वा हा तुला नय ज्ञात ?
शिशुपाल कृष्ण-निंदा करुनि मरे राजसूय यज्ञांत. २५

---

१ देवांना. २ विसरतां. ३ 'ते' चा संबंध वाक्शरांकडे.

अतिलोभा न धरावें; छळुनी लक्ष्म्यादिरत्न-दात्यातें
देवासुर घुसळीतां; दिधलें विष खर तयें तदा त्यातें. २६
दुष्टजनादर न करीं निजसंगें तुज करील तो निधन
सत्कारुनि आदरितां गाधिज हरि मुनिवशिष्ठ-धेनु-धन. २७
विरहें धृतिविकल न हो; तापद तो अंति जाण सायकसा[1]
सुत-विरहें द्रोणाचा अहह! रणीं जाहलाचि सायें[2] कसा! २८
क्रोधद्रुमविषछायीं न घडो मनुजा तुझ्या मना वास
क्रोधें भीम प्राशुनि अरिरुधिरा डाग लावि नांवास. २९
विद्येच्छु मानवा कर गुरु-सेवा एकनिष्ठ भावानें.
सोसुनि दुःख कचें कवि तोषविला; तो तदीय भा वाने ३०

*　　　*　　　*

स्वजना न त्यागावें भक्त हितद शक्त जो सदाचरणी
शोकें रघु विद्ध पडे, त्यजिलां सीता नता सदा चरणीं ३१
लक्ष्मी अतिकृपणत्वें राक्षि न; विद्युत्समान ती चपळ
व्याडींद्रदत्त हरती नंदनृपश्री, न लावितीच फळ ३२
वेश्याकैतवकृत्यीं रति न धरीं; बा! तदक्ष-कुशरांनीं
शांतापति विंधियला, व्याध करी मृग जसा स्व-वश रानीं. ३३
भुजबलदर्प न मिरवीं दक्ष रहा अल्प शत्रुचे दमनीं.
रामावमान करितां भृगुपति झाला तरी सखेद मनीं ३४
क्रूराचरणें साधिं न वैर जगीं सदय बा! असावेंची
जगरिपुमागधनृपवर भीमकरीं प्राण तैं कसा वेंची? ३५
स्वार्थी नच साधावें अनयें वच हें मनीं नरा मानीं
वालीवध करुनी का डाग यशा लाविला न रामांनीं? ३६
उग्रतपोनिष्ठांच्या धृति-दमनीं तव न धी विशंक रतो
निजतपछेदनकर्ता-मनासिज जाळी न काय शंकर तो? ३७
चार्वाकमतापासुनि वळिव सु-धी झटति जाण पां परत
स्तंभीं प्रकटुनि हरिनें वधिला प्रल्हाद-तात पापरत! ३८

---

१ बाणासारखा. २ शेवट.

दैवें सुपदां चढतां नच हो उद्युक्त ताप लावाया
पूज्यां ; सनकां छळितां त्रयजन्में विजय तापला वायां. ३९
दुष्कृति कधिं न करीं बा थोर मनीं शल्यशीच जी शिरते
विप्यपराध सुदुःसह होतां शिव अहह ! छेदि तच्छिर तें ! ४०
प्राज्ञ गुणादर करिती नच बघती लिंग जाति वा सु-कवी
शूद्र विदुर मान्य जगा; द्रोण-ज परि तो बुधांतरा सुकवी. ४१
स्व-क्षयकारक अंतीं होई तो वर न याचि दात्यातें
याची त्राण शिवा रण, परि तें मारक घडे तदा त्यातें ४२
क्षीणें प्रबलांपुढतीं दावावें धार्ष्ट्य कीं न तोरा वा
कृतवीर्यज[1]-कर-पंजरिं पडला होउनि दशास्य तो रावा. ४३
कलहज अक्षक्रीडासक्त नसावें अतीव, हा नियम
द्यूतक्रीडनिं मुसलीकरिं रुक्मीची करीच हानि यम. ४४
झाला संधि रिपूंशीं तरि न नरा बा ! रहा कधीं निसुर
केल्यावरि हरि संधिहि गतभय करि करुनि वृत्र-हानि सुर. ४५

*    *    *

नृपतिकृपा स्वप्नासम; नंदनृपें प्रिय सुमंत शकटाला
कारागृहिं सूदियलें, असतां सुधुरीण राज्य-शकटाला. ४६
जठरांगशब्दकृतिचा करणें उक्त न विडंब माना कीं
अष्टावक्रविडंबें वैरूप्यचि ये सुरोत्तमा नाकीं. ४७
बोध न करिं कधिं मूढा; व्यर्थ श्रम तो, कथीहि संत-तति
शुक्रोपदिष्टदानव संतति पावे विनाश संतत ती ! ४८
यद्वेष तीव्र दीर्घहि डवाचि अशा कधिं न मनुज-सापाला
चाणाक्यें चुरिला नृप नंद ससुत शुष्कसा जसा पाला ! ४९
साध्वीक्रोधानल तूं दीप्त कराया न होइं पां पवन
वेदवती सीता हो, जाळाया दशशिराख्य पापवन ! ५०
जें देय तें स्वयें दे सर्वस्वा प्रबळ ना तरी सुकवी
द्रोणार्थ द्रुपदातें नर जिंकी वर्णि भारतीं सु-कवी ! ५१
साध गृहस्थाश्रमिंही अन्योन्याबाध धर्मकामास
सगरें पुमर्थ गृहिं हे साधियले तपिं न वेचितां मास. ५२

---

१ कृतवीर्याचा मुलगा सहस्रार्जुन त्याच्या हातरूपी पिंजऱ्यांत.

पूतोज्ज्वल करिं आत्मा शुद्धमनें करुनि तीर्थयात्रा त्या
पांडव कृतार्थ झाले करुनी ज्या कीं भवाचिया त्रात्या. ५३
स्वोग्रत्वें कुसुमासम-मृदुचित्ता-योषितांस नच डरवीं
गतभय भार्या व्हाया झाला बहु शांततेज चंड रवी. ५४
प्राप्त जरी बोधामृत भग्नघटासम नरा न टाकावें
गीतास्मृतिहतफाल्गुन रडला रणकालिं काय सांगावें ! ५५
द्यावि न सत्ता कु-सुता नय हा, दुर्योधनेंहि धृत राष्ट्र!
करितां स्वकरीं झाला जनदृष्ट्या तृणसमान धृतराष्ट्र ५६
स्वामि-प्रसाद मिळतां चित्तीं तव नच फल-व्यथा राहो
क्षीणांग चंद्र झाला, ईशें जरि शिरिं दिलाहि थारा हो! ५७
श्रुत्युपपादित धर्मा पाळावें बा ! न सोडिजे त्यातें
दैत्यें धर्म त्यजितां गेली लक्ष्मी तदीय जेत्यातें. ५८
सद्गुणसंग्रह करिं बा ! बद्ध करायास चंचला [1]माला
निर्गुण दैत्यां त्यजुनी श्रीनें देवांस घातली माला. ५९
बांधव-कलि वार, परी चेतवि नच काय ताप सामान्य ?
वाली-कलिवर्धक रघु निंद्य ठरे जरिहि तापसां मान्य. ६०

* * *

असुवधयुताभिचारा न करीं त्यांतहि अमूप बा त्रास
सौमित्रे शरिं वधिलें अभिचाराग्रणि दशास्य-पुत्रास. ६१
भौतिक-वपु जावो परि यशरूपें वस सुकर्म साधून
यशमय देहें उरले जगतीं व्यासादि काय साधू न ? ६२
संसार-सार सारें हेंचि नरा नित रमा-धवा गावें
झिजवित परोपकारीं चंदनशी तनु जगांत वागावें ६३
निरुपाधिक ऐस भवीं धरिं न मनीं रति, ममत्व अघ-जनक
निर्लेप जेविं उदकीं पद्म; तसा राज्यिं राहिला जनक ६४
महदाश्रय नित्य करीं, नीचांचा परि न घेइं वारा ही
मदिरानामा पावे शौण्डिके[2] निजकरिं जरी पया वाही. ६५

---

१ लक्ष्मीला. २ कलाल ( दारू विकणारा. )

स्त्रीधन-भोग अधम तो, बंधुश्री गौण ती न भोगावी
मध्यम जनकार्जितही स्वार्जितधनकीर्ति, काय भो गावी ? ६६
अजरामरवत्प्राज्ञें विद्याधन नित्य सत्य साधावें
धर्म करावा त्वरितहि धरुनि मनीं 'मृत्यु पाठिसी धावे'! ६७
प्रत्यहिं मना विचारीं पशुसम दुष्कर्म आजि तव करिं तें
घडलें सुजनासमही कर्म तसें जें अघ-क्षया करितें. ६८
ओखट वस्तु किती जरि देते थोरास सद्य[1] शोभा ते
जें विष मारक इतरां वाढवि परि शंभुसद्मशोभा तें ३९
उत्तम वस्तु जरी बहु तापद नीचांप्रती नरा होते
मृतितारक मधुर सुधा झाली मारक न काय राहोतें ? ७०
' अतिपरिचयादवज्ञा ' होते, तैसा अमूप तोटा कीं
टाकुनि गंगास्नाना गंगापुलिनस्थ शोधितो टाकीं ! ७१
साक्षर नराहुनीही सरस गमे मन यदीय कीं स-रस
साक्षर उलटा करितां राक्षस हो सरस राहतो सरस. ७२
ऊन न दूरपणानें होतें हो ! प्रेम जेंहि साहजिक
हर्षवि चकोरनयना इंदूदय तो जरी नसे नजिक ७३
सज्जन-निंदा करि जो नर त्या निंदेंत तोच सांपडतो
व्योमीं भस्मसमुच्चय फेंकुनि देतां शिरीं जसा पडतो. ७४
वेळीं हितकर्ता नर कारणही आपदेस होतो कीं
दोहनसमयीं गोष्पद पाहीं स्तंभासमान हो तोकीं[2] ७५
पादोनशतार्यांचा बोधामृतचषक गोड हा घ्यावा
प्रेमानंदें प्राशुनि खाऊसा सुतसुताकरीं द्यावा. ७६

---

१ तत्काळ. २ वासराचे ठायीं.

# तरंग ८ वा

## वरविक्रय* !

### आर्या ( गीति )

१

“ झाली उपवर बाळी तरिही कोणी न काळजी वाहे,
जरि पोटचान्हि गोळा वाटे जणुं आजि काळ जीवा हे. १
कानीं कपाळिं रोजीं ओरडल्यें तरिहि धांग ना इकडे,
केल्या दांतकिराकिल्या जाइ न कानावरूनि ‘ओहि’ गडे ! २
लागे पोर गळ्याला तोंड न बाहेर काढुं दे कोणी
न कळे मानेवरची खालीं येणार केविं ही गोणी ? ३
किति जीव पांखडूं मी घाम इथें पण मुळीं न हृदयातें
सारा गांव कुजबुजे वाटे त्याचा न दर्दही यातें ? ४
झाली गडे शिराणी मजला चौघींत आज जायाची,
डोळेझांक पुरे ही वाटे खंती न कांहिं का याची ? ५
बाळांचा बाळ गमे नवरा बाळीस छान शोभेल,
आहे रत्न खरोखर, परि कैसें तें कळे न लाभेल ? ६
घरबसल्या स्थळ लाधे नांवाजति फार गोपिका काकू,
सासू गरीब सालस आतां न गडे मुळीं करा कांकूं ! ७
नसती बहिणी भाऊ नाहीं कोणी करावया जाच,
जाऊं द्या न स्थळ हें उद्यां सकाळीं उजाडतां जाच ! ८
घरदार शेतवाडी सर्व यथास्थित कुठें नसे तोटा,
भरणूर वस्त्र अंगा नाहीं कमती मुळींच कीं पोटा ! ९

* प्रस्तुत खंडकाव्याचा हा पहिला सर्ग आहे. हा सर्ग लिहून फार वर्षें झालीं. हें काव्य बरेंच मोठें व्हावयाचें होतें. परंतु मी योजिलेलें कथानक ‘ हाच मुलाचा बाप ’ या नाटकांतील कथानकाशीं बऱ्याच बाबतींत जुळतें आल्यामुळें तें अपुरेंच सोडून दिलें.

जरिही सुनेस अपुल्या ते न फुलवितील घालुनी डाग,
तरि ते नसति खरोखर बाळीबुगडीस आजि माहाग ! ” १०
“ वदसी जणूं असें कीं, बाळीची सर्व काळजी तुजला !
संबंधही न माझा कुठुनि तरी धरुनि आणिलें मजला ? ११
संसार एक तंबू पतिपत्नी दोन खांब हे त्याचे,
वाइट-बरें तयांचें खांद्यावरि समसमान उभयांचे ! १२
एक स्तंभीं परि ही नगरी द्वारावती असे सर्व,
“ मी एक चालवीं ती ’ व्यर्थ असा वाहती मनीं गर्व ! १३
व्हावें बरें सुतेचें जितुकी ही काळजी तुला आहे,
तितुकीच ती मला ही रात्रंदिन सारखा झुरें पाहें ! १४
अंतर इतुकेंच परी युवती ती दावितात बोलून,
आम्हीहि दाखवीतों नच शब्दीं परि मनांत झिरपून ! १५
तूंचि तिच्या मायेची वाटे तुज मी जणूं तिचा वादी
भ्रमवी भ्रम हा तुजला; केलें म्यां काय वाचु का यादी ? १६
एक परी नवलाची—दुःखाची गोष्ट जी मनीं दाटे
समयोचित या कालीं सांगावी ती तुला असें वाटे. १७
प्रियकर नितांत सुंदर जें जें अत्यंत वाटतें मनुजा
तें तें जिवापलिकडे जतन करी तो कधींच दे न दुजा. १८
झाल्यापासुनि केलें जीस गडे नित्य जीव कीं प्राण,
ताईत कीं जणूं मम सर्व सुखांची न संपती खाण. १९
वाढविलें वर्तविलें खस्ता खाऊनि नवससायासें,
ती आज लोटितां मी लाधे परवयाप्रती अनायासें ! २०
हें दुःख साहवेंना पडती हृदयावरी जणूं बाण
सांगूं कोणा परि ते कवण कसा कीं करील मत्त्राण ? ” २१

* * *

“ तिसरेंच काय बाई आलें हें आपुल्या मनामाजीं,
कन्याप्रेमा फुटले पाझर इतुके कुठोनि हे आजी ? २२
होता कन्या तुजला अपटिन मी खास ती शिळेवरती,
तेव्हांचे हे अपुले शब्द श्रवणीं अजूनही घुमती. २३
त्या या शब्दांचा मी मेळ कसा घालुं हें कळेना कीं

झालें बरेंचि असतें जाती जरि या करेंचि ती नाकीं !　२४
इकडेचि दूषितें मी हें न असें परि खरें कुणालाही,
कन्या नकोचि असते, मोदें तिज कोणिही न जन लाही.　२५
मौजेची गोष्ट परी जन ऐसा एकही न गवसेल,
स्वप्नांतही नको जो युवती मज हें सभान बोलेल.　२६
सकलांस स्त्री व्हावी दृष्टोसाहि पण नकोचि दुहिता कीं,
दुग्धाभावीं होइल इच्छा काशि पूर्ण जी असे ताकीं ?　२७
एकचि उपाय नाथा यास दिसे गर्भधारणाकार्य,
व्हावें ध्याया पुरुषीं होइल तद्धेतु साध्य अविकार्य.　२८
दुसरेंचि एक कोडें पुढतिं उभें नाथ याच समयासी,
व्हावा त्याचाहि गडे वाटे सुविचार कीं करायासी.　२९
गुणधर्मभिन्न जाती तेविं स्त्रीपुरुष हेहि गुणभिन्न
संततिकार्य स्त्रीला देई विधि भागुनी अविच्छिन्न.　३०
कन्याधन परक्याचें केवल तीं ठेव आपुल्यापाशीं,
नियमित कालीं व्हावी द्याया ज्याची असेल ती त्यासी.　३१
संस्कार हा मनावर अनादिकालीन कीं असे घडला.
हाडींमासीं खिळला रंध्रारंध्रांतही तसा भरला.　३२
कितिही असो सुता प्रिय जींवरि ही भावना मनीं जागी;
कीं ती परस्व आहे; अन्य विचारा न वाट त्या जागीं !　३३
स्त्रीपुरुष या द्विजाती गुणधर्मोत्पन्न हें मला भावें
संततिकार्य नरानें घेतां तो स्त्रीत्वही सवें पावें !　३४
जातां स्त्रीता पुरुषा येइल ! पतिपण अम्हांसि ओघानें
भारीच मौज होइल परि ही मानी नरां न मानवणें !　३५
एवंच काय पुनरपि येऊनि पूर्वस्थलासि वेताल,
आरंभील सर्वांची अपुले प्रख्यात खेळ बेताल !　३६

*　*　*

राहोत बोलणीं हीं सांगावें काय योजिलें इकडे,
यंदा निभाव नाहीं टाळाटाळी अशी करून गडे !　३७
कन्याविवाहचिंता जाची मनुजास हें असें नाहीं.
मधुमासयामिनी ही बघतां परि ती गमे असेना ही !　३८

किति चोपली पहा ही सुता उषेच्या विवाहचिंतेनें,
इंदुहि किती फिकुटला पुढतीं करुं काय हें गमे नेणें. ३९
दिसती खिन्न उभयही चिंतेचा नीलिमा मुखीं दाटे,
कीटकशब्दमिषें जणु रजनी कुरकुर करी असें वाटे. ” ४०
“ चिंतातुर तूं म्हणुनी दिसलें विपरीत सर्व तुजलागीं,
माझ्या नयनीं बघ ये राहें उभि येथ माझिया जागीं ! ४१
शांतपणें आनंदें बघ चिंतानीलिमा कुठें आहे
दिसतें विरुद्ध मजला अरुणद्युतिरागरक्तिमा वाहे. ४२
ठरलें लग्न उषेचें रविसंगें; सर्व सिद्धता झाली,
वेडे बघ हीं इकडे विवाहरंगीं वधूवरें आलीं. ४३
वरमाय प्राची ही साडेसुन्मुख करावयासाठीं,
वसनें रत्नाभरणें घेउनि सोत्सुक पुढें बसे ताटीं. ४४
किति गोड अंजिरी ही शेलाही काजळी बुटेदार,
ताटीं दाटी नच तरि असती ठसठशित भूषणें चार ! ४५
राहोत सर्व बाकी नथाचि तरी एक तेवढी पाहें,
वरचा खडा टिकेचा ! वाटे जणुं तेज सांडतें आहे ! ४६
शुभ सावधान झालें बघ या चौफेर अक्षता पडती,
मंगल वाद्यें झडती परिस विहग हे प्रतिध्वनी करती ! ४७

* * *

अंतःपट मधला जों न निघे तोंचि काय हें झालें,
पावे निधन उषा ही केला अपघात घोर चांडालें ! ४८
हा मंगळया पती कीं वैरी कीं पूर्वजन्मिचा काय ?
दिसतात पाळण्यांतचि बाळाचे सुगुणदुर्गुणी पाय ! ४९
खाऊनिंही वधूला झाली तृप्ती न नवरदेवाची,
सासूसही तयानें दाखविली वाट मृत्युभुवनाची ! ५०
गेली पत्नी दुहिता झाला संभ्रांत इंदु हा पुरता
आली प्रेतकळा त्या नकळे हा चालला कुठें वरता ! ” ५१
“ दुश्चिन्ह काय बाई ! टळो मुलीची इडापिडा सारी
दूरी पळो अमंगळ ! लाधो तिज सुखसमृद्धि संसारीं ! ५२

* * *

चिंता करूं कशाला ! होणें जाणें कधीं न कीं टळतें,
झालें उजाडलें हें बाळांचें स्थळ बघूनि या परतें. " ५३
" ज्याची ठेव असे तो जाइल घेउनि कशा मला आतां—
चिंतेचे हे गुंते ? तुम्हि तरि कां व्यर्थ गाणिं हीं गातां ? ५४
बाळांचा बाळ नको, काळ्यांचा काळही नको, भोळा—
भोळ्यांचाहि नको तो, गोळ्यांचा तो नको तसा गोळा ५५
जाउनि उद्यां पुण्याला दीक्षित यशवंतरायजी यांच्या—
साह्यानें वर शोधूं, दारोदारीं वृथा नको याझा ! " ५६
" मी कांहिं गोष्ट म्हटली नी ती इकडून ऐकणें झाली,
होइल सूर्य इकडचा इकडे परि हें न हो कदाकाळीं ! ५७
माझाचि जीव वेडा वदल्यें हें मी न राहवें म्हणुनी,
माझी न एकटीची ती कीं शिणवूं उगीच वटवटुनी ! ५८
स्त्रीजन्म फार खोटा त्यांत पुन्हां ब्राम्हणस्त्रियांचा ही,
अगदीं परावलंबी सत्ता हातीं न काडिची कांहीं ! ५९
खावें मिळेल तैसें घाल तसा धोंगडा सुखें ल्यावा,
सांगाल तें करावें डोळाहि वरी कधीं न उचलावा ! " ६०

* * *

" आले का राघोबा ? त्यांनीं तर पाठ पुरविली पुरती,
आहे तशीच त्यांची थोर कृपा नित्य आमुच्यावरतीं ! ६१
झालें जें झालें तें; द्या आतां त्यास जावया वाट,
इच्छेनुरूप सादर देवींच्या घालुं यापुढें घाट ! ६२
व्हावा कसा परी वर देवींना एकवार सांगावें,
शोधूं तसाच अगदीं राघोबांना पुन्हां न आणावें. " ६३
प्रतिशब्द ऐकतां हे कोप उमेचा समग्र मावळुनी;
हास्यच्छटा मनोहर लागे खेळूं तदा तिचे वदनीं. ६४
आकर्ण ओढलेली भ्रूप्रत्यांचा क्षणामधें शिथिल,
झाली सर्वेचि तैसे सज्जीकृत नेत्रबाणही विफल ! ६५
सस्मित उमा वदे तैं " वरशोधन कार्य खास जनकाचें,
या जन्मीं माझ्याशीं नातें अपुलें परी न तें साचें ! " ६६

करकमलकोरकानें प्रिय दयितेच्या तदा कपोलास,
स्पर्शुनि वदे महेश्वर हांसत का तुज कळे न परिहास ? ६७

[ वसंततिलका. ]

गंडूष घेउनि सर्व वरशोधनास,
जातीं त्वरें उभयतां मग ते पुण्यास;
चाले उजागर जिथें सवदा वरांचा,
बाजार तो भरतसे जणुं कीं गुरांचा ! ६८

---

[अपूर्ण.]

# अंतर्विद्धकलिका

**प्रस्तावनाः**—प्रस्तुत शब्दचित्र सामाजिक आहे. सामाजिक काव्यें महाराष्ट्र भाषेंत फारच विरळ आहेत. विषय अगदींच सामान्य असून नित्य निरीक्षणांतला आहे. पुरुष नीतिभ्रष्ट व्हावयास स्त्री कारणीभूत होते कीं स्त्री नीतिभ्रष्ट व्हावयास पुरुष कारणीभूत होतो, त्याचप्रमाणें नीतिभ्रष्ट पुरुषास समाज आपल्यामध्यें उजळ माथ्यानें वावरूं देऊन स्त्रीकडेमात्र कठोर दृष्टीनें पाहतो या व यासारख्या आपल्यापुढें नित्य येणाऱ्या प्रश्नांचा लेखकानें आपल्या दृष्टीनें विचार केला आहे ! प्रस्तुतसारखे सामाजिक प्रश्न लेखनद्वारां पुढें आणावेत कीं नाहीं हा एक प्रश्न आहे. पण तो आज जरी चमत्कारिक वाटत असला तरी कालांतरानें शोकपर्यावसायी नाटकाप्रमाणेंच तो नामशेष होईल यांत शंका नाहीं. काव्यविषय जसा नवा आहे तशी रचनापद्धतिही अगदींच नवी आहे. दुसऱ्या प्रसंगांतील प्रत्येक पद निरानिराळ्या चालीवरचें आहे. पद्यांत चाली महाराष्ट्रांत सर्वप्रिय अतएव सर्वतोमुखीं झालेल्या संगीत मानापमान व शारदा नाटकांतील घेतल्या असल्यामुळें ' अमुक पदाची चाल लागत नाहीं, ' असें म्हणावयाची पाळी येणार नाहीं असें वाटतें.

वृत्तभंगामुळें रसहानि होते असें कित्येक रसिकांचें मत आहे व तें खरेंही आहे. तथापि प्रस्तुत काव्यनायिकेच्या भडकलेल्या मनस्थितीकडे लक्ष दिलें असतां तिच्या तोंडीं एकच एक वृत्त घालणें रसापकर्षक झालें असतें व म्हणून लेखकानें प्रस्तुत कृतींत जी भिन्न भिन्न चालींची योजना केली आहे तींत निदान अनौचित्य तरी नाहीं.

ना. न फडणीस

( चालः—भूपती खरें तें वैभव. )

१

का मना ओढसी मागें मागें मजसी !
वद भीति कशाची वाटे आतां तुजसी ?
मज कुणाचेंच कीं नाहीं भय वा ! उरलें,
मीं लाज जनाची तुझीहि वाटुनि प्यालें;
ही भीड भिकेची वहिण कशाला आतां,
चल पुढें स्वैर तूं करुं दे कांहीं जगता;
　मी जशी जगा या मेलें आजला,
　जग तसेंच हेंही मेलें वा ! मला,
मी नको जगा मग जगत कशाला मजसी ?
ही मेली मेंढी भीत नसे आगेशी !

२

जग हंसेल म्हणसी ? हंसो बापुडें परतें,
मी हंसेन त्यातें मलाहि हंसता येतें;
जग मला न घाली मिळवुनि खायाप्याया
मी तरी धरूं का मुरवत त्याची वायां ?
एकदां मना तूं भ्याड जगा हें कळतां
तें स्वारी अक्षय भरील तुझियावरतां;
　निःसंग तया तूं ऐसें समजतां,
　वाराहि तुझा ने घे तें तत्त्वतां;
तव नाणें खोटें बोल काय दुसऱ्याशी,
भांडलें पाहिजे आपुल्याच पायाशीं !

३

बा ! काय बोलसी ? म्हणेल जनता मजशी,
" ही महा पापिणी नाहीं काळिज इजसी,
ही कलंकभूता उभय कुलांना झाली,
ही दुष्ट जारिणी कृत्या जन्मा आली! "
मी असेन कुलटा काय जगा परि त्याचें—
मज दूर न केलें काय तयें कायमचें ?
जारिणी परी बा ! झालें मी कशी,
ही कधीं कुणीं का केली चवकशी ?
जग सदा सज्ज कीं परांस निंदायासी,
अंधार दिव्याच्या परि बा ! पाहिं बुडाशी.

४

बा पाप कोणतें पुण्य कोणतें याचें—
जें गूढ जगाच्या अनादि आरंभींचें;
तें सहज सोडिलें अनुभव—योगी—गुरुनें
द्व्यक्षरी मंत्र मज ' जग ' हा देउनि त्यानें.
हे शब्द दोन परि एक अर्थ बा ! त्यांचा,
जो समयपरत्वें असतो लावायाचा;
ही जोडी म्हणजे पोरफसवणी नुसती
ही धूळ फेकणें लोकलोचनीं पुरती !
नर करी कर्म जें कांही पुण्य तें,
स्त्रीकरें होय घडतांची पाप तें,
या अर्थ वदूं कीं अनर्थ वदुं मी यासी,
कीं पुरुषार्थाचा अर्थ मानुं हा पुरुषी ?

५

मज जयें उठविलें जगांतुनी या आजी
तो फिरे उजागर खुशाल जगतामाजीं;
मैत्रिणी जिवाच्या बालपणींच्या मम त्या,
ज्या प्रिय बहु मजला बहिणींहूनहि होत्या;

त्या अतां न कोणी तोंडहि माझें बघती,
गण गोत आप्त मग कशास मजला पुसती ?
तांदुळापरी धुतल्याही शुद्ध तो,
निर्धास्त उजळ माथ्यानें नांदतो,
तो साव, चोर मी कोणी वालि न मजशी,
ही धरा माउली घेइ न मज पोटाशी !

६

त्या वहिणी जावा म्हणती खापरखुंटी,
ही कशास आली जन्मा नष्ट करंटी ?
पाठीस पाठ जे लाउनि आले भाऊ,
मी झालें त्यांना जिवंत गिळुं कीं खाऊं;
मज केलें ज्यांहीं सदा जीव कीं प्राण,
ते बाबा माझें नांवहि घेति न चुकुन;
चंडाळ जणूं ते मातें मानुनी;
साउलीहि घेति न माझी ते कुणी;
प्रत्यक्ष जिनें मज घातियलें जन्मासी,
ती आईही मम नवसि मरण देवासी !

७

ते आई बाबा मात्र धनी जन्माचे,
नाहींत खरोखर माझ्या या कर्माचे;
जे दिनीं तयांनीं दिधलें मज अन्यासी,
ते दिनींच तुटलें माझें नातें त्यांशीं;
मज मेली मानुनि माझ्या नावें त्यांनीं,
सोडिलें जरी बा ! तीन ओंजळी पाणी;
मज नसे तोंड बोलाया त्यांप्रती,
ही अशी बिकट मजलागीं ये स्थिति;
हा तोंड दाबुनी मार बुक्याचा मजसी,
बा ! निमुटपणानें व्हावा सोसायासी !

८

संबंध जयांसी जन्माचा या घडला,
त्यांनींहिं आजि का धिःकारावें मजला ?
मी महापातकी म्हणें न मी कीं नाहीं.
मी असंख्य रचिल्या राशी दोपाच्यांही;
जें वर्ज्य खरोखर कुलस्त्रियेला कर्म,
मीं केलें तेंही अवगणुनी निज शर्म;
स्त्रीधर्म तुडविला पाहीं पदतलीं,
मी ध्वजा महा पापाची उभविली;
मीं एक मारिली गाय म्हणुनि त्यासरसीं,
वासरूं मारणें शोभे काय तयांसी ?

९

मी नष्ट म्हणोनी केला माझा त्याग,
परि काय तयांनीं केलें अजवरि चांग ?
तें तयें न केलें असें न पातक बाकी,
मी काय बापुडी तुळितां त्यांच्याशीं कीं !
जगिं असे वस्तु कीं सत्य म्हणोनी कांहीं,
हें तयांस वाटे मुळींच ठाउक नाहीं;
कोणतें व्यसन त्या नाहीं हें नसें,
चोरींत पटाइत भारी ते तसे
ना पुरे रमाया घरचें बटकुर त्यांशीं
दिनिं दिनीं रचति ते पुण्यांच्या या राशी !

१०

हें असें परी त्या कोणि न लावी बोल,
परि जन्माचा मम मात्र जाहला घोळ;
मज कथीं तयांहुनि अधिक काय मीं केलें ?
पतिपदावरी पद देउनि चालत आलें;
पति गुरु स्त्रियेचा ऐशी शास्त्राज्ञा ही,
मीं सांग पाळिली आळस केला नाहीं;

समय हा योग्य पूजाया गुरुजना,
पातला मला कीं वाटे बा ! मना.
गुरुभक्तिव्रत हें सादर उजवायासी,
चल करूं तयारी, पैसे मिळवायासी.

११

परि सांग कोणतें साधन योजूं आज,
होईल सफल कीं जेणें इच्छित काज;
नच करील कोणी उभीहि दारीं मातें,
चाकरी कशाची नको नांवही परतें;
मागेन भीक तरि तीहि न घालिल कोणी,
ही दिसते म्हणतिल लाल गाजरावाणी;
मागते भीक दिवसासी ही अशी,
चालवी छान धंदाही रात्रिशी
बघ मौज न घाली आई जेवायासी,
देई न बाप कीं भीकहि मागूं मजसी !

१२

मज उपाय यातें एकचि दिसतो आतां,
तो करूं; मोकळ्या दिशाहि दाही चित्ता !
हा देह विकाया राजरोस बाजारीं,
चल मांडूं सांडुनि भीतिभीडही सारी;
ही नव्हे चहाडी चोरी कोणाची ही;
कीं अंधारांतिल शिंदळकी ही नाहीं;
मानुनी एक धंदा हा बा ! करीं,
चल लाग तयाला आतां सत्वरीं,
का उगा लाजशी ! भीक न ही परदेशीं,
कीं नसे चोरि ही करणें अपुल्या देशीं !

१३

का कळे न घेशी अजून आढे वेढे ?
का कळे न पडलें विकट तुला हें कोडें ?

चल झुगार बुरखा, पडदा लाजेचा कीं,
कर दूर झडकरीं पाय एकदां टाकीं,
बा ! नकोत पत्रें शिफारशीचीं याला,
कीं नको कुणाचा लावायास वशीला;
या नको भांडवल कांहीं फारसें,
कीं नको गुरूचें ध्याया बळ तसें;
चल तेलफणी कर बैस आजि खिडकीशी,
घे करीं आरसा लावीं रंग मुखाशी !

* * *

( चालः—शारदे दासकामदे. )

१

आरसा आजि हा कसा, दिसे हा असा, कळे ना बाई !
पोटांत असें कां धडधड माझ्या होई ?
हें रूप, दिसे बेरूप; मावळे हूप पूर्वींचा ताठा,
का जाय जिरोनी ? उठला अंगीं कांटा !
हे काल, गुलाबी गाल दलासम लाल दिसत जे होते,
सुरकुतुनि आजला म्लान कसे झाले ते !
हीं हडें, पाहतां पुढें चित्त ततफडे, किती वर आलीं
हीं गालफडें कशिं आज खालतीं बसलीं !
हें काय, जाहलें हाय, पडति हृदिं घाय करूं तरि कायी ?
कां असें कळे ना चर्र अंतरीं होई ?

२

भेसूर, उतरला नूर, दाट काहूर, उसळलें हृदयीं,
हे विचार आजी डोकें फिरविति बाई !
हे चार, नवे अविचार, नवे अविकार दाटती प्रबल,
सुविचार उपजती कळे न कीं हे विमल !
करूं कसें, होइ कां असें, लागतें पिसें, जणूं कीं वाटे,
लागली आग ही हृदय आतुनी पेटे

गतकाल जणूं कीं व्याल अग्यावेताळ उभा मजपुढतीं,
इंगळ्या हजारो अंगातें जणुं डंसती !
वेदना होति ज्या मना, सांगुं तरि कुणा कुणीहि नाहीं,
तुजवीण कवण या ऐके यादवभाई ?

---

( चालः—हरि मजला चालवेना. )

मुळिं मजला सोसवेना ध्रु०
धडगत न दिसत, मुखिं वच न फुटत, मन मुळिं न ठरत,
मज पुढतीं पाहवेना !
किति समय कठिण, तुजवीण कवण, मम करिल तरण,
बाळि ऐसा सांपडेना !
तुज म्हणुनि शरण, व्रजवनगवळण, मज हरि समजुन,
उद्धरिं ही दीनदीना.

---

( चालः—धीरसमीरे यमुनातीरे. )

सांग मुरारे ! काय कठिण रे ! भाई मेरे राधाप्यारे ! ध्रु०
कितिक गौळणी वृंदारण्यीं आलिंगुनि तूं प्रेमविकारें—
उद्धरिल्यासी कथाहि ऐशी मिथ्या कैशी मानूं बा रे !
तूं जाराग्रणि त्याहि जारिणी, तरिहि न तरल्या का व्यभिचारें ?
मीच तरी कशि, वद मग दोषी सारासारें पाहिं विचारें !

---

( चालः—अंकित पदांबुजाची दासी. )

येइ न कशी दया बा ! तुजशी, शरण मी तुझ्या पायाशीं ध्रु०
आठ ठिकाणीं जरिहि वांकडी कुब्जा तिशिं रतलासि !
कान्होपात्रा तुज न अपात्रा गमली मुळिं हृषिकेशि !
काय पिंगला होति मंगला तिजसह तूं रमलासि !
अधिकारें या म्हणत्यें तुजसी बन्सि ! धरीं हृदयासि !

---

( चालः—ही कामाची तलवार. )

मी काय कुणा बोललें, कुणा भाकिलें, स्मरण त्याचें—
होई न भोग दैवाचे ! ध्रु०
त्या मेल्या काळ्याप्रती, चुकुनि काय कीं शरण गेलें,
मीं खडकिं बीज पेरिलें !
तो साऱ्या मुलखाप्रती, असे माहिती, स्त्रैण भारी,
कुलकलंक कीं व्यभिचारी !
तो चोरुनि नारी हरी, बळें घर भरी, नीति त्याची,
हें कथि कथा भीमकीची !
मी शिळा गळां बांधुनी, इच्छिलें मनीं, तरुनि जाया,
परि साध्य कोठचें व्हाया ?
तो काय कन्हैया हरी मजसि उद्धरी ? व्यर्थ त्याचे—
मी नादिं लागलें साचें !

---

( चालः—कसें मन मोडुनी अमुचें. )

मना ! करुणा कशी येणें मेघवर्णा,
निर्दया त्या बकीहन्त्या शेषशयना ? ध्रु०
कुमुदिनीची दयागंगा, पतंगा[1]च्या अंतरंगा
विभंगोनी न घे जनना.
पद्मिनीची क्षयीन्दूला, तशिच कीं त्या—
लोलुपाला भ्रमराला दया ये ना !

---

( चालः—उद्धवा शांतवन करिं जा. )

१

' जारिणी अहिल्या ज्यानें । उद्धरिली पदरेणूनें
' तारेस जारिणीदीक्षा । पति वधून दिधली ज्यानें
' जाइ त्या शरण रघुनाथा ' । बदलासि काय तूं आतां ?
जारिणीविहिताहितकर्ता । जो असा दयामय दाता

१ सूर्याच्या.

काय त्या शरण मी जाऊं ?
तत्पदीं भाल का ठेवूं ?
तत्पदीं तनू ही वाहूं ?
विनवुनि त्या प्रेमरवानें !

२

बा मना ! रामचरिताचा । एक भाग तुजला ठावा,
योग्य कीं म्हणुनि तो तुजला । भासावा प्राणविसांवा,
राघवा परी बा ! तव या । अबलांची नाहीं कणवा,
काय तो तारितो अन्या । स्वजनाची ज्यास न पर्वा,
वध केला शूर्पणखेचा,
चित्तभंग अहिरमणीचा,
त्यागही आत्मदयितेचा,–
केला कुणिं जग हें जाणें !

---

( चालः–प्रिये पहा रात्रीचा. )

नको नको नांवहि त्या रामाचें मानसा मला ध्रु०
वदुनि जिला ' प्रेमखनी ' । गौरविलें मधुवचनीं
त्यजिली ती गहनवनीं । सदनमंगला !
त्यासंगें रात्रंदिन । फिरली जी वण वण वण
अंगाचें करुनि रान । वंचिलें तिला !
गणिलें यच्चरणयुगुल । जणुं शिरीष कुसुम विमल
नवनीताहूनि मृदुल । वंचिलें तिला !
देवद्विजरविसमक्ष । करुनि वरी सिंहवक्ष
होउनियां वचनदक्ष । परिणिलें जिला !
' नच कदापि अतिचरामि ' । तीन वेळ शपथ नामीं
करुनि जयें वामीं मार्मीं । विंधिलें जिला !
गर्भभरें अलसवती । असतांना सति सुदती
त्यजुनि दया नीतिरीति । टाकिलें तिला !
तरिहि एकवचनि त्यास । मानिति जे कुणि तयांस
धिःकाराचि निर्दयास । गरज ना मला !

---

( चालः—नृपममता रामावरती. )

१

पुरुष एक म्हटला कीं तो । अनयचा पुतळा असतो । वा मना !
तूं कुठेंहि बघ वा यातें । अपवाद न दिसतिल तूतें । मानसा !
जा जगांत, सुरलोकांत । जा किंवा पातालांत । ,,
राम कीं कृष्ण कीं शंभू । साक्षात् ते दंभ स्वयंभू । ,,
घनवृंद । होउनी धुंद । करी किति फंद
बघुनि चपला तो । पळतां मुइ थोडी करितो । मानसा !

२

हा पहा लफंगा इंदू । नीतिचा न ठावा बिंदू । मानसा !
कुणि म्हणो सुधेचा सिंधू । परि त्या न नयाचा बिंदू । मानसा !
कुणि म्हणो कुमुदवनबंधू । परि त्या न नयाचा बिंदू । मानसा !
वांकला । क्षयें खंगला । तरिहि रंगला
रात्रिचा फिरतो । दिवसा मुख काळें करितो । मानसा !

---

( चालः—अजि म्यां ब्रह्म पाहिलें. )

ललना केवळ माउली । प्रणयविरंजित सुरलतिकेची—
मधु मधु सुंदर सुधारसाची । मूर्ति जणूं ओतिली ॥ ध्रु० ॥
पतिकरितां जी कष्ट निरंतर । करी तिचें तरि गळे न अंतर
संकटिंही जी देइ न अंतर । शितल दे साउली !
जनकनंदिनी रामें त्यजितां । विव्हल एकचि हो भूमाता
दुभंग होउनि तिनें अवचिता । पोटीं ती घातली !
शरण मना जा तिलाची आतां । एक खरी ती समताभिरता
होइल तुजला दुःखीं त्राता । शंका ना राहिली !

---

[ चालः—प्रेम सेवा शरण. ]

पाव गे भूजननि, शरण कन्या तुला,
धांव झणिं जठरविवरिं ठाव दे तूं मला ध्रु०
हतभागि अघसक्त । केली जनें त्यक्त

लाधलें फल उक्त । देह हा पोळला !
जनिं तूंचि समदृष्टि । करिसी दयावृष्टि
पात्रु हें मन तुष्टि । पुरवीं या हेतुला !

---

[ चालः—मी समजुं तरि काय. ]

बा ! इजसि तरि काय दया वद
असे जारिणी जन्मापासुनि जिरे न तरिही अजुनि तिचा मद ! ध्रु०
सूर्यवंशि नृपतींना वरिले । चंद्रकुलीही कमी न केले
अनार्य राक्षस मागुति वरिले । काशि अशि व्हावी सांग हितप्रद ?

---

[ चालः—निजरूपीं जगदाकृति. ]

जग सारें गमतें अजि मातें, जारजारिणीमय झालें तें ध्रु०
भूतलिं वरतीं पातालींही; अपवाद न बा ! गवसे तूतें !
न्यायनिरतमुनि पराशरासम, याच पथाचे अनुयायी ते !
देवाग्रणिही जारशिरोमणि, दोष काय मग तरि इतरांतें ?
खाण जशी ती तशीच माती, जसा शिंपला मोत्यें होतें !

---

[ चालः—धिःकार मन साहिना ]

लज्जा न कधि या जना । व्यभिचारसक्तभू पाहवें ज्या मना
खचित मृत वाटती नर न ते अंगना ! ध्रु०
बघतात माता भगिनी स्वकांता अन्योपभुक्ता झांकूनि नयना !
बसतांहि लत्ता गालिप्रयुक्ता सहती, न वरतीं, करितीहि माना !

---

[ चालः—लग्न नव्हे मरण उद्यां. ]

दोष परी तिजसि कशा । सकल ! जिथें अधम पापि ध्रु०
लाधे जनु नरकिं ज्यांस । निरयचि कैलास त्यांस
औषध का स्वभावास । बदल तया नच कदापि !
रुधिर रुचे गोचिडास । मुख न लावि तो पयास
कर्दमिं रुचि दर्दुरास । कमलमधू कधिं न तो पि !

---

[ चालः—वसंतीं बघुनि मेनकेला. ]

मना तुज कोण वालि आतां ? ध्रु०
अकरुण झाला करुणाघनही सकल जगत्त्राता !
जगीं तुज कोण तरी पुसतो
सहानुभूती शब्दांची तरि कोण दाखवीतो !
कळेना काय गती भावी
एक्या माळेचेच सकल मणि कोण तया ओंवी ?
सुखाची आस जरी धरिसी
अपुल्या पायीं उभे रहाया हवे शिकायासी !
हिताची ऐक एक गोष्ट
स्वतः मेल्याविना न दिसतो स्वर्ग कधीं स्पष्ट !
करीं तुज जेविं रुचे आतां
दोन मार्ग तुज पुढें उभे हे अवलोकीं चित्ता !

[ दिंडी ]

सकल दुःखांतुनि मुक्त व्हावयास
आड व्हावा तुज जवळ करायास;
श्रम न करितां सुखभोग जरी व्हावा
बापलेंकांचा होइ हाटमेवा !

---

[ चालः—जय कृष्णातटवासा. ]

तुजलागीं मनराया । अबला ही या समया,करि विनती येउं दया !ध्रु०
मृत्यु आजि पति वरिते । चितारंगीं ही चढते
हो सहाय अबलेतें । घाबरवी नच हीतें
भयभारें चळतां ते । ने पुढतीं तूं काया !
होवो हा तरि आतां । इजलागीं सुखदाता
दुःखभारसंहर्ता । स्वर्गप्रदपथनेता !
अनुकंपाकुलभर्ता । देवो तो तरि न्याया !

---

[ चालः—आनंदी आनंद गडे. ]

काय बोलसी मृत्यूचें। नको नांवही मति कांचे! ध्रु०
कसेंहि करुनी पोट भरूं। जशी वेळ ये तसें करूं.
याची टोपी शिरिं त्याच्या–। त्याची घालूं तिसऱ्याच्या
देह विकाया बाजारीं। मांडूं किंवा करुं चोरी
थापाथापी। कीं गळचेपी। कांपाकांपी
भयहि न यांतिल कोणाचें। नको नांव परि मृत्यूचें!

---

[ चालः–तुमचें शिव सदा. ]

वदसी वद कसा असें। हें मज बा! ऐकवें न, कर्णीं जणुं तीव्र लहर आग होतसे! ध्रु०
पासुनि या विरम विरम। पथ हा बा! घोर अधम
होइल तुज दुःख परम। साहवें कसें!
बोलाया सहज सुकर। करुं जातां बिकट फार
कृति वाणीपुढतिं हार। सतत खातसे!

---

[ चालः—चंद्रकांत राजाची कन्या. ]

१

पवित्र निर्मल परमोज्ज्वल त्या ब्रह्मकुलामाजीं
जन्मुनियां मी काय करावें हीन कर्म आजी! ध्रु०
नांव केवढें लौकिक किति तो बाबांचा मोठा!
काय आज मी सर्वांवरि त्या फिरवूं वरवंटा!
अंधारांतिल कृत्यें माझीं आधिंच आयकुनी,
मेल्याहुनि ते मेले झाले तेज न लव वदनीं!
राजरोस मी वेश्या आतां झालें हें कळतां,
जीवंत न ते राहतील कीं क्षणही यावरता!
परम सुशीला साध्वी माता तशीच ती माझी,
हाय! जागच्या जागीं होइल दुःखें मृत आजी!

२

पोटीं येउनि काळ होउनी काय तया खाऊं ?
अश्रूचा ध्वज असाच त्यांच्या सदनाला लावूं ?
सकलांसचि ते आज सुखाचें किति झालें असतें ?
गर्भींच जिरलें असतें किंवा बाल्यिंच जरि मरतें
जन्मतांच कीं मातेनें गळिं नख दिधलें असतें
झालें असतें किती बरें परि कुठुनि व्हावया तें !
विधिचें लिहिणें परंतु कैसें हाय टळावें तें ?
' परंतु ' चेंही परि रामायण काय कधीं टळतें ?
त्रिकालदर्शी आदर्शा ! स्थिति पूर्वभावि माझी,
सद्यस्थितिसंन्निकट मांडुनी करिसी स्मृति ताजी !

३

बालपणींचें खऱ्या सुखाचें चित्र मनोरम तें,
डोळ्यांपुढतीं उभें ठाकतें मन तन्मय करतें;
खावें प्यावें सुखें हंसावें यथेच्छ विहरावें,
किंवा होतां न मनाजोगें अश्रुजलीं न्हावें !
चिंतेचें मुळिं जातक नाहीं एक मात्र ठावें,
मनास जें प्रिय तेंच करावें उजवें कीं डावें !
जो गुण बाळा असे उपजतां तोचि जन्मकाळा,
चरित्र माझें सुंदर साधन घ्याया पडताळा !
लाड भयंकर केले मम जे बालपणामाजीं,
त्यांचें फल हें चाखितसें मी मूर्तिमंत आजी !

४

दुर्दैवें पति मला मिळाले परम दुराचारी,
' रूढिविघातक ' जे म्हणवीती अपणां व्यवहारीं !
बुद्धि राक्षसी स्वयंप्रकाशी डोकें भलतेंच,
हृदय साहसी परि न ठाउकी व्यवहारी पेंच !
अफाट शिक्षण अचाट कल्पक परि या सगळ्याची—
माती झाली कारण नव्हती जोड विचाराची !

जे जे जनता म्हणेल त्याच्या विरुद्ध जायाचा
हटातटानें बाणा जणुं कीं होता हा त्यांचा !
विवाह होतां अशी विलक्षण झाली स्थिति माझी,
हासूं किंवा रडूं कळेना स्मृति चित्ता भाजी !

५

' रुचेल तितुका मधु प्राशितो मधुहर नव कमलीं—
बसुनी निर्भय—निर्भयता ही प्रणयाची खोली !
' तशीच मनुजें प्रणयलोलुपें रुचेल ती वस्तु,
खुशाल घ्यावी मुळीं न धरितां मनामधें किंतु
' सांग कशाला कशास किंवा बंध विवाहाचा ?
काय अजवरी कुणीं मांडिला विवाह पक्ष्यांचा ?
' वल्कवासिता विपिनवासिनी विमला वधुवल्ली,
वयोविचक्षण वर्जुनि वरिते विटपी वनमाली !
' मनुजलतांनीं तशी वरावी वस्तु रुचे जी जी, '
विचार त्यांचे असे परिसुनी भ्रमली मति माझी !

६

विकलविचारप्रवाहपतिता पतिता मी झालें,
त्यांच्या एक्या मित्रें मन्मन हरिलें ! चळवीलें !
परम नीच त्या कैवर्ताच्या रम्यरूपजालीं,
सांपडला मम मनोमीन हा मोहुनि त्या कालीं !
नयविनयाचें हृदयावरचें दडपण मग निघुनी,
अनयपथाच्या उतरंडीला गेलें घसरोनी !
गेला गेला पाय घसरला ! खोल खोल गेलें
कैचें वरतीं येणें ? खचलें ! पंकीं मी रुतलें !
संजीवन मम करील तुजविण कोण असा गाजी ?
दयामृताचा करुणासिंधो ! बिंदु एक पाजीं.

७

अनुतापें मी तापुनि जरिही उभी जळत आहें,
कोण मानितो ? दयादृष्टिनें कोण मला पाहे ?

कितिहि वागतां पाय फुंकुनी नाथा ! मी आतां,
डोळे मोडित बोटें दावित निरखिल मज जनता !
काय पाप कीं केलें न कळे अह्मीं योषितांहीं
सदासर्वदा पापदृष्टिनें जग आह्मां पाही !
नको जिणें हें प्रभो ! अमंगल आला मज वीट—
आला पुरंता ! तार तार ये धांवत बा ! नीट !
दीनदयाळा ! करीं तांतडी धीर न मज आजी,
आग लागली भडका झाला करुणामृत पाजीं !

---

( चालः—प्रेमभावें जीव जगिं या. )

तूंचि जागा एक अससी । सदया । मंगल यदुराया ! ध्रु०
मम या परम शांती जीवासि द्याया । नवघनकाया !
चरणीं शरण तारीं दीना ! पापशमना ! अयि जितमाया !

---

[ चालः— विनयहीन वदतां नाथा. ]

मुळिं न धीर मजला श्यामा ! येइं बा पावननामा ! ध्रु०
निजजनाविश्रामा ! आरामा ! गुणधामा ! करिं न मला—
हतकामा ! श्यामा !

---

[ चालः—दासी ऐसें मानुनियां. ]

येइं येइं यादवभाई । वाट तुझी किती पाहुं,
शोधुं कुठें कुठें पाहुं जाउं कुठें किती साहुं;
वाहुं किती वाहुं किती कोठवरी अशी राहुं,
घाळशील सांग कधीं प्रेमरसीं मला नाहुं ?

---

[ चालः— या हो सज्जनजन हो. ]

आला । कृपासिंधु हा आला । दीनबंधु हा आला !
पाउल वाजे कर्णीं गाजे भाग्योदय कीं झाला । ध्रु०

कितिहि वागतां पाय फुंकुनी नाथा ! मी आतां,
डोळे मोडित बोटें दावित निरखिल मज जनता !
काय पाप कीं केलें न कळे अह्मीं योषितांहीं
सदासर्वदा पापदृष्टिनें जग आह्मां पाहो !
नको जिणें हें प्रभो ! अमंगल आला मज वीट-
आला पुरता ! तार तार ये धांवत बा ! नीट !
दीनदयाळा ! करीं तांतडी धीर न मज आजी,
आग लागली भडका झाला करुणामृत पाजीं !

---

( चालः–प्रेमभावें जीव जगिं या. )

तूंचि जागा एक असशी । सदया । मंगल यदुराया ! ध्रु०
मम या परम शांती जीवासि द्याया । नवघनकाया !
चरणीं शरण तारीं दीना ! पापशमना ! अयि जितमाया !

---

[ चालः— विनयहीन वदतां नाथा. ]

मुळिं न धीर मजला श्यामा ! येइं बा पावननामा ! ध्रु०
निजजनाविश्रामा ! आरामा ! गुणधामा ! करिं न मला-
हतकामा ! श्यामा !

---

[ चालः–दासी ऐसें मानुनियां. ]

येइं येइं यादवभाई । वाट तुझी किती पाहुं,
शोधुं कुठें कुठें पाहुं जाउं कुठें किती साहुं;
वाहुं किती वाहुं किती कोठवरी अशी राहुं,
घाळशील सांग कधीं प्रेमरसीं मला नाहुं ?

---

[ चालः– या हो सज्जनजन हो. ]

आला । कृपासिंधु हा आला । दीनबंधु हा आला !
पाउल वाजे कर्णीं गाजे भाग्योदय कीं झाला । ध्रु०

प्राण । झाले जणुं गतभान । आनंदांत विलीन
करितां प्रेमें विमलमनानें नामसुधारसपान
बाष्प । झरती झरर अपाप । प्राशुनि ते निष्पाप
नाचूं लागे प्राणमयूरी विसरुनि चेतस्ताप
धाला । जीव शांतिरस प्याला । ताप लयाला गेला
वाटे जणुं कीं शीतल मंगल सुधास्यंदनीं न्हाला !

* * *

[ मंदाक्रांता. ]

आला तेव्हां द्रुतपदिं युवा त्या स्थलीं एक कोणी,
हास्या लास्या करित जवळीं जाय जों त्या वधोनी—
पश्चात्तापें तनु [1]तनु जिची जाहली फार होती,
किंकाळानी सभय पडली भामिनी भूमिला ती! १
ज्यानें केलें तिज अपथगा तोच तो दुष्ट जार,
आला होता, विरचुनि नवे अन्य पापप्रकार;
गेला वेगें परत फिरला पाहतां मूर्च्छिता ती,
सौख्याचे कीं सकल असती सोबती लोकरीती ! २
शुद्धी बुद्धी सकल सरली मूर्च्छना तीव्र झाली,
प्राणज्योती त्वरितचि तिची त्याच जागीं निमाली;
नीतीभ्रष्टा चटुलवचनी भृंगवृत्ती नराच्या,
झाली कामानालिं हुत अहा ! भंग त्या काय नीचा ! ३

* * *

मोहोनीयां मनुजफणिच्या शीतलालिंगनास,
झाली जी का विषकलुषिता आंचवे जीवितास;
केली सत्त्वच्युत नव कळी चुंबुनी [2]दुष्कुमारें,
होई अंतीं मृतिवश अहा ! साधिला डाव मारें ! ४
ऐसे भुंगे विषधर फणी गृध्र ज्या ज्या समाजीं
नीती भीती पिउनि कुशली हिंडती स्वैर आजी;
साक्षेपें त्या हुडकुनि करा स्पष्ट लोकीं फजीत !
धिःकारोनी निशिदिनिं तसें त्यां मृतप्राय चीत ! ५

१ कृश. २ मदनानें.

[ स्रग्धरा. ]

हा ! हा ! ज्या वंभरानें प्रशमित अपुला कामदावा कराया,
होमीयेली अहा ! ती अभिनव कलिका कीं मृगीचारुकाया;
ऐशा त्या राक्षसा तन्नव कृतिफल हें अर्पितों तें बघोनी,
पश्चात्तापें जळो तो जळुनि झुरुनियां शुद्ध होवो निदानीं ! १

---

# स्वर्गाचे द्वारांत—

[ वृत्त शार्दूलविक्रीडित. ]

शय्या भूतल त्यावरी भुज उशी दिङ्वस्त्र अंगावरी,
घेवोनी सहजीं सुखें पहुडलों लावोनि दृष्टी वरी;
रात्रीं रम्य नितांत शांत समयीं चिच्छांतिलाभास्तव,
होतों भक्तिभरें करीत हरिखें श्रीरामकृष्णस्तव. १
आली नीज कशी कळे न, निमिशीं होवोनि अंतर्मुख,
लागे सेंद्रियवृत्ति मी अनुभवूं एकांत अंतःसुख;
सारीं ऐहिक बंधनें तुटुनियां निर्मुक्त होवोनियां,
गेलों स्वप्नसुखाधिराज्यें सहसा निर्वंध रंगोनियां. २
होतों जात जवें कुठें वरिवरी कांहीं कळेना मशी,
नक्षत्रें ग्रहगोल सर्व चढलों उल्लघुनी मी शशी;
तेजाचीं वलयें नभांत दिसती खालून जीं पाहतां,
तीं सारीं दिसलीं मला पदतलीं आतां पुढें चालतां. ३
टाहो फोडि मयूर जेंसि बघतां चित्तांत संमोहुनी,
भास्वद्बर्हिकलापही विकसवी चक्रापरी नाचुनी;
पोषी जी जगता सुधा वितरुनी दुर्भिक्षसंहारिणी,
वंदीं ती कमनीय काव्यकमला कारुण्यकादंबिनी. ४
स्वच्छंदें अवगाहतां मुदभरें आमंद शीतोदकीं,
गेलों वाहत मंदमंथरगती जों मग्न मी त्या सुखीं;

तों मातें दिसली पुढें पसरली स्वर्गीय मंदाकिनी,
प्रक्षाळीत पदें तिथेंच पुलिनीं मी बैसलों रंगुनी.　५
स्वर्गंगांबुतुषारहार पडतां येवोनि माझ्या गळां,
बाह्याभ्यंतर होउनी अनघ मी तेजें दिसें आगळा;
जाई जों पुढतीं तदा हळुहळू वेंघोनियां अंबर,
आली दृष्टिपथीं पुरंदरपुरी तेजोमयी सुंदर.　६
रथ्या केशररागरक्तरुचिरा रत्नप्रभारंजिता,
कल्पच्छाय, मनोज्ञ शीतपवनें, तैशा सुधासिंचिता;
पुण्या पुष्करिणी श्रमापहरिणी पीयूष-उत्फुल्लिनी,
गाया तद्विभवा हवा कवि कुणी यद्वाक् सुधास्यंदिनी.　७
औत्सुक्यें त्वरया तया पुर-महा-द्वाराकडे मोहुनी,
गेलों जों बघुनी चमत्कृति अशी, मी जाय भांबावुनी;
नानादेशविशेषवेशजनता द्वारीं प्रवेशावया,
होती यत्न करीत थोर वशिले दूतास लावूनियां.　८
काढोनी पथ त्या भिडेंतुनि तशा यत्नें महात्मा कुणी,
द्वारासंनिध जाय जों लगबगा दूतें तया रोधुनी;
'उच्चारा' वदला 'अहो सुकृति ज्या केल्या तुम्ही स्वर्ग—दा,
जावें निर्भय मंदिरांत मग या उल्लंघुनी ही गदा.'　९
'कोणाचा पथ रोधितोसि मशका! ठावें न मी कोण का?
होतों मी सर—नामदार जगतीं हो दूर दुर्धर्षका!
कार्यै भूपतिचीं अनेकविध मीं सोत्साह संपादिलीं.
कार्यांची गृहिंच्याहि रे न तितुकी चिंता कधीं वाहिली!　१०
बाळांचे नच लाड म्यां पुरविले घेवोनि उत्संगि तीं,
शय्यालापनिका तशा न कधिंही केल्या सखीसंगतीं;
पोटोबाहि न पूजिला सुखभरें कैंचा विठोबा तरी,
नाहीं शांतपणें कधीं पहुडलों, मी मग्न कार्यांतरीं!　११
भूपाराधन 'केविं होय करिं या' हें एक म्यां चिंतिलें,
त्याचें सुंदर लाधलें फल मला धन्यत्व संपादिलें;
देशाचे हितपालनीं अनुदिनीं म्यां वेंचिला काल कीं,
पाडा हा कृतिचा पुरे तुजसि कीं वाचूं पुढें आणखी?'　१२

दृश्यादृश्यहि वस्तुजात अवघें ब्रह्माश्रयें निर्मिलें,
तत्त्वा या अनुवादुनी अनुभवा आणोनि सर्वां दिलें;
ब्रह्मीं भेद न अल्पही विलसतो स्त्री, वैश्य कीं शूद्र हा
साधार प्रतिपादिलें ठसविलें तत्त्वोपदेशें महा ! २७

जैशी निस्तृण भूमिका समुचिता बीजादि रोपावया,
तैशी निर्मलचित्तयुक्तयुवती उत्कृष्ट बोधावया;
प्रामुख्यें गुणधर्म हा बहुपरी नारीमधें सांपडे,
योषिज्जाति अनुग्रहार्थ म्हणुनी भारी मला आवडे ! २८

नारी ही मनुनिर्मिता फलवती सद्भूमिका कामदा,
भूमीचा गुण उद्भिजीं उतरतो संमान्य हेंही सदा;
बीजाचा त्यजुनी विचार म्हणुनी म्यां भूमि संशोधिली,
त्याचें हें फल आजला भरतभू साक्षात् पहा पावली ! २९

आहे आणिक लाभ एक दुसरा स्त्रीजातिला बोधुनी,
तो मी प्रांजल सांगतों शुचि मनें घेई गड्या ऐकुनी;
शंकासंकुल मानवापरिस ती श्रद्धालु नारी भली,
आनंदें सहयोग तीच म्हणुनी म्यां नित्य सद्बोधली ! ' ३०

' जीवन्मुक्त यतीप्रती तुजपरी हें योग्य नोहे स्थल,
निर्मायास हवी तुझ्यास्तव गमे स्वर्भू दुजी निर्मल;
विश्वब्रह्म दिसे समस्त तुज ज्या अत्यंत चेतोहर,
शोभे ब्रह्मविलासमंदिर तुला जा रौरवीं सत्वर ' ! ३१

* * * *

जाती जों गुरुराज खिन्नवदनें शोकाकुलें मानसें,
आला एक तिथें वयोधिक कुणी याच्चित्त थारीं नसे;
मुद्रा द्राष्ट, विचारशील परि ती, गंभीरवृत्ती तशी,
दृष्टी भेदक, तीव्र रक्त, दिसली तद्रूपरेखा अशी. ३२

येतां तो जन मंदिरानिकट त्या लागे पुसूं रक्षका !
'तूं कां रोधिसि आमुचा पथ असा फूत्कारुनी तक्षका !
यत्काव्यामृत वाञ्छिती अमरहि प्राशावया सर्वदा,
त्या या सत्कविराजराजितिलका तू नेणसी दुर्मदा ? ३३

शैलोत्तंस हिमाद्रि मंदरगिरी कीं विंध्यसह्यादिका,
तैशा त्या भुवनप्रसिद्धविपिना वृंदावना दंडका;
कालिंदी शरयू सुधा गिरिसुता कीं सिंधु मंदाकिनी,
आहे ठाउक का कुणी अमरता यांतें दिली या जनीं ? ३४
रेणूपासुनि सूक्ष्मसूक्ष्म अगदीं ब्रह्मांडपर्यंत, ही,
माझी वा ! जगती असे उपकृता हें मान्य देवांसही;
काव्यें सुंदर भारतादि नसती आम्हीं जरी गाइलीं,
देवातें तव सांग कोण पुसतें या धूर्त पृथ्वीतलीं ? ३५
आहे ज्यापरि वर्णिलें दशमुखा रामायणीं संप्रती,
तैसा तो नसताच काय महती ये रामचंद्राप्रती ?
रामाला स्तवनार्हता मजमुळें कृष्णाप्रती कृष्णता,
देई नारकरूप मीच नरका स्वर्गा तशी स्वर्गता ! ३६
रामस्थापन मंदिरीं न घडतें येता तिथें रावण,
गाता अर्जुनकीर्ति कोण ? कुरुचा होतास वंदीजन !
राष्ट्राला उदयास्त दान करणें संपूर्ण हें मत्करीं,
सांगूं काय, सजीवताहि तव जी तीही मदिच्छेवरी ! ३७
सृष्टीचा अवघ्या जडाजड जसा सर्वेश तो निर्मिता,
तैसा शाब्दिक सृष्टिचा विधि असे मी एक रे तत्त्वतां; '
बोले रक्षक तैं तया कविवरा, ' वाटे तुला का कवे !
भाषेनें असल्या वधेन ? परि तें केव्हांहि ना संभवे ! ३८
आत्मप्रौढि कुठें कवे ! तव, कुठें ती व्यासशालीनता ?
कोठें ती गुरुभक्ति आद्यकविची कोठें तुझी दृप्तता ?
कोठें ती रमणीय वाङ्मधुरता त्वद्रूक्ष वाणी कुठें ?
कोठें ती रविची प्रभा वद तशी खद्योतदीप्ती कुठें ? ३९
लागे का रविची प्रभा शुभकरा दावावया दीपक ?
गाया श्रीमधुमाधवीय महिमा व्हावा कशाला पिक ?
' मेघावांचुनि तोयवृष्टि न घडे ' हें तत्त्व सांगावया,
व्हावी काय मदोत्कटा शपथ रे प्रत्यक्ष वाहावया ? ४०
ज्यांचें तेज निसर्गसिद्ध असतें लागे न त्या वर्णन,
मातृप्रेम कसें सुतीं विलसतें, त्याचें नको कीर्तन;

रामाचा महिमाच दिव्य इतुका कीं त्या चिरंजीविता,
व्याया तूं नलगेसि; कीट गरुडा दे का खगस्वामिता ? ४१
सृष्टीची रमणीयता विविधता पाहूनियां उज्ज्वला,
मूका कांचनपंजरस्थित शुका ! वाचा फुटे ही तुला !
ज्यांची थोर कृपा म्हणून तुज ही पीयूषवाक् लाधली,
त्यांची ती उपकारिता कविकुमे ! त्वां फेडिली ही भली ! ४२
ज्यांना तूं नवकल्पना म्हणवुनी दाऊनि काव्यांतरीं,
स्फूर्तीचे दृढपक्षयुग्मिं बसुनी घेसी भराऱ्या वरी;
' विश्वातीत खरोखरीच असती ' या आपुल्या कल्पना,
वागे हे जरि मानसीं तव असे खोटी तुझी भावना ! ४३
विश्वातीत अशी न वस्तु विलसे बा ! जन्मजन्मार्जित—
नाना संस्कृति सुष्ट दुष्ट तव ज्या, त्यांचींच जीं निश्चित—
रूपें मूर्त हृदंतरीं विनटती-त्या या तुझ्या कल्पना;
ध्यानीं कीं मनिं जें सदा भ्रमतसे स्वप्नीं दिसे होय ना ? ' ४४

* * * *

तत्त्वान्वेषक तर्कवाद उभयीं जों त्या असा चालला;
कोणी तों तिसराच दत्त म्हणुनी तेथें उभा ठाकला;
बोले, ' काय पहा नशीब-गुण हा मी ज्या स्थलीं जातसें,
कज्जाभांडण वाढुनीच जणुं कीं तें ठेविलेलें दिसे ! ४५
कज्जाकैफियती सदा निवडितां गेला तळीं जन्म हा,
आलों येथ तरीहि तेंच अगदीं हा योग कैसा पहा !
द्यावाभूमि तलातलादि सगळें ब्रह्मांड संव्यापुन,
देवांनाहि उरे पुरोनि कालें जो त्यातें असो वंदन ! ४६
आलां कां तरि वर्दळीस इतुके ? येथें असें भांडणें,
नाहीं हो उभयांसही उचित कीं, हें काय मीं सांगणें;
गर्दी कां इतुकी इथं जमविली व्हा दूर मागें सरा,
आलें कोण, कशास, दाद न तुम्हां ! हा छान हो पाहरा ! ४७
वर्दी जाउनि आंत द्या झणिं उभा मी येथ आहें असा,
थांबा; हें इतुकें नकोचि अथवा हा मीच जातों कसा;

बोलोनी जन तो प्रतिष्ठितपणें जों आंत जाया निघे,
नेत्रीं त्यास दटावुनी करि गदा सक्रोध तो दूत घे. ४८
लीनत्वें मग तो वदे वरमुनी ' वा ! का असा कोपसी ?
घे ही पानसुपारिला चिरिमिरी आतां तरी का खुषी ?
झाली वा असली कसूर जरिही कार्यी तुझ्या हातुन,
माफी मी करवीन खास तुजला स्वामीप्रती सांगुन. ४९
झालें कारण काय हो तरि वदा तुम्हांस भांडावया,
दोघांची समजूत सत्वर करूं या तोड काढूनियां,
घेतों मीच वकील-पत्र लिहुनी फिर्यादही मांडतों,
न्यायाधीश असो कुणीहि, मथवृं चिंता नको सांगतों ! ' ५०
बोले रक्षक तो प्रकार बघुनी साश्चर्य त्या हासुनी,
' आहों आपण आजही मृतिभुवी, वाटे तुला का मनीं ?
नोहे ही तव मृत्युभूमि परि वा ! नांदे जिथें आपदा,
दुःखांचा बहुसाल जेथ भरला बाजार तैसा सदा ! ५१
येथें शांति समृद्धि नित्य विलसे तेथें सदा ती उणी,
कज्जे येथ न चालती, परि तिथें होई तयांची दुणी;
झाला वाद पुरे, वदे सुकृति ज्या केल्या तुवां स्वर्गदा,
जाई निर्भय मंदिरांत मग या उल्लंघुनी ही गदा. ' ५२
' केव्हां वक्र विनोदशील अथवा सव्याज निर्व्याज कीं,
केव्हां रम्य कधीं कधीं सरळ कीं केव्हां तसे घातकी:
नाना प्रश्न असे करोनि इतरां ज्या म्यां सदा हांसत,
घ्यावे जाबजबाब नित्य लिहुनी मातेंच त्या सांप्रत—५३
यावी वेळ करावया कथन कीं जें जाहलें हातुनी—
तेंही निर्दय सेवकापुढतिं या दुर्भाग्य ना याहुनी;
होई सादर मानसा ! चल पुढें आल्या प्रसंगाप्रति;
वारा येइ जसा तशीच सहसा द्याया हवी पाठ ती ! ५४
होतों ख्यात जनीं वकील म्हणुनी कीं लोकसेवाव्रती,
लोकां बोधुनि देशकार्यविषयीं म्यां आणिली जागृती;
चालू राष्ट्रियजीवनार्थकलहीं व्हाया स्वदेशोन्नत
केले सोसुनि झीज यत्न बहु मीं ते सर्वलोकश्रुत. ५५

बाकी धर्म तुवां कितीक धरिला सोडोनि पेयाशन,
याचा आठव होइ काय ? करितों वा मीच तद्वर्णन ! ६३

' बीजारोपण दारिं मीं करुनियां जो वृक्ष संवर्धिला,
नाहीं कीं प्रतिबंध जेविं मजला भक्षावया तत्फला;'
ऐसा तार्किक वाद तूं लढवुनी कन्येप्रती सेविलें !
हेंही धार्मिक वेड तूं म्हणुनि का पायांतळीं मार्दिलें ! ६४

' खोटे साक्षि तुवां किती करविले खोट्या सह्याही तशा;
केले कागदही बनावट किती रोखे तसे साहशा !
मिथ्यारोप तुवां नवे विरचुनी दीनांवरी लादले;
हेंही धार्मिक वेड तूं म्हणुनि का पायांतळीं घातलें ?' ६५

' वस्तू पाहुनि चाखुनीहि अथवा हाटांत घेतों जशी,
कांता काय नको परीक्षुनि गृहीं आणावयातें तशी ? '
ऐसें बोलुनि तूं कितीक तरुणी—कौमार्य उच्छेदिलें
प्रौढोद्वाह असाच ? हेंच यश का भूलोकिं संपादिलें ? ६६

येतां स्वर्गी तुझी सती सहचरी, त्वां ठेविली सत्तमा—
णी वेतन देउनी गतधवा संसारकार्यक्षमा;
मेल पंदिरिं रात्रिं जें तिजसवें नातें तुवां जोडिलें,
गेली ह पुनर्विवाह तव का ? आतांच ज्या वर्णिलें ! ६७
वेश्या हो
साऱ्या कृति काय ज्या तुळुनि त्या पापासवें पाहतां,
आनंदात ड पारडें ताळें, दुजें स्वर्गी चढे तत्त्वतां;'
होती नय कसा तुझ्याच वदनें; मत्पाप राहे तळीं,
शोकामात इथें न वास मग का देशी मला या स्थळीं ?' ६८
कांहीं काी मांडिसी मजसवें तूं शब्द-चाहाटळी,
सारासार कळींपुढें वरळणें तूं या स्थळीं निर्बळीं;
इच्छा मी श्रंदिरीं सनद घे तेथें वकीली करीं,
सत्त्वश्रेष्ठ समस्त सर्व पाहिलें आणूं इथें सत्वरीं !' ६९
माझा दुष्परिणे * * *
संतापें अविचारकील सरला वाजूस जो त्या क्षणीं,
संज्ञा ' खून ' म्य तरुणी येई स्थलीं त्या कुणी;

ओचे हातिं धरून मंथरगती डौलामधें चालतां
आकर्षी जनलोचनें समन ती लावण्यलीलालता! ७०
बाहू पद्ममृणाल पद्म मुख तें लावण्यलीला जल,
मध्या तीर्थशिलाच मत्स्य नयनें केशावली शैवल,
तेवीं ते स्तन चक्रवाकयुग कीं जे मारबाणानलें,
झालें दग्ध तयां तडाग विधिनें हें चालतें निर्मिलें ! ७१
आली संनिध जों न ती मदनिका द्वाःस्थें तिला रोधुनी ,
केले प्रश्न ठरीव तों हसत ती बोले तयालागुनी;
'कां हो नाइक वाट ही धरितसां ? ही काय रीती बरें ?
एकाकी अबला, नका करुं असें; द्या वाट सोडा त्वरें ! ७२
वागावें तरि केविं; हें न कळतें खालीं वरी सारखे,
आम्हांलाच जगांत खास बसती जातां कुठेंही धक्के !
पानें तीनच लागतात पळसा जा देशिं कीं कोकणीं;
केलें पातक आम्हि काय न कळे जन्मास या येउनी ? ८८
येवो दृष्टिपथीं कशीहि ललना साध्वी सती जारिणी
तुम्हां सर्वचि सारख्या; बघतसां मागें पुढें होउनी;
डोकीची पगडी जरीहि पडली माडीकडे पाहतां,
धक्के तेंवि परस्परांस बसले मार्गांतुनी चालता— ८९
दुर्लक्षें पद धोतरीं अडकुनी साष्टांग लोटांगण—
होतां हासतसां परी न गमते लज्जा तुम्हांलागुन;
जादू काय अशी अम्हांत विलसे कीं तुम्हि संमोहुनी
देहाचीहि न काळजी करितसां नारीमुखेन्द्वीक्षणीं ! ९०
माळेचे मणि सारखेच सगळे कोणा न कोणी भिती
नेत्रांचें अपुल्या अम्हांस बघुनी हे पारणें फेडिती !
माता कीं भगिनी तयां न असती पाहावयाला जणूं
किंवा त्या पुरुषायिताच दिसती नेत्रां तयांच्या म्हणं ९१
चोरी होय अम्हां अशी भर दिसां मार्गांत हिंडा
रात्रींची मग हो मुळींच नलगे ती गोष्ट सांगा!
राहो; मी अबला मला न कथितां ये काय गो,
माझें मीच चरित्र साग्र कथितें येईल सं! ९२

झाला जन्म मदीय पुण्यनगरीं दीन द्विजाचे कुलीं
होतों आम्हि तयास सर्व मिळुनी बारा मुलें नी मुली;
प्रत्यब्दीं अमुचें कुटुंब तरिही वृद्धीच तें घेतसे,
दारिद्र्य प्रिय त्यासवें अनुदिनीं लागे धरूं बाळसें ! ७८
घेई वाढ जसा प्रपंच चिमटा पोटा बसूं लागला,
होतों जेवित एकदा परि पुढें तो नेमही मोडला;
सोंगें सर्व कशींबशीं पुरवतीं मध्यान्हचिंता परी,
कोणाला पुरवें ? यतीहि चळती; आम्ही मनुष्यें तरी ! ७९
एरंडापरि मी स्थितींतहि अशा भारीच कीं वाढलें,
येई जों अपुल्या पणांत सहजीं अंगीं भरूं लागलें;
रूपानें जरि अप्सराच नव्हतें होतें दहांचे परी,
नाहीं शिक्षण लाधलें र ट फ मी वाचीत होतें तरी ! ८०
होत्यें योग्य तरी न लग्न घडलें लाभे न कोठें स्थल,
केले यत्न अनेक सर्व परिनीं झालें परी निष्फल !
द्रव्याभाव जिथें तिथें मज नडे जन्मस्थ पापग्रह,
गोळा मी जरि पोटचाच गमल्यें आईसही दुःसह ! ८१
मेंहा येउनि एकनाड मजला लग्नाविणें राहिलें;
गेलीं लंघन तैं विवाहविषयीं माझें असें जाहलें;
वेश्या ही अठरांतुनी उतरुनी आल्यें विशीचे घरा,
सान्या बोलति , 'मृत्यु हाच उरला आतां हिला नोवरा !' ८२
आनंदा वणवा मनीं धुमसुनी संत्रस्त झाला पिता,
होती मृत्युकळा तदीय वदनीं चित्तीं नुरे शांतता;
शोकाक्रान्तद्विमनस्कता निरखितां काळीज लागे तुटूं
कांहीं जीवहि होउनी जड मला सारेंचि वाटे कटू ! ८३
सारासार कि पित्या कसें करु तरी ' ? चिंता मला ही जडे,
इच्छा निश्चय कांहिंही न ठरतां दुःखें सदा मी कढें;
सत्त्वश्रेष्ठ शिरपूं मनांत झुरुनी खंगावया लागतां,
माझा दुष्परिणाम हीस ' माय वदली ' बा ! अंत ना पाहतां ' ! ८४
संतापें अविचारी पित्यां जड अशी मानोनियां हें मनें,
संज्ञा ' खून ' यास सजलें कंटाळवाणें जिणें;

ध्यावी स्नेहलतेपरी निजतनू अग्नीमधें जाळुनी !
ऐसा तैं करुनी विचार बसल्यें खोलीमधें जाउनी ! ८५
वस्त्रीं ओतुनि तेल म्यां लगबगा काडीहि कीं ओढली,
आतां चेतविणार तोंचि गळली मावार म्यां घेतली;
हातें होइ न कर्म घोर असलें पाहोनि कूपावरी,
गेल्यें वेगभरें करीं जलमिषें घेऊनियां घागरी ! ८६
जावा जीव जवें म्हणोनि वसनीं पाषाणही बांधला,
आतां जों तनु लोटणार उदकीं तों जीव कांचावला;
आहे फार, विचारकर्मयुगिं या स्वर्भूमिचें अंतर,
जाणोनी स्वमनीं गृहा परतल्यें लाजोनि मी सत्वर ! ८७
माझी जन्मकथा इथें न सरली मध्यें परी संप्रती,
थोड्याशा विषयांतरेंहि कथित्यें अस्मत्समाजस्थिति;
पूर्वीचा इतिहास कीं पुनरपी आवृत्त होतो असें,
आल्यें ऐकत भारतीं अनुभवा तें आजला येतसे. ८८
होता मानवविक्रयक्रय सुरू अन्यत्र पूर्वीं जसा,
काशीखंडिं इथेंहि तो सुरु हरिश्चंद्रीय कालीं तसा;
कोणी याउपरीं उदार पुरुषें ही रूढि उच्छेदिली,
येथें आज तिची सुधारुनि नवी आवृत्ति हो काढिली ! ८९
लग्नाला वर आजि योग्य असती विप्रादिकीं जे कुणी,
हुंड्याचा जड आंकडा लिहुनियां त्यांच्या गळीं बांधुनी
चाले खास लिलांव तो भर दिसां बाजारभावापरी,
जो जैसा चढवील अंक, नवरी जाई तयाचे घरीं ! ९०
हुंड्याची बहु दुष्ट चाल असली प्रत्येक जो निंदितो,
कन्येच्या अपुल्या विवाहसमयीं मोडावया इच्छितो;
पुत्रोद्वाहिं परी स्मरे न पहिलें तो तोंचि कन्यापिता,
हुंडा मागुनि ओढुनी धरितसे, कैशी पहा न्याय्यता ! ९१
याचे ते परिणाम घोर घडुनी भोगावया लागले—
दोघांतें समही, परंतु तिकडे ना लक्ष कोणीं दिलें.
लग्नावांचुनि राहिल्या बहु मुली तैशीं मुलें राहिलीं,
तारुण्योन्मदजन्य घोर नरकीं डुंबावया लागलीं ! ९२

द्रव्याभावें सदा-कुवार अशि मी लग्नाविणें राहतां,
माझें पाउल वांकडें पडुनियां मी होय सत्त्वच्युता !
पापी तें ठरुनी जनैकनयनें त्यांहीं मला निंदिलें,
त्याचें वाइट वाटलें न मजला शांतान्त मी राहिलें ! ९३
व्हावा त्रास न अल्पही स्वपितरां आप्तांहि माझ्यामुळें,
गेहत्याग स्वयें सुखेंचि करुनी केलें तयां मोकळे;
'आतां काय पुढें ' विचार असला जों मी करूं लागल्यें
सुष्टासुष्ट मनीं तरंग उठुनी काहूर तें दाटलें ! ९४
अन्यायी नसतां सजूं उगिच का हा जीव मी द्यावया ?
पाळाया नयनीति काय असती बांधील मात्र स्त्रिया ?
नीतीची पुरुषांस चाड सहसा कां ती नसावी तरी ?
अन्यायप्रतिकार हा न करुं कां ? शक्ती न का मत्करीं ? ९५
नाहीं होत विकारसंयम नरां कैसा स्त्रियांना तरी,
ज्या द्रव्यीं घडलें नरास विधिनें त्यांहींच तो स्त्री करी;
एकाचा व्यभिचार सह्य ठरुनी निष्पाप तो नांदतो,
एकीचा उठवी जगांतुनि तिला अन्याय कीं न्याय तो ? ९६
मेल्यें मी जरि या स्थितींत असल्या कांहीं न तेणें घडे,
गेली स्नेहलता म्हणोनि भरतीं का बंद हुंडा पडे ?
वेश्या होउनि काय मी स्वकृतिनें घालूनि देऊं धडा ?—
साऱ्या आज कुमारिकांप्रति हटे; होवो किती ओरडा ! ९७
आनंदांत यदन्त तो घडतसे गोष्टी अशा मोहक,
होती ना परिणामकारक कधीं किंवा न सद्बोधक;
शोकामाजिं यदीय शेवट घडे त्या दुःखदायी जरी,
कांहीं काळ तरी ठसा उठविती स्वप्रेक्षकांचे वरी ! ९८
सारासार असा विचार करुनी सर्वप्रकारें तदा,
इच्छा मी मनिंची सुखें पुरविली नेणोनि दुःखप्रदा;
सत्त्वश्रेष्ठ समाज आज अमुचा निद्रेत जो घोरत,
माझा दुष्परिणाम हा बघुनियां होवो तरी जागृत ! ९९
संतापें अविचारमूल तिमिरीं जो होतसे घात कीं,
संज्ञा ' खून ' अशी तयास मिळुनी कर्ता ठरे घातकी;

शौर्यें जो रणदेवतेस समरीं खड्गें बळी अर्पितो,
त्याचें कृत्य जगीं न निंद्य ठरतां सन्मान तो लाहतो ! १००
चोरी जो जठरार्थ दीन करितो रात्रीं घरें फोडुनी,
संज्ञा ' चोर ' अशी तयांस मिळुनी तो निंद्य होतो जनीं;
क्रूरत्वें परि जाळपोळ करुनी जो देशचे देशहीं,
उध्वस्तोनि अरण्यभीषण करी तत्कीर्ति गाई मही ! १
स्वार्थानें अथवा अकारणहि जो वाहाडकर्मा करी,
पावे कीं जगतीं अनादर सदा तो चोरजारापरीं;
राजाज्ञे परि तेंच कर्म करितां भूपाळचाराग्रणी,
पावे राजसभेंत मानहि तसा संकीर्त होतो जनीं ! २
तेवीं यत्करिं पापकर्म घडलें जाणोनि कीं नेणुनी,
तीतें सर्वचि लोक निंद्य गणती ' चांडाळिनी ' मानुनी;
वेश्या ज्या व्यभिचारिणी श्रुत महानंदा सती पिंगला,
लोकीं त्यांस दिलें सतीत्व भरतीं मानूनियां मंगला ! ३
चोरी, वाहाडि, जार कर्म, घडलीं अल्प प्रमाणीं जरी,
लोकीं वर्ज्य तयांस सर्व गणती निंदोनि नानापरी;
कर्में तींच परी भितां न जगता मोठ्या प्रमाणामधें,
जो कोणी करितो तयास जनता हा ! तीच गाते मुदें ! ४
सारांश जन जो भिवोनि जनते, पाऊल फुंकूनियां,
वागे या जगतीं समाज बघतो त्या पायिं घालावया;
देवोनी पद जो समाजशिखरीं उन्मत्तसा नाचतो,
त्याचें तोच समाज कौतुक करी; प्रेमादरें वंदितो ! ५
चामुंडादि अनेक उग्र धरुनी रूपें सतीनें पुरा,
रक्षः शुंभनिशुंभ मर्दुनि जशी ही धन्य केली धरा;
तैसें राष्ट्रिय कार्य आपण करूं इच्छा धरोनी मनीं,
हुंडा–राक्षसमर्दनार्थ नटल्यें वेश्या स्वयें होउनी ! ६
ऐशी म्यां नव युक्ति ही विरचुनी सश्रेय संपादिली,
आपत्तींतुनि या भयंकर महा म्यां मायभू रक्षिली;
कोणी कांहिं म्हणो निरखंदुनि मला म्यां मार्ग जो शोधिला,
तेणें, स्वर्गद पुण्यलाभ युगपद् सानंद तो जोडिला ! ७

स्त्रीवागस्खलित प्रवाह असला दूतें तया पाहुनी,
बोले ‘ या तव भाषणें चतुरिके ! संतोषलों मी मनीं;
केला यत्न समाजकंटक तुवां काढावया कंटकें,
नाहीं श्रेयद सर्वकाल सगळ्या गोष्टींत तो आयके ! ८

नीतिभ्रष्टसमाजशुद्धिकरणा केलें तुवां काय जें,
त्यायोगें उलटें अधःपतन गे झालें पहा कीं तुझें;
केली खांच धरावया वनगजा तीमाजि तो सांपडे—
कर्ता जेविं अये ! चुकोनि सहसा तेवीं न का हें घडे ? ९

येतें शासनकार्य हें तुज करूं अन्य प्रकारें जरी,
होता प्राप्त निवास खास तुजला येथेंच या मंदिरीं;
बुद्धीचा उपयोग योग्य अपुल्या केला न तूं त्यामुळें,
दुर्दैवें कपिहस्तकीं मणि पडे तैसेंच हें जाहलें ! १०

जाई यास्तव आजि मर्त्यभुवनीं होतांचि पापक्षय,—
लाभेल स्थल हेंचि खास तुजला राहीं मनीं निर्भय !’
दूताचें वच ऐकतांच ललना बाजूस जों जाहली,
झोंके घेत मतंगजापरि कुणी आला जवें त्या स्थलीं. ११

* * * *

भारी दोंद विशाल धान्य—कणगी डेराच कीं रांजण,
डोकें सान किती जणूं सुगड तें घालावया झांकण;
फुन्नेदार मिशा—सुरेख झुबके—ते गालगोंडे जणूं !
लागावी नच दृष्ट त्यास म्हणुनी कीं गालबोटे म्हणूं ! १२

कर्णीं मूषक, मत्त दन्ति नयनीं, दन्तीं जणूं मर्कट,
दृष्टीमाजिं बिडाल, काक अथवा, तुंबी नितंबी वट;
मांड्या मांसल, त्यांत कीं तरस तो ज्या चालतां घांसती,
नारी तो मणिबंधनीं; किणकिणी तत्कंकणें वाजती ! १३

नाकीं, मारुति, ओष्ठिं उंट जणुं कीं वाणीमधें पोपट,
येथें भिन्नविशेषदेशजनता झाली दिसे एकट,
भाट्या शीर्षविभूषणीं दिसतसे कोटामधें पारशी,
शोभे ब्राह्मण धोतरांत पुरता जोड्यामधें व्हेनिशी ! १४

नाना धार्मिक पंथ एकवटले त्या दिव्य रूपांतरीं,
गर्भी वैष्णव गाणपत्य जठरीं कीं रम्य नेत्रांतरीं;
खांद्यीं पेयिं विशेष शाक्त असुनी शैव स्वभावें गुणें,
येतां सोंग असें घरींच वसल्या त्या कोण नाहीं म्हणे ? १५

दूतें प्रश्न नियुक्त त्यास करितां बोलावया लागला,
' बंद द्वार कशास ? वा ! उघड तें दे वाट जाया मला
कोट्याधीश वणिक् वदान्य सुकृती सत्कीर्ति माझी अशी–
गर्जे; नादनिनादही न जिरला; कैसा न तूं ऐकशी ? १६

कालाच्या वदनामधें गवसुनी देवालयें, साजिरीं,
झालीं चूर्णित, नामशेष निजलीं सर्वंसहांकावरी[1];
जीर्णोद्धार तदीय मीं करविला तीं बांधवीलीं पुन्हां,
स्वर्गद्वार म्हणूनि बंद मज का ?–मानीतसां हा गुन्हा ? १७

देतां दान समान दृष्टि धरिली, भेदा न ठावा दिला,
धेनुश्वा सम, जीव तेथुनि पहा मीं एक संमानिला;
द्यावें धेनुस अन्न तेंच शुनका विप्रासही तेंच कीं,
सर्वां भूतिं समानधर्म विलसे पाहीं जनीं कीटकीं ! १८

केले नीट महा पुराण पथ ते छायातरू लाविले,
जागोजाग सरित्तटीं सुबकसे वा ! घाटही बांधिले.
वापी रम्य जलप्लुता पथिंपथीं यत्नें तशा बांधल्या,
विस्तीर्णा श्रमहारिणी सुखदशा म्यां धर्मशाळा भल्या. १९

बुद्धाचे अनुयायि भिक्षु यति कीं सच्छील शान्तान्त जे,
ज्यांचें चित्त चळे न वा मन मळे अज्ञानजातें रजें;
त्यांसाठीं गहनीं वनीं उपवनीं कीं पर्वतांचे शिरीं,
नाना रम्य विहार म्यां वसविले ग्रंथालयें साजिरीं. २०

विद्या वस्तुविशेष वित्त वसनें वांच्छील जो जें जसें,
त्याचा हेतु तसा तसा पुरविला ही शुष्क शंसा नसे;
दीनोद्धार विशेष हेतु धरुनी संस्थान संस्थापुनी,
येनां कीं असहाय साह्य दिधलें म्यां त्या समुत्तेजुनी. २१

---

१ पृथ्वीच्या मांडीवर.

कृत्यें याविण आणखी कितितरी लोकापयोगी अशीं
केलीं, न स्मरती मलाहि सगळीं, येती न मोजूं मशी !
माझें नांव जिथें मुळीं न निघतें ऐसें न पुण्यस्थल
केलें स्मारक मीं स्वयेंचि अपुलें दूता ! असें उज्ज्वल ! ' २२
दृष्टिक्षेपण तीव्र सूक्ष्म करुनी दूतें तयाचे मुखीं,
बोले ' या अवघ्या जनांत दिससी तूं एक मातें सुखी;
औदार्यें अपुल्या यशोविजय हा संस्तुत्य संपादुनी,
केली स्वांकित दुर्जयास्पद जरी हा स्वर्ग, ही स्वर्धुनी.[1] २३
आतां स्वर्ग तुझेंचि दिव्य गृह हा झाला तरी कासया—
घाई सांग अशी उगाचि करशी आंत प्रवेशावया ?
गेहीं स्वीय नवप्रवेशसमयीं—ते सांगती शाहणे—
लाभालाभ विचार सर्वपरिंनीं प्राप्तव्य कीं पाहणें ! २४
आली श्रांति गमे तुला बहुत ही होवोनि मार्गश्रम,
भो श्रेष्ठिन् क्षण एक येथ बसुनी घेई जरा विश्रम;
प्रौढ्या कारणकार्ययोग वदुनी जो दाविलासी मला,
आहे त्या मधला दुवा निखळला तो पाहिजे जोडिला. २५
जे जे प्रश्न म्हणून मी तुज पुढें करणा ! विचारीन `,
सत्यातें स्मरुनी शुचिष्मत मनें देईं तदीयोत्तरें;
जीर्णोद्धार परोपकार अथवा ' निर्मेळ ' दीनावन,
हेतूनें धन याच काय अवघें केलेंसि संपादन ? २६
तेसें जें धन वेंचिलेंस इतुकें सत्कर्मपुण्यच्छलें,
तें सारें वद कीं नयेंचि अथवा कष्टेंचि संपादिलें ?
व्यापारी नय सत्य, धर्म धृति हीं देवोनि नामें अशीं
आपें आपण होउनीच पडशीं या दुर्गतीचे फशीं ! २७
द्यूताचे युगिं या सुधारुनि नवे जे मार्ग संशोधिले,
सट्टे सोडत शर्यती सकल ते सोत्कंठ चोखाळिले;
राशींचे वर राशि ज्या उधाळिल्या चैनीमधें निर्भय;
झाला काय परोपकारपर हा संपत्तिचा सद्व्यय ? २८

---

१ आकाशगंगा

नामें सुंदर मोहनीय दिधलीं कल्पूनि नाना जरी,
वस्तूंचे गुणदोष काय विलया जातील तेणें तरी ?
श्वानातें जरि सिंहराज म्हटलें होई न तो केसरी,
श्वा तो श्वाच जसा तसाच हरिही राहे सदाचा हरी ! २९
वर्णें स्वर्णसमान ' सोनखत ' जें नाहीं गुणेंही उणें
मूल्यें तेविं महार्घही जरि असे त्या कोण सोनें म्हणे ?
आमूलाग्र पवित्र निर्मल असे जें वस्तु तें वास्तव,
वस्तूचा उपयोग मूल्य नच वा देई तया गौरव. ३०
नामें शांति खरी परी निज मनीं क्रोधें सदा ती जळे,
तैसें ' ओ ' म्हणतां न ' ठो ' हि तव त्या विद्याधराला कळे !
नामानें ' हनुमत् ' परी गवसतो नेमेंचि वेश्यागृहीं,
*नामें राम असूनही* कटुवचें विंधी पित्या प्रत्यहीं ! ३१
जीर्णोद्धार परोपकार अथवा कीं दीनसंगोपन.
केलें या अभिधानिं मात्र अपुलें तूं गौप्य गोपायन !
संज्ञा यास्तव त्या जरी फिरविल्या होती उण्या ना गुणें,
व्यापारी धृतिला तुझ्या म्हणुनि या निर्लज्जता मी म्हणें. ३२

' सर्वाभूतिं समान भाव विलसे वा सर्व भूतें सम, '
बापा ! सुंदर पथ्य तथ्य जरि हें केलास तूं व्युत्क्रम;
आहे एकचि भाव, जीव म्हणुं या; आकारभेदामुळें
येई त्यास विभिन्नता विधिवशात् कैसें तुला नाकळे ? ३३
पाणी एक परंतु तेंच भरतां भिन्नांगपात्रांतरीं,
पात्राकारसमान तें धरितसे वैविध्य नानापरी,
अंतर्बाह्य असूनि एक नट कीं तो भिन्न वेषांतरें,
' चेष्टा रंगतसे ' प्रबुद्ध म्हणती ' आकारयोगें ' खरें ! ३४
आतां या समदृष्टिचा करुनियां दात्या ! तुझ्या व्युत्क्रम;
अस्थींचीं शकलें विमांसरुधिरें देतां ! तुला उत्तम
धेनूंचे विहितोक्त खाद्य अथवा श्वानाप्रती घालितां,
पाहूं केविं परंपरांस रुचुनी सेवाल नोपेक्षितां ! ३५
तत्त्वें सुंदर, काय होत परि तीं ? तन्मर्म नाहीं जया,
मूढा काय मनोज्ञ काव्यरस कीं क्लीबासि रंभा तया ?

बोले ' विठ्ठल विठ्ठल ' प्रतिपळीं तो कीर पक्षी जसा,
वागाडंबर मांडिसी न कळतां वागर्थ तूतें तसा ! ३६
गीता ग्रंथ अमोघरत्न[1] म्हणुनी केली अधीता मुदा,
लाखोंका प्रति दानही जरि दिल्या विप्रांप्रती सर्व—दा;
गीतामर्म म्हणूनि काय कळलें मानूं तुला ? सन्मते—
गीता शब्दहि ठाउका तुज नसे, मातें असें वाटतें ! ३७
दुर्भिक्षीं मरतां विपन्न जनता तूं अत्तरें जाळुनी,
रात्रौ प्रत्यहिं मैफली झडविल्या वारांगना आणुनीः
उत्पन्नें वडिलीं शिवस्व म्हणुनी लोडोनि देवा दिलीं;
कोणीं सांग तयां निरर्थ म्हणुनी पोटामधें घातलीं ? ३८
मुंबास्थानिकराज्यलोकसमितीमध्यें तुला घेउनी.
अध्यक्षाविपदीं सवें पुरजनीं प्रेमादरें नेमुनी—
घ्यावें; क्लृप्ति म्हणून तूं विरचिल्या, ध्यानांतुनी निश्चित,
गेल्या आज जरीहि मातृपुरिचे[2] पौरांत त्या जागृत ! ३९
त्यांना लाउनि लालुची लुचपती, थापा नव्या प्रत्यही—
देवोनी वरि वंचिलेंस, वच रे ! ना पाळितां एकही;
नाना दुष्कृति आचरूनि असल्या तूं वांच्छिसी स्वर्गती !
स्वर्गाची तुझिया मतें वद तरी व्याख्या असे काय ती ? ४०
चोरांचा सुखसंनिवास सुमते ! स्वर्लोक वाटे तुशीं,
जारांचे अथवा विलासगृह कीं येई तुझे मानसीं ?
गंगा थिल्लर ही गमे तुजसि कीं ओहोळ कीं नाग्झरी,
साजिंदे वद काय कीं दिसलसूं आम्ही तुला बा ! तरी ? ' ४१
दृष्टीची चढुनी कमान वणिकासंगें असें बोलतां,
झाली लाल गमे बमेल जणुं कीं अंगार ती तत्वतां;
' जा जा जा ' वदला, ' नसे उखळ कीं हें धर्मशाळेंतलें-
यावें कोणिंहि कीं यथारुचि इथें इच्छेपरी आपुले ! ' ४२
' पूर्वींच्या सुजनीं उदार मनसा ग्रंथांतरीं वर्णिले—
स्वर्गप्राप्ति घडावया सुपथ जे, सश्रद्ध ते सेविले;

१ चिंतामणि. २ Metropolis.

केले रद्द कधीं कसे सुपथ ते ना सूचना काढिली,
नांदे मूर्त इथेंहि का अनय या स्वर्गीय दिव्यस्थलीं ? ४३
केले ते असते नवे नियम हो जाहीर खालीं जरी,
आम्ही उद्धृत तेच कीं करुनियां येतों स्थलीं या तरी;
हा ! हा ! नोकरशाहिची दडपणी येथेंहि कीं पातली,
वाटे नोकर–वामनें स्वचरणें ही त्रिस्थली व्यापिली ! ' ४४
' छे ! छे ! छे ! विजया प्रमाद कसला हातें तुझ्या हा घडे,
नाहीं भान कुणास काय वदलों ! आश्चर्य हें केवढें ?
राहो; श्रेष्ठिवरा तुम्हां नुमजला तद्भाव वाटे मला,
ऐका मी कथितों पुन्हां विशद तें तो काय जें बोलला. ४५
झाला स्वर्ग मिराशिचें वतन हा शंका मुळींही नसे,
ऐश्वर्या तव या न योग्य परि तो; यातें करावें कसें ?
आकांक्षे चढत्या न वाव तव या एकांत शांत स्थलीं,
राजारंक असा न भेद विलसे, सारेच येथें बली ! ४६
भोज्याचे विविध प्रकार तळिंचे लोकांत या दुर्मिळ,
जिव्हेची चट त्या पुरी न पडणें चौचाल जी चौंढळ !
मद्यावीण जया तुझें नच कधीं पाऊलही पालटे
येथें तें न मुळीं; मरुस्थल तुला कोठोनि बा हें पटे ? ४७
होई जीवहि जावया न मिळतां क्षारोदक प्राशना,
त्याचें नांवहि बा ! इथें न, तुजला होतील कीं यातना;
नाहीं योग्य तुला म्हणोनि कथितों, हा लोक राहावया,
तेवीं तूंहि वसावयास गमतें ना योग्य लोकांत या ! ४८
आकांक्षे अनुरूपसें स्थल तुला लाधेल लोकीं जया,
जाणें उक्त तुला तिथेंच; तव बा राहील कांहीं रया;
श्रेष्ठी होउनि खिन्न तो वचनिं या नाजूस जों जाहला,
प्राणी एक विचित्ररूप सहसा तेथें तदा पातला. ४९

* * * *

डोईला पगडी जुनीच जरिही रंगें नव्यासारखी,
वाटे कालचि डूब देउनि जणूं ती आणिली काय कीं !
होतां येत दिसूनियां परि सुतं केळ्यावरी पाहतां,

काळा रंग दिला मिशांस म्हणुनी का लोपते वृद्धता ? ५०
अंगीं अंगरखा परीटघडिचा आणीक त्याचेवरी,
शोभे ठेवणिचा पुरातन झुबा आपादसा काश्मिरी;
गेलें[1] धोतर अंगवस्त्र करुनी कानास गुंडाळुनी,
सोगे दोंहिकडून दोन दिधले होते शिरीं सोडुनी ! ५१
जोडा फार जुनाट दोन पिढिंचा लांबींत सोळांगुळें,
सामावेल तयांत धान्य भरतां शेराहुनी आगळें !
होतीं त्या ठिगळें असंख्य इतुकीं, भिन्नत्व आलें तया,
होतें रूप मुळांत केविं पहिलें येई न जाणावया ! ५२
शोभे वेत्रवती सुहास्यवदना रक्तांशुका साजिरी
नाहीं उंच न ठेंगणी पृथु परी आसन्न सिंगापुरी;
बाला ती न, परी करीं न धरितां चाले न, खांद्यावरी—
बैसे ती जरठा; न यौवनवती ? छत्री अहो साजिरी ! ५३
होती अन्य करीं तयें धरियली बाला सुवंशान्विता,
शोभे रौप्यकिरीटिनी सुखवती, सौवर्णवर्णांकिता;
बांधेसूद तशी सुकोमलतनू, कन्या तयाची ? न ती,
कीं ती तत् सहचारिणी ? नाहि नहीं यष्टी विशिष्टाकृती ! ५४
मुंबादैनिकवृत्तपत्र दिसलें हातामधें घेतलें,
होतें तेविं खिशांत एक दुसरें घाईमधें कोंबलें;
भारें होउनियां विशेष जड तैं तो लेखकासारखा—
हिंदोले वरखालती बसुनियां त्या चालतांना धका ! ५५
होवोनी पुढती विचित्र जन तो बोल तया रक्षका,
'आहे काय विशेष ? लोक जमले हे या स्थलीं आज का ?
आहे जेवण? किं निमित्त परि तें ? पक्वान्न शाल्योदन—
किंवा इंद्रसभाचि अक्षरशः गंगोदकप्राशन ?' ५६
ऐसें बोलत तो हळूहळु चढे, द्वाराकडे जावया—
लागे जों धरुनी करासि जय त्या घे पार्श्वि ओढोनियां;
'उच्चारीं,' वदला 'त्वदीय करिं ज्या झाल्या कृती स्वर्गदा,
जावें निर्भय मंदिरांत मग त्या उल्लंघुनी ही गदा !' ५७

---

१ जुन.

' वेडा तूं किति ! मंदिरांत तव या इच्छीं न मी जावया,
झालें द्वार दिसे बहू खिळखिळें तें मात्र पाहावया—
होतों जात वरी; नको तुज जरी मातें उठाठेव ती—
व्हावी आज कशास ? काय नडलें ? हा जाय आल्या पथीं ! ५८

राहो; वा विजया विनोद तव हा थट्टा पुरें जाहली,
शोभे हें न तुला तसोंचि मजला ही रीति नोहे भली !
व्हावी डागडुजी कशी किति कुठें हें घेउं दे पाहुनी,
खर्चाचा अंकडा तयार करितों अंदाज मी बांधुनी ! ५९

आहे मंडप घालणें मग पुढें विस्तीर्ण चौकांत या,
येथें छप्पन कोटि देव बसणें आहेत जेवावया !
व्हावे पाट किती नवीन, पहिले आहेत तैसे किती—
आहे आजचि लावणें उचित वा याची पुरी संगती ! ६०

सोपें या पुढलें जरी न बहुसें, आहे मधू कार्य तें,
पाहोनी रुचितें असें ठरविणें पक्वान्न—फर्मास ते !
लाडू कीं जिलबी, शिरा पुरण कीं, श्रीखंड कीं फेसुनी,
व्हावें केशर कीं सुधाधवल या खार्दावरी गाळुनी ? ६१

क्षिप्रांचे विविध प्रकार सगळे व्हावेत कीं शेवटीं—
बासुंदी अथवा पुरेल सकलां ती एकटी गोमटी ?
मांडे घीवर फेणिही मज गमे थोडी कराया हवी,
व्हांवा शोधहि घ्यावयास कितिशी लागेल ती काकवी ! ६२

भातांचे विविध प्रकार करणें किंवा पुरे एकची,
वांगीभात बरा मला गमतसे सर्वां समाना रुची !
म्हैसूरी अथवा अचानकपणें हा लाधला ब्राह्मण
घ्यावा त्याकडुनी गमे करवुनी चित्रान्न कीं रावण ! ६३

विड्यांभात बरा, मटारहि बरा किंवा बटाटे नवा,
कांदेभातहि कीं रुचेल सकलां त्याची नको वानवा !
किंवा साखरभात ज्या कुणिकुणी संबोधिती केशरी,
चाले नारळिभातही मज गमे ज्याची नवी माधुरी ! ६४

किंवा वा ! गव्हले इथें वळवुनी त्यांचा करूं भात या
आणूं तांदुळ ते पुरीकडिल वा जे गोड कीं खावया;

जिव्हेच्या पुरतात सर्व परिंनीं खातांच जो गुद्गुद्या,
घालोनी नव मेथकूट अथवा तो खुद्खुद्या होउं द्या ! ६५.
नाना सुंदर झणूझणीत करवा पंचामृतें रायतीं,
भोज्यांना चढते रुची बहुपरी ज्यांच्यामुळें आयती;
तैशीं सुंदर गुर्जरीय अवघीं सत्त्वाढ्य तीं लोणचीं,
बोंडे पापड सांडया कुरडया भिन्ना जयांची रुची ! ६६.
शाकांचे जमवा प्रकार, नसती साठाहुनी ते उणे,
भाज्यांची परकी तयांत भरती केल्यास होती दुणे;
कृष्णेच्या मळयामधील चवळ्या, वांगीं मुळें कारलीं;
मिर्च्या मोहक धारवाडकडच्या कीं कोंकणी तोंडलीं. ६७.
रेताडांतिल घेंडसें चिबुड कीं चक्क्या तशा नाशकी
भाज्यांचें सह या हवेंचि गमतें तें सार कर्नाटकी;
मल्याळी महनीय सारु वरवें घालोनियां नारळ,
सर्वां विश्रुत 'मोरची' म्हणुनियां जी 'आमटी' सोज्ज्वळ. ६८.
प्रारंभीं परि पित्तशामक जरा द्यावा बदामी शिरा,
आलेपाकवडी विशिष्ट कृतिची, कुष्मांड चाराचुरा !
हा ! हा ! मत्प्रिय भामिनी गुणवती येथेंच जी संप्रती,
होती घालित सुप्रभातिं मज तीं सत्त्वान्न हें सन्मती ! ६९.
हूंः ! राहो मजला सुचे न वदवें संभ्रान्त मी जाहलों,
कांतेच्या स्मृतिनें मनीं भडकलों; संपूर्ण हा पेटलों !
बापा दूतवरा ! कृपा करुनियां ती एकदा सत्तमा—
प्रत्यक्षा करिं गा ! पदीं नमितसें मानोनियां अर्यमा !' ७०.
'वेड्या वावदुका विचारविकला ! भ्रांतिष्ट तूं भाससी,
किंवा अस्सल काकवृत्ति शठ तूं बुद्धी तुझी राक्षसी !
केले प्रश्न तुला मघां खलमते ! देईं तदीयोत्तरें
प्रेषूं कीं निरयीं न वाट बघतां आतांचि तूतें त्वरें ?' ७१.
'माझा आगमहेतु शुद्ध मतिनें केला तुम्हां सादर,
दुर्दैवें परि माझिया मज गमे तो जाय वाऱ्यावर !
जागे कीं निजलां कळे न मजला ! कानांत बोटें जणूं—
घालोनी बसलात ? काय दुसरें सांगा तरी या म्हणूं ? ७२.

अन्नानें जगतांत जीव जगतीं अन्नेंचि ते जन्मती,
अन्नानेंच तसें, वदे अनुभवें, ते नाशही पावती !
ऐसें अन्नचि आद्यकारण जगा गीतोक्त सिद्धांत हा,
प्रेमें आचरिला, तुम्हां पढविला ज्ञानांबुधींनो महा ! ७३
आहे ज्यावरि जीव आज धरुनी श्रीमन्महाराष्ट्र हा
कैसा मी चुकलों पदार्थ न कळे सांगावया तो महा !
वेगें धाडुनि आणवा जन कुणी कांदे बटाटे अजी,
पक्वान्नें नसल्या नसोत ! परि तीं आधीं करा हो भर्जी !' ७४
'जा बाबा करिं जा हवें तुज जसें मी त्या न नाहीं म्हणें,
आतां याउपरी परी न पळही येथें तुवां राहणें;
ते तेथें जन जे असंख्य असती जा सर्वही घेउनी,
भाज्या आणि भर्जी यथेच्छ वडवा; श्रीखंड घ्या फेसुनी !' ७५

* * * *

ज्यांची आपण वाट पाहत असूं, अद्यापि ते कां तरी–
येती ना ? नकळे ! सुचे न मजला, संभ्रान्त मी अंतरीं !
लागावा स्थलिं या न काल इतुका यानासि त्या यावया,
वायूनें झुकलें, विमार्गिं वळलें मानूं असें कीं जया ? ७६
किंवा तें पडलें मधें विघडुनी मार्गीं दरीकंदरीं,
किंवा पाडियलें अनार्यकुजनीं रुक्मांगदाचेपरी ?
किंवा वैतरणीवरी अडवुनी ठेवी कुणी त्याप्रती–
कीं भौमग्रहगोलिं तें उतरलें भूतें कराया नती ? ७७
सापत्न्यें नृपकारणीं झगडले ते बंधु दावावया
कीं धर्मापरि नेति औट घडि त्या आत्म्या तमिस्त्रालया ?
कैलासाप्रति कीं हठें शिवगणीं नेलें तया ओढुनी
वैकुंठाप्रति विष्णुदूत अथवा गेले म्हणूं घेउनी ? ७८
ज्योतींचा पथ कीं करीत बसले प्रत्यक्ष मान्याप्रती,
चित्रा मार्ग कसा ? झिटा तशि कुठें वा निःशरा रेवती !
कोठें तो मृगशीर्षपुंज अथवा षट्कृत्तिकांचा गण,
कोठें आणि कसें तरी वसतसे स्वर्गीय गंगांगण ! ७९
येई जाइ कशी उषःकुवर ती कोठें तिचें मंदिर,

कोठें तें रविराजमंडल तसें कोठें तसा चांदिर !
येती तर्क वितर्क नैक असले चित्तांतरीं माझिया
त्यांचा केंविं कधीं निरास न कळे होणार आहे जया ? ८०
स्वर्गीची मनिं लालसा धरुनियां जे जे कुणी मानव,
आले आणिक येतिही वरिवरी दुर्दांत दंभार्णव !
त्यांची चर्पटपंजरी चटुलता चार्वाककोटिक्रम
ऐकोनी विटलों पुरा उबगलों व्हावा अतां विश्रम ! ८१
विश्रांती परि लाधणें कुठुनिया तें यान आल्याविणें ?
जा कोठेंहि समान एक विलसे सेवेकऱ्यांचें जिणें ! '
येई घर्घर मर्मर ध्वनि तदा खालोनि वेगें वरी,
घेरे घेत विमानही उतरलें त्याच क्षणीं अंबरीं ! ८२
नामें विश्रुत वैनतेय म्हणुनी श्रीविष्णुचें वाहन,
होतें तेंच तदा तिथें प्रकटलें वैकुंठलोकाहुन;
वर्णू केविं तया ? न त्या बघवलें दृष्टी दिपाली त्वरें
तेजोगोलक झगझगीत दिसला तो एक मात्र स्मरे ! ८३

येई धांवत दूत तो लगबगा श्रेष्ठामि त्या घ्यावया
देई हात पुढें परी दचकुनी घे पार्श्वि ओढोनियां;
मेघश्यामल मूर्ति तोंचि उतरे खालीं विमानांतुनी,
विश्वामित्र विधातृ मूर्त जणुं कीं सत्त्वाढ्य अत्री मुनी ! ८४
देवांचींच विभूषणें म्हणुनि जीं विख्यात पृथ्वीतलीं
शस्त्रास्त्रें धनुतोमरादि अथवा नामेंचि जीं ऐकिलीं;
त्यांतोनी दिसलें न एकहि मला शस्त्रास्त्र कीं भूषण,
होती मूर्ति किती मनोज्ञ परिसा थोडें तिचें वर्णन ! ८५

वर्ण श्यामल नीरदोपम खुले ना कृष्ण ना गौर वा
तैशी आकृति पाहतां उपजवी चित्तांतरीं गौरवा;
नाहीं स्थूल विशेष उंच अथवा नोहे कृशा कीं बटू
दृष्टी भेदक अन्यमर्म सहसा आकर्षणीं जी पटू ! ८६
शोभे मस्तकिं लाल सान पगडी भौम ग्रहाचे परी,
अंगीं अंगरखा वरी उपरणें ना रेशमी वा जरी;
तैसें गंध विशाल भालपटलीं शोभे उभें साजिरें,

वंदाया कर पाहतांच वरती होती तया आदरें. ८७
तेजाचा पुतळा सुमेरु धृतिचा सिंधु क्षमेचाच कीं,
बुद्धीचा जणुं आरसा न दिसली द्रोहार्थता ठाउकी;
दंभाचा नच लेशही दिसुन ये मुद्रेकडे पाहतां
दैवी संपदिं जन्मला पुरुष तो होता गमे तत्त्वतां ! ८८
दैवी संपदिं जन्मती पुरुष जे त्यांचीं अशीं लक्षणें,
श्रीकृष्णें कथिलीं प्रसन्न मनसा जीं अर्जुनाकारणें;
तीं सारीं मज त्या महाजनमिषें प्रत्यक्ष झालीं तदा,
त्यांची केवल संस्मृतीहि घडते चित्तास सौख्यप्रदा ! ८९
वाक्कर्मीहि न घातपात करणें, मिथ्या न तें बोलणें,
सत्कर्मी रतणें प्रशांत असणें, केव्हां न रागावणें;
सर्वीं प्रेमळ वागणें, सतत ती निर्लोभता ठेवणें.
लज्जामार्दव रक्षिणें पिशुनता चांचल्य संवार्जिणें. ९०
यानांतून तदा महापुरुष तो येई न जों भूतळीं,
दूतीं त्या अभिवादिलें लगबगा होवोनि बद्धांजली;
बोले सादर होउनी जय पुढें, ' स्वामीस मार्गश्रम—
झाले फार ! न घेतला दिसतसे कोठेंच कीं विश्रम ! " ९१
' देवेन्द्रें मज काय हेतु धरुनी आज्ञापिलें यावया
आहे का विजया ! तुला विदित हें ? किंवा तुला गा जया !
झालें कार्य नियुक्त पूर्ण मजला प्रेषीयलें ज्यास्तव
सर्वेशाप्रति का गमे ? स्थिति परी ऐशी नसे वास्तव. ९२
कार्यालागुनि माझिया न विजया आरंभही जाहला,
पत्ता नाहिं कशास काहिं अजुनी; अंधार नांदे भला !
पाटी स्वच्छ करून धूळ भरुनी श्रीकार काढावया
घेतों जों करिं लेखणी मजसि गा संदेश ये यावया ! ९३
पाटी केवळ यावयास करिं या अश्रांत केले श्रम,
त्यांचें सुंदर लाधलें फल मला ! झाला पुरा व्युत्क्रम !
होताना इतुकेंच कार्यलव हें गोष्टी किती दुःसहा—
झाल्या तत्स्मृति जाळिते हृदय हें होई तनूचा दहा ! ९४
झाली भूमि उखीर पीक नुपजे शक्तीच ना राहिली,

स्वत्वाची उरली न ओळख कुणा बुद्धी खुळी जाहली !
गेली आपुलकी समग्र विलया नांदे पराधीनता
स्वार्थाचा पिकला मळा ! करपली सौजन्यरूपी लता ! ९५

साधे संहतिनेंच कार्य सहसा जाणोनि अभ्यंतरीं,
' आहे संहति हीच शक्ति अतुला ' हें ब्रीद मी स्वीकरीं;
संस्था शिक्षण द्यावया निज जना आरंभिं जी निर्मिली,
तीची पूज्य मुहूर्त मेढ विजया मंत्रेंच त्या रोंविली ! ९६

इच्छावें मनिं जें तसें न घडणें हें तत्त्व भूलोकिंचें,
त्यालागीं अपवाद कार्य मग तें होणें कसें आमुचें ?
केले तैं सदुपाय जे बहुविधी स्वध्येय साधावया,
झाले ते विफलार्थ सर्व ! फिरली जों पाठ माझी जया ! ९७

माझे संनिधि राहुनी स्वमतिनें माझ्याचि शिक्षाबळें,
जे झाले नृपनीतिकार्यकुशली नाना गुणीं आगळे;
नाना पंथ नवे नवे विरचुनी अन्योन्य ते भांडती,
कार्याची महतीच आजि गमतें राहे न कोणांप्रती ! ९८

कार्यातें मम या तशीच मजला लाधे जगन्मान्यता,
स्पर्ध्यांचे नयनामधें लसुनि ती ग्रासी असूयांधता !
केला कार्यविनाश जों न सजलों मी यावया या स्थलीं,
दुःखें या परि एक साश्रुनयना भूमाय ती जाहली ! ९९

मन्निंदा करण्यांत ज्या सुख गमे निंदोत मातें सुखें,
जाई स्वच्छ धुवून सर्व परि ती भूमातृनेत्रोदकें;
आहे ठाउक मच्चरित्र सगळें आनंदसद्रूपिणी—
भूमातेप्रति माझिया; उगिच मी दुःखें करूं का मनीं ? १००

माझें वर्तन गर्हणीय अथवा निर्दोष कीं तें ऋभू
जाणे एक अशेष सर्वपरिनीं तो सर्वसाक्षी प्रभू;
जी जी मत्कृति गर्हणीय गमतें मच्छत्रुचित्तांतरीं,
निःस्वार्थी जननीरतींतचि खरें तन्मूल आहे तरी !

बाल्यापासुनि मायभूप्रतिच म्यां भक्त्यादरें सेविलें;
स्वप्नींही तिजवांचुनी चुकुनिही अन्या न मीं चिंतिलें;

संकल्पींहि तिच्याविणें न दुसरें ये कांहिं माझे मनीं,
येणें आज मदीय येथ घडलें तेंही तिचे कारणीं ! २
सर्वेशाप्रति वंदुना प्रथमतां साष्टांग मी सादर,
कर्णीं घालिन आर्ति या हृदयिंच्या दुःखासवें दुर्धर;
देवींभूजननीसमुद्धरण तें माझ्याच हातें घडो;
वारंवार मदीय देह कणशः तत्कारणीं हा पडो ! ३
भावी वैभव आर्य भूजनानिचें लाधेल पाहावया—
ज्यांना; होतिल धन्य तेच जगतीं तें भाग्य जीवास या,
लाधो वा नच तें पुढेंहि; मजला मी धन्य चित्तीं गणीं,
झाला पावन देह एक तरि हा लागोनि तत्कारणीं !' ४
'झाला जर्जर देह शक्ति नुरली कष्टांस सोसावया,
सर्वेशें म्हणुनी दिला गमतसे संदेश कीं यावया;
थोडा विश्रम घ्या; सुधा पिउनियां घ्यावें नवें जविन,
घ्यावा देह नवा यथेच्छ घडतां सामर्थ्यसंपूरण ! ५
जें कांहीं जितुकें स्वकार्य करुनी ठेवीयलें भूजनीं,
राहे तें तितुकें तसेंच; लव ही शंका न घ्यावी मनीं;
ईषन्मात्र कधींहि साच लघुता येणार नाहीं तया
अल्पांशेंहि तसें न जाय अथवा कालत्रयीं तें लया ! ६
आहां आपण पूर्ण पूर्णपरिनीं, पूर्ण स्वयें जो असे,
जे कांहीं करितो तदीय कृति ते केव्हां अपूर्णा नसे !
पूर्णातून उणेंहि पूर्ण करितां जें शेष खालीं उरे
तेंही पूर्णचि; सांगती विबुध हें सत्तत्त्व उच्च स्वरें !' ७
'कार्य त्यागुनियां वृथा विहरणें किंवा सुधा प्राशणें,
किंवा गायनवादनांत रमणें शय्यागृहीं लोळणें—
किंवा कुश्चळ अप्सरांसह इथें स्वेच्छेपरी हिंडणें
यापेक्षां नरकामधें खितपणें संश्लाघ्य माझ्या मनें ! ८
विश्रांती म्हणजे न नीज अथवा स्वेच्छासुखीं रंगणें,
विश्रांती म्हणजे न बुद्धि विकुनी स्वच्छंद संक्रीडणें;
विश्रांती म्हणजे न कैफ करणें मद्यालयीं झिंगणें,
विश्रांती म्हणजे न नीति पिउनी अन्याप्रती वंचणें ! ९

विश्रांती म्हणजे न क्लांति रचुनी कापट्य संयोजणें,
खोटी बुद्धि धरून वा निज मनीं साधूसि संपीडणें;
अर्थाचा करुनी अनर्थ अवघा स्वार्थासि जोपासणें,
विद्वेषें अथवा मनांत जळणें विश्रांति ही ना म्हणें ! १०

स्वोद्दिष्टांप्रति साधितां विधिवशात् आली जरी श्रांतता,
विश्रांती तनुला जरी समुचिता चित्तास ना तत्त्वतां;
येतां श्रांति मनाप्रती तनुस त्या कार्याप्रती जुंपणें,
होता श्रांत मती मृतीच वरणें विश्रांति ही मी म्हणें ! ११

कार्याची महती सुकौशल तसें ज्याला कळे चांगलें,
देहाचें क्षणभंगुरत्वहि तसें ज्याला कळे आगळें;
श्रेयःसाधन याविणें न दुसरें ठावें तयाला असे,
यातायातिमधील काल सहसा विश्रांति तो घेतसे ! १२

श्रेयःसाधन हीच एक म्हणुनी विश्रांति मी मानितों,
श्रेयःसाधन हीच मुक्ति मम ती मत्स्वर्गही तेविं तो;
श्रेयःसाधन हीच आजि मम ती पीयूषमंदाकिनी,
श्रेयःसाधन कामधेनु मम ती शांतीसुधास्राविणी ! १३

'आम्ही द्वाःस्थित; दूतकर्मकुशली अल्पज्ञ कीं मंदधी,
जाणाया क्षम हें नसूं प्रभुवरा ! आम्ही न तत्त्वांबुधी !
येथें राहुनियां सदोदित उभे निर्देश येती जसे,
पाळावे न विसर्गबिंदु चुकतां; हें एक ठावें असे !' १४

'यासाठीं मज हा निवास इथला होईल दुःखप्रद,
जावें घेउनि जन्म नव्य दुसरा तें योग्य सौख्यास्पद !
जेव्हां भूजननी बघेन बसली स्वातंत्र्यसिंहासनीं,
झाला जन्म मदीय धन्य विजया ! मानीन मी त्या दिनीं !' १५

'कालातिक्रम हा प्रभो बहुतसा आधींच झाला असे,
आतां होइल हें कपाट उघडें; शंका विलंबा नसे;
देवाचार्य सुरेश्वरादि सगळे येतील आतां तिथें,
आहां आपणही परात्पर; गुरो घ्या पाहुनी काय तें !' १६

'आहां कोण कसे नि काय विजया तुम्हांहुनी ही जया,

आहे ठाउक आगळें, मज नको कांहींच सांगावया;
राहो हें; परि लोक तिष्ठत उभे का हे असे या स्थलीं ?
जाया आंत तयांस काय अजुनी आज्ञा नसे जाहली ? ' १७
' त्या दोघांव्यतिरिक्त एकहि नसे स्वर्गप्रवेशक्षम,
सारे दांभिक तर्कटी खलमती उद्दाम कीं दुर्दम !
एकाहून विशेष एक दिम्ती पाखंडि हे उद्धट,
भारी वादविवादकार्यकुशली वाचस्पती वाग्भट ! ' १८
' वाणी ही विषदिग्ध तीव्र विजया जिव्हारिं या झोंबली,
ऐसें हें वमशील कीं गरल तूं शंका न ही स्पर्शली;
यावी लाज कुणासही वरळतां जे शब्द पृथ्वीतलीं,
त्याची लाज तुम्हां न धिक् गमतसे या दिव्य पुण्यस्थलीं ? १९
लोकांना प्रिय मी जसा मज तसे आहेत तेही प्रिय,
त्यांच्यावांचुनि पायही न उचलीं मी जाण निःसंशय !
अल्पस्वल्प मदीय कार्य विजया जें काय झालें तळीं,
त्याचें श्रेय तयां; तयांविण जनीं मी सर्वथा निर्बळी ! २०
साक्षात् मी जनता जनार्दन गणीं, मी भक्तसेवाव्रती,
' लोकेच्छाअनुवर्ति' गालि मम ते स्पर्धी मला अर्पिती !
तेव्हां त्या त्यजुनि स्थितींत असल्या सोद्वेग मी सांप्रत
दोषी या नयमंदिरीं ठरुनियां होईन सत्त्वच्युत !' २१
' दावावें वरचेवरी वदुनियां त्या त्याच शब्दां जरी,
चित्ताला रुचतां न; रोष सहसा होईल आम्हांवरी !
घ्यावें आंत कुणा कुणा न अथवा आदेश येती जसे,
आम्ही पाळितसूं; न लेश अमुच्या हातांत सत्ता असे !' २२

* * * *

होता एक उभा तिथें जन कुणी पाहात हें लांबुनी
इच्छोनी परतावया न कळतां घे पाय जों काढुनी—
दूताची सहजी अचानक वळे तों दृष्टि त्याच्याकडे,
कर्मांचा इतिहास सांग, ' वदला जाऊं नको ये पुढें. २३
जाई जेविं समृद्धवेग जनता इच्छा नसोनी मनीं—
कालक्रूरमुखीं, तसा मनुज तो दूतापुढें येउनी—

बोले शांतपणें प्रणाम करुनी, ' पाचारिलें कासया
इच्छा, प्रांजल सांगतों, मज नसे स्वर्गीं तुझ्या यावया. ' २४
' इच्छा काय तुझी न मी पुसतसें, कर्मे तुझ्या जीं करीं—
झालीं भूमितळीं समग्र वद तीं लज्जा न भीती धरीं.
कर्में जीं घडती सकाम अथवा निष्काम पृथ्वीतलीं,
कर्त्या तत्फल लाधतें नियम हा, येतांचि रे या स्थलीं. ' २५
' सांगावें तुजला समुल्लसित मीं होवोनि दूता असें
या जीवाकरवीं विशिष्ट जगतीं कांहींच झालें नसे;
झालें प्राप्त यदृच्छयाच मज जें तें सर्व केलें सुखें
त्याचा मी बडिवार काय म्हणुनी गावा फुका या मुखें ? २६
कृत्यें धार्मिक राजकीय अथवा राष्ट्रीय सामाजिक,
भूलोकीं घडलीं, असोतहि कशीं तीं साच कीं मायिक
त्यांचें वर्णन या महज्जनमुखें आतांच मीं ऐकिलें
राहों कायिक वाङ्मनेंहि सहसा मीं त्या न उत्तेजिलें ! २७
कांतारीं स्पृहणीय भूमिकुहरीं श्रीक्षेत्र औदुंबरीं,
माझी रम्य कुटी सपुष्पवटिका कृष्णातटाकावरी;
दूता ठाउक एक तीच मजसी चेतोहरा निर्मला
वाटे तुच्छ तिच्यापुढें सुरपुरी वैकुंठही वा मला ! २८
*जेथें पुष्करणी तुडुंब भरल्या पीयूषतुल्यें जलें
ज्यांचे पाट लतातरूमधुनिया आहेत वा खेळले;
वाहे त्यांत मरंदरेणुसह तें गंधाढ्य शीतोदक
कोणा स्थान गमे न सांग असलें आनंदसंवर्धक ? २९
वाहे संतत मंजु मंथरगति स्वच्छंद मंदानिल
मार्तंड प्रखरप्रचंडकरही ना तीव्र ना कोमल—
होतो, काय कथूं निदाघसमयीं चंद्रापरी शीतल !
चिंतासंकुल अंतरंग निववी आनंदवी प्रांजल ! ३०
चंडोलादि विहंग चक्रयुगुलें कीं क्रौंच कारंडव,
चित्ता रंजविती विहार करुनी देती वना गौरव;

* हें वर्णन वाल्मिकी रामायणाच्या आधारें केलें आहे.

लक्ष्मीसुंदरकंजमंदिर भरी भृंगालि गुंजारवें
केकीतांडवरंजनें मन डुले कीं कोकिलांचे रवें. ३१
दूर्वाकोमलखंड खुडुनि मृगी घाली कुरंगाननीं
शृंगें खाजवुनी कुरंग रतही स्वोयांगनारंजनीं;
शृंगारप्रिय जीं कुरंगयुगुलें मानेवरी मान तीं
टाकोनी रमती यथारुचि इथें सानंद संक्रीडती ! ३२
स्वच्छंदें मृगशावकें विहरती भक्षीत दर्भांकुर
मोदें बागडती सुकोमलतनू गोवत्सही सुंदर.
धेनू धावति तुंद चंचलतनू संहृष्ट चारी खुरीं
आनंदातिशयें स्वपुच्छभरही वाहोनि पृष्ठावरी ! ३३
जेथें नील तमाल ताल बकुली पुष्पांकिता सुंदरा
चुंबाया जणुं कीं वरी उफळती नीलांग अंभोधरा,
जेथें चंदन जंबु जंबिर तरू मंदार माकंदही
पुष्पांचे नव वृष्टितें करुनियां शृंगारिती ही मही ! ३४
जेथें निर्झरिणी कड्यावरुनिया, घेती उड्या खालतीं,
ज्यांचे धौत जलौघ भूमिकुहरीं गर्जोनियां धावती
जेथें वंजुलकुंजिं मंजु मुरली गुंगूनि मंदानिल
प्रेमें वाजवि सूर तैं धरितसे सोत्कंठ तो कोकिल ! ३५
जेथें धीर समीर कुंजकुहरीं संश्लिष्ट वृक्षांतरीं
आनंदांत मृदंगवादन करी रंगोनि चित्तांतरीं;
जेथें सारससारिकांस शिकवी गाया वनश्री मुदा
जेथें खास झडे असाचि जलसा दूता सदासर्वदा ! ३६
स्थानीं निर्मल शांत मंगल अशा प्रेमें कुटुंबासवें,
होतों राहत तुष्टपुष्टमन मी राजोचितें वैभवें
भार्या शांतिच मूर्तिमंत जणुं कीं साध्वी गुणाढ्या सती
आलीं विघ्नशतें तरी न गणिलीं म्यां तीं तिचे संगतीं ! ३७
वर्णू तद्गुण एक एक किति मी वाटे उमा ती स्वयें,
ताराया अपुल्या पतीस दुबळ्या शंभू स्वयंभूस ये !
बाळें सद्गुणशालि दिव्य मम तीं प्रत्यक्ष नक्षत्रशीं
त्यांच्या सुंदर मंडलांत विभवें शोभे जणूं मी शशी ! ३८

कांता प्रेमल बालकें विमल हीं सन्मित्र पक्षीगण
तैसें गोधन निर्विकारहृदयी सर्वस्व हें मद्धन
यांना सोडुनियां विचार दुसरा आला न माझ्या मनीं
पूजा ध्यान मदीय हेंचि सगळें मद्देव ही त्या वनीं ! ३९
कोणाचा नच घातपात कधिंही स्वप्नांतरीं इच्छिला
हेवा मत्सर लोभ शब्द नुसते ठाऊक होते मला;
चिंता क्लेश कशास काय मजला होतें वनीं त्या कमी ?
स्वर्गीं त्याहुनि सौख्य काय अगळें ? व्हावें वृथा का श्रमी ? ४०
येतां पांथ कुणी चुकून विपिनीं साहाय्य त्या देउनी
लावीं मी सुपथास त्यास विनयें वस्त्रान्न संतर्पुनी;
जी जी वाण जया पडेल हरिखें ती ती पुरी मी करीं—
देहें कष्टुनि; तुष्टि त्यास मिळतां संतुष्टिही मी वरीं. ४१
आनंदें गृहकार्यमग्न असतां ओढोनि मातें बळें
कोणीं बांधुनि आणुनी मज क्षणीं दूता इथें सोडिलें !
होतों मी किति वेळ हिंडत तरी मागें पुढें सारखा
आलों चित्रसमूह हा बघुनियां दृष्टीस जो पारखा. ४२
धालों पाहुनि मोहनीय तव हें स्वर्गीय दिव्य स्थल
माझी ती लखलाभ पर्णकुटिका होवो मला निर्मल !
मातें स्वर्ग नको नको अमृतही आज्ञा मला जावया,
दे दे मद्गिरहें असेल झुरणी ती लागली मत्प्रिया !' ४३
' सांगाया तुजलागिं ' जा ' म्हणुनिया माझा धनी मी नसें,
ईशाज्ञेविण येथुनी परत रे येईल जाया कसें ?
बापा तूंहि तिजा सुपात्र दिससी स्वर्गांत राहावया
आतां द्वार कुणी तुम्हां उघडुनी येईल हो न्यावया.' ४४

* * * *

बोले दूत असें न तोंचि तिकडे गंभीर झाला ध्वनी
दिंडी तीव्रजवें कुणी उघडुनी ने या तिघां बाहुनी.
लागे दिंडि पुन्हां न जों ध्वनि निघे तो ऐकतां जाहलों—
जागा मी सहसा तदा दचकुनी आहें असा बैसलों ! ४५

* * * *

गेली नीज कशी उडोनि निमिषीं डोळ नही लागती
कर्णीं नाद घुमे; कुठोनि परि ये लागे न ही संगती !
पाहें जों गगनोदरीं भिरभिरीं मागें पुढें खालतां
शुक्राचा नव रत्नदीप दिसला मातें तिथें तेवतां ! ४६
गेला इंदु कुठें मधेंच निघुनी कां तारका निष्प्रभा !
देवाचार्य असा अधोमुख तरी का राहिला हा उभा ?
कां ही रात्रिवधू अशी विलपते किर्ध्वनीच्या मिषें
औदासिन्य नभोऽगणीं पसरलें एकाकिं कां हें असें ? ४७
तोंडें सर्व दिगङ्गना करवल्या झांकोनि चेलांतरीं,
कां ऐशा रडती विभग्नहृदया ? हें काय आहे तरी ?
झाला रात्रिसवें विवाह विधुचा कीं राहिला तो म्हणूं?
या का मंगल अक्षता उधळल्या लाजा तया कीं गणूं ? ४८
कां अंतःपट हें गळोनि पडलें कीं स्वर्धुनी ही दिसे ?
यांचा अल्पहि बोध हो न मजला लागे जणूं कीं पिसें !
राहूनें गमतें जणूं उगाविलें प्राग्वैर कीं आपुलें
नष्टें मन्मतिचंद्रबिंब अवघें ग्रासोनियां टाकिलें ! ४९
खालीं जों बसलों तिथें गंवसल्या लाह्या मला सांडल्या,
पत्नीनें निशि भोजनोत्तर मला खायास ज्या ठेविल्या;
लाजापात्र गमे चुकून सहजीं झोंपेंत लाथाडिलें
लाह्या सांडुनि पात्रही पडुनियां शब्दत्व तें पावलें ! ५०
पात्राचा ध्वनि ठं ठळं परिसतां मी जाहलों जागृत,
कैंचा स्वर्ग नि दिंडि दार कुठलीं ? ना इंदु वा निश्चित !
कैंचे दूत नि लोकवृंद कुठला ? गंगा न वा तारका
सारा खेळ विषाददायि नटला हा कल्पनेचा फुका ! २५१

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २ | २६ | तांड | तोंड |
| ८ | १० | ०माधवाचीं | ०माधवांचीं |
| १० | २५ | आतुनी | ओतुनी |
| ११ | २ | कर्मयोगात | कर्मयोगातें |
| १५ | १३ | मातुःश्रा | मातुःश्री |
| १९ | ८ | सपलें | संपलें |
| ३२ | ८ | ०काटरीं | कोटरीं |
| ३७ | १ | नेका | नको |
| ४२ | २६ | फगुसन | फर्ग्सन |
| ४७ | २६ | व | वा |
| ४८ | ३ | शीपाई | शिपाई |
| ७७ | २४ | ध्वंनींची | ध्वनींची |
| ७९ | १७ | भुकेलें | भुकेले |
| ८० | ११ | दवता | देवता |
| ८१ | १९ | ०सधान | ०संधान |
| ८३ | १८ | छे ! छ ! | छे ! छे ! |
| ८६ | १३ | किंवां | किंवा |
| ८८ | २० | र्वतनीं | वर्तनीं |
| ९४ | १७ | | ही ओळ टीपेंत वाचावी |
| ९६ | ९ | ष्ट | हृष्ट |
| १२६ | १ | एकाच | एकाचि |
| ,, | २२ | बाडिल | वडिल |
| १२८ | ८ | खतें | खुतें |
| १३० | १९ | कळ | कळे |
| १५५ | २० | ताटा | तोटा |
| ,, | २३ | मा | मीं |

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १५९ | २५ | ०प्रत्यांचा | ०प्रत्यंचा |
| १६० | १८ | नाटकाप्रमाणेंच | नाटकावरील आक्षेपा० |
| ,, | २१ | पद्यांत | पदांच्या |
| १७७ | ११ | किंकाळार्नी | किंकाळोनी |
| १९६ | १७ | सर्वांभतिं | सर्वांभूतिं |
| २०४ | २८ | गाष्टी | गोष्टी |
| २०६ | ३ | वंदुना | वंदुनी |
| २०८ | १२ | लाकांना | लोकांना |

# अनंततनयांच्या काव्यासंबंधानें लोक काय बोलतात !

हृदयतरंग [ पुस्तक १ लें ] ( आवृत्ति २ री ) किं० एक रुपाया
व्ही. पी. नें १८४.

केसरी:—रसिकांचें मन रंजविणारें तें काव्य, अशी काव्याची सर्वसामान्य व्याख्या केली तर त्या व्याख्येप्रमाणें रा. आपटे यांचे कवितारूपानें बाहेर पडलेले हृदयतरंग हे काव्यमय आहेत यांत कांहीं शंका नाहीं. कल्पनावैचित्र्य व रचनाचातुर्य या दोन गोष्टी कवीस साधल्या म्हणजे रसिकांना रमविण्याचें कार्य त्याच्याकडून होतें. काव्याच्या या सर्वसामान्य व्याख्येची कसोटी पहावयाची असल्यास, या पुस्तकांतील 'गळावयास झालेलें फूल,' 'किती तरी बाई ही लांबण,' 'दर्पण,' 'लक्के पैथे लक्के आंबे,' 'पतंगाचे बोल,' 'हट्टी मुलांची दिवाळी,' 'तर मग मी देवाची'—वगैरे विषयांवरील कविता वाचाव्या म्हणजे रा. आपटे यांचें हृदय किती मनोहर कल्पनातरंगांनीं भरलेलें आहे याची कल्पना येईल. रचनाचातुर्यासंबंधानें विचार केला म्हणजे याहि बाबतींत रा. आपटे यांचा हातखंडा आहे असें म्हटल्याशिवाय राहवत नाहीं. हृदयतरंगांत अनेक छंदांतल्या अनेक पदांच्या चालीवरच्या कविता आहेत. आर्याछंदाच्या बाबतींत तर रा. आपट्यांनीं मयूर कवीचा कित्ता उत्तम रीतीनें गिरविला असून या दोघां कवींचे आर्याबद्ध कवितारूपी वळणदार अक्षरांचे नमुने जवळजवळ ठेवल्यास यांतील मोरोपंतांचें अक्षर कोणतें व दत्तोपंतांचें अक्षर कोणतें हें खरोखरीच ओळखण्याची पंचाईत पडेल इतका हा छंद रा. आपटे यांना बेमालुम साधला आहे. वाचकांच्या मनांत सात्त्विक भावना उत्पन्न करण्याचें सामर्थ्य यांचे कवितेंत असून त्यांत शांतरसाचा चांगला परिपोष झालेला आढळून येतो. एकंदरींत आपटे यांची काव्यरचना पुराणमताभिमानी व आधुनिक काव्यलोलुप या दोघांनाही सारखीच आनंदवील यांत शंका नाहीं.

आनंद:—आधुनिक कवींना सामान्यतः लावता येण्याजोगा जो केवळ श्रृंगारप्रवणतेचा दोष त्यापासून 'अनंततनय' मुक्त आहेत. 'लक्के पैथे लक्के आंबे,' 'चिलयाकंडन,' 'दुःखातच सुख' हीं प्रकरणें मनोरम आहेत. काव्यसंग्रह संग्रहणीय आहे.

नवा काळः—कवीच्या वांट्याला आपल्या पुस्तकाची दुसरी आवृत्ति काढण्याचें भाग्य येणें म्हणजेच वाचकवर्गाला त्याच्या कवितांची आवड लागली आहे यांत शंका नाहीं. अनंततनयांच्या काव्यांत जुन्यानव्यांचा संगम उत्तमरीतीनें दृष्टीस पडतो. पहिल्या तरंगांतील त्यांच्या ईश्वरपर कविता पाहिल्या तर त्यांत मोरोपंताच्या शैलीचें प्रतिबिंब स्पष्ट उमटलेलें दिसतें. राधाजीवन ही कविता पाहिली तर आधुनिक प्रतिभांचे उत्कृष्ट गुण तिच्यांत आढळून येतात. प्रस्तुत कवितेची मांडणी उत्तम पदलालित्यांत केलेली असून, ती अनुवादात्मक असतांही कवीनें हें काव्य जणू काय स्वतंत्रच लिहिलें आहे असें वाटतें.

महाराष्ट्र:—अनंततनयांच्या काव्यांत जुन्या नव्या विचारांचें व वळणांचें मोठें चमत्कृतिजनक मिश्रण झालेलें दृष्टीस पडतें; व यामुळें त्यांची कविता महाराष्ट्रांतील भिन्न रुचीच्या रसिकांना सारखीच मान्य आहे. त्यांची भाषा प्रौढ, अलंकारिक पण जुन्या थाटाची असते. नवे विचार जुन्या शब्दांच्या कोंदणांत बसविण्याचें त्यांचें कौशल्य वाखाणण्यासारखें आहे. दुसऱ्या तरंगांतील ' सरित्सिंधु, ' ' पुष्प आणि मानवी जीवित, ' वगैरे कविता सरस असून ' प्रीति आहेना पण ' ही कविता तर अत्यंत हृदयंगम आहे. चवथ्या तरंगांत रूपांतरित कवितांचा संग्रह केलेला आहे. अनंततनयांचीं रूपांतरें इतकी सफाईदार व सुंदर असतात कीं, स्वतंत्र कवितांत त्यांचा समावेश करावयाला मुळींच हरकत नाहीं. सहाव्या तरंगांतील हट्टी मुलांची दिवाळी, अर्धचंद्र वगैरे कवितांतील उपरोधपूर्ण विनोद मार्मिक आहे. अनंततनयांच्या वाणीला करुण व वत्सल हे दोन रस विशेष मानवतात. त्या दृष्टीनें ' पुथून ताकला, ' ' लक्के पैथे लक्के आंबे, ' गरीब गौंवऱ्यावाली वगैरे कविता फारच हृदयस्पर्शी आहेत.

## हृदयतरंग [ पुस्तक २ रें ] किं० १८४ व्ही.पीनें १८८

चित्रमयजगत्:—इतर आधुनिक कवि व ' अनंततनय ' यांच्यांत विशेष भेद कसा व कोठें आहे हें प्रस्तावनाकारांनीं जें दाखविलें आहे, तें अनंततनयांची कविता ज्यांनीं मार्मिकपणें, वाचली असेल, त्यांना मान्य झाल्यावांचून राहणार नाहीं. जुन्यांत जो चांगला भाग असेल तो कायम ठेवणें, व नव्यांत जो ग्राह्यांश असेल त्याची त्याला जोड देणें ही सुधारणेची

खरी दिशा होय. अनंततनयांच्या कृतींत असा जुन्यानव्याचा बेमालूम मिलाफ झाला असल्यामुळें व भाषासौष्ठव, पदलालित्य, शब्दांची समर्पक योजना इत्यादि गुणांनीं त्यांची कविता नेहमींच मंडित असल्यामुळें स्वाभिमानी रसिक मनुष्यास ती तोषकर होते यांत नवल नाहीं. अनंततनय यांची कविता नेहमींच प्रसादयुक्त असते. पण ‘ ईश्वरभक्ति ’ हें तिचें मर्मस्थान आहे. ईश्वरी महात्म्याचा किंवा भक्तीचा जेथें जेथें संबंध येतो तेथें तेथें त्यांचे उद्गार इतके सहज व तल्लीनतेचे असतात कीं, कांहीं बोलायाची सोय नाहीं ! त्याचप्रमाणें परिस्थित्यनुरूप लोकांत स्वाभिमान, राष्ट्राभिमान, प्राचीन इतिहासाभिमान जागृत करणें हें कवीचें कर्तव्य आहे. व तें बजावण्याचा प्रसंग अनंततनय किती दक्षतेनें साधतात याचें प्रत्यंतर या भागांत पुष्कळ मिळण्यासारखें आहे. थोर विभूतींचें यशोगान व स्वाभिमान उद्दीपित करणाऱ्या ऐतिहासिक प्रसंगांचें वर्णन करणाऱ्या अशा बऱ्याच कृति या भागांत आहेत; त्या फार सरस वठलेल्या आहेत. करुण व वत्सल हे दोन रस मूर्तिमंत उभे करण्याची हातोटी अनंततनय यांना किती साधली आहे, हेंही या पुस्तकांतील त्यांच्या अनेक कृतींवरून दिसून येणारें आहे. प्रसंगानुसार काव्यांत विनोदाची छटा असली म्हणजे तें काव्य विशेष आनंददायक होतें; मात्र तो विनोद भारदस्त असावा लागतो. अनंततनय यांच्या कवितेंत हा गुणही चांगलाच दिसून येतो. या पुस्तकांतील विनोदप्रसंगही त्यांनीं मोठ्या कुशलतेनें रंगविलेले आहेत. एकंदरींत प्रस्तुत पुस्तक काव्यरसिकांना आनंददायक झाल्यावांचून राहणार नाहीं.

मुमुक्षु:—‘ अनंततनय ’ हे प्राचीन कवींत प्रतिष्ठित व आधुनिक कवींत अभिमत असे कवि आहेत. असें सौभाग्य आधुनिकांच्या वांट्याला क्वचितच येतें. प्रस्तुत पुस्तकांतील काव्यें वाचून आमचा त्यांच्या काव्यरचनाकौशल्याविषयीं जो पूर्वीपासून अनुकूल ग्रह झाला आहे तो दृढ झाला. प्रथम तरंगावरून कवीची भक्तिप्रवणता दिसून येत आहे. भारतवर्षाच्या अवनतावस्थेचा कवीच्या अंतःकरणावर कसा परिणाम होतो हें प्रस्तुत तरंगांतील प्रत्येक पद्य वाचून ध्यानांत येण्यासारखें आहे. देवावर ज्याचा विश्वास असेल तोच देवावर रुसेल ! प्रस्तुत तरंगांतील चवदाचीं चवदा रत्नें अत्यंत देदीप्यमान अशीं झालीं आहेत. द्वितीयतरंगांतील ‘ मुक्त कोण ’ हें क्रमानें द्वितीय पण योग्यतेनें अद्वितीय काव्य चिमुकलें पण चमकदार आहे. ‘ परतंत्र

कोण ? ' ही कविता चिंतनीय आहे. चवथ्या तरंगांतील ' माझें कुंडल ' ही कविता अत्यंत हृदयद्रावक आहे. ही कविता रूपांतरित असतांही तें मूळ काव्याचें मुळींच मिंधे नाहीं असें म्हणावें लागतें. काव्यव्यासंगी विद्यार्थ्यांनी अनंततनयांच्या काव्याची छाननी करतांना अनंततनय आपलें आत्मतेज ज्यामध्यें अवतरित करितां येणार नाहीं असें एकहि रूपांतर करीत नाहींत हें ध्यानांत धरावें ! चतुर्थ तरंगांतील ' कल्याणची कल्याणी, ' व ' छत फोडतांना ' हीं काव्यें सुंदर साधलीं आहेत. चतुर्थ, पंचम व सप्तम या तीन तरंगांतील काव्यें वाचून अनंततनय हे राष्ट्रीय कवि आहेत असें वाचकांच्या निदर्शनास येईल. अनंततनयांची भाषा सुंदर व सुबोध व प्रायः निर्दोष अशी आहे. म्हणी किंवा म्हणीवजा वाक्यें आपल्या काव्यांत गोंवण्याची यांची धाटणी फार मनोरम आहे. यांच्यापुढें भाषादेवी किती हात जोडून आहे याची प्रचीति 'राजपारितोषिक' या एका कवितेवरूनही येण्यासारखी आहे.

**ज्ञानप्रकाशः**—अनंततनयांच्या हृदयतरंगाचा पहिला भाग ज्यांनीं पाहिला असेल त्यांना या दुसऱ्या भागांतील कविप्रतिभेचा गेल्या चार वर्षांत झालेला उत्कृष्ट उत्कर्ष पाहून विशेष आनंद होईल. जुनें वळण न सोडतां नव्या वळणांतील ग्राह्य वाटला तितका भाग घेऊन आधुनिक काव्यसंपदेंत मनोभावानें भर घालणारे जे विरळ सत्कवि आज आहेत त्यांत अनंततनय हे बहुधा सर्वश्रेष्ठ ठरतील. वामनमयूरांच्या शब्दचमत्कारयुक्त रचनेचें स्मरण करून देणारें पदलालित्य हृदयतरंगांत ठिकठिकाणीं असल्यामुळें प्राचीनाभिमानी रसिकांचासुद्धां अनंततनयांच्या कवितेवर विशेष लोभ आहे. प्रथम तरंगांतील ' कर्धा, ' ' मधुरभक्ति ' व ' जागृत जागृति ' हीं गीतें मधुर आहेत. प्रभुस्तुतिपर कविता सोडून पुढें दृष्टि फेंकिली कीं अनंततनयांच्या प्रतिभेचा उत्कट उत्कर्ष दाखविणारीं राधाकृष्णांचीं नितांत मधुर प्रेम गीतें दिसतात. अनंततनयांच्या प्रतिभेचे अत्यंत रमणीय विलास या त्यांच्या प्रेमगीतांतच आढळतात. हीं सर्वच गीतें गोड आहेत पण त्यांतल्या त्यांत 'हृदयराग, ' 'दर्शनोत्कंठिता राधा' व ' राधा–प्रसादन ' हीं गीतें रसोद्रेकाच्या दृष्टीनें केवळ अनुपम आहेत. ' वंजुल कुंज ' व ' बद वाट किती मी पाहूं ' हीं गाणींही चांगलीं आहेत. अनंततनयांच्या वाणींतले सगळे उत्तम गुण या गीतांत उदित झाले आहेत. ऐतिहासिक कवितांपैकीं ' कल्याणची कल्याणी ' हें कवन उत्कृष्ट व जोरदार आहे. ' माझें कुंडल ' हे कवनही चांगलें आहे.

‘ जाग्रत जागृति ’ व ‘ आक्षेप ’ हीं गीतें हृदयंगम असून अनन्यसुंदर आहेत. त्याचप्रमाणें ‘ परतंत्र कोण ’ हें उपहासपर संवादकवनही अगदीं बहारीचें साधलें आहे. आपलीं अनन्यरम्य बालगीतें आणि मधुर प्रेमगीतें यांच्या प्रभावानें महाराष्ट्रीयांच्या हृदयांत अनंततनयांनीं आजच अढळपद मिळविलें आहे. अशा सत्कवीचा हा गुणसुंदर काव्यग्रंथ सर्व महाराष्ट्रीय रसिक आदरानें आणि आनंदानें संग्रहीं ठेवतील अशी आम्हांस उमेद आहे.

REFBK-0003162

REFBK-0003162

३७६२